म. ग्रं.
विषय
सं. क्र.

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

# कवितासंग्रह

REFBK-0011966
REFBK-0011966

वा. सी. बेंद्रे
संपादक

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 35320 वि: काव्य
क्रमांक 19280 नों. वि: 92/99/68



शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर

यांचा

# कवितासंग्रह

११०६६
REFBK-0011966
REFBK-0011966

संपादक

वासुदेव सीताराम बेंद्रे

पी. पी. एच. बुकस्टॉल, मुंबई ४.

पहिली आवृत्ति : जून १९६१

सर्व हक्क संपादकाच्या स्वाधीन

किंमत : ५ रुपये

मुद्रक : जयंत भट, न्यू एज प्रिंटिंग प्रेस, १९० बी, खेतवाडी मेन रोड, मुंबई ४ येथें छापून त्यांनीं पी. पी. एच. बुकस्टॉलसाठीं १९०-बी, खेतवाडी मेन रोड, मुंबई ४ येथें प्रसिद्ध केलें.

# निवेदन

शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर हे फार मोठे ज्ञानी संत पुरुष होऊन गेले. त्यांचा कवितासंग्रह श्रीगोंदे येथें मिळाला. सतराव्या शतकांतील महाराष्ट्रियांच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा उत्क्रांतीच्या कालांत हिंदुमुसलमानांचे अध्यात्माच्या क्षेत्रांत संबंध कसे जडले होते आणि आर्यांच्या अध्यात्मविचारसरणीची छाप मुसलमान मुमुक्षूंवर बसतांना इस्लामी आचारधर्माची त्यांत सांगड कशी बसूं शकली, हा इतिहास बऱ्याच दृष्टींनीं उद्बोधक होईल असें वाटल्यावरून हा संग्रह पहाण्याचा प्रयत्न केला. ही सांगड बरीच मत्त्हवाची ठरली. अध्यात्मविद्येंत किंवा भक्तियोगांत सामाजिक आचारधर्म व वैयक्तिक व विशिष्ट संस्कार संस्कृति यांचा कोलदंड आड येत नाहीं. इतकेंच नव्हे तर भक्तियोग हा स्वयंपूर्ण कोणत्याहि धर्माच्या व संस्काराच्या आचारआचरणुकींत राहूनहि आचरतां येतो, याची साक्ष पटली. पराविद्या व पराप्राप्ती यांचा संबंध सांसारिक किंवा व्यावहारिक आचारविचारांपासून जरूर त्या अभ्यासकालांत तोडतां येतो. इस्लामी धर्मांत कुराणाची जी शिकवण आहे तींत मानवधर्मच सांगितला आहे, अध्यात्मवाद नाहीं. त्यामुळें अध्यात्माला इस्लामी आचारधर्मांत सामावून घेतांना मुमुक्षूची स्थिति अडचणीची होते किंवा कसें याचा पडताळा येथें पहावयास मिळेल या उद्देशानें हा संग्रह अभ्यासला. श्री. मलंगबुवा, श्री. भुजंगराव रावळ, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार व कै. श्री. शंकरराव देव यांनीं आपले संग्रह दाखविले व वापरण्यास दिले, त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. माझे मित्र श्री. माधवराव बहुळकर यांनीं आपल्या वृद्धापकालांतहि मनोभावें मदत करून मला शेख महंमदबाबांच्या कवितासंग्रहाचे दोन भाग संपादण्यांत यश मिळवून दिलें, त्याबद्दल त्यांचाहि मी फार ऋणी आहे. या संग्रहांतील ऊर्दू मराठीकरण केलेल्या कवितांचा भाग माझे मित्र खानसाहेब यांनीं आपल्या छापखान्याच्या जिकीरीच्या कामांतूनहि वेळ काढून तपासून दिला, त्याबद्दल त्यांचेहि आभार मानतो. पहिला भाग "योगसंग्राम" हा इ. स. १९५९ च्या जून महिन्यांत प्रकाशित झाल्यानंतर हा दुसरा भाग शक्य तों लौकर प्रकाशित करण्याची पी. पी. एच. बुकस्टॉलच्या चालकांनीं जी तत्परता दाखविली त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होत. मूळ संकल्प असा होता कीं, या भागाला महामहोपाध्याय दत्तोपंत पोतदार यांची शेख महंमदांच्या

लेखनसंभारावर वाङ्मय दृष्ट्या विचारपरिप्लुत अशी प्रस्तावना जोडावी. त्यांनीं तसें करण्याचें मान्यहि केलें होतें. परंतु त्यांचेवर पडलेला लोककार्याचा भार आणि शिवाजी महाराजांच्या चरित्राची किचकट व श्रमसायासाची कामगिरी आणि विशेषतः त्यांचें सध्याचें प्रकृतिमान हे लक्षांत घेऊन त्यास या संकटांत घालण्याचें मी धाडस केलें नाहीं. अर्थात् पहिल्या भागांत योजिल्याप्रमाणें महामहोपाध्याय दत्तोपंतांची विद्वत्तापूर्ण प्रस्तावना या भागांत येऊं शकली नाहीं, म्हणून क्षमस्व.

या संग्रहाच्या प्रकाशनार्थ पुणें विश्वविद्यापीठानें पांचशें रुपयांचें अनुदान दिलें. त्यामुळें या प्रकाशनाची छपाई वगैरे त्वरित करून घेण्यास फारच मदत झाली. या अमोलिक साह्याबद्दल प्रकाशकांबरोबर मीहि विद्यापीठाचा फार ऋणी आहे.

पुणें ४.
अक्षयतृतिया,
१७ एप्रिल १९६१

वा. सी. बेंद्रे

# अनुक्रमणिका


| | गीत क्रमांक | पृष्ठ |
|---|---|---|
| प्रास्ताविक (पृ. ९–३३) | | |
| १. पवनविजय (पृ. १–२८) | | |
| १. तत्त्वसार | १–९० | १ |
| २. पवनविजय | ९१–४१२ | ६ |
| ३. काळ(मृत्यु)ज्ञान | १–७० | २५ |
| २. निष्कलंक प्रबोध (पृ. २९–४४) | १–३४ | २९ |
| ३. प्रकरणें (पृ. ४५–४९) | | |
| १. गायका | ३५–३८ | ४५ |
| २. मदालसा | ३९ | ४७ |
| ४. सद्गुरुमहिमा (पृ. ५०–५५) | ४०–६४ | ५० |
| ५. भक्तिबोध (पृ. ५६–७६) | | |
| १. भक्ताभक्त | ६५–७२ | ५६ |
| २. योगी | ७३–७६ | ५८ |
| ३. साधुअसाधु | ७७–८८ | ६० |
| ४. भावभक्ति | ८९–९६ | ६३ |
| ५. नाममहिमा | ९७–१०४ | ६४ |
| ६. पंचतत्त्वें | १०६–१०८ | ६६ |
| ७. द्वैताद्वैत | १०९–११५ | ६७ |
| ८. विवेक | ११६ | ६८ |
| ९. स्वानुभव | ११७–१२४ | ६८ |
| १०. आत्मज्ञान | १२५–१४० | ७० |
| ११. ब्रह्मज्ञान | १४१–१४३ | ७३ |
| १२. कूट | १४४–१५१ | ७४ |
| ६. आचारबोध (पृ. ७७–९४) | | |
| १. नरदेह | १५२–१६८ | ७७ |
| २. जन्म–मरण | १६९–१७२ | ८० |

| | | |
|---|---|---|
| ३. यातिश्रेष्ठत्व | १७३–१७६ | ८१ |
| ४. यवन | १७७–१८० | ८२ |
| ५. सोंवळें ओंवळें | १८१–१८३ | ८३ |
| ६. तीर्थें व्रतें | १८४–१८८ | ८४ |
| ७. दुष्ट दुर्जन | १८९–१९५ | ८५ |
| ८. पाखांडी | १९६–२०० | ८७ |
| ९. स्त्रैण | २०१–२०२ | ८८ |
| १०. संचित | २०३–२०८ | ८८ |
| ११. आचारबोध | २०९–२३० | ८९ |

७. रुपकें वगैरे (पृ. ९५—१११)

| | | |
|---|---|---|
| १. गणेश–विनायक | २३१–२३२ | ९५ |
| २. राम | २३३ | ९६ |
| ३. विठ्ठल | २३४–२३५ | ९६ |
| ४. पंढरी | २३६–२४० | ९६ |
| ५. ललित | २४१ | ९८ |
| ६. वासुदेव | २४२–२४४ | ९८ |
| ७. जोगी | २४५ | ९९ |
| ८. पांगुळ | २४६–२४७ | ९९ |
| ९. वणजारा | २४८ | १०० |
| १०. सौरी–मुंढा | २४९–२५० | १०० |
| ११. कैकाये | २५१–२५२ | १०१ |
| १२. जखडी | २५३ | १०३ |
| १३. फतेहनामा | २५४ | १०३ |
| १४. महात्मा | २५५ | १०४ |
| १५. तेली | २५६ | १०४ |
| १६. नापिक | २५७ | १०४ |
| १७. हाटकरी | २५८ | १०५ |
| १८. कवि | २५९–२६० | १०५ |
| १९. तरू–झाड | २६१–२६२ | १०५ |
| २०. हिंदोळा | २६३–२६५ | १०६ |
| २१. राधा | २६६ | १०७ |
| २२. आशिर्वाद | २६७ | १०७ |
| २३. श्राप | २६८ | १०७ |
| २४. कलियुग | २६९–२७० | १०७ |

| | | |
|---|---|---|
| २५. प्रळय | २७१ | १०८ |
| २६. दोहोरे | २७२–२७३ | १०९ |
| २७. आरत्या | २७४–२८० | १०९ |

८. हिंदुस्थानी कवित : (पृ. ११२–११८)

| | | |
|---|---|---|
| १. वासुदेव | २८१ | ११२ |
| २. ललित | २८२ | ११२ |
| ३. नसिहतनामा | २८३ | ११२ |
| ४. पंचीज मुसलमानी | २८४ | ११३ |
| ५. आरत्या | २८५–२८७ | ११३ |
| ६. स्फूट कविता | २८८–३०२ | ११४ |
| ७. दोहोरे | ३०३–३१४ | ११७ |

९. शेख महंमदबाबा यांच्या चरित्रपर–अन्य लेखक (पृ. ११९–१३४)

| | | |
|---|---|---|
| १. चरित्र | ३१५–३२१ | ११९ |
| २. सिजरा | ३२२ | १२३ |
| ३. अनामिक–चरित्रपर | ३२३–३२४ | १२४ |
| ४. मुकुंदराज–गुरुपरंपरा | ३२५ | १२५ |
| ५. मुधा पांगुळ | ३२६–३२८ | १२५ |
| ६. अजम | ३२९ | १२६ |
| ७. दावलजी | ३३० | १२७ |
| ८. हाकीम | ३३१ | १२८ |
| ९. दयाळदास | ३३२ | १२८ |
| १०. रामदास | ३३३ | १२८ |
| ११. रघुनाथयोगी | ३३४ | १२९ |
| १२. अनामिक | ३३५–३३७ | १२९ |
| १३. हरदासी साकी | ३३८ | १३० |
| १४. हरदासी आर्या | ३३९ | १३० |
| १५. दुचेष्मा | ३४० | १३० |
| १६. चंद्र बोधले यांची कविता | ३४१–३४३ | १३४ |

**गीत–सूचि** १३५–१४६

# प्रास्ताविक

धार्मिक, सामाजिक, राजकीय, तांत्रिक आदि सर्व विषयांतील तत्त्वज्ञान नेहमींच अस्पष्ट व अपूर्ण अशाच अवस्थांत अवगाहन करण्यांत येतें. कारण ही दृष्टि पुढें त्या विषयांत अनुभवानें अधिकाधिक सूक्ष्म होत जाते. कोणत्याहि तत्त्वज्ञानाची पूर्णावस्था ही तर्कातीतच राहते. कोणतेंहि तत्त्वज्ञान असो, त्यांतील ध्येयसिध्यर्थ जे आचार विचार रूढ होतात त्यांत उत्क्रांतीचीं आंदोलनें सारखीं चालूच असतात. मात्र हीं आंदोलनें इतकीं मंदगति असतात कीं, त्यांचे हेलकावे समाजाला क्वचितच जाणवतात. मानवी प्राणी मात्र प्रगताप्रगत कालौघांत दृढ विश्वास किंवा श्रद्धा यांची कास धरल्यानें रमून गेलेला दिसतो. तत्त्वज्ञानाची व्याप्ती इतकी मोठी व मिश्र असते कीं, तींत जुन्या नव्या सर्व कल्पना अथवा तर्क वितर्क सहजपणें सामावून गेलेले किंवा समरस झालेले भासतात. परंतु तत्त्वज्ञानाच्या ध्येयास अनुसरून जे आचार विचार रूढ केले जातात त्याबाबत मात्र तशी परिस्थिति नसते. सामान्यतः परंपरागत आचारांवर दृढ श्रद्धा जडल्यानें त्यांत फेरबदल न करण्याकडेच साहाजिक ओढा राहतो. परंतु बदलती सांसारिक, व्यावहारिक आणि आर्थिक परिस्थिति अशा आचारांत क्रांति करण्याची निकड लाविते. या झगड्यांत तत्त्वज्ञानाची दिशा किंवा बैठक न बदलली गेली तरी आचारविचारांत क्रांति घडून येतेच. ह्या क्रांतिमुळें जरी वादविवाद, विरोधनिरोध, आग्रहनिग्रह, कितीहि क्षोभित होत असले तरी वास्तवतेच्या अगर तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें होणारी ही उत्क्रांति आपली वाटचाल थांबवीत नाहीं. परंतु समाज हा हीहि उत्क्रांतावस्था आत्मसात करून नवीन उत्क्रांतीच्या क्षेत्रांत शिरतांच ती विसरून जातो आणि आपली परंपरागत आचारविचारपद्धति अबाधित असल्याचें अज्ञानानें मानीत रहातो. इतिहास मात्र अशा सर्व क्रांतिउत्क्रांतींची मोजदाद तत्कालीन मूल्यांवमूल्यांवर करून आकलनीय तत्त्वज्ञानाचें स्वरूप अथवा प्रगमनशीलता विशद करून दाखवितो. तोच परंपरानिष्ठ समाज या क्रांतीच्या किंवा उत्क्रांतीच्या तपशीलांवरून तत्कालीन समाजाच्या प्रगतिपर किंवा अप्रगतिपर धोरणांबाबत अगर वागणुकीची भलीबुरी बरीवाईट चिकित्सा करतो. सारांश, तत्त्वज्ञानाचें स्वरूप कालगतीनें जसें अधिकाधिक स्पष्ट वा सतेज होत जातें तसतशी तत्त्वज्ञानाच्या ध्येयपूर्तिसाठीं जी आचारआचरणूक पाळली जाते तीहि कालाच्या मुसेंत तावून सुलाखून निघते आणि जागतिक प्रगतीबरोबर सकस होत जाते. मात्र ही प्रगति इतकी मंदगति असते कीं, तिनें केलेला हा कायापालट मानवास सहजपणें दृग्गोचर होऊं शकत

नाहीं. चिकित्सा व ऐतिहासिक संशोधन मात्र या बदलत्या स्वरूपाची चांगलीच जाणीव करून देतात. या जाणिवेनें मानव संस्कृतीनें अधिक प्रगमनशील होतो. हा उत्क्रांतिकाल समाजाला व धर्माला मोठा आदर्शभूत ठरतो. सुदैवानें महाराष्ट्रास असा काल सतराव्या शतकांत लाभला होता. याच कालांत राजकीय क्षेत्रांत शिवाजी महाराज व संभाजी महाराज, धार्मिक क्षेत्रांत गागाभट्ट व अनंतदेवभट्ट आणि पराविद्येच्या क्षेत्रांत शेख महंमद, तुकाराम, जयराम, रामदास, रंगनाथ, आनंदमूर्ति, केशवस्वामी आदि संत महंत यांनीं महाराष्ट्रांत फारच मोठें लोककार्य करून आपलीं नांवें अजरामर करून ठेविलीं आहेत.

पराविद्येच्या सृष्टींत सर्वच फलनिष्पत्ति अगोचर असते. त्यामुळें पराविद्येच्या अभ्यासाच्या मार्गांत व अनुभवाच्या जाणिवेंत भिन्नाचार व भिन्न मतवाद उत्पन्न झालेले दिसतात. आचारविचारांच्या संघर्षानें तत्संबंधीय आचारांत क्रांति मात्र त्वरित जोम धरते. ही क्रांति जरी मुमुक्षूस तेव्हढी जाणवत नसली तरी ती सारखी होतच राहते. वेदांचें प्रागतिक स्पष्टीकरण उपनिषदांनीं व त्यावरील टीकाकारांनीं केलें. पुढें ब्राह्मणें, पुराणें, उपपुराणें, स्तुतिस्तोत्रें आदि ग्रंथांनीं भर घालून वेदांतील किंवा पूर्व आर्यसंस्कृतीनें जोपासलेलें तत्त्वज्ञान अधिकाधिक प्रगत व स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. तत्संबंधीय आचारांतहि वेदकालीन निसर्गपूजनानंतर शिवपार्वती आदि देवतांना महत्त्व प्राप्त झालें. शिव–देवी–गणेश या आदिशक्तींच्या साह्यानें योगादि साधनांचें सामर्थ्य पुष्कळ उपभोगल्यानंतर इतर देवदेवतांच्या पूजावंदनांच्या मार्गांची पराप्राप्तीसाठीं आचारांत योजना करण्यांत आली. पराधर्मांत अष्टांग योगाच्या साह्याची प्रतिष्ठा वाढली. ज्ञानयोगाला समाजाच्या वरच्या पातळींत साहाजिकच मोठें स्थान प्राप्त झालें. जीवात्म्यांच्या ओळखीसाठीं प्राणायाम–मन–बुद्धीचें नियंत्रण आवश्यक भासलें. ध्यान धारणा आदि गोष्टी रोजच्या कार्यक्रमांत प्रविष्ट झाल्या. सामान्य जनांत त्यामुळें व्रतवैकल्यांची सांगता जोरावूं लागली. मंत्रापेक्षां तंत्रावरच अधिक भर देण्यांत येऊं लागला आणि पुढें या आचारांचें महत्त्व कमी होऊन व्रतवैकल्यांच्या सांगतेंतील दानादिकांतच मानव भलाई मानूं लागला. ज्ञानमार्ग अनाकलनीय म्हणून सामान्य जनता आचारधर्मावरच सारी भिस्त ठेवून आपल्या परासाधनांबाबत सुखसमाधान मानूं लागली. पराविद्येचा अभ्यास मात्र योगसाधनांवर कायमचा आधारला गेला. स्त्रियांच्या बाबतींत जरी योगमार्ग त्यांच्या शारीरिक निर्बलतेमुळें त्यांस आचरतां येण्यासारखा नव्हता तरी त्यांस नमस्कार, प्रदक्षिणा आदि ध्यानधारणेस उपयुक्त अशीं साधनें निर्माण केलीं गेलीं होतीं. पातिव्रत्यांतील एकनिष्ठा परानिष्ठेंत परिवर्तन करून त्यांना पराप्राप्तीचा सुलभ मार्ग रूळावून दिला होता. त्याचबरोबर या समाजाच्या मोठ्या भागास ऐहिक सुखस्वास्थ्यासाठीं विशेष व्रतवैकल्यांची जोड करून दिल्यानें मूळ आचारांतील ध्येयवाद किंचित् डळमळूं लागला.

अशा अस्थिर वातावरणांत अनार्य लोकांच्या संघर्षानें त्यांच्या धार्मिक समजुती आर्यकुलांनीं जशा स्वीकारल्या तसेंच आचारधर्मांतील पुष्कळ महत्त्वाचे आचार देशकालविप्लवादि कारणांमुळें लोपले होते. पतिव्रताधर्मांतील आचारांत पराप्राप्तीच्या दृष्टीनें केलेलें मूळ वैचारिक परिवर्तन तितकें जागरूक राहिलें नाहीं. योगबलानें बुद्धीचें विकसन करून घेऊन व त्या बलानें मन जिंकून पराप्राप्तीसाठीं ध्यान धारणा साधण्याची पुरुषांची शक्ति दिवसेंदिवस ऱ्हास पावत गेली. साहाजिकच समाजाचा फार मोठा भाग पराप्राप्तीच्या आकांक्षेपासून विन्मुख झाला. अशा क्रांतिकालांत परधर्मियांच्या संघर्षानें निरनिराळे पंथ व मार्ग यांचें अवडंबर माजूं लागलें. ज्या कारणांमुळें ही अवनतावस्था प्राप्त झाली तीं कारणें दूर करण्याकरितां तत्कालिन युक्त अशा आचारविचारांच्या बैठकींत भक्तिमार्गाचा पुरस्कार करून ही झालेली आचारधर्माची व त्याचबरोबर पराधर्माची हानी भरून काढण्याचे मुसलमानी रियासतींतच जोरदार प्रयत्न झाले. त्यामुळें धर्माचा मुख्य आधार, जी पराप्राप्तीची आकांक्षा, तो पुन्हां बलवान होऊन लोकांची प्रवृत्ति पराप्राप्तीकडे अधिकच ओढवली आणि ज्या कारणांनीं समाजांत धार्मिक विमनस्कता वाढली होती त्याकडे जनता दुर्लक्ष करूं लागली व पराधर्मविषयक तेढ बहुसंख्य समाजांतून कमी कमी होऊं लागली. शेवटीं या आचारधर्माला कांहीं काळ जें महत्त्व प्राप्त झालें होतें तें समाजांतून नाहींसें झालें. या धार्मिक जागृतीस राजकीय संघटित सामर्थ्याचा आधार मिळाल्यामुळें ती अधिक संघटित स्वरूपांत आपलें बल वाढवूं लागली. भक्तियोगाचें प्राबल्य वाढलें. या धार्मिक क्रांति उत्क्रांतीच्या तपशीलांतील भेद जरी विचारांत न घेतले तरी मागील हजारों वर्षांच्या काळांत या पराविद्येच्या मार्गांत कितीतरी घडामोडी झालेल्या होत्या. त्यांतील आंदोलनांत या मार्गाचें मूळ स्वरूप कितीतरी बदललें गेलें होतें. तरीहि सामान्य लोकसमजांत व दंतकथांत तसें झाल्याची दखल न घेतली गेल्यानें एवढी मोठी क्रांति झाली असतांनाहि आम्ही वेदकालीन तत्त्वज्ञानापासून च्युत अगर प्रगत झालों असल्याची ग्वाही न देतां उलट आम्ही पूर्व परंपराच कायम राखली आहे अशीच सामान्य समजूत रूढ होऊन राहिली होती. कारण कीं, अस्पष्ट व अपूर्ण अशा अवस्थेंत दृग्गोचर होणारें तत्त्वज्ञान अधिक स्पष्ट व सतेज झाल्याचा भास अनुभवानें होणें हा निसर्गसिद्धच नियम आहे. जोपर्यंत वेदकालापासून अभ्यासिलेलें निसर्गज्ञान पूर्णावस्थेप्रत पोंचत नाहीं तोंपर्यंत तो अभ्यास एकाच ध्येयासाठीं असल्याची जाणीव बलवत्तर राहणें स्वाभाविक आहे. या पराविद्येच्या साधनमार्गांतील क्रांतिउत्क्रांतीचा विस्तार ऐतिहासिक समालोचनानें करणें येथें अप्रस्तुत होईल. फक्त सतराव्या शतकांतील क्रांतीची पूर्व भूमिकाच लक्षांत घेणें जरूर आहे.

वेदत्रयींतील महत्तत्त्वें जरी अबाधित रहाणारीं होतीं तरी नंतर सामाजिक आचारविचारांच्या क्रांतीबरोबर चतुर्थ वेदाची जोड द्यावी लागली. तत्त्वांच्या

 मराठी ग्रंथ सं... हा... स्था

सूत्रांचा अर्थ प्रगत मनोभावनांना पटवून देण्यासाठीं उपनिषदांनीं आपली शक्ती खर्च केली. उपनिषदांतील मूळ तत्त्वें विशद करून सामान्य जनतेच्या आचारविचारांत उतरविण्यासाठीं कालमानाप्रमाणें पुराणें, उपपुराणें आणि स्मृतिशास्त्र ग्रंथांनीं आपापल्यापरी प्रयत्न केले. यज्ञकर्मातून वर्णाश्रमधर्म, आचारधर्म, यातीधर्म, सतातनधर्म वगैरे समाजरचनेचे किंवा सामाजिक संघटना आणि सहकारित्व दृढ राखण्यासाठीं कालाच्या ओघाबरोबर निरनिराळे प्रयत्न होत गेले. याच कालौघानें समाजरचनेंत, ज्ञानविज्ञानांत, आचारआचरणुकींत, जीवनविषयक आशेआकांक्षेंत व परस्पर संबंधांत वाढती विविधता, अनेक वैचारिक परंपरा आणि शास्त्रें, उपशास्त्रें कला वगैरेंचा विस्तार अधिकाधिक होण्यास कारण झालीं आणि कालौघांत वाढत्या विविधतेबरोबर हा व्याप वाढतच राहाणारा होता. परंतु या व्यापामागील मूलभूत तत्त्वें मात्र अबाधित रहात आलीं आहेत ही गोष्ट लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं. आर्यधर्माव्यतिरिक्त इतर धर्मांतहि ही क्रांतिउत्क्रांतीची परंपरा दृष्टीस पडते. यहुदी धर्मातील मूळ तत्त्वांना वेळोवेळीं उजाळा देण्याचें कार्य त्यांच्यांतील द्रष्ट्यांनीं किंवा प्रेषितांनीं केलें. कालांतरानें या यहुदीधर्माला ख्रिश्चन धर्मसंस्थापनेंत परिणत व्हावें लागलें. तेव्हां त्या धर्मतत्त्वांना बायबल किंवा "न्यू टेस्ट्यामेंट"चें स्वरूप प्राप्त झालें, आणि पुढें त्यांतूनच इस्लामी धर्मानें आपला प्रचार व प्रसार कुराणाच्या साह्यानें केला. कुराणांतील विशेष म्हणजे "This the Quran relates to the children of Israel most of what they defer in" (Chap. 27 No. 76). या व इतर सर्व धर्मांत किंवा धार्मिक संघटनांत परिस्थितीबरोबर आचारविचार व आचारविचारांबरोबर मूळ तत्त्वांचें स्वरूप बदलत गेलें आहे. असा बदल होत जाणें हा सृष्टिक्रमच आहे. म्हणून कोणत्याहि माणसाच्या धार्मिक भावनांचा विचार करितांना या सामान्य सृष्टिक्रमाकडे डोळेझांक करून चालणार नाहीं.

मानवधर्माचीं मूलभूत तत्त्वें म्हणजे जीवनस्वास्थ्य, समाजस्वास्थ्य आणि मनस्वास्थ्य हीं होत. मनुष्य आपल्या जीवनस्वास्थ्याबाबत सृष्टिक्रमान्वयें जन्मापासूनच धडपड करितो. जीवनस्वास्थ्यास आवश्यक म्हणून नंतर तो जरूरीपुरता समाजस्वास्थ्याचाहि विचार करूं लागतो आणि या दोन्हींहि प्रयत्नांनीं मनःस्वास्थ्य राहीनासें झाल्यानें जीवनस्वास्थ्यास धोका भासूं लागला कीं मग तो मनःस्वास्थ्याचा विचार करूं लागतो. परंतु मानवी जीवन परावलंबी होत राहिल्यानें हे दोन्हीहि उपाय तितके फलदायी होऊं शकत नाहींत. मानवधर्मास अत्यंत आवश्यक झालेल्या या मनःस्वास्थ्याकडे साहाजिकच मानवीप्राण्याचें लक्ष अधिकाधिक वेधूं लागणें अपरिहार्य होत गेलें. मानवहि या आवश्यक बाबीकडे अधिक चिकित्सापूर्ण दृष्टीनें व बारकाईनें लक्ष पूरवूं लागला आणि या दृष्टीनें जीं जीं कांहीं साधनें निर्माण करितां आलीं किंवा होऊं शकलीं तीं तीं अभ्यासानुभवानें तावून

सुलाखून घेण्याचा प्रयत्न करूं लागला. अर्थात् या साधनांची निर्मिती व त्यांतील प्रगति हीं त्या त्या कालांतील परिस्थितीवर अवलंबून राहिल्यामुळें कालाबरोबर या साधनमार्गांतहि जशी विविधता उत्पन्न झाली तशीच त्या मार्गांत सहजसुलभता व पूर्णावस्था साधण्याचे सारखे प्रयत्न होत राहिले. कालगतीबरोबर ही पूर्णावस्थाहि गतिमान असल्यानें या प्रयत्नांना शास्त्राचें स्वरूप आलें. शास्त्र म्हणजे प्रगत ज्ञानानुभवानें अस्पष्ट व अज्ञात असलेल्या सृष्टिक्रमाच्या शोधनाभ्यासाचा क्रम. हा शास्त्राभ्यास सारखा चालूच राहाणारा व न संपणारा असा विषय आहे. दृष्टिगोचर होणाऱ्या क्षितीजाजवळ जाऊं लागतांच तें दूरच दूर राहिल्याचा निर्वाळा यांतहि मिळत असल्याची साक्ष पटते. मात्र जे आपली वाटचाल एखाद्या मतपरंपरेशीं मर्यादित करितात त्यांना आपलें ध्येय मिळाल्याचा आभास होतो आणि ते तेवढ्यावरच संतुष्ट राहातात. ही जरी मानवधर्माच्या मूलभूत तत्त्वांची क्रमपद्धति असली तरी सामाजिक संघटनेपर्यंतची वाटचाल पूर्ण न केलेल्या अशा वन्य अगर मागासलेल्या जाती–जमातींना फक्त जीवनस्वास्थ्याचाच विचार करण्याची आवश्यकता भासते, तर ज्यांनीं समाजसंघटनेच्या परिस्थितींत प्रवेश केला त्यांना समाजस्वास्थ्याबाबतच झगडा देण्याची जरूरी भासते. मनःस्वास्थ्याची निकड भासलीच तर हा समाज कांहीं काल ती निकड ऐहिक सुखासमाधानालाच मर्यादित धरून ती भागविण्याचे प्रयत्न करीत रहातो. पाश्चिमात्य देशांत समाजस्वास्थ्यांतच शक्य तों मनःस्वास्थ्य साधण्याचा प्रयत्न होत आला. मनःशांतीसाठीं अध्यात्माची जोड करून घेण्याची पौर्वात्य प्रवृत्ति वाढविण्याचे प्रयत्न केले गेले नाहींत. परंतु कालांतरानें म्हणजे बऱ्याच उशिरां मनःस्वास्थ्यासाठीं उपाय शोधण्याचे प्रयत्न सुरू झाले. सारांश, मनःस्वास्थ्य मिळविण्याची निकड परिस्थित्यनुरूप सर्वांनाच भासते. पण तें स्वास्थ्य मिळविण्याचे मार्ग, आकांक्षा आणि मर्यादा मात्र प्रकृती-भिन्नतेबरोबर भिन्नच राहतात.

मनःस्वास्थ्य मिळविण्याचे दोन प्रकार आहेत. कामिक आणि पारमार्थिक. कोणत्याहि फलाकांक्षेनें मनास लावून घेतलेला तापशमनार्थ इच्छित फल प्राप्त करून घेण्यासाठीं झालेला प्रयत्न तो देहव्यापार होय. ऐहिक बाबतींत ही फलाकांक्षा तृप्त होणें हें केवळ मनुष्याच्या प्रयत्नांवर अवलंबून राहात नसतें. त्यामुळें ऐहिक विषयसुखांत मनःस्वास्थ्याची प्राप्ती निश्चित नसते. मनुष्य कधीं मधीं दैवी शक्तींवरहि हवाला टाकून आपलें ऐहिक सुख मिळविण्याचा प्रयत्न करितो. हे प्रयत्न दोन तऱ्हेनें केले जातात. कांहीं व्रतवैकल्यांचें आचरण करून इच्छित साधण्याचा प्रयत्न करितात तर कांहीं दैवी शक्तीचा अनुग्रह मिळवून फलसिद्धीची आकांक्षा धरितात. अशा प्रयत्नांना कधीं मधीं यश लाभलेंच तर तेंहि तें मनःस्वास्थ्य क्षणिकच राखण्यापुरतें समर्थ असतें. उलट ऐहिक सुखस्वास्थ्याच्या लाभालाभासाठीं सारखी धडपड करीत राहिल्यानें चित्तमनाला

शांति मिळूं शकत नाहीं. शांतीसाठीं मानवप्राणी विश्रांति मिळावी ही अपेक्षा धरून तसेहि प्रयत्न करून मनाला विरंगुळा पाडून घेतो. परंतु हीहि विश्रांति क्षणिक फलदायी ठरते. शिवाय एका फलाकांक्षेच्या पूर्तींतून अनेक आशाआकांक्षांना जन्म मिळत राहिल्यानें ऐहिक सुखांत निरंतरची शांति मिळणें दुरापास्त होते. अशावेळीं मनुष्य ऐहिक संसारांत राहूनहि मनःस्वास्थ्य मिळविण्यासाठीं पारमार्थिक विचारआचारांची जोड देण्याचा प्रयत्न करतों. हे पारमार्थिक आचारविचारांचे मार्ग म्हणजे सकाम व निष्काम उपासना हे होत. ज्या उपासनेचें ध्येय मर्यादित व मनबुद्धीला व्यक्त असते ती सकाम उपासना होय. अमर्याद परमोच्च ध्येयावर लक्ष ठेवून जी उपासना होते ती निष्काम उपासना होय. कारण अशा उपासनेंत अखंडता रहाते व सामान्य फलाकांक्षेनें चित्तमनाला चलन मिळण्याचें कारण त्यांत रहात नाहीं. चित्तमनाची स्थिरता ही शांतीची सुरुवात होय. उपासनेच्या गुणावगुणांवर म्हणजेच बलाबलावर पारमार्थिक सुखाचा आनंद कमीअधिक होतो. हे गुणावगुण त्या त्या प्रदेशांतील किंवा धार्मिक संघाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परिस्थित्यनुरूप भिन्न भिन्न प्रकारानें मानले जातात.

सृष्टीची उत्पत्ति स्थिती आणि लय यांचा क्रम, निसर्गाच्या रचनेंतील व सौंदर्यांतील विविधता, निसर्गांत दृग्गोचर होणारा पंचमहातत्त्वांच्या शक्तिसामर्थ्याचा किंवा चांचल्यतेचा दृश्यादृश्य परिणाम, यांच्याशीं समरसतेनें झगडण्याचा योग सारखा येत राहिल्यानें मानवी प्राण्याच्या उत्पत्तिस्थितीलयाचा चिकित्सापूर्ण विचार करणें भाग पडलें. त्यामुळें आर्यसंस्कृतीवर याच आचारविचारांचें अधिष्ठान अधिकाधिक बसत गेलें. पशुपक्षी, मुंगी, कीटक, सर्प, वृक्षवल्ली, नद्या, सरोवरें, वगैरेंतील जीवप्राणीं आदींचे जीवनक्रम बारकाईनें पारखून त्यांतून उपयुक्त असें अनुभवज्ञान आपल्या आचरणांत आणून आपलें शरीरस्वास्थ्य, चित्तनिग्रह आणि मनबुद्धीच्या सामर्थ्याची जोपासना, उपयोग व विकास करण्याकडे द्रष्ट्यांचें लक्ष वेधलें गेलें. त्यांनीं मानवी जीवनक्रम व जीवनसाफल्य आपल्या मनबुद्धीच्या नियंत्रणाखालीं आणण्याची आकांक्षा धरिली आणि त्या आकांक्षेनें नवे नवे आचारविचार रूढ करून मानवी प्राण्याची प्रगति करण्याची काळजी घेतली. यज्ञ, निसर्गपूजन, व्रतवैकल्यें, योगाभ्यास, पराज्ञान, पराभक्ति आदि निरनिराळ्या मार्गांना शास्त्रशुद्ध बैठक देण्याचा प्रयत्न करून आर्यांनीं ऐहिक जीवनाबरोबर आपल्या पारमार्थिक जीवनाच्या पूर्णतेवर आपला विशेष भर ठेविला. त्यामुळें भारतीय संस्कृतींत पराविद्या व पराज्ञान याचाच पगडा मानवी मनावर अधिक बसला. साहाजिकच सामाजिक स्वास्थ्य संपादण्यांत सुलभता प्राप्त झाली आणि राजकीय शासन पद्धतीला समाजव्यवस्थेंत तितकें लक्ष देण्याची गरज राहिली नव्हती. आर्यसंस्कृतींत पराविद्येची सारखी प्रगति होत होती तरी प्रत्यक्ष आचारधर्मांत या पराविद्येच्या सर्वच प्रगत तत्त्वांचें सर्राह अविरोध किंवा सरमेसळीविना अवलंबन

केलें जात होतें अशांतला प्रकार नव्हता. व्यक्तिस्वार्थ किंवा गटागटांच्या स्वात्म-महतीसाठीं चाललेल्या प्रयत्नांमुळें त्यांच्यांत तत्त्वें सांगणाऱ्या सूत्रांचे आपापल्यापरी अर्थ लावण्याची अहमहमिका सारखी चालूच राहिली. ह्या टीकाटिपण्यांच्या साह्यानें जी चर्चाचिकित्सा झाली ती सामान्य जनतेला त्या तत्त्वांच्या मूलार्थाबद्दल भ्रमच उत्पन्न करूं लागली. सामान्य व सहजाकलनीय तत्त्वेंहि गूढ, वादास्पद किंवा अनाकलनीय होऊन बसलीं. बौद्धधर्मतत्त्वांबद्दल इत्सिंगनें जें सातव्या शतकांत (६७१ ते ६९५ इ. स.) लिहिलें आहे तें हिंदु पराविद्येच्या शिकवणुकीसाठीं अनुभवानें म्हणून अत्यंत सुलभतेनें सांगितलेल्या तत्त्वांनाहि लागू पडतें. इत्सिंग लिहितो :

"As when a river has overflowed, and its water has been swept into a deep well, a thirsty man wishing to drink of the pure water of the well could only procure it by endangering his life, so it is difficult to gain knowledge of the Vinaya after it has been handled by many men. Such is not the case when we simply examine the Vinaya texts themselves . . . . so people are led to confusion if we go on arguing things too much . . ."[१]

ही उक्ति योगसूत्रांच्या बाबतींत व परातत्त्वबोधाच्या बाबतींत शब्दशः लागू पडते. सामान्यपणें आचरणांत असलेले प्राणायाम–आसन–ध्यान–धारणादि आचार एक दुर्घट व अनाकलनीय शास्त्र होऊन बसलें आहे. हीच परिस्थिति वर्णाश्रम-धर्माचारांची. वैयक्तिक हिताहित संबंध त्यांत इतके घुसडले गेले कीं, त्यामुळें अखिल स्त्रीसमाज तर पराधर्मीय शिकवणुकीला मुकलाच, पण पुरुष समाजांतील बहुसंख्य शूद्र व बराच द्विजसमाजहि पराविद्येच्या आचारआचरणुकीला मुकविला. परंतु सुप्तावस्थेंत पडून राहिलेला समाज जागृति धरतांच आपल्या धार्मिक उत्क्रांतीचा मार्ग आक्रमूं लागतो आणि या क्रांतिकालांत संस्कृति व संस्कार यांचे प्रगत स्वरूप अधिक सतेज झालेलें आढळून येतें. अशीच क्रांति श्रीमत्भागवताच्या रचनाकालांत होत होती. कदाचित आर्यधर्माच्या इतिहासांत हा क्रांतिकाल अत्यंत महत्त्वाचा होऊन गेला असें मानावें लागतें. भागवतरचनेचा उद्देशच मुळीं ही क्रांति करण्याचा होता. जनतेंत वाढलेल्या विषमतेला दूर करून समाजस्वास्थ्य दीर्घायु करण्याचा होता. हा उद्देश भागवतांत स्पष्टपणें सर्वत्र सांगितलेला आहे. "स्त्रीशूद्रद्विजबन्धूनां त्रयी न श्रुतिगोचरा। कर्मश्रेयसि मूढानां श्रेय एवं भवेदिह ॥ इति भारतमाख्यानं कृपया मुनिना कृतम् ॥२५॥ (स्कं. १, अ. ४); य एषां पुरुषं साक्षादात्मप्रभवमीश्वरम्। न भजन्त्यवजानन्ति स्थानाद्भ्रष्टः पतन्त्यधः ॥३॥ (स्क. ११, अ. ५)" इत्यादि. सारांश, हिंदु धर्मीयांत पराविद्या चांगल्या

१ Pp. 16 and 59, "A Record of the Buddhist Religion as preached in India and the Malaya Archipalago (A.D. 671 to 659)" by I-Tsing-Tin Takakusu, 1896, Oxford.

प्रगतिपथावर आणली जात होती व त्याचबरोबर भारतांतील दक्षिण भागांत अनार्य लोकांच्या संघर्षांनें विघातक आचारविचार रूढ होत होते आणि खास आर्यजमातीहि आपल्या आचारधर्मांतील संकुचित स्वार्थासाठीं विपर्यस्त स्वरुपांत परातत्त्वाचा फैलाव करीत होत्या. जसें पराधर्मांत अष्टांगयोगास मंत्रयोग व लययोगाची जोड देऊन भक्तियोगाचा पुरस्कार करून महाराष्ट्राला प्रगतिपथावर ठेविलें तसेंच सामान्य जनतेला पराविद्येच्या क्षेत्रांतून दूर ठेवण्याचे प्रयत्नहि केले गेले. सोळाव्या व सतराव्या शतकांत संतांनीं जें महान् कार्य केलें त्यामुळें आर्यसंस्कृतीचें वैशिष्ठ्य जी पराविद्या तिची जोपासना झाली. सोळाव्या व सतराव्या शतकांतील या संतांचें लेखन या क्रांतिकालांतील त्यांच्या कार्याची चांगलीच जाणीव करून देत आहे व आपला हिंदु समाज कोणत्या विशिष्ठ परिस्थितींत वावरत होता याची साक्ष पटवित आहे. अनार्य लोकांशींच संबंध जडल्यानें त्यांच्यांतील कुलदेवता, ग्रामदेवता, स्थानदेवता, उपदेवता यांचें बंड बरेंच वाढलें होतें. कदाचित निसर्गाच्या आपत्तींतून संरक्षण करण्याचें सामर्थ्य याच उपदेवतांत असल्याचा निर्वाळा वाटत राहिल्यानें द्विजेतर समाज इतर साधनांभावीं या मार्गांत लुब्ध झाला होता इतकेंच नव्हे तर द्विजांनींहि त्यांचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रभुत्व मानलें होतें आणि उच्च वर्णीय देशमुख, देशपांडे आदींनीं या देवतांस केलेल्या नवससायासांत व बकऱ्याकोंबड्यांच्या बलिदानांत आपला अग्रहक्क राखून अशा बलिदानांना प्रोत्साहनच दिलें होतें. द्विजांनींहि आचारधर्मांत कांहीं बाह्य व अंतर्गत कारणांमुळें पुष्कळच शिथिलता पत्करली होती. त्यामुळें पराधर्माकडे सहज प्रवृत्ति राहील अशी परिस्थिति राहिली नव्हती. त्याशिवाय इस्लामी धर्मतत्त्वांपेक्षां इस्लामी सुलतानसरदारांच्या धार्मिक आचार व संघर्ष याबाबतच्या कल्पना हिंदु संस्कृतीवर चारपांच शतकें आघात करीत होत्याच. परंतु हा आघात धार्मिक आचारव्यवहारापुरतांच मर्यादित होता. धर्माधर्मांतील मूळ तत्त्वांत नव्हता. हिंदु धर्मांतून निघालेले निरनिराळे पंथ जसे बाह्य आचारविचारांना प्राधान्य देऊन एकमेकांची निंदा करीत होते त्याचप्रमाणें इस्लामी धर्माची श्रेष्ठता राजकीय सत्तेच्या जोरावर मानावयास लागत असली तरी या धर्माचे वादविवाद हिंदुधर्मांतील जाणत्या लोकांच्या मार्गदर्शनांत आढळणाऱ्या त्याज्यात्याज्य कर्मवादापेक्षां फारसे निराळे होते असें नाहीं. शेख महंमदांपूर्वीहि कित्येक इस्लामी धर्मनिष्ठ लोकांचें लक्ष हिंदूंच्या परामार्गीय साधनांकडे लागले होतें आणि बऱ्याच लोकांनीं या मार्गांत आपली चांगली, परंतु मर्यादित स्वरूपाची, प्रगति करून घेतली होती, यांत शंका नाहीं.

इस्लामी धर्म हा पाश्चात्यांच्या इस्रायल व ख्रिश्चन धर्मतत्त्वांवरच आधारलेली व सुधारली अशी एक आवृत्ति होय. सातव्या शतकांत या नव्या तत्त्वज्ञानाला सुरुवात झाली. हे सर्व तिन्ही धर्म एकेश्वरी मताचे असले तरी इस्रायल लोक इतर

देवता व मूर्ती मानीत, प्रेषितांना उपदेवतेचा मान देत आणि या देवदेवतांना मनुष्य व इतर प्राण्यांचा बळी देणें, हें एक धर्मकृत्य मानीत. खिश्चन धर्मानें प्रेषितांना ईश्वराचे वारसपुत्र किंवा ईश्वरच मानणें आणि विशेषतः जिझसला देव म्हणून मानण्याचा उपक्रम केला. इस्लामनें इस्रायल व खिश्चन धर्मातील या समजुतींच्या विरुद्ध कटाक्षानें प्रचार केला. उलट "कुराणां"त हिब्रु व खिश्चन प्रेषितांना आद्य प्रेषित म्हणूनच मान दिलेला आहे व त्यांच्या कांहीं शिकवणुकींची तरफदारी केली आहे. इस्लामी धर्माच्या या कुराणांत किंवा एकमेव धर्मग्रंथांत या ग्रंथाच्या लेखनाचा मुख्य उद्देश दिला आहे तो म्हणजे :

"Verily, this Quran guides to what is most upright and gives tidings to believers who do good deeds that they shall have a great reward." (Chap. 17, no. 9).

इस्लामियांच्या धर्मनिष्ठेबाबतची सर्व कल्पना त्यांच्या सूत्रमय सप्तकल्मी प्रार्थना मंत्रांत येते. तीं प्रार्थनासूत्रें या कुराण ग्रंथाचा आद्य व शेवट साधतात. ही प्रार्थना अशी :

"1. Praise be to Allah, Lord of the Worlds. 2. The Beneficient, the Merciful. 3. King of the day of Fate (reckoning). 4. Thee (alone) do we worship, and of Thee (alone) do we ask aid. 5. Guide us on the straight path, 6. The path of those to whom Thou hast been gracious. 7. With whom Thou are not angry, and who do not go astray." (Chap. 1 and 115.)

सारांश, इस्लामी धर्मात ईश्वराला एकमेव सर्वज्ञ असा शास्ता मानून त्याची भीति धरून सामाजिक समता व स्वास्थ्य मिळविण्याचा राजमार्ग साधला आहे. परंतु या धर्माच्या प्रचारप्रसारार्थ जो आचारधर्म स्वीकारला गेला त्यांत सत्संगतीनें देवमान्य सुमार्ग धरण्याची कोशिस करण्यावर भर न देतां कुसंगतीचा, कीं ज्यामुळें कुमार्गाकडे लक्ष जाईल त्याचा, स्वधर्मीयांना संपर्कच लागूं न देण्यासाठीं त्यांचा व त्यांच्या कुमार्गाला पोषक अशा सर्व गोष्टींचा नायनाट करावयाचा ह्याच आदेशावर तीव्रतेनें भर दिला आहे :

'And indeed He has revealed to you in the Book that when you hear the sign of Allah disbelieved and derided, then do not sit with them . . . . . otherwise you will become like them; verily Allah will gather the hypocrites and the disbelievers all together in hell." (Chap. 4, no. 138). ". . . they (the disbelievers) hope for His mercy and fear His doom . . . (no. 57).

"And there is no town which We will not destroy before the day of resurrection, or chastise it with a

grievous chastisement; . . . . . . (Chap. 17, no. 58). "O you who believe ! Do not take into intimacy among others than yourselves; they will not fail to corrupt you; they long for your ruin; hatred has already appeared from their mouths; and what their hearts conceal is greater . . . . . (Chap. 3, no. 117). "Let not the believers take disbelievers for their friends rather than believers: and whoso does this he shall have nothing of Allah, but you should guard yourself against them . . . . . . ." (Chap. 3, no. 27). "It is not a guidance for them (to know) how many generations We destroyed before them, . . . . . (Chap. 18, no. 128-134), "And already We laid hold on them with chastisement, yet they humble not to their Lord, nor did they lament. (no. 76). Until, when We open upon them, the door of a severe chastisement: behold; they are in despair of it." (Chap. 23, no. 78) . . . . . . "And how many a town have We destroyed which exulted in its opulence. Yonder are their dwellings which have not been inhabited after them, save a little; and We are the inheritors. (58). And your Lord never destroys the towns until He raise in their mother (town) as apostle reciting to them Our revelations; and never do We destroy the towns unless the residents thereof are evil-doers. (Chap. 28, no. 59) . . . . . 'And We have destroyed the cities round about you, and in order that they might return to us, We varied our signs before them." (Chap. 46, no. 27-Quran).

इस्लामी आचारधर्मांतील हा हटवाद सोडला तर त्यांच्या धार्मिक तत्त्वांबाबत भारतांत तरी त्यांच्याविरुद्ध विशेष ओरड करण्यासारखें कांहीं नव्हतें. शेख नासिरुद्दीन, त्यांचा मुख्य शिष्य गेसु दराज व इतर शिष्य प्रशिष्यांचा विचार केला तर हे वली इस्लामी धर्माचे जरी पूर्ण अभिमानी होते तरी त्यांस पराविद्येची गोडी लागली होती. या पराविद्येच्या अभ्यासांत धर्मभेदाच्या अडचणी उत्पन्न होत नव्हत्या याची त्यांना खात्री होती. परामार्ग आचरण्यास त्यांच्या धर्मांतील एकेश्वरी मताचा जसा त्यांना फायदा मिळत होता तसेंच त्यांना त्यांच्या नित्यनैमित्तिक शुचिर्भूतता व प्रार्थना आणि विशेषकरून प्रार्थनेची अनुरूप पद्धति हीं सर्व त्यांस या अभ्यासाला उपयुक्त ठरलीं. इस्लामी प्रार्थनापद्धतीहि लक्षांत घेण्यासारखी आहे :

"Keep up prayer from the sunset till the dark of night, and (the recital of) the Quran at dawn, verily (the recital of) the Quran at dawn is ever witnessed" (no. 78). And wake up a part of the night a largest for you, it may be that your lord will raise you to a glorious sta-

tion. (no. 79). And say: My Lord! make me enter the entrance of truth and bring me out the bringing out of truth, and give me from you a helping Power. (no. 81). And say: Truth is come, and falsehood has vanished; verily falsehood is to vanish." (nos. 78 to 81, Chap. 17, Quran).

मात्र इस्लामी अवलियांच्या या पराधर्मविषयक अभ्यासानें व त्यांच्या नेहमींच्या दैनंदिन आचारांमुळें त्यांचा इतर धर्माचारांबाबतचा कट्टर विध्वंसक दृष्टिकोन बदलला गेला होता. त्यामुळें इतर बाबतींत ते जरी कट्टर इस्लामी धर्मवृत्तीनें वागत होते तरी त्यांच्याबाबतचा दृष्टिकोन भारतांत येणाऱ्या नवीन मुसलमानांना साहत नव्हता. शेख नासिरुद्दीनच्या सर्व शिष्यगणांस तार्तर लोकांनीं ससेहोलपट करून दिल्लींतून काढून लाविलें. ही मंडळी पळून दक्षिणेंत आलीं. वाटेनें येतांना यांतील बऱ्याच अवलियांनीं गिरीकुहरांत वास केला. त्यांच्या योगबलामुळें हिंदूनीं त्यांस आदरानें वागविलें. गेसू दराज हा फार मोठा विद्वान अवलिया होता. त्याच्या विद्वत्तेचें आणि विशेषतः त्याचें कुराणांतील तत्त्वांवरील टीकावाङ्मय महत्त्वाचें असल्यानें त्यास प्रथम बहामनी राज्यांत मानसन्मान मिळाला. परंतु नंतर थोड्याच कालांत स्थानिक कट्टर इस्लामी पंडितांनीं त्याच्याबद्दल वाईट ग्रह करून दिल्यामुळें त्याला राजाश्रयाला मुकावें लागलें. सारांश, हे व त्यानंतर आलेल्या अवलियांचा सन्मान जरी हिंदु जनतेनें केला असला तरी त्यांस इस्लामी धर्मीय गौणत्वच देत असत. कित्येक ठिकाणीं तर त्यांच्या व त्यांच्या अनुयायांच्या कबरींना मशिदींच्या आवारांत स्थान मिळालेलें दिसत नाहीं. यावरून असें दिसतें कीं, कुराणांतील शिकवणुकींत या पराविद्येला स्थान नसल्याकारणानें आणि त्यांच्या मानवी विशिष्ट शक्तीचें प्रदर्शन म्हणजे कुराणांत त्याज्य ठरविलेली ( Sorcery ) "जादुटोण्या"चाच प्रकार होय म्हणून मानल्यानें या अवलियांना त्यांच्या जमातींत फारसा मान मिळाला नाहीं. इतकेंच नव्हे तर मौलवी लोकांनीं आपल्या श्रेष्ठतेच्या रक्षणार्थ विरोधच केला असें दिसतें. या अवलियांचीं नांवें तेराव्या शतकाच्या मध्यापासून ते सतराव्या शतकाच्या अखेरपर्यंतच ऐकूं येतात. जसा हिंदु पराविद्यानिष्ठांचा काल सतराव्या शतकाच्या अखेरीस संपतो, तसाच या अवलियांचा काल सतराव्या शतकाच्या अखेरीस संपतो. या अवलियांच्या कबरींच्या व्यवस्थेबाबतहि एक विशेष आढळतो आणि तो म्हणजे हे मुतावली बाटग्या मुसलमान घराण्यांतीलच अधिक आहेत. अष्टांगयोग साधणारे अवलिया पूर्व कालांत बरेच आढळतात. सोळाव्या शतकापासून कांहीं मुसलमान मंडळींची ओढ भक्तिकडे लागली आणि त्या क्षेत्रांतहि त्यांनीं बरीच ख्याती मिळविली. राघव चैतन्य, बाबाजी व चांद बोधले यांच्या शिष्यपरंपरेंत इस्लामी धर्मियांनीं आपली चांगलीच प्रगती करून घेतली होती याबद्दल दाखले आहेत. परंतु हीं सर्व मंडळी व त्यांचीं घराणीं

इस्लामी धर्मियांकडून उपेक्षित अशींच राहिलीं. तसें पाहिलें तर त्यांच्या कबरींची पूजाअर्चा होणें, लोकांनीं नवससायास करणें व ते त्या पीरवल्लीनीं स्वीकारणें, त्यांचा उरूस भरवणें, त्यांच्या नांवानें प्राणीबली देणें वगैरे गोष्टी कुराणांतील शिकवणुकीला न जुळणाऱ्या होत्या यांत शंका नाहीं. त्यामुळें या पीरवल्लींच्या उत्सवमहोत्सवांत सामान्य हिंदु जनताच विशेष प्रामुख्यानें भाग घेत असल्याचें दिसून आलें तर नवल कसलें ! या अवलियांना सिद्धींची प्राप्ती चांगली झाली होती. हे अवलिया इस्लामी म्हणजे समाजविशिष्ट धर्मसंस्कारामध्येंच वाढले असल्यानें त्यांनी आपलें सिद्धींचें सामर्थ्य स्वतःच्या किंवा इतरांच्या संकटनिवारणार्थ वापरण्यांत कुसुर केली नाहीं. इस्लामी धर्मानुसार त्यांनीं "जिवंत स्थान समाधि किंवा जलसमाधि" घेण्याचा प्रयत्न केला नाहीं. जे लोक भक्तिमार्गाकडे वळले त्यांनीं हिंदु पराज्ञानाचा अभ्यास केला होता. त्यानुसार त्यांनीं आपल्या सिद्धिसामर्थ्याचा उपयोग न करण्याकडेच कल ठेविला होता. सतराव्या शतकानंतर वर्णाश्रमआचारधर्माला पुन्हां विशेष प्रामाण्य दिलें गेल्यानें व नंतर ब्रिटिश अमदानींत स्थानिक धर्मांची उपेक्षा केली गेल्यानें इस्लामी धर्मीयांनीं जो पराविद्येच्या क्षेत्रांत विक्रम करून दाखविण्याचा उपक्रम सुरू केला होता तो मंदावला.

शेख महंमदबाबांची जीवनविषयक माहिती "योग–संग्रामाच्या" प्रास्ताविक भागांत आलीच आहे. तिचा येथें पुन्हां विस्तार करण्यांचें कारण नाहीं. शेख महंमद हे इस्लामधर्मीय होते व त्यांनीं आपल्या धर्माचा आचार धर्मनिष्ठेनें शेवटपर्यंत पाळला होता. ते गृहस्थाश्रमी होते. गृहसंसार साधूनच त्यांनीं आपलीं पराधर्माची साधना उत्कृष्टपणें साधून दाखविली आहे. त्यांच्या पत्नीची कबरहि त्यांच्या कबरीशेजारीं लागूनच एकाच दर्ग्यांत आहे. शेख महंमदांचे पिते हे निजामशाहींत एक मोठे हुद्देदार होते. ते मूळ घोरी घराण्यांतील. अव्वल इस्लाम-धर्मीय म्हणूनच ते प्रसिद्ध होते. धारूर किल्ल्याची हवालदारी त्यांचेकडे होती. त्यांचे भारतांतील राहाण्याचें ठिकाण म्हणजे खुदलापुर. हें खुलनापूर किंवा खुदलापूर गेसू दाराजच्या लहानपणापासून धर्मिष्ट लोकांच्या प्रागतिक प्रवृत्तिबद्दल प्रख्यात होतें. राजे महंमदांनीं कादिरी अवलियांच्या परंपरेंत आपली प्रसिद्धी करून घेतली होती. या परंपरेची माहिती 'शिजरा–इ–कादिरी' यांत आलीच आहे. चंद्रभट बोधले राजे महंमदांच्या सहवासांत वाढले. शेख महंमदानें त्यांनांच आपले गुरु केलें. चंद्रभट बोधले हे चंद्र व इस्लामी संस्काराप्रमाणें चांद बोधले म्हणूनच हिंदु व मुसलमान लहान थोर अनुयायांत प्रसिद्धि पावले. राजे महंमद प्रथम धारूर व नंतर देवगिरी दौलताबाद ऊर्फ औरंगाबाद येथें राहिले. चंद्र बोधले यांच्या अनुयायांत हिंदु मुसलमानांचा बराच भरणा होता. त्यांत खास निजामशहा असल्यानें त्यांचे अधिकारीहि चंद्र बोधल्यांचे चरणीं लागले असल्यास

नवल नाहीं. परंतु इस्लामधर्मीय अनुयायांपेक्षां हिंदुधर्मीय अनुयायी पराविद्येच्या जोपासनेच्या दृष्टीनें फार महत्वाचें होते. त्यांत जनार्दनपंत होते. जनार्दनपंतांचे प्रसिद्ध शिष्य एकनाथ हेहि आपले आजेगुरु चंद्र बोधले यांच्या सानिध्यांत आले होते. शेख महंमदांना त्यामुळें सहजच जनार्दनपंत व त्यांचे शिष्य एकनाथ आणि इतर ब्राह्मणादि शिष्यांच्या संगतींत बराच काल काढावयास मिळाला. राजे महंमदामुळें शेख महंमदावर चांद बोधलेंचें विशेष प्रेम व ओढा असणें स्वाभाविक होतें. चंद्र बोधलेंनीं उत्तर कालांत चतुर्थाश्रम किंवा संन्यास घेतला व "दत्त दिगंबर" हें नांव धारण केलें. पुढें ते दत्त दिगंबर या नांवानेंच ओळखले गेले. सारांश, शेख महंमदांना लहानपणीं जशी इस्लामी धर्माचारांची आवड व संवय लागली होती तशाच त्यांनीं हिंदु धर्माचारांतील चालीरीती अगदीं जवळून पाहिल्या होत्या व मोठेपणी राजे महंमदांच्या मृत्यूनंतर ते देवगिरींतच राहण्यास आल्यानें गुरु व गुरुबंधूंच्या संगतींत त्यांनीं पराधर्मातील विशिष्टाचार कटाक्षानें पाळण्याची कोशिस केली असल्याचें त्यांच्या लेखनावरून स्पष्ट दिसतें. शेख महंमदांचे मनावर लहानपणापासूनच इस्लामी व हिंदु संस्कृतीचे चांगले संस्कार झाले होते. परंतु त्यांचे गृहशिक्षण इस्लामी धर्मासच अनुसरून होत राहिल्यानें त्यांचा पिंडच त्या संस्कारानें पोसला गेला होता. दौलताबादेंत असतांना शेख महंमदांची परामार्गातील तयारी बऱ्यापैकीं झाली होतीसें दिसतें. कारण एकनाथांचे मृत्युपूर्वींच मालोजी राजे यासारखे थोर मराठा सरदार त्यांना मानूं लागलेले दिसतात. शेख महंमदांच्या लेखनांत जे अनेक ठिकाणीं शाहाण्णव कुळीचे उद्गार आढळतात त्यावरून या मराठमंडळीचा त्यांच्याशीं बराच दृढ संबंध आल्याची साक्ष पटते. शेख महंमद इ. स. १५९३ नंतर मालोजीराजांच्या आश्रयानें श्रीगोंद्यास आले व शेवटपर्यंत तेथेंच राहिले. शेख महंमद बरेच दूरवर हिंडत असत. त्यामुळें त्यांनीं बऱ्याच पंथीय वगैरेंच्या आचारविचारांची बारकाईनें पहाणी केलीसें दिसतें. त्यांच्या लेखनांत आचार–धर्माधर्मावरच अधिक चर्चा चिकित्सा आलेली आहे.

शेख महंमदबाबांस कुराणांतील वचनें चांगलींच अवगत झालीं होतीं. शेख महंमद लिहितात : " अविंध जातीस निपजलों । कुराण पुराण बोलों लागलों । वळी साधुसिद्धांस मानलों । स्वहितपरहितागुणें ॥६६॥ " (पृ. १८७ यो.) शेख महंमदबाबांच्या हिंदी–मराठी आणि हिंदी कवितांतून कुराणांतील उक्त्या आल्याच आहेत व त्यांनीं त्या उक्त्यांचा मेळ हिंदु धर्मोक्तींशीं घालण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचा विशेष भर आचारदुराचारांवरील टीकेकडे आहे. कुराणांत ज्या कांहीं आचारांचा निषेध केला आहे त्याबाबत त्यांच्या लिहिण्यांत जी विचारपद्धति स्वीकारली आहे त्यांत त्यांच्या इस्लामी संस्कारांचाच पगडा दिसून येतो. हिंदु देवता व उपदेवतांचे निखंदन करितांना कुराणांतील विचारसरणी विशेषत्वानें दृष्टीस पडतें. शेख महंमद लिहितात : ऐका हरि अल्ला जरी दोन असते । तरी ते

भांडभांडोच मरते। वोळखा कांहीं ठाव उरों न देते। येरून येरांचा पै ॥९५॥ (पृ. १४२ यो.). कुराणांतील उक्ति :

"If there were other gods, along with Him, as they say, then they would have sought a way against the Lord of Power." (Chap. 17, no. 42). "Allah has not chosen any son, nor is there any other god with Him; else would each god have assuredly taken away that which He had created, and some of them would have assuredly overcome others: glory be to Allah above what they attribute." (Chap. 23, no. 91). "If there were therein (heaven and earth) gods beside Allah, then verily both had disordered; so glory be to Allah, the Lord of the throne, above what they attribute." (Chap. 21, no. 22).

ईश्वराचीं नांवें कोणीं कांहींहि व कितीहि घेवोत, ईश्वर हा एकच हें सांगतांना शेख महंमदबाबा लिहितात : "राम नव्हे दाशरथी। कृष्णनाथाचा पिता। तो राम तत्त्वता। धरा मनासीं ॥१॥ असंख्य ब्रह्मांडाची कोडी। क्षणामाजी घडी मोडी। तो राम धराडी। अंतर्बाह्य ॥२॥ असे साक्षात् भूत। जीत नाम रत। शेख महंमद पुनीत। तत्त्वज्ञानी ॥३॥ (क्र. २३४). "दशरथें तिघाचें सरण दहन केलें। पुत्र जाल्या राम ऐसें नाम ठेविलें। तळमळोन उसनें दिधलें। हें श्रोते जाणती ॥२४४॥ श्रावणें राम राम होतें म्हणितलें। म्हणोनि दशरथें पुत्राचें नाम ठेविलें। हें पाहिजे श्रोत्यांस कळले। रामनाम अगाध जें ॥२४५॥ वल्ली विक्राम वेरदिलाल खइर। बहु अलाकुल सेइन कादर। हें चौथ्या कलमांत पडती जाहिर। मुसलमान परियेसा ॥२४६॥ जैसीं एका शरीरास अनेक नांवें। तैशीं सहस्र नामें ओळखा भावें। परी एक मूळ नाम करावें ठावें। सद्गुरु सेवूनियां ॥२४७" (प्र. १२. पृ. २२८, यो.). कुराणांत याच भावार्थाच्या बऱ्याच उक्त्या आढळतात. त्यांतील एक दोन पहा :

"Do you not know that Allah's is the dominion of the heavens and the earth, and that beside Allah you have neither patron nor helper?" (Chap. 2, no. 107). "Certainly they disbelieve who say : Surely Allah, He is the Messiah, son of Mary, and the Messiah said: O children of Israel, serve Allah, my Lord and your Lord, surely, whoever joins partners with Allah, then Allah has forbidden him the Paradise and his abode is the fire, and for evil-doers there shall be no helpers." (Chap. 5, no. 72). 'Originator of the heavens and the earth! How can He have a son, when He has no consort and He has created all things and He knows all things?". This is Allah, your Lord, there is no God but He, the

creator of all things, so serve Him and He takes care of all things." (Chap. 6, no. 102-3).

शेख महंमदबाबांनीं मूर्तिपूजेबद्दल बरेंच लिहिलें आहे. कुराणाच्या शिकवणुकीप्रमाणें प्रतिमांचा निषेधहि केला आहे. कुराणांतील एक दोन उतारे देतों :

"Have you not seen those who profess that they believe in what has been revealed to you and what has been revealed before you? Fain would they be judged before Thagout (false deties, devils), though enjoined to deny them and fain would Satan make them wander with wanderings far away." (Chap. 4, no. 58). "Do not marry idolatresses .... indolaters-.... until they believe ... (Chap. 2, no. 221). "They do not invoke besides Him aught but females (the idols which the pagan Arabs worshipped were all females), and they invoke none else but Satan, the persistent rebel." ... "These are they whose abode is hell, and they shall not find any escape from it. (Chap. 4, no. 115.119). "They said: We worship idols, so we are their constant devotees." He said: Can they hear you when they call?". "Or do they benefit you or harm you?". "They said: Nay, but we found our fathers do the like." ... "Then surely they are my enemies, save the Lord of the Worlds." (Chap. 26, nos. 71-74, 77). "And by Allah! I will circumvent your idols after you go away, turning your backs. So he broke them into pieces, except the chief of them, that they might return to it (inquiring)." (Chap. 21, no. 57-58).

शेख महंमदांनीं या मूर्तिपूजेबाबत पुष्कळच लिहिलें आहे. हें निखंदन त्यांच्या योगसंग्राम ग्रंथांत बरेंच आलें आहे. (पृ. १२१, १२२, १४७, १६५, १६६ इ. कवितासंग्रहांत पृ. ३०, ४३, ६८ इ.). परंतु त्याचबरोबर त्यांच्या विठ्ठल, पंढरीवरील कविता पाहिली म्हणजे त्यांना या प्रतिमा पूजनांतील मूळ उद्देश, जो पुढें अज्ञानानें झुगारून दिला होता तो त्यांनीं आणल्याचें दिसतें. म्हणून ते एके ठिकाणीं लिहितात : "प्रतिमा दुषिल्याचा, राहिला अन्वय, ते सांगेन सोय, सभे श्रोत्यां ॥ ओनामा एका खडी, आधीं मांडिती धडे । मग मोडिसी पाडे, अभ्यासिती ॥.. तैसी तीर्थ प्रतिमा, ओनाम्याचे धडे। स्वहिता धडफुडे, सेवा संत ॥...खुळखुळा देऊनी, बाळ रिझविलें । काहाडूनि घेतलें, मातेनें आपणां ॥...तैसे ते जना, निज गुज देती । अज्ञानें सळिती, प्रतिमा हिरतां ॥९॥ शाहाणे झाल्या बाळ, टाकी खुळखुळा । मागे द्रव्यगोळा, शेख महंमद ॥१० ...तैसे होणें शहाणे, साधुसंत सांगाती । प्रतिमा भक्ति, टाका खुळखुळा ॥


मराठा ग्रंथ ... स्थळ

(क्र. ३२). याचप्रमाणें शेख महंमदांच्या लिहिण्यांत कुराणांतील विनय, बलिदान, समता, पुनर्जन्म, सप्तस्वर्ग, वैकुंठ, उपवास, विटाळ, प्रार्थना आदि कांहीं आचारांबाबतच्या उक्तींचा अनुवाद आढळतो व कांहीं ठिकाणीं हिंदु आचार-पद्धतीशीं समन्वयहि केलेला मिळतो. त्या सर्वांचा तपशिलवार विस्तार करण्याचें येथें कारण नाहीं. सारांश, शेख महंमदांना कुराण चांगलें अवगत होतें इतकेंच नव्हें तर त्यांच्या मनावर त्यांतील धर्माचारांच्या शिकवणुकीचा चांगलाच पगडा बसला होता यांत शंका नाहीं. शेख महंमदांची उर्दूत व पर्शियनमध्येंहि कांहीं कविता पहावयास मिळाली. परंतु तिचे नागरी लिपीकरण करून न मिळाल्यानें त्या कवितांचा येथें संग्रह केला गेला नाहीं.

शेख महंमदांचे मनावर हिंदु संस्कृति व विशेषतः पराधर्मीतील आचार-विचारांचें बरेच संस्कार झाले होते. पराविद्येचा अभ्यास व पराज्ञानाचा स्वानुभव त्यांस चंद्र बोधले उर्फ दत्त दिगांबर, जनार्दनस्वामी, एकनाथ महाराज व त्यांच्या गुरुबंधूंच्या सान्निध्यांत प्राप्त झाला होता. शेख महंमदांची गीतावचनें चांगलीच पाठ झालेली असावीत. कारण त्यांनीं आपल्या लेखनांत गीतावचनांचा निर्वाळा दिलेला आहे. एकनाथांच्या सानिध्यांत ज्ञानदेवीहि वाचली असावीसें दिसतें. ज्ञानदेवींतील विवेचनाची त्यांच्या लेखनावर छाप बसलेलीं पुष्कळ ठिकाणीं दृग्गोचर होते. षड्दर्शनावर तर त्यांच्या टीकात्मक कितीतरी ओव्या आल्या आहेत. अष्टांगयोग हेंच त्यांचें पराप्राप्तीचें मुख्य साधन होतें. या अष्टांगयोगास आवश्यक अशा ज्ञानमार्गाचेंहि त्यांचें अध्ययन बरें झालें होतें, याची साक्ष त्यांच्या कवितेंत जी या विषयावर चर्चा आलेली आहे त्यावरून स्पष्टच आहे. या ज्ञानयोगांतील उपांगांचा म्हणजे ‘ स्वरज्ञान ’ इत्यादि विषयांचा त्यांनीं बारकाईनें अभ्यास केला होता. “ शिवस्वरोदय ” या ग्रंथाचा अनुवाद शेख महंमदानीं आपल्या ‘ पवनविजय ’ या प्रकरणांत केला आहे. त्याचप्रमाणें एकनाथशिष्य मुकुंदराज यांनींहि ‘ पवनविजय ’ म्हणूनच अनुवाद केला. त्याशिवायहि आणखी अनुवाद या विषयावर झालेले आहेत. हा विषय आवश्यक उपांग म्हणून अभ्यासला जाई. एकूण चंद्र बोधलेंच्या परंपरेंत हे दोन्हीहि अनुवाद सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत झालेले आहेत. भागवत व कांहीं पुराणांचें वाचनश्रवणहि शेख महंमदानीं केले होतें. एकनाथांच्या मराठी भागवताचा उल्लेख एकनाथांचा विशेष म्हणून केलेल आहे. भागवतांतील कांहीं कथाख्यानें शेख महंमदांनीं घेतली आहेत. पिंगळेचें आख्यान हें एक त्यापैकींच आहे. परंतु तें आख्यान भागवतापेक्षां भिन्न भावार्थानें सांगितले आहे. भागवतांत (स्कं. ११, अ. ८) पिंगला ही वेश्येचा धंदा करीत होती. एके दिवशीं कोणीच गिऱ्हाइक आलें नाहीं त्यामुळें ती वैतागली त्या नैराष्यतेंत पुरुषांच्या मेहरबानीवर अवलंबून राहण्यापेक्षां सर्व आयुष्य जर ईश्वराकडे लावलें असतें तर कल्याण झालें असतें असें मानून ती ईश्वरभजनाकडे

लागली. उलट शेख महंमदांनीं आपल्या कुराणप्रतिपादित आचारधर्माप्रमाणें जी स्त्री कराराप्रमाणें ठरवून घेतलेल्या कालांत एकाच पुरुषांवर सर्व लक्ष ठेवून वागते, मग ती वेश्या असली तरी चालेल, ती जी त्या पुरुषाबाबत एकनिष्ठा दाखविते तोच पतिव्रताधर्म ह्या तत्त्वानुरोधें या कथेस कलाटणी दिली आहे. पिंगळा ही एके दिवशीं गिऱ्हाईकाची मार्गप्रतिक्षा करित असतां तिच्याकडे कुश्चळ वगैरे झालेला असा एक म्हातारा आला आणि तिनें त्याच्याशीं एक रात्र पत्नी म्हणून काढण्याचें आश्वासन दिलें. परंतु तो म्हातारा येण्यापूर्वीच एक राजा तिच्या संभोगाच्या इच्छेनें आला आणि त्यानें तिला त्या रात्रीस आपली सेवा करण्यासाठीं हर तऱ्हेचें प्रयत्न केले. परंतु ती आपलें वचन मोडण्यास तयार झाली नाहीं. तेव्हां राजा परत गेला. म्हातारा आला. दुर्गंधी असलेल्या त्या म्हाताऱ्याला तिनें न्हाहूं वगैरे घातलें, जेवण झालें. संभोगाचे समयीं मात्र तो तिला गतप्राण झालेला दिसला. तिनें शोक केला व त्याच्या मरणाबरोबर ती सती जाण्यास निघाली. तेव्हां त्या म्हाताऱ्याचें व राजाचें रूप घेणाऱ्या शंकरानें तिला दर्शन देऊन मोक्षपदास नेलें. सारांश, वेश्याहि जर आपल्या पोषणासाठीं तो धंदा करीत असतां जर पावित्र्यानें वागेल तर ती ईश्वरास प्रिय असते व तिला ईश्वर आपल्या जवळ नेतो हें दर्शविलें आहे. शेख महंमदांनीं मदालसा व प्रल्हाद चरित्राच्या कथा फारसा बदल न करितां घेतल्या आहेत. शेख महंमदांच्या लिहिण्यांत अनेक वेळां भूतकालीन् संतमहंतांचीं नांवें येतात. त्यावरून त्यांनीं त्या संतांबद्दलची थोडीबहुत माहिती मिळविली असल्याचें दिसतें. या नामावलींत इस्लामी धर्मीय नांवांची गणती आहे. ज्यांना आपण सोफी पंथाचे समजतो त्यांचा त्यांत उल्लेख नाहीं. सोफी पंथीयाबाबत शेख महंमदांचा अभिप्राय असा : “ चौदा पंथांचा आचार्य सोफी खरा । आपल्याच मार्गास म्हणवी बरा । आणिकांतें निखंदूनि करी तोरा । त्याचें ज्ञान मिथ्या असे ॥ १०० ॥ (प्र. ५, योग ). अशा परिस्थितींत सोफींचा उल्लेख त्यांच्या संतमहंतांच्या नामावलींत न आला तर नवल कसचें ? विशेषतः हिंदु संतांचा जो नामनिर्देश आला आहे त्याचाच विचार केला तर शेख महंमदांनीं भक्तिमार्गीय संतमहंतांची माहिती चांगलीच मिळविली होती यांत शंका नाहीं. शेख महंमदबाबांची एक संतनामावली फार दिवसांपूर्वी प्रकाशित केली गेली आहे. ती बरीच अशुद्ध आहे. ती या कविता-संग्रहांत छापण्याची राहून गेली. त्यामुळें कवितासंग्रहांतील क्र. १०५ सुटला गेला. ती संतनामावली अशी : “ जये जये आरती पीरा पैगंबरा । गौसें कुतुब वलया रुसी आठ्यांसी सहस्रा ॥धृ०॥ सद्गुरु वसिष्ट दुर्वास, वाल्मीक व्यास । अठरा पर्वें चर्चा भारत उपदेस ॥ रामायण गीता भागवत, शास्त्रें कवि रास । उपनिपदें ज्ञानी प्रेम, बोध तत्त्वें साधूस ॥१॥ सा दरुसने परीख, नवनाथ सोळा सिद्ध । चराचर खाणी वाणी । थावर जंगम श्रुति वेद ॥ विधि निषेध चौऱ्यांसी, भेदुनी गोविंद । जैसा जळीं आळिपु, रवि तारा

चांद ॥२॥ निऊर्ति ज्ञानेश्वर, नामदेव खेचर। एका जनार्दन लोल्या, मुद्गल कबीर ॥ वटेश्वर सोपान, सुदामा विदूर। बजीद दादु कमळा, धना जाट कुबा सागर ॥३॥ सांवता कूर्मदास, गडगा पीळा सूरदास। चोखामेळा पुंडलिक, आवडे विठ्ठलास ॥ रवणमोराळ सिध, काको मडक्या हरिदास। रेणूकानंदन बहिरा, कोंडो डागो त्रिमळदास ॥४॥ जयराम तुकोबा, सिद्धराजबाबा। आवे कळीग रघुनाथ, कवि जाव्हनमे गोसिवा ॥ रुक्मांगद भगिरथ, गौतम रंगजीवा। उर्दूळ चांडा हनुमा, गंभीर चांदा बरवा ॥६॥ रामकृष्ण अक्रूर, ऊद्धव हरिश्चंद्र। जनक कर्ण श्रियाळ, भोज गोपीचंद्र ॥ चक्रवर्ती विनायक, विक्रम कुबीर। भर्तृहरी याज्ञवल्क्य, निंबराज गुणगंभीर ॥६॥ नारद मुकुंद ईस्याळ, येकळिक कविकाळ। साबयैनां गोपजी, पदारथ गोपाळ ॥ अंबऋषि येमधर्म, संतबा वेल्हाळ। मयेकरण नारो, वंदे प्रजन पाञ्हाळ ॥६॥ सक संवत सरदाणव, अठरा पगड स्याहाणव। जये विजये भीमक, आषिळका बिळस वासव ॥ नक्षत्र तिथी गिहे, भुवनें स्वर्ग देव। चित्रगुप्त निशिदिन, शुभाशुभ संचित वावो ॥८॥ उपमन्या सुक धुरु, कुकुट स्वधीरू। सोमं मंगळ बुध ब्रस्पत, दशदिशा सप्त वारू ॥ मार्के आगस्तीदाया, जति वति रनधिरू। द्वारका स्वेत विरंची, विष्णु गरुड महेश्वरू ॥९॥ प्रल्हाद देवदंत, जोतिर्लिंग विख्यात। जयदेव अच्युताश्रम, द्रिगदास भगवंत ॥ विश्वामित्र जन्मेजय, वडवाळ नागेश वितंत। जमळा गोवर्धन, हिरालाल माणिक उदत्त ॥१०॥ दाऊद मुक्तिहिळाळ, रोहिदास गुंजलाल। सारजानंदन धाबा वाका चाणूर जठी माळ ॥ सारंगा चोभा विप्र विश्वा, मजन गरीब नवळ। सोनारू पहाडताळी, तिखे चर्पटी निर्दुळ ॥११॥ हाफीज सादिक मनसूर, तानसेन सैना जुधार। काजी महंमुद जैना मीरा, बाबाखबर लतीफ ॥ फरीद सैया, जंसतार। ईभराइम हरूणी, हिन दुनियामें जाहीर ॥१२॥ सेषादिक काळिया, निळकंठ बळिया। महालिंग तिमा दामोदर, वैजनाथ विरदाया। कानिफा जाळंध्री सोमा, पुरुषोत्तम येसया। गहिनीदास निपाणी, सति नंदनराया ॥१३॥ राजनफुळ नैनसा, मन मछिंद्र मनसा। केवळ प्रकास दिनकर, जाधव माधव मुदसा ॥ जगमैत्र मुरारा सरज्या गोविंदराज बळसा। ळमया बगुळराव, दीपमाळ भीळन रसा ॥१४॥ मछ कछ वाऱ्हाव नरकळी, फरस वामन बळी। कळकी बौध भाडळ जांबवंत वतनमाळी ॥ पद्मनाभ लका थुळा, आम नमदार कळी। विवेकराज सम दम, प्रमार्थ भद्रकाळी ॥१५॥ हजरत मीरा, कादीरा जाहीरा। चमक आरती जाहिर बतीम फकीरा ॥ आरा सकुरसी, कांमीळ द्रवेस सुरा। शेख महंमद दरुस्या हीरा ॥१६॥ श्रावण कार्तिक भद्दु, सत जाद साद औध। सीम चक्रवता, वोढ्या जगन्नाथ इंद्रवधु ॥ सुलोचन नळ अंगद, सुग्रीव बिभीषण जरासंधु। भोमासुर बंगळा, कडकट जळबंदु ॥१७॥ गण गंधर्व सिगणी, कपि यादव मुनि। सनकादिक मयोर, कूर्म भ्रुचंडी हरुसनी ॥ बगळ भिहूंमा चकोर,

सार्धूळ अंजनी । गड बहिरव आजदास्या, हा मृगधुळ ध्यानीं ॥१८॥ मदु कीटक देवा, आज्ञ साव वेळू चंदन । तीर्थें व्रतें प्रतिमा, पंचमहाभूतें ॥ पर्वत हिमालयादि, नद्या गंगादि । हिरे पाषाणादि, लक्ष्मण शत्रुघन ॥१९॥ बाणासुर घटोघटो, भीम पेंधा वडजा । चांगा रगा गोरा, रायेभान तोड्या ॥ बरवंट अहीर, बसवंत उद्धत । ढमढेर कद्रू, लकुपीया अर्जुन ॥२०॥ श्यामगिरी पुरी द्रुण, त्रिमला मालो हैबत । औचित नागा तोडरमल, जुळकरन सिंगरुसी ॥ अकबर बन बहीरी, सप्तराग मूर्छना । वैशंपायन संभू भिक्षुक, विश्वास मुचकुंद ॥२१॥ पुष्यदंत सोमदंत, भगवान सेख फरीद । दुंदुभी डांगवी बभ्रू, अजामेळ नवकोडी राजे ॥ बावन चौऱ्यांसी जपी तपी, सैना गगना नाव्ही । फातिमा हसेन हुसेन, सैदा मका चतुर्भुज भिका ॥२२॥ दत्त दिगंबर योगी, मीन विहंगम पिपीलिका । विज्ञान विवेक, सोहं आळोपिका । शेख महंमदीं आरती प्रेमबोध धृती, भक्तीची कळिका ॥२३॥ "[1]

या आरतींत शेख महंमदांनीं आपल्या गुरूचा नामनिर्देश गाळला आहे अशी श्री. चांदोरकर यांनीं शंका व्यक्त केली होती. परंतु ती शंका केवळ चांद बोधलेनीं शेवटीं संन्यास घेतला त्यावेळीं जें संन्यासाश्रमाचें नांव दत्त दिगांबर घेतलें त्याबाबतची माहिती त्या कालीं नव्हती म्हणून होय. शेख महंमदांच्या अष्टांगयोग, ज्ञानयोग यावरील कवितांचा विचार केला तर त्यांनीं या विषयांचा फारच बारकाईनें अभ्यास केला होता असें जसें दिसून येतें तसेंच त्यांनीं या विषयांतील पूर्वानुभवाचा चांगला शोध घेतला होता असें वाटल्याशिवाय राहात नाहीं. पहिल्या भागांत त्यांच्या भक्तियोगाबाबतची विचारसरणी दाखविलीच आहे. येथें अधिक विस्तार न करितां समग्र कवितासंग्रह आतां उपलब्ध होत असल्यानें जिज्ञासूंनीं तोच प्रत्यक्ष पहावा.

शेख महंमदांच्या कवितासंग्रहांत "योगसंग्राम" हेंच एक अठरा अध्यायांचें मोठें प्रकरण आहे. त्यांतील पहिलीं चार व शेवटचीं दोन प्रकरणें रूपकात्मक परंतु योगविषयकज्ञानविज्ञानदर्शक आहेत. बाकीचीं प्रामुख्यानें पंथीय, भक्त, गुरुशिष्य आदि परामार्गांतील अज्ञानमूल किंवा अनिष्ट आचारांआचरणुकीचें निखंदन करण्याकडे खर्ची पडलीं आहेत. "शिवस्वरोदयाचा" अनुवाद म्हणजे "पवनविजय" हें प्रकरण होय. अष्टांगयोगासारखें स्वरोदयाचें ज्ञान हें पराविद्येच्या अभ्यासांत आवश्यक असें उपांग मानलें जात होतें. ध्यान धारणा समाधि लय लावण्यासाठीं जें शारीरिक व मनःस्वास्थ्य जरूरीचें असतें तें साधण्यांत किंवा जाणण्यांत या ज्ञानाचा उपयोग होतो. या प्रकरणाचा शेवटचा कालज्ञानाचा भाग अपूर्णच आहे. तिसरें प्रकरण "निष्कलंकप्रबोधा"चें. हें प्रकरण बरेंच मोठें

---

१. पृ. १०३–१०५ शेख महंमदकृत संतनामावळी, ले. पां. मा. चांदोरकर, भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त, शके १८३८.

असावें. उपलब्ध भाग थोडाच आहे. परंतु जो कांहीं भाग उपलब्ध झाला आहे तो सर्वस्वी आचारआचरणुकींतील युक्तायुक्तता, त्याज्यात्याज्यताच सांगण्यांत खर्ची पडलेला आहे. चवथें परंतु लहानसेंच प्रकरण म्हणजे "गायका" हें योगमार्गीय भक्तांची त्यांच्या इंद्रियादींच्या वृत्तिप्रवृत्तीमुळें कशी त्रेधा उडते याचें सुंदर रूपक आहे. हें प्रकरण जरी छोटेंसें असलें तरी शेख महंमदांच्या कवितेंतील पराज्ञान-विषयक उत्कृष्ट निवेदन ठरतें. पांचवें मदालसा वृतांताचें प्रकरण हें एक भागवतांतील कथेचाच अनुवाद आहे. हीं पांच -प्रकरणें सोडलीं तर राहिलेलीं सर्व कविता निरनिराळ्या संग्रहांतून घेतलेली आहे व ती मिश्र अशाच स्थितींत त्या बाडांत नकलून घेतलेली होती. अर्थात् या मिश्र कवितांची जी विषयवारीनें रचना केली आहे ती संपादनाच्या सोयीसाठीं आहे. या कविता मात्रावृत्तेंच आहेत. त्यांत ओवीवृत्तेंच अधिक येतात. या ओवीवृत्तांत दोन प्रकार आहेत. गीत ओवी व ग्रंथी ओवी. ग्रंथी ओवींत मात्रांच्या मर्यादेपेक्षां तीन किंवा साडेतीन पादांचें प्रासच साधण्यांत लक्ष पुरविलें गेलें आहे. गीत ओवींत तीन प्रकार आहेत. या साडेतीन पादांतील मात्रांचें प्रमाण सहा सहा व सहा आणि चार असतें. प्रथम तिन्हीं पादांचे सम प्रास म्हणजे शेवटीं सम उच्चार असलेली, दुसरा व तिसरा पाद यांचेच सम प्रास साधलेली व या दोन्हीं प्रकारच्या ओव्यांत मागील चरणाच्या शेवटच्या अक्षरक्रमाची पुनरावृत्ति पुढील चरणाचा आद्य करून साधणें म्हणजे दाम यमकाच्या ओव्या असे या ओव्यांचे तीन प्रकार होत. गीत वृत्तें हीं पाठांतरास किंवा संकीर्तनास भक्तियोग्यांना महत्वाचीं व आवडतीं वृत्तें मानलीं जातात. हींहि मात्रावृत्तेंच असून दोन प्रकारचीं आहेत. एक दुचरणी व दुसरें दीड चरणी. यांचे अनुक्रमें आठ व आठ, आणि आठ व सात मात्रांचे दोन दोन पाद एकेका चरणांत असतात. या आट व सात मात्रांच्या पादांतहि चार चार व चार तीन चरणांचे उपपाद असतात. पदें, आरत्या वगैरे वृत्तांची चर्चा येथें करण्याची जरूर नाहीं. ओवी व गीत हीं वृत्तें संतकाव्यांत विशेषत्वानें आढळतात आणि ती अनिर्बंध कविता आहे असा समज दृढ करून घेऊन त्यांत नकलकारानें आपल्या अर्थाकरितां किंवा चुकीनें समावेश केलेल्या शब्दांना मूळ कविता म्हणून मानण्याचा एक अज्ञानपूर्ण शिष्टाचार रूढ झाला आहे तो असत्य आहे हें सुचविण्याकरितां ही फोड केलेली आहे. अशी गफलत नकलकारांनीं इतर गीतावृत्तांतहि केलेली आहे. परंतु गायकांची मूळ वृत्तगानाबाबतची कल्पना कायम असल्यानें तो ह्या आगांतुक शब्दांना गातांना सहजपणेंच रजा देतो. या दृष्टीनें शेख महंमदांची कविता बऱ्याचशा प्रमाणांत शुद्ध असली तरी पुष्कळच ठिकाणीं अर्थबोधासाठीं अवांतर मात्रांची नकलकारांनीं भर टाकिलेली आहे. विशेषतः "शेख महंमद" या शब्दाची शेवटीं कृत्रिम जोड देतांना "शेख" ही अक्षरें गाळूनच कित्येक ओवीगीतें गावीं लागतील. लेखनांत मात्र तो शब्द लेखक व महंमद पैगंबर यांचा भेद दाखविण्या-

साठीं सर्वत्र लिहिला आहे. या संतकाव्यांत अक्षर हा मात्रांचा घटक न धरितां उच्चार हाच घटक मानला आहे. असो. कवितासंग्रहांत स्वीकारलेला विषयक्रम व वृत्तांच्या विशिष्ट मर्यादा यांचा विचार केल्यास मात्रामर्यादा ह्या मूळच्याच आहेत. रचनाक्रम हा मूळ रचनाकालाला जसा धरून होणार नाहीं तसेंच या रचनाक्रमांत कोणत्या कारणानें ही निरनिराळी कवितानिष्पति झाली याचा सुगावाहि यांत मिळूं शकणार नाहीं. शेख महंमदांचा खास हातचाच संग्रह उपलब्ध झाला असता तर ही उद्दिष्टें साधण्याचीं शक्यता होती. परंतु त्या अभावीं त्यांची कविता विषयवारीनें देण्याचा शक्य तो प्रयत्न करणें प्राप्त झालें.

सद्गुरूप्रकरणांत २५ कविता आल्या आहेत. त्याशिवाय गुरुसद्गुरुविषयक विचार पहिल्या योगसंग्राम, निष्कलंकप्रबोध व मदालसा या प्रकरणांतहि बरेच आलेला आहे. गुरु आणि सद्गुरु हे दोन शब्द वेगवेगळ्या अर्थानें संतवाङ्मयांत वापरले जातात. मात्र नकलकारांना यांतील भेद न जाणतां आल्यामुळें कांहीं घोटाळा केलेला दृष्टोत्पत्तीस येतो. गुरु किंवा श्रीगुरु ( क्वचितप्रसंगीच ) म्हणजे पराविद्या देणारा मनुष्य, आणि सद्गुरु म्हणजे गुरु ज्या हृदिस्थ ईश्वराची जाणीव करून देतो तो किंवा भक्तियोगांत उपास्य प्रतिमेच्या ठाईं ज्या विराटस्वरूपीं ईश्वराचें अधिष्ठान मानलें जाते तो परमात्मा असें समजलें जातें. संन्यासाश्रमांत प्रत्येक संन्यासी आपल्या आत्म्याचें नामकरण स्वीकारितो आणि पराज्ञानाचा अनुभव सांगतांना आपल्या गुरूच्या पूर्वाश्रमींच्या नांवानें किंवा गुरु म्हणून न सांगतां या संन्यासाश्रमांतील नांवाचा उल्लेख करतों. भक्तियोगांत आत्म्याचें नामकरण करीत नाहीं. म्हणून गुरु आणि सद्गुरु अथवा मनुष्य व ईश्वर असा उल्लेख करितात. शेख महंमदांनींहि आपल्या गुरुचा उल्लेख त्यांनीं उत्तर कालांत धारण केलेल्या दत्त दिगांबर किंवा दिगांबर या नांवानें केलेला आहे. गुरुज्ञान, गुरुलक्षणें वगैरे बद्दल शेख महंमदांनीं बरीच चर्चा केली आहे. त्या चर्चेच्या तपशिलांत जाऊन विस्तार करण्याचें कारण नाहीं. हा सर्व मजकूर परंपरेला धरूनच आहे. इस्लामी धर्मांत ही पराधर्मीय शिक्षणाची गुरुपरंपरा नसल्याकारणानें या विषयांत संस्कारजन्य मतभेदाचें कारण उरलें नव्हतें.

भक्तिबोधाखालीं शेख महंमदांच्या ८७ कविता आल्या आहेत. त्यांतील विचारसरणी हिंदु पराधर्मपद्धतीलाच धरून आहे. क्र. ७० मधील निर्गुण परमेश्वराचें वर्णन कुराणांतील कल्पनेला धरून आहे. शेख महंमद लिहितात : " चौदा भुवनें निर्गुणाची करणी । आणि इच्छिलें पवन पाणी । आनंद करिती खाणी वाणी । रवि शशि केले उजेडालागीं ॥१॥ मज मातापित्यासी न होता ठाव । संसार रचिला उपाव । तो सकळ देवतांचा देव । फुकाचा नये जनाचे वाचे ॥२॥ ज्यानें केला मनुष्याचा आकार । आणीक नानापरीचे उपचार । त्यांस कां विसरले गव्हार । ढवाळी करितील उन्मत्तपणें ॥३॥ जेव्हां हा जन्मा आला प्राणी । तेव्हां कांहीं सवें

न होती गोणी । पान्हां फोडिला मातेच्या स्तनीं । तुज दूध आहारालागीं ॥४॥ ऐसा हरि करूनि अकर्ता थोर । त्याचा जन मानीच ना आभार । बगाडी लागे देवतेसमोर । म्हणे मज काकाई प्रसन्न झाली ॥५॥..." इ. याच विचाराचे उद्गार कुराणांत सर्वत्र आढळतात. त्यांतील कांहीं पुढें देतों :

"Surely in the creation of the heavens and the earth, and in the alteration of night and day, . . . . and in the rain which Allah sends down from heaven, giving life by it to the earth after its death, . . . ." (no. 164). And yet of mankind are some who take (for worship) others besides Allah, loving them with the love of Allah: and those who believe are stronger in love for Allah, and Oh ! the impious will see, when they see their chastisement that all power is Allah's, and that Allah is severe in chastising. (Chap. 2, no. 165). "Allah is he who created the heavens, and the earth, and sends down water from the heaven thereby . . . ." (no. 32), "And he subjects to you the sun and the moon in their constant courses, and He subjects to you the night and the day." (Chap. 15, no. 33). "And He is Who has created the night and the day, and the sun and the moon, all moving swiftly in their celestial spheres." (Chap. 21, no. 33). "Do you indeed disbelieve in Him who created the earth in two days? . . ." (no. 9). "He made them seven heavens in two days. (Chap. 41, no. 12). And Allah brings you out of your mother's wombs devoid of all knowledge, and He gives you hearing, and sight, and heart, that haply you may give thanks." (Chap. 16, no. 78). O Mankind ! if you doubt as to resurrection, then lo ! We have created you of dust, then of the moist germs of life, then of clots of blood, then of pieces of flesh shapen and unshapen that We may clear to you, and We cause what We will to remain in the wombs till an appointed time, then We bring you forth infants, then that you attain your full strength, and one of you dies, and another of you lives on to an age so abject that after knowledge he knows nothing; and you see the earth barren, but when We send down water thereon, it stirs and swells and grows every kind of luxuriant herb." (Chap. 22, no. 5). "Say : have you seen your partener-gods whom you call upon beside Allah? Show me what they have created of the earth; or have they any share in the heavens; or have We given them a Book so that they are on clear proofs thereof? Nay, the

evil-doers promise one another only to deceive." (Chap. 35, no 40).

कुराणांतील वरील विचारसरणीवरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं, कुराणाच्या अनुयायांना ब्रह्मतत्त्व किंवा भक्तियोगांतील विराटपुरुषाच्या स्वरूपाबाबत फारशी वैकल्पिक भावना होण्याचें कारण नव्हतें. त्यामुळेंच इस्लामी धर्मानुशासनाखालीं वागलेल्या मंडळींनीं अष्टांगयोगांत बरीच प्रगती करून दाखविली. अष्टसिद्धीहि मिळविल्या. शेख महंमदांना भक्तियोगांतील वाचासिद्धीहि प्राप्त झाली होती म्हटलें तरी चूक होणार नाहीं. परंतु परातत्त्वाबाबत त्यांची प्रगती मर्यादितच राहिली. कारण प्राणी आणि प्रणेता ईश्वर यांच्यातील द्वैतभावाचा भेद कायम राहिला. श्रेष्ठ संतमहंतांनीं हा भेद टाकून देऊन आत्म्यापरमात्म्याच्या एकरूपतेंत किंवा ऐक्यतेंत पराज्ञानाची ध्येयसिद्धता सुरुवातीपासूनच संस्कारामुळें मानली होती. निव्वळ तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें ही तफावत दृग्गोचर होत असली तरी त्यांच्या पूर्णत्वाच्या स्वानंदांत त्यांना कांहीं कमतरता होती असें मात्र मानण्याचें मुळींच कारण नाहीं. शेख महंमदांच्या भक्तिबोधाच्या कवितासंग्रहाचा विचार केला तर त्यांत त्यांनीं या विषयांबाबतचा चांगला अभ्यास केल्याची साक्ष सहज पटण्यासारखी आहे. त्यांचा या अभ्यासांतील अनुभव व दीर्घ चिंतनमनन यामुळेंच त्यांचे हें लेखन वाचकांना गूढांत न घालतां त्यांना सुलभतेनें स्पष्ट बोध करून घेण्यास उपयुक्त ठरेल यांत शंका नाहीं.

शेख महंमदांनीं पंथांच्या व पराधर्मव्यवसायी लोकांच्या आचाराबाबत पुष्कळ अधिकारवाणीनें लिहिलें आहे. एकतर परातत्त्वज्ञानापेक्षां इस्लामी धर्मीय माणसांच्या मनावर आचारआचारणुकीबाबतच्या धार्मिक विशिष्ट शासनपद्धतीमुळें जे कांहीं संस्कार झालेले असतात त्यामुळें इस्लामियांची भिन्नाचाराबद्दल निषेध दाखविण्याकडे स्वाभाविकच प्रवृत्ति असते. निषेध करितांना साहाजिकच त्या गोष्टींच्या निषेधार्ह बाबी अधिक बारकाईनें शोधून काढण्याकडे कल राहातो. शेख महंमदांनीं आचारांचें निखंदन करितांना कोठेंहि अतिशयोक्ति किंवा तिरस्कार अथवा विडंबन करण्याची दृष्टि ठेवून विवेचन न करितां केवळ पराविद्येंत अनेक कारणांनें चुकीचें मार्गदर्शन कसें होत आलें आहे हें दाखविण्याच्याच हेतूनें तें केलें आहे. तसें करितांना परामार्गांत आड येणारी विषयोपभोगाच्या वासनेचें व मनोविकारांचे मूळ यांचे जरा ग्राम्य शब्दांत स्पष्टिकरण केलेलें आहे, असें सामान्य माणसांस वाटणें साहाजिक आहे. परंतु योगी–महंत हे आपल्या देहातीत अवस्थेंत जें बोलणें तें स्पष्ट शब्दांतच बोलत रहातात. संतांची तशी मनोवृत्ति नसते. ते असला संबंधच तोडतात. ते निरोधनिषेधापेक्षां सदाचाराबद्दलच बोलतात. शेख महंमद बोलभाषेंत लिहितात ही गोष्टहि येथें लक्षांत घेणें जरूर काहे. शिवाय मराठी ही त्यांची मायबोली नव्हती. धर्माधर्मांतील भिन्नता म्हणून ही आचार-

बोधाची टीका केलेली नसून ती केवळ पराविद्येच्या अभ्यासास जरूर ते अनुपान म्हणून दिली आहे. या दृष्टीनें मुमूक्षूस ती मननीय वाटेल यांत शंका नाहीं.

शेख महंमदांची रूपकात्मक कविताहि आचारबोधपरच आहे. त्यांतील 'हिंदोळा' ही कविता त्याचा तत्त्वज्ञानबोधाचा प्रत्यक्षानुभव सांगणारी असल्यानें ज्या स्थितीला पराविद्येंत "गुरूपदेश किंवा गुरुदिक्षा" म्हणतात तो प्रसंग कोणत्या प्रकारचा असतो तें समजून घेण्यास फार उपयुक्त ठरेल यांत शंका नाहीं. 'प्रळया'ची कल्पना आणि त्यांतील विशिष्ट तपशील हा इस्रायल धर्मापासून रूढ असलेली तिकडील प्रादेशिक भावना आहे. पंढरीवरील रूपक जरी भक्तिपंथीय रूढ कल्पनांना धरून असलें तरी तें अष्टांगयोगाचेंच निदर्शक आहे. हिंदुस्थानी कवितेंत कुराणांतील वचनांचा बराच उहापोह आहे. धर्माचारांत जरी भेदाभेद असला तरी धर्मतत्त्वांत तो तसा नसतो हेंच या त्यांच्या लेखनावरून दिसून येतें. शेख महंमदांच्या चरित्रपर कवितांचा विचार त्यांच्या चरित्रपर प्रास्ताविकांत केलेलाच आहे. अधिक विस्तार करण्याची जरूर नाहीं.

शेख महंमदांच्या समग्र कवितासंग्रहांत असलेल्या तत्कालीन माहितीवरून सतराव्या शतकांतील धार्मिक व सामाजिक परिस्थितीचा चांगलाच बोध करून घेतां येण्यासारखा आहे. तत्कालीन राजकीय परिस्थितींत जसे स्थानिक हिंदु-मुसलमानाचे संबंध सामाजिक दृष्ट्या शत्रुत्वाचे राहिलेले नव्हते तसेंच ते धार्मिक समजुतींतहि तितके तीव्र मतभेदाचे नव्हते. त्याकाळीं आपले धर्मग्रंथ मुसलमानांनाहि समजाऊन देण्याकडे हिंदु विद्वान संत महंतांची जशी प्रवृत्ति होती तशीच मुसलमानांचीहि हिंदु संस्कृति जाणून घेण्याची प्रवृत्ति जागृत झालेली होती हें स्पष्ट दिसतें. अधिकारीवर्गाच्या कुटुंबांत लेखन वाचन हें आवश्यक धन म्हणून सर्हा साध्य करून घेण्याचा प्रयत्न होत होता. क्षत्रीय व वैश्यवर्णीय मराठ्यांत व इतर ज्ञातींत अध्ययनाची गोडी संस्कारानेंच जडली होती. मात्र कागदाच्या दुर्भिक्षतेमुळें लेखनसाहित्य फार काटकसरीनें वापरलें जात असे इतकेंच. त्या कालीं अध्ययनार्थ आवश्यक असणाऱ्या संस्कृत भाषेच्या ज्ञानाला पूर्णपणें मोकळीक होती. कुणबाऊ धंदा करणाऱ्या व सेवाचाकरीनें चरितार्थ चालविणाऱ्या लोकांना अशा अध्ययनाची मुळींच गरज नव्हती म्हणून त्यांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं ही गोष्ट वेगळी. परंतु हिंदुधर्मसंस्था जेव्हां यवनांनासुद्धां आपल्या धर्मग्रंथांचे अध्ययन व अनुकरण करून देण्यास तयार होती त्याकाळीं सांप्रत जी संस्कृत भाषेच्या सोंवळेपणाची ग्वाही देण्यांत येते, ती कशी असत्य व अज्ञानपूर्ण आहे याची कल्पना सहजच करितां येते. प्रत्यक्ष ज्ञानाच्या अभावीं परंपरेच्या किंवा अनुवंशीय ज्ञानाच्या प्रतिष्ठेचें महत्व मानणारे नेहमींच आपलें अज्ञान त्या ज्ञानाच्या गूढपणाखालीं किंवा गुप्ततेखालीं लपविण्याचा प्रयत्न करितांना आजहि आपणांस पहावयास मिळतात. आर्यसंस्कृतीनें जो आपला प्रसार केला आहे तो धार्मिक आचारांच्या जुलमजबर-

दस्तीनें केलेला नसून ज्ञानदानानेंच केलेला आहे आणि अद्यापहि केला जात आहे. ज्या ज्या वेळीं हें उच्च ध्येय सोडून आचारधर्मांत संकुचित वृत्तीनें आर्यसमाज वागूं लागला त्या त्या कालखंडांत आर्यांची पिछेहाट झालेली दिसते. धर्माची ग्लानी येणें व ती दूर करण्याची जागृकता उत्पन्न होणें आणि पुन्हां समाज प्रगतिपथावर नेणें हेंहि एक आर्यसंस्कृतींतील फार सामर्थ्यवान बीजतत्त्व आहे. आत्मा अविनाशी आहे तरी त्यास जसें पूर्व जन्मांतील कर्माकर्मांच्या पापपुण्याईचा झाडा देण्यासाठीं कायापालट करून घेण्यास सिद्ध व्हावें लागतें त्याचप्रमाणें संस्कृतीलाहि आपल्या बऱ्यावाईट बदलत्या संस्कारांचा झाडा देण्यासाठीं नेहमींच वेषांतरास सिद्ध रहावें लागते. मात्र अशा जन्मांतरांत किंवा कायापालटींत जर पुण्याईचा संग्रह केला तर त्या अविनाशी परमतत्त्वाच्या तेजस्वी स्वरूपाशी समरसता करून घेण्याचा मार्ग जलदगतीनें आक्रमितां येतो ही संतांच्या अनुभवपूर्ण शिकवणुकीची जाणीव दृढ राखली गेली पाहिजे.

हिंदुधर्मांत जोपासलेली व अव्याहत प्रगतिपथावर राखण्यांत आलेली पराविद्या सतराव्या शतकाच्या सुरुवातीस महाराष्ट्राच्या सर्वच संतमहंतांनीं जशी लिंगभेदातीत व जातिभेदातीत राखण्याचा प्रयत्न केला होता तसाच त्यांनीं ती धर्मभेदातीतहि राखल्याचा निर्वाळा शेख महंमदानीं स्पष्ट शब्दांत दिला आहे. सतराव्या शतकांतील संतांनीं मानवतेच्या कल्याणार्थ स्वीकारलेले हें उदात्त धोरण, त्यांचे समाजाच्या समतेचे प्रयत्न आणि अनुभवपूर्ण परातत्त्वज्ञानदान हीं त्यांची महत्कार्यें महाराष्ट्राची प्रतिष्ठा अमर राखतील यांत शंका नाहीं.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक .................... नों. दि. ....................

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम........................ वि: ..............
क्रमांक ........................ नोंद दि ..........

१

१७९३६

# पवनविजय

## १ तत्त्वसार :

ॐ नमोजी अव्यक्तरामा। परात्पर तूं मेघःशामा। ब्रह्मादिकां न कळे महिमा। अविनाश म्हणोनियां ॥१॥ मग नमिली ते सरस्वती। जये ते सायोज्यता म्हणती। जे व्यापून त्रिजगतीं। प्रकाश असे[1] तिचा ॥२॥ मग नमिला तो श्रीगुरुनाथ। आनंदचैतन्य अवधूत। जयापासूनि असंख्यात। अवतारादिक जन्मले ॥३॥ स्वस्ति श्रीमनोहरा[2]। सकळ गुणांच्या भांडारा। आदि बहुळा दातारा। पुरुषा पुरातना[3] ॥४॥ तेथींच्या ज्ञानतारा वंदेन। नमस्कार याचिया[4] कारण। पृच्छा करूनियां शिष्यपण। सांगेल महिमा सद्गुरु ॥ ५ ॥ अक्षर कोणते संचलें। क्षर कैसे क्षरले। या निर्धारें होय भलें[5]। सांगा जी सद्गुरुराया ॥६॥ जरी समर्थ सद्गुरू भेटे। तरी भ्रांति पडळ तुटे। दारिद्य दुःख फिटे[6]। त्या पुरुषाचें ॥७॥ सद्गुरूची कृपादृष्टी। जाली सोऽहं मूर्तीची भेटी[7]। आत्मत्वाची गोष्टी। अनुभवीय जाणें ॥८॥ जेणें आत्मत्व देखिलें। आपणांतें वोळखिलें। त्यासी काय जाले। स्वस्वरूपीं बोधु ॥९॥ तेथ प्रकाश परंज्योती। कोटि सूर्य प्रकाशती। सहस्र चंद्र वरुषती। तेज[8] शीतळपणें ॥१०॥ तया आयागमन नाहीं। स्वयुंभु सदोदित[9] पाही। जनीं विजनीं अनन्य देहीं। भास नाहीं द्वैताचा ॥११॥ तय उदयास्त नास्ती[10]। जागृति ना सुषुप्ति। आपआपणिया[11] प्रज्योति। दर्पण होऊनि

---

१. प्रकाशे–(ब्रा. १).
२. सिध म०–(ब्रा. २).
३. आदिपुरुषा दातारा। बहुळा पुरातना।–(ब्रा. १).
४. ०याचि का०। ०करून शि०। सांगेन महिमान स० ॥–(ब्रा. १).
५. होऊन ठेले–(ब्रा. २).
६. दालिद्र फिटे–(ब्रा. १).
७. ०सुमोहतेंसी भेटी–(ब्रा. १).
८. शब्दलोप–(ब्रा. १).
९. स्वहिंभ सदोदित–(ब्रा. १ व २).
१०. तया उदो ना अस्तु।–(ब्रा. १).
११. आपआपणियातु।–(ब्रा. १).

ठेला ॥१२॥ ऐसा पुरुष तो कवण। याचें सांगा जी लक्षण। चैतन्य ब्रह्मीं पुरुषपण। असें कीं नसें ॥१३॥ निर्गुण ब्रह्म तें कवण। याचें कीजें निरूपण। सगुणाचें लक्षण। दृष्टि दावा जी सद्गुरू ॥१४॥ ब्रह्माविण ब्रह्मज्ञान[१२]। हृदय शुद्ध न होय जाण। एक ब्रह्म सर्व घटीं व्यापून। द्वितीय नाहीं काय ॥१५॥ ईश्वरीं माया जाली। ते अदुहिता कैसी गमली। हे सांगावी सखोली। सद्गुरुराया[१३] ॥१६॥ अकस्मात जाली दोन्ही। तरी तो बंधु ते भगिनी। ते माया[१४] जयापासुनी। तो देव होये कीं नाहीं ॥१७॥ होणें ना दुजे स्थानीं। तरी ते दुहिता कैसेनी। दोन्ही मातृकांचे प्रगटनीं। कैसें केलें सद्गुरू ॥१८॥ ईश्वरीं जिवात्मा आहे किंवा नाहीं। परमात्मा तो कवण ठायीं। तीर्थें तपें मंत्र जपें देहीं। कैसा भास आभास[१५] ॥१९॥ महद अक्षर त्रिलक्षण। प्रत्यक्षाकार होय कैसेन। हे देवरूपासी आले कोठोन। सांगावें जी गुरुराया ॥२०॥ आकारा आले तें सर्वहि नासे। निराकार केवीं प्रकाशे। ज्ञान विज्ञान कैसें। करावा बोध बोधु ॥२१॥ ज्याचा गुरु असे धडफुडी। तो लावेल ब्रह्मविद्येची हुडी। ज्याचा गुरु काबाडी[१६]। कोण फेडी दैना त्याची ॥२२॥ गुरुशिष्य पडलें बांदोडीं[१७]। त्या दोहींस कोण सोडी। आत्मज्ञानाविण बांदोडी। सुटे ना तयाची ॥२३॥ शुद्ध सोज्वळ वाचा लक्ष। द्वैधा कोणता पक्ष। तो जाणावा प्रत्यक्ष[१८]। कोणते क्षणीं घ्यावा ॥२४॥ पद देयाचे[१९] लक्षण। काय कार्यालागून। भेदत्रीये निरूपण। करावें जी सद्गुरुराया ॥२५॥ ॐकारीं आउट मातृका। सांगाजो जी सर्वत्रां। याची अर्ध मातृका। साक्ष दावा या जिवा[२०] ॥२६॥ कोठें प्रकटला ॐकार। तेथें कैसा क्षराक्षर। अर्धमातृका निर्धार। विस्तार कोठें कैसा झाला ॥२७॥ वेद कोठें झाले। नेति नेति[२१] काय देखुनि रक्षिले। पूर्ण तें काय देखिलें। कोणते वेदीं ॥२८॥ कोणते वस्तूमधीं। बुडी दिधली वेदीं। हे देह चारी आदी। ईश्वरीं कैसेनी[२२] ॥२९॥ देवादि कोणतें दैवत। कोणतें म्हणिजे अद्भुत। अध्यात्म बोलिजे त्वरित। कोणतें जी सद्गुरू ॥३०॥ ईश्वरीं विकार असे कीं नसे। देव कोणते विकारीं वसे। या जीवा निर्धारीं सरिसे। विकार असे किती[२३] ॥३१॥ कोणती

---

१२. ब्रह्मज्ञानाविण।–(ब्रा. १).

१३. ०सांगा जी स० । सद्गुरू राजेन्द्रा ॥–(ब्रा. २).

१४. माता–(ब्रा. १).

१५. कैसा भासे ॥–(ब्रा. १).

१६. ०धडफुडा। ०हुडा। ०काबाडी। –(ब्रा. १ व २).

१७. बांधोडी–(ब्रा. १).

१८. ०लक्षु । ०पक्षु । ०प्रत्यक्षु । –(ब्रा. २).

१९. पद्दयाचे ?

२०. साक्ष दावा ॥–(ब्रा. १).

२१. नित नित०–(ब्रा. १); नेतनेत० –(ब्रा. २).

२२. कैसे ॥–(ब्रा. १).

२३. ०असे।०। ०निर्धारी । विकार किती ॥–(ब्रा. २).

अवस्था देवा । किती अवस्थां जीवा । अवस्थानिर्धार करावा[२४] । जिवन्मुक्त स्थितीचा ॥३२॥ जीव शिव तो कवण । हा देह चाले कवणापासून । वर्ते विपरित प्राण । गेलियानें ॥३३॥...तो पुरुष कवणे ठाई । सांगा बोधु[२५] ॥३३॥ ब्रह्मीं जीव भिन्न किं अभिन्न । हें सांगा जी कृपा करून । या ब्रह्मांडास कवण । आधार असे किं नसे[२६] ॥३४॥ ब्रह्म निर्गुण केवळ । माया महा ढिसाळ । यासी आधार मूळ । काय असे जी समर्था ॥३५॥ ब्रह्मीची माया । ब्रह्मींच जाय विलया । ऐसे जरी झालिया । ब्रह्मचि भासे ॥३६॥ ॐकार शुन्याबाहिर अभ्यंतरी । तंव कां देहीं असे शुन्याभितरीं । हें देखोनि अंतरीं । दृष्टि बैसे जी ॥३७॥ शुन्यापासोनि ॐकार । ॐकारीं गगनाकार । गगनीं पवन निर्धार । निपजता जाहाला ॥३८॥ तेथें तेज व्यालें । आप तेथें कां गोठलें । पृथ्वी मंडळ झालें । माया पासाव ॥३९॥[२७] पांचांचे पंचवीस गुण । सद्गुरूनें दिधले वाटोन । हे जरी जाणती खुण । अनुभवी वैरागी ॥४०॥

**अर्धशून्ये मध्यशून्ये च निरामये ।**
**चतुर्शून्ये यो जानंति मुच्यते जन्मबंधनात् ॥ ४१ ॥**

हे चारी शून्ये महाशून्यापासोनि झाली । हे अध्यात्म महा खोली । अनंत सिद्धाचे बोली । अनुभवियालागीं ॥४२॥[२८] शून्य तेंचि ओळखा । तयासी नाहीं रूप ना रेखा । तें गुरुमुखें ओळखा । गुरुपुत्रीं अनुभविया[२९] ॥४३॥ ब्रह्म निर्गुण किं अपुरें । शाश्वत कीं देशांतरें । कीं कर्म भक्ति निर्धारें[३०] । जोडे कीं न जोडे ॥४४॥ अजपा ते कवण । जपा काय प्रमाण । देवतांचें क्रिया वंदन । कीं यासी मुक्त कैंची बोधेविण ॥४५॥ हे कैसी चालती अजपा । कवण जपे या जपा । हा जप पुढें जाण पां । कैसा आला असे ॥४६॥ हा कोणे ठाई कैसा उठे । कैसा केधवां कोठें उमटे । दोन्ही अक्षरें प्रकटे । करुनी दावा ॥४७॥

अजपा जपो शून्य मन धरो । पंच इंद्रिय हाट निग्रह करो[३१] । ब्रह्मज्ञानाग्निमो होम काया । महादेव कहे पारबती वंदो सद्गुरु पाया ॥ ४८ ॥ कमळकळिकेमाझारीं । चंद्र असती चारी । तेथें चौसष्टी क्रीडा करी । तें कवण स्थान असे पां ॥४९॥ कवण तें आत्मयाचें क्रीडामंदिर । कोठून देहे विकार स्थूळ

२४. धरावा ।–(बा. १).
२५. ही ओंवी अर्धीच असून क्र. ३३ त समाविष्ट आहे.–(बा. १ व २).
२६. आधार असे ॥–(बा. १).
२७. बाड क्र. १ मध्यें ओंवी क्र. ३९ गळला आहे. या ओंवीपासून क्र. ४० पासून चालू होतो.
२८. या ओंवींतील २ रा व ३ रा चरण गळला आहे.–(बा. २).
२९. अनुभवी ॥–(बा. १).
३०. ०देशांतर । ०निर्धार (आ. १).
३१. निग्रहंकारु ।–(बा. २).

लिंग देहे सार। कारण महाकारण शरीर। गती कैसी[३२] ॥५०॥ देहे इंद्रिये निका। कवण ते कळे चाळका। तेथिच्या सुखा दुःखा। कोण जाणणें[८] जाणे ॥५१॥ तेथिचिया त्रिकुटीं तिन्ही लोक। ते देही दावा विसा वस्तुंची साक्ष चारी वाचा चार देहे देहीक। स्थानें सांगा जी गुरुराया[३३] ॥५२॥ पांचा शून्यांसहित सांगा खुण। जेथुनि ब्रह्मा विष्णु रुद्र सर्व जण। तो कर्ता तो कवण। प्रतिपाळिता नारायण कवण पाळी ॥५३॥ रुद्र होऊनि संहार करी। विष्णु होऊनी प्रतिपाळिता जरी। ब्रह्मा होऊनि सृष्टि[३४] करी। तो सूत्रधारी कवण जी सद्गुरू[३५] ॥५४॥ जो सर्वत्रीं सदा वसे। तेज सर्वत्रीं व्यापिलें असें। तें[३६] सदाशिव प्रकाशे। हें प्रत्यक्ष कैसें ॥५५॥ देह प्रश्न असे सुंदर अक्षरें। मज निरूपावी दातारें। मी पुसतसें आदरें। भक्तिभाव धरूनियां[३७] ॥५६॥ ज्यास नाहीं ज्ञानाचा लवलेश। त्यास कासया उपदेश। खापरास लावितां परिस। तें काय सुवर्ण होईल ॥५७॥ ऐसा विनविती शिष्य राजेंद्र। जो असेल ज्ञानसमुद्र। तो उन्मळोन सुखी करील राज। आम्हालागीं ॥५८॥ सद्गुरुराया कृपा करून देणें[८]। ऐसा उपकार प्रकट करणें। यापरतें आणिक पुसणें। तें मौनचि असे ॥५९॥ जो आत्मा अव्यक्त अपरंपार। श्रुति नेणती न कळे पार। तो गुरु करूनियां साचार। अभिन्नत्व तत्त्व देखिलें ॥६०॥ तेथें नेमानेम कथिले[३८]। या शब्दीं मौन ठेलें। सद्भावें उद्धरण झालें। ब्रह्मोपदेसी[३९] ॥६१॥ ऐसा तो कृपासिंधु। शब्दीं नांदे ब्रह्मानंदु। भूतें म्हणतील शब्दु। येईल आम्हांसी ॥६२॥ याचिया मुखाची वाणी पाहाती। तंव तो अनुभवें[४०] वर्तती। होये नव्हे ते करिती। आपले अंगीं[४१] आपली इच्छा ॥६३॥ धन्य धन्य तो श्रीगुरु। ज्यानें फेडिला अंधकारु। मग दाविला परात्परु। निज हिता निज गुहे[४२] ॥६४॥ श्रीगुरु म्हणिजे कवण। तोडी या जीवाचें बंधन। मोडी संसारदुःख दारुण। दुःख कष्ट भारी ॥६५॥ श्रीगुरूची महिमा। वर्णिता काशास द्यावी उपमा। तरी कैवल्य परमात्या। बिंबी बिंबलासे ॥६६॥ श्रीगुरुचरणीचें सेवितां जळ। तेणें शिष्य मुरे तात्काळ। खंडे जन्ममरणाचें मूळ। ऐसे बोलती श्रुती ॥६७॥ श्रुतीनें लटिकें म्हणावें। तरी सत्य काय धरावें। श्रुतिविरहित बोलावें। त्यासी पाखांड बोलिजे ॥६८॥ तैसा तो नव्हे श्रीगुरु। परमहंस तो

---

३२. चरणलोप–(बा. २).
३३. ०जीं साक्ष गुरुराया ॥–(बा. १).
३४. श्रेष्ठ–(बा. १); श्रीष्टक–(बा. २).
३५. "जी सद्गुरु" या शब्दांचा लोप–(बा. १).
३६. तो–(बा. १).
३७. ०भावें करुनी।–(बा. १).
३८. तेथें नेम नेम कथा सरली। –(बा. १).
३९. ब्रह्मीं ब्रह्मपदेसी ॥–(बा. १).
४०. ० अनुभ्यास ०–(बा. १).
४१. "आपुले अंगीं" या शब्दांचा लोप–(बा. १).
४२. निज पिता ॥–(बा. १).

**दिगांवरु** । परब्रह्मीं करी साक्षात्कारु । निमिष न लगतां ॥६९॥ इति **श्रीतत्त्वसार** । तो निरूपिला साचार । तो सद्गुरु जगदोद्धार । त्यासी साष्टांग नमस्कार ॥७०॥ इति **श्रीतत्त्वसार** जाणा । महावाक्यें अध्यात्मपणा । संपूर्ण स्वरूपीं विवंचना । सर्व साध्यसाधना स्मरावें मनीं ॥७१॥

मन केव्हडें बापुडें । ब्रह्मादिकां पडलें सांकडें । माझे स्वरूप नेणती बापुडे[४३] । मीपणासी अधिकार[४४] ॥७२॥ हें तंव सहजचि सकळ । मातेंच मी अकळ । मज नेणती ढिसाळ[४५] । मजचि मध्यें ॥७३॥ मी अनंत अपरंपार । भरला असे सबराभर । परमात्मा सुखसागर । तोच्चि मी पैं ॥७४॥ एकविसा स्वर्गांवरी । आणि त्रिभुवन मजभीतरीं । सकळ असे चराचरीं । मीच तो असे पैं ॥७५॥ मजपासोनि हे माया । मज आहुत देती माझी काया । तेहि माझ्या ठाया । मावळती ॥७६॥ मी बोलिलों ऐसें जाण । माया स्वरूप तें कवण ; परमात्मिया बोल ओळखण । आंतील लक्षण जाणती[४६] ॥७७॥ मी परमात्मचि केवळ[४७] । असे सर्वांभूतीं सकळ । मातेंचि मी अकळ । म्हणत असे ॥७८॥ द्रष्टा दृश्य दर्शन । हें सर्वहि आपण । सकळ जेंहि जनीजनार्दन । हारपले तेथें ॥७९॥ सकळिक काय बोलावे । आणिक काय पाहावे । आणीक ते मानावे । अदृश्य हे ॥८०॥ येथून नसे अनुवाद । आणीक न करावा वेवाद । स्वरूपीं भेदबोध[४७-अ] । आपणियासी ॥८१॥ हें सर्व कांहीं असे । आणि दिसे ना दिसे । कवण काय ऐसें । म्हणावें मज ॥८२॥ चतुर वेदाभीतरीं । आणि क्षरअक्षरीं । आणीक चराचरीं । कर्म नि अकर्म उच्चारी सर्व मीच ॥८३॥ चतुर वेदांचें सत्त्व काढिलें । उपनिषदांचें सार घेतलें । **शेख महंमद** बोलिले । विजयो मंथन करूनियां ॥८४॥ हें मंथन करून घेईल । तो स्वतः सिद्ध होईल । सायुज्जता मोक्ष पावेल । सत्य जाणा ॥८५॥ हा प्रथम खंड **पवनविजयाचा** । श्रीमहादेवाचें वचन साचा । हें ऐकिल्या मूळ खंडे जन्मोजन्मींचा । पवनविजयो साधितां ॥८६॥ हा उपदेश स्वामी कार्तिकास केला । म्हणऊनि हा ग्रंथ आरंभिला । श्रोतीं चित्त द्यावें बोला । एकविधपणें ॥८७॥ पहिले खंडीचा विचार । दुसरे खंडींचा **पवनविजय** साचार । तिसरे खंडीं **काळज्ञानेश्वर** । हा क्षराक्षराचा विचार सांगितला असे ॥८८॥ पहिले खंडी क्षराक्षर ; दुसरे खंडीं इडा पिंगळा यांच्या तत्त्वांचे प्रकार । काळज्ञान निराकार । सांगितला सद्गुरुरायें ॥८९॥ आतां जो शिवशक्तीचा खेळु । आणीक समाधीचा मेळु । निराकाराचा आकारू । **महंमदीं** सद्गुरू सांगिजेल ॥९०॥

---

४३. घडफुडे ।–(बा. १).

४४. मीपण ॥–(बा. १).

४५. मज नेणवे सबळे ।–(बा. १).

४६. परमात्मिया वोळखणें । आंतिलच असे ॥–(बा. १)

४७. ० त्मानि केवळ ।–(बा. १). परमात्मिया नकळे ।–(बा. २.)

४७-अ. सस्वरूपीं बोधु ।–(बा. १).

## २. पवनविजय

आतां **पवनविजयाचें** ज्ञान कथिजेल : आतां सूर्याचें अंग उजवें, चंद्राचें अंग डावें; इडा चंद्राचें स्थान, पिंगळा सूर्याचें जाण; दोन्ही वाहाती सुषुम्ना जाणावी ॥९१॥ चंद्र सम जाणावा, रवि विषम ओळखावा; चंद्र स्त्री[४८] बरवी, रवि तो पुरुष; संक्रमण[४९] तो स्त्री ना पुरुष जाणावा ॥९२॥

**अस्थिर कार्यकारण** : अलंकारादि भूषणें । देशांतरादि गमनें । विविध वस्तू संग्रह करणें । शांतिक प्रष्णिक[५०] चंद्र कीजे ॥९३॥ दानें विविध न द्यावीं । विवाह लग्नें साधावीं । दासी म्हैसी गजें आणावीं । ग्रहप्रवेश चंद्र कीजे ॥९४॥ सद्गुरुस्वामीचीं दर्शनें । देवता प्रतिष्ठा करणें । संन्याशांसी वस्त्र देणें । चंद्र वाहातां ॥९५॥

आतां **सूर्याचा प्रश्न** : विद्यासिद्धीचा आरंभ । निर्वाण दीक्षेचा प्रारंभ । सेवा शास्त्र स्वयंभ । रवि वाहातां ॥९६॥ जुवा खेळतां चोरी जातां । गजीं घोड्यावर बैसतां । यानीं रथीं सर्वथा । रवि पाळिजे[५१] ॥९७॥ शास्त्र चित्र लिहिजे । मंत्र सिद्धि आकर्षण कीजे । झुंझाराविणें जिंतीजे । संदेह नाहीं ॥९८॥ वोखदें द्यावीं । विषें हरावीं । भूतें त्रासावीं । रवि वाहातां ॥९९॥ क्रिया विक्रिया करावी, आसनीं भोजनीं । शयनीं मैथुनीं । रवि वाहातां ॥१००॥ जारण मारण मोहन । स्तंभन आणिक उच्चाटण । गंगाजळीं तरण । रवि वाहातां ॥१०१॥

आतां **सुषुम्नेचा प्रश्न** : दोन्ही चंद्र सूर्य वाहाती । ते जाणावी संक्रमण गती[५२] । शुभें अशुभें निर्फळ होती । संक्रमणें[५३] न कीजे ॥१०२॥ जीवनमृत्याचा प्रश्न केला । लाभालाभ तेणें पुसला । दोन्ही नाडी पवन वाहात असला । तरी नाशिवंत गा ॥१०३॥ संक्रमण वाहातां । ईश्वर स्मरावा जाणता । क्षणक्षणां चंद्र सूर्य पालटतां । तोहि जाणावा विपरीत ॥१०४॥ सकळसिद्धी नाशिवंत । वेवादी तयासी हित ना अहित । विष न उतरे धनवंत्रीयातें । जरी विपरीत वाहे ॥१०५॥

कोपला स्वामी मारून काढी चोर । जरी वाहात असे चंद्र । तरी मरण घात । नाहीं तयासी ॥१०६॥ भलतिये यात्रे कार्या जावें । तरी चंद्रासी पाहावें । कार्यसिद्धि होये । निर्विघ्न सुखें ॥१०७॥ शीघ्र कार्य ओढवलें । जो वाहे त्याचीच चालावी पाऊलें । परी जाणावें इतुलें । चंद्राची सम रवीची विषम ॥१०८॥ आणीक विशेष जाणावें । जो वाहे त्याचीच चालावीं पाऊलें । परी जाणावें इतुलें,

---

४८. सर्वत्र श्री लिहिलें आहे.-(बा. १ व २).

४९. सर्वत्र "झंकरमान" लिहिलें आहे.-(बा. १ व २).

५०. प्रष्टिक-(बा. १ व २).

५१. वाहिजे-(बा. १ व २).

५२. शंकरमागती-(बा. १ व २).

५३. शक्रमाने०-(बा. १ व २).

चंद्राची सम रवीची विषम, तरी कार्यसिद्धि होये ॥१०९॥ वाहतां संक्रमण। न करावें गमन। केलिया भय दारुण। हानी[८] होय तयासी ॥११०॥

आतां **दिशेचा प्रश्न :** चंद्र वाहात असे जरी। नव जावें पूर्व दिशे तरी। उत्तरे गेलिया भय थोरी। मरण घात तयासी[५४] ॥१११॥ वाहात असतां भास्करु। पाश्चिमे दक्षिणे यात्रा नये करुं। केलिया घात थोरू। होय तयासी[५५] ॥११२॥ वाहतां चंद्र संपूर्ण। पूर्व उत्तरे शून्य। पश्चिमे दक्षिणे शून्य। रवि वाहातां ॥११३॥ पुसत्यानें प्रश्न[५६] केला। सम अक्षरीं बोलिला। चंद्र वाहात असला। तरी सिद्धि होय ॥११४॥ विषम अक्षर बोलिला। आणि चंद्र जरी अधिष्टला। तरी कार्य केलियाला[५७]। सिद्धि न होये ॥११५॥ परी येथें असे विचार। होय चंद्र अथवा दिनकर। प्रश्नाचा होतो उच्चार। रेचक पूरक[५८] जाणावा ॥११६॥ रिते नाडी कडिल प्रश्न करी तो निर्फळ। पूर्व नाडीकडील सुफळ। हे ज्ञान निर्मळ। सम विषम अक्षर जाणावें ॥११७॥ हरपलें हिरोनि नेलें। अथवा चोरीं गेलें। देशांतरादि चिंतिलें। पूर्ण नाडीकडे प्रश्न सुफळ ॥११८॥ व्याधी रोगें पीडिलें। आणिक इत्यादि पुसिलें। प्रश्न नाडी चंद्र असले। तरी सुफळ येरे निर्फळ ॥११९॥ प्रश्न केला गर्भिणीचा। उदय देखिला चंद्राचा। कन्या होईल सत्य वाचा। जाणावें लागे ॥१२०॥ देखिला भास्कर। तरी होईल कुमर। हा न चुके निर्धार। शिवलिखिताचा ॥१२१॥ पूर्ण स्थानीं प्रश्न करी। तो शून्य स्थानीं ये जरी। मृत्यु जाणावा लवकरी। सत्य गर्भिणीसी ॥१२२॥ शून्य स्थानीं पुसे। विघ्न गर्भासी असे। संक्रमणीं असे नपुंसक। गर्भ गर्भिणीचा[५९] ॥१२३॥ पुसता शून्य स्थानीं होतां। पूर्ण स्थानीं ये निरुता। तरी जिवंत तत्वतां। होय गर्भू ॥१२४॥ प्रश्न करितां तया हातीं दिसे। जरी एखादा जीव जवळी असे। अथवा फळ तरी असे। ते सुफळ जाणावे ॥१२५॥[६०]

आतां **चिंतेचा प्रश्न**। तत्त्वज्ञानावरून। आतां सांगेन खूण। तत्त्व परीक्षा[६१] जाणावी ॥१२६॥ अधोमुख तो ज्ञानी। ऊर्ध्व मुख वाहे तो ध्यानी। वायूच्या कळा पवनीं। निरुत्या जाणाव्या ॥१२७॥ न लगतां कवणिये स्थानीं। तो वायू जाणावा तत्क्षणीं। मिशीमध्यें वाहे ते धरणी। आकाश सर्व व्यापून असे ॥१२८॥ मन पुसे पवन सांगे। शुभ अशुभ जाणावे लागे। पवन चाले ऊर्ध्व मार्गे।

---

५४. ०भय असे। हानी होय॥ –(ब्रा. १).

५५. ०भय थोरु। होय तयासी॥ –(ब्रा. २).

५६. प्रयाण–(ब्रा. १).

५८. मूळांत सर्वत्र पूर्वक लिहिलें आहे.

५७. ० कार्य केल्या।–(ब्रा. १).

५९. असे। नपुंसक॥–(ब्रा. १).

६०. येथपासून क्रमाक्रमांकांत दोन बाडांत फरक आहे.

६१. ०प्रक्षा०–(ब्रा. १).

तरी मृत्यु सांगे सत्य ॥१२९॥ दिसे अधोमुख वाहात । तरी सुफळ सांगत । उंच स्थानीं सांगे त्वरित । न वाहे तरी ॥१३०॥ मध्यें वाहे तो शुभ नव्हे जाणावा । स्थानीं व्यापक तो नव्हे बरवा । वायू हा ऐसे परी जाणावा । प्रश्निके[६२] निकी ॥१३१॥ पृथ्वीं अस्थिर[६३] कार्यें करावीं । आपें बळ ज्ञान साधावीं[६४] । तेजें भांडणें करावीं । वायू उच्चाटण आकाश योगसाधना[६५] ॥१३२॥ पृथ्वी वाहे तरी चिंतिल्या कार्याचा लाभ । वायू[६६] पारवा एका सांग शुभ[८] । आपतत्त्वें तूर्त सिद्धि भोग[८] । सर्व कार्यासी[६७] तेज वायू ॥१३३॥ दोन्ही सांगती हानी । आकाश वायू[८] निर्फळ जाणोनी । सर्व कार्यासी घालिती वन्ही । तेज वायु आकाश[६८] ॥१३४॥

आतां **गर्भाची चिंता** । आप दिसे वाहाता । तरी पुत्र सांगे निरुता । पृथ्वी सांगे कन्या ॥१३५॥ तेजें होय गर्भपात । वायू आकाश नपुंसक होत । पवन जाणावा सत्य । तत्त्वभेद साधकवर्गी ॥१३६॥

आतां **जीव मूळ धातु शून्य** । आणिक विशेष सांगिजेल ज्ञान । सकळ ज्ञान जाणोन । बोलिजे[६६] याचिपरी ॥१३७॥ मूळ चिंता म्हणजे धान्यतरुतृणादिक । जीव चिंता म्हणजे सकळ जीव अनेक । धातु चिंता म्हणजे अष्टादि लोकादिक । कांहीं ना चित्तीं ते शून्य चिंता ॥१३८॥

आतां हा **चिंतेचा विवर** । चिंतिलिया जागीं जे प्रकार । पृथ्वी दिसे तरी निर्धार । मूळ चिंता[६९] ॥१३९॥ आप दिसे तरी जीव चिंता । तेज दिसे तरी धातु चिंता । आकाश वायु दिसे तरी शून्य चिंता । जाणावी याचपरी[७०] ॥१४०॥ आप शुद्ध दिसे तरी द्विपद जाणिजे । आप तेज चतुष्पद ओळखिजे । पृथ्वी दिसे तरी बहु चरण म्हणिजे । आकाश वायू तरी शून्य जाणिजे[७१] याचिपरी ॥१४१॥[७२]

आतां **गर्भचिंता** जाणिजे : आपतत्त्वीं पुरुष । पृथ्वी तत्त्वीं स्त्रीचा वेश । तेज तत्त्वीं गर्भा घात असे । वायू आकाश नपुंसक जाणावा ॥१४२॥[७३]

---

६२. जरी प्रश्न ॥–(बा. १).
६३. ०स्थिर०–(बा. १).
६४. आपें शुभ लग्नें साधावीं ।–(बा. १).
६५. असे योगसाधनें ॥–(बा. १).
६६. शब्दलोप–(बा. २).
६७. " सर्व कार्यासी " या शब्दांचा लोप–(बा. १).
६८. तिसऱ्या व चवथ्या चरणांचा लोप–(बा. १).
६९. ०प्रकार । होय कीं न होय निर्धार । वरताळा पहावे तत्त्वें ॥–(बा. २).
७०. जाणावी ॥ (बा. १).
७१. शून्य चिंता जा०–(बा. १).
७२. यानंतर मध्येंच " हे जीवीं जाणावे तत्त्व भेद ऐसे । " असा एकच चरण आहे.–(बा. १).
७३. यापुढें " हा चितेचा विवरु " असें म्हटलें आहे.–(बा. १ व २).

राजिकें दैविकें नेले। अथवा चोरीं चुकोन गेलें[७४]। तें कवणे दिशेसी गमले[७५]। पाहिजे तत्त्वीं प्रश्न[७६] ॥१४३॥ आप तत्त्व देखिलें लाधेल तेच ठाये। पृथ्वी तत्त्व दिसे तरी पश्चिमेस आहे। तेज तत्त्व तरी पूर्वेची सांगे सोय। वायू तत्त्व आहे उत्तरेसी ॥१४४॥ आकाश देखिले तरी दक्षिणे असे गेले। मागुतें न भेट होईल वहिले। परी जाणावें इतुलें। कांहीं केल्या न भेटे[७७] ॥१४५॥ पृथ्वी आप दिसे। गेला तो गोरा वर्ण असे। तेज सांवळें प्रतिभासे। वायू आकाश दिसे काळा वर्ण ॥१४६॥ आपें लवकरी ये लाभासी। पृथ्वीनें लाभ कितिका दिवशीं। तेजें भय निर्फळ मानसीं। आकाशे वायो मृत्यु सांगे[७८] ॥१४७॥

आतां **मूळ चिंतेचा** विवर। चिंतिलिया जाणिजे प्रकार। आपें श्वेत फळे मोहर। तेजें तिखट फळें तोंवर। पाहे ज्ञानी[७९] ॥१४९॥ पृथ्वी देखिली तर पीत फळें पुष्पें[८] मधुर। वायू तत्त्व देखिलें आंबट फळें मोहर। आकाश बहु[८] वर्ण झाड फळें तोंवर। कडवट ॥१४९॥ मूळ चिंतेच्या ठायीं। आधीं सजिव निर्जिव पाही। आप पृथ्वी सजीव होई[८]। येरे निर्जीव ॥१५०॥

आतां **धातु चिंतेचा** विवर। कवण धातु विचार[८०]। आप तत्त्व जीव निर्धार[८१]। पृथ्वी तत्त्व तरू तृण ॥१५१॥ तेज तत्त्व कनक जाण। आकाश वायू दोन्ही[८] शून्य। पृथ्वी आप होय संजीवन। येरे निर्फळ निर्जिव ॥१५२॥ धातु चिंतेचा विवर पहावा। पाषाण हातीं धरावा[८२]। होये कीं नव्हे पुसावा। तेज तत्त्व होय येर न होय ॥१५३॥ श्वेत पीत कृष्ण नीळ आरक्त। हा सांगितला वृत्तांत। सद्गुरु स्वामी निरोपित। **शेख महंमदा**लागीं ॥१५४॥

हे भेद बहु वर्ण। तत्त्वें जाणावें वर्ण[८३] प्रमाण। **पंच तत्त्वांचें वर्ण** गहन[८४]। या परी जाणिजे ॥१५५॥

आतां **तत्त्वज्ञान उत्पत्ति** सांगो: पृथ्वी घटिका ५, आप घटिका १०, तेज घटिका[८५] १५, वायू घटिका १२, आकाश घटिका १८, ऐसी रात्र न दिवस संख्या जाणावी ॥१५६॥

---

७४. यापुढें "स्त्री कां पुरुषें पुसिलें।" असा चरण आहे–(बा. १ व २).
७५. गेलें।–(बा. १).
७६. सांगिजो जी ॥–(बा. १).
७७. ०भेटे वहिले। कांहीं केलिया ॥ –(बा. १).
७८. अदृश्य होय ॥–(बा. १).
७९. चरणलोप–(बा. १).
८०. ०धातु ते साचार।–(बा. २).
८१. ०तत्त्वसिद्धि लौकर।–(बा. २).
८२. घ्यावा।–(बा. १).
८३. ०वर्म प्रमाण।–(बा. २).
८४. पंच तत्त्व वर्णन।–(बा. १).
८५. २५–(बा. १).

आतां **तत्त्व वर्ण** सांगो : पृथ्वी पिवळी, आप श्वेत, तेज आरक्त वर्ण,[८६] वायू नीळ, आकाश काळा[८७] ॥१५८॥

आतां **तत्त्वरुच्या** सांगो : पृथ्वी मधुर गोड, आप खारें, तेज तिखट, वायू आंबट, आकाश कडू ॥१५८॥

आतां **तत्त्वांचीं घरेंद्वारें** सांगो : आपाचें घर लल्हाट। मुख लिंग घनवट। आहार मैथुन रुची (नीट)। तयापरी जाणावे ॥१५९॥ तेजाचें घर तिळी। मुख नेत्र न्याहाळी। आहार कुंभ स्वरूप सुढाळी। देखणें पाहे ॥१६०॥ वायूचें घर फोपीस। मुख जाणावें नासिक। आहार परिमळ सुगंध देख। दुर्गंधा जाणावी याची पैं[७९] ॥१६१॥ आकाशाचें घर काळीज। मुख देखणें कर्ण जाणिजे[८८]। आहार शब्द गोड रुची पाहिजे[८]। ओळखावें गुरुमुखें[७९] ॥१६२॥ पृथ्वीचें घर नाभी। द्वार मुख आहार षड्रसेंहि। मधुर रुचेस भोगी[८]। जाण याच पैं[७९] ॥१६३॥

आतां **तत्त्वांचीं शस्त्रें** सांगो : आकाशाचा बाण, वायूचें चक्र, तेजाची भाली, आपाचा भाला, पृथ्वीचा खांड, हे शस्त्र जाणिजे ॥१६४॥

आतां **तत्त्व रंग** सांगो : [७९] आरसा कांसियाचा उठीजे[८९]। वरी[८] पवन उश्वास[९०] सोडिजे। जें तत्त्व वाहे ओळखिजे[८]। तो वर्ण उमटे ॥१६५॥

आतां **तत्त्व परीक्षा** सांगो[७९] : उजवे[९१] हाताचे मनगट मुखावरी ठेविजे, तळहातावरी पवन सोडिजे; तळहातीं पवन जिरे तरी पृथ्वी जाणिजे ॥१६६॥ कोपराकडे पवन वाहे तो आप, आंगठ्याकडे पवन वाहे तो आकाश, अंगुळियामध्यें वाहे तें वायू तत्त्व, करांगुळियाकडे वाहे तें तेज तत्त्व; तत्त्वभेद जाणिजे याचिपरी ॥१६७॥ हे तत्त्व भेद जाणा। साधकीं आणावें मना। **शेख महंमद** सांगे खुणा। आत्मज्ञानाच्या ॥१६८॥

आतां **दुसरी धारणा** सांगो : बेंबीवर[९२] वाहे पवन तें पृथ्वी तत्त्व, हृदयावरी समावे तें तेजतत्त्व, उरावरी लागे[९३] शीतळ पवन तें आप ॥१६९॥ नाकापासून भवती कोठें नलगे तें वायू तत्त्व, नाकापासून सर्व व्यापून असे ते आकाश तत्त्व जाणें; तत्त्व धारणा जाणावी याचिपरी ॥१७०॥

आतां **तिसरी धारणा** सांगो : काष्ठाचा कोपर कीजे, वरी पवन सोडिजे, अनामिकापासी येई पवन तरी आयुष्य सरे[८] वर्षे एका ॥१७१॥ योगसाधन[९४] दृढ

---

८६. रक्तवर्ण–(ब्रा. १).

८७. काळे–(ब्रा. १).

८८. मुख कर्ण।–(ब्रा. १).

८९. उठणी–(ब्रा. १).

९०. श्वास–(ब्रा. २.).

९१. जेवणिये–(ब्रा. १).

९२. बोंबी उजु०–(ब्रा. १).

९३. ०समावे०–(ब्रा. १).

९४. योगसिद्धि–(ब्रा. १).

 अनुक्रम .................. दि: .................. क्रमांक .................. नों दि: .................. 

धरिजे, अनामिकेचा भाग अंगुळिया चार ४; पृथ्वीचा चौंगा एक १, आप चौंगे दोन २, तेज चौंगे ३, वायू चौंगे चार ४, पांचवा चौंगा आकाश, जाणिजे ॥१७२॥

आतां **चवथी धारणा** सांगो : उजवे नाकपुडीस पवन लागे तो तेज, डावे नाकपुडीस पवन लागे तो आप, नाकापासून कोठें न लागे तों वायु, मिशींमध्यें लागे ते पृथ्वी, सर्व व्यापक ते आकाश तत्त्व ॥१७३॥

आतां **पांचवी धारणा** सांगो : मृत्तिकेच्या गोळ्या कीजे, वर रंग श्वेत पीत कृष्ण नीळ आरक्त दीजे, पिशवीजेमध्यें भरिजे, हात घालून धरिजे, जें तत्त्व वाहे तो रंग हातास येईल ॥१७४॥ आधीं देहशुद्धि करावी । मग तत्त्वभेद साधावी । तेल मैथुन वांगी राई । वर्जावी साधकीं ॥१७५॥ नादापासून शून्य आकाश जाण । आकाशीं पवन उत्पन्न । पवनीं तेज गहन । तेजापासाव आप जाण । आपीं पृथ्वी उत्पन्न ॥१७६॥ पांचांचे पंचविस गुण । उत्पन्न पंचमुखी जाण । पंचवगत्र कामधेनु । सत्रावी जीवनकला ॥१७७॥

**पांचा शून्यांपासाव पाहावी पांच तत्वें** : पाहे पांच देह, पांच वाचा, पांच घरें, पांच आहार, पांच वेव्हार, पांच शस्त्रें, हें जाणिजे[९५] गुरुपुत्रें ॥१७८॥ तो गुरुपुत्र ओळखावा प्रकाश । पवनाचा जाणावा मास । चौदा पवन आणि ध्यानास ।त्यामाजी तीन[९६] उत्तम ॥१७९॥ इडा चंद्राचें स्थान । ब्रह्याचे सात्विक गुण । रेचक जाणावा पवन । गुरुपुत्रा । योगिया[९७] ॥१८०॥ पिंगळा सूर्याचें स्थान । पूरक जाणावा पवन । विष्णुचे राजस सगुण । ऐसियाचे परी ॥१८१॥ संक्रमण तो जाणावा शंकर । त्राहाटक पवन तयाचा निर्धार । तामस गुण रुद्राचा अपार । अनुभवियें[९८] जाणा ॥१८२॥ निर्शून्यांत[९९] कुंभक जाणोनी । वाजतो महाशून्याचा ध्वनि । हा पांचवा सूक्ष्म वेद जाणोनी ।गुरुपुत्रें ओळखावा गुरुमुखें ॥१८३॥ सत्त्व–रज–तमापासुनी । या देहाची उभारणी । या त्रिगुणापासुनी । शरीर चाले ॥१८४॥ सत्त्व रज तम । जाण त्रिगुण वर्म । या तीहीं[१००] पासून । ब्रह्म वेगळेची असे ॥१८५॥ इडा पिंगळा सुषुम्ना । साधकें आणावें मना । ते चुकेल जन्म-मरणा । सत्य योगी[१०१] ॥१८६॥ जरी सद्गुरुचा होय बोध । तोचि जाणें संवाद । येरां अज्ञान्यांस नाहीं बोध । सद्गुरुविण ॥१८७॥ अनिलापासोनि पृथ्वी क्षीण होय[१०२] । खारें आप लोपलें जाय । परि न कळे सोय । या पवनाची ॥१८८॥

---

९५. जाणवें–(ब्रा. १).
९६. चर–(ब्रा. १).
९७. गुरुपुत्रीं ॥–(ब्रा. १).
९८. जाणत्यानों जाणा ॥–(ब्रा. १).
९९. निर्शून्य तो कु०–(ब्रा. १).
१००. या तिहींतें व्यापून । –(ब्रा. १).
१०१. जाणा ॥–(ब्रा. १).
१०२. ०पृथ्वी क्षण एक वाहें । –(ब्रा. २).

अति मैथुनीं अनिल नासे । अनिल नासलिया पोटीं । जीव होय हिंपुटीं । नर ते होती कष्टी[१०३] । अज्ञान भासे ॥१८९॥ या कारणें मधुर मधुर भोजन करावें, तरी हेचि पावसी वर्म; नाभीहून पवन पृथ्वी जांभई अंगोळिया चार ४ ॥१९०॥ तयापरी आपतत्त्व अंगोळिया चार ४, तया उपरि तेज तत्त्व अंगोळिया चार ४, जाणावा याउपरी वायूप्रकाश, तें आकाश तत्त्व ॥१९१॥ पृथ्वी अंगोळिया सोळा १६, आप अंगोळिया बारा १२, तेज अंगुळें चार ४, वायू अंगुळें साडेआठ, आकाशीं संख्या नाहीं ॥१९२॥

आतां **ध्यानाची मुद्रा** : आकृति अगोचरी सांगेन । मुख नयन नासिका दोन्ही श्रवण । दोन्ही हातांच्या अंगोळिया निरोधून । भरावें[१०४] कुंभक ॥१९३॥ भ्रूमध्यें द्यावी लक्ष । शुचिर्भुत होऊनियां अष्टांगें सुर्धु । आत्म स्वरूप पहावें निर्धु । योगागमन योगी[७९] ॥१९४॥ पृथ्वी पीत वर्ण चतुष्कोण । आप श्वेत वर्ण दोन कोनें[१०५] । तेज आरक्त वर्ण तीन कोन । वायू नीळ वर्ण इंद्राकार, आकाश काळा वर्ण निराकार ॥१९५॥ पृथ्वीमध्यें वाहे घडी १, आप वाहे अर्ध घडी, तेज उंच वाहे घडी १, वायू सवा वाहे घडी १, आकाश काळा वर्ण वाहे घडी १ ॥ १९६ ॥ मधें वाहे ते धरणी, आप अर्ध्व प्रकृति, तेज ऊर्ध्व मती, पृथ्वी मध्यस्त, वायू अलिप्त, आकाश नीळारंभ, हा वायू सर्व प्रदायकं[१०६] ॥१९७॥ पृथ्वी सोये, आप बोले, तेज खावे, वायू चाले, आकाश निराकार डोले ॥१९८॥ पृथ्वी द्वारें[१०७] । आप घर । तेज वायू जाणावा दुर्ग[८१०८] । आकाश ऊर्ध्व ॥१९९॥ एवं[६६] तत्वभेद : ॥ पृथ्वी पश्चिमे, आप येथेंचि लाधे, तेज सांगे पूर्वेची सोय, वायू उत्तरे आहे, आकाश दक्षिणे निर्फळ ॥२००॥ पृथ्वी शुद्ध वाहे काज होय, आप वाहे काज होय, तेज वाहे तरी झगडा करी, वायू वाहे काज न होय बोल होती, आकाश वाहे झगडा करी परी भरेल ॥२०१॥ पृथ्वी आप कार्य करी परी झगडा करी, तेज वायू कार्य करी न करी, आकाश निर्फळ अपेशी,[१०९] आकाश वायू काज नोव्हे ॥२०२॥

आतां **चंद्राच्या तिथी शुक्ल पक्षीच्या** जाणिजे : पाडवा १, बीज २, तीज ३, सप्तमी ७, अष्टमी ८, नवमी ९, तेरस १३, चतुरदस १४, पूर्णिमा १५ ॥२०२॥ आतां **सूर्याच्या तिथी शुक्ल पक्षीच्या** जाणिजे : चौत ४, पंचमी ५, षष्ठी ६, दशमी १०, एकादशी ११, द्वादशी १२, एवं च चंद्रसूर्याच्या तिथी शुक्ल पक्षीचिया जाणाव्या ॥२०४॥

---

१०३. न परते दृष्टि ।-(बा. १).
१०४. भरावा-(बा. २).
१०५. ० वर्ण बीजाकार-(बा. १).
१०६. परदायक-(बा. २).
१०७. "घरद्वार" फक्त-(बा. २).
१०८. दीर्घ-(बा. १); द्रीर्घ-(बा. २).
१०९. तेज...अपेशी या वाक्याचा लोप-(बा. १.)

आतां **कृष्णपक्षीचिया तिथी : सूर्याच्या** जाणिजे : पाडवा १, बीज २, तीज ३, सप्तमी ७, अष्टमी ८, नवमी ९, त्रयोदशी १३, चतुर्दशी १४ ॥२०५॥ आतां अमावस्या[११०] चंद्राची. एवं **चंद्राचिया तिथी कृष्णपक्षीचिया** जाणिजे : चौत[१११]४, पंचमी ५, षष्ठी ६, दशमी १०, एकादशी ११, द्वादशी १२, या तिथी कृष्णपक्षीचिया जाणिजे ॥२०६॥

**मनुष्य प्रश्न** करी । तयाकडील नाडी वाहे जरी । सफळ काज होय निर्धारी । रिते नाडीकडील निर्फळ । काज न होये ॥२०७॥

**अर्ध्वं चंद्रा ऊर्ध्वं सुरा मध्यें गगनका द्वारा । धरतरी वैठ[११२] गगन थंबो रोयो इस वीधवन खंड खेलो तव जीतो जम काला** ॥२०८॥

**प्रयोग** सांगेन आतां : ल्हान थोर ठायीं जाईजे । कीं बहुतांमधीं बैसिजे । पृथ्वी तत्त्व पाहिजे[७९] । **शेख महंमद** म्हणे ॥ २०९ ॥

स्वामी कार्तिक करी विनंति । श्रीमहादेवाप्रती । तत्त्वज्ञानाची निगुती । प्रगट कीजे ॥२१०॥ सेवा करिती सुरवर[११३] । अष्टमा सिद्धीसी[११४] मनोहर । वोळंगती गणगंधर्व विहार[८] । अर्ध अंगीं पार्वती ॥२११॥ ते मायापासूनि अभ्यासकळा[११५] । तयेचे ध्यानीं प्रकाश सकळा[११६] । पंचवगत्र देखिला । परमात्मा ॥२१२॥ म्हणे अहो जी ज्ञानसागरा । ज्ञान सांगिजो जी कर्पुरगौरा । सिद्ध साधु तरावया प्रकाश चतुरा[११७] । योगें कारण ॥२१३॥ तिथिवार दिवसाचें चंद्रबळ । याती योग सुफळ । ऐसें ज्ञान निर्मळ । कथी देवा ॥२१४॥ हुं सः दोन्हींहि अक्षरें । त्रिलोक व्यापक थोर । याचा तर्क मनीं[११८] मनोहार । सर्वस्व लाधेल ॥२१५॥...सकळ । तो प्राणी पवन प्रकाशे ॥२१५ अ॥

आतां ईश्वर म्हणे पुरुषोत्तमा । ऐक स्वामी कार्तिका वचना । येथचिया विवंचना । सांगेन तूंतें[११९] ॥२१६॥ हें ईश्वर मुखींचें वचन । पवन अभ्यासकरण । त्याचें करी प्रमाण[१२०] । गुरुमुखें ज्ञान प्रकाश होय ॥२१७॥ हें अंतरीचें ज्ञान ।

---

११०. आवस–(बा. १).
१११. या पूर्वी " बीज २ " दिली आहे–(बा. २).
११२. पैठ–(बा. १).
११३. सुरनर–(बा. २).
११४. ०सिद्धि शिव मनो०–(बा. १).
११५. ०ज्ञान अ० केला ।–(बा. १).
११६. जाला–(बा. १).
११७. ०तरावया । पवन प्रकाशे योग करण ॥–(बा. १).
११८. ०तर्क धरी मनीं मनहर । –(बा. १).
११९. आतां सांगो उपमा । म्हणे पंचवगत्रु ॥–(बा. १).
१२०. त्याचें याचें धरे साधन । –(बा. २.).

१वनविजय सांगावें योगाचें साधन । कथी पंचवगत्र आपण । ज्ञानयोग बोलिजे ॥२१८॥ आतां शक्तिचियानीं संवादे[१२१] । पवनविजय ग्रंथ प्रबंधे । म्हणे आनंदु आनंदें । माया शक्ति आदि ॥२१९॥ हे जाणती भेद । सर्व सिद्धींचा आनंद[१२२] फिटे सर्वस्व देहबंध[१२३] । अभ्यासितां ॥२२०॥ योगासी कारण । चंद्र सूर्य बळ पाहाणें । ऐसें सुफळ ज्ञान । कथी देवा ॥२२१॥ हे देह असतां प्राण पिंडीं । बहात्तर नाडी विस्तारिल्या ब्रह्मांडीं । हे पवन जाणावे अनुभवें गोडी[१२४] । सर्व सिद्धि ज्ञान घडे तया ॥२२२॥ नाभीहून हृदय स्वाधिष्टान । अकोंचन कंदर्पापासोन । बहात्तर कोठे[१२५] व्यापून । चौदा अंगुळें ॥२२३॥ जे वीर हे समाधि साधिती । अर्ध्व ऊर्ध्व भेदिती । नाडीमाजी प्राणी संचरती । ते स्वयें साधु[१२६] ॥२२४॥ देहामध्यें दश पवन । त्यांत उत्तम तीन । इडा पिंगळा सुषुम्ना । हें ज्ञान जाणिजे ॥२२५॥ इडा चंद्राचें स्थान । पिंगळा सूर्याचें जाण । सुषुम्ना ते संक्रमण । जाणिजे ज्ञाता ॥२२६॥ हे साधकी पवन साधिती । ज्यासी हीं तत्त्वें कळती । ऐसा योग मंथुन पाहाती । पांच तत्त्वांच्या आकृती जाणिजे ॥२२७॥ आसनीं द्वादश अंगुळें । मार्गीं चालतां चोविस अंगुळें । रडतां[१२७] बोलतां सोळा अंगुळें । पवन प्रकाशे बाहेरी ॥२२८॥ चौपन्न अंगुळें उल्हासनिद्रासमयें । मैथुनीं चौसष्ट अंगुळें ऊर्ध्व वाहे । धांवतां चौताळिस[१२८] अंगुळें आहे । पवन चाले नाडीसंगें[१२९] ॥२२९॥ मैथुनीं काया होय हिंपुटीं । खोकर पडे काया नर होती कष्टी । यालागीं न परते दृष्टि[१३०] । ह्या चित्ताची[१३१] ॥२३०॥ चर्तुदश अंगुळें पढतां । नव अंगुळें बोलतां । ध्यानीं ॐकारीं उठतां । कुंभक चाले नाडीसंगें ॥२३१॥ या कारणें मन पवन जो जाणे । तो पिंडासीं करी रक्षण । आहिक्यें पवित्र[१३२] साधन । तया घडे ॥२३२॥

बिंदु तरी न द्यावा कामांगीं[१३३] । तो राजयोगी भोगी ना त्यागी । तो सदा वीतरागी । वर्ततसे ॥२३३॥ तो विरळा ज्ञान जाणें । याहि स्थितीप्रमाणें । मैथुन करूं जाणें । तो नर विरळा ॥२३४॥

---

१२१. सावध-(बा. २).
१२२. आरंभ-(बा. १).
१२३. फिटे सर्व संदेह ।-(बा. १).
१२४. साधीं-(बा. १).
१२५. कोठे-(बा. १).
१२६. ते प्राणी संचरती । नाडीमाजी ते स्वायंसाधु होती ॥-(बा. २).
१२७. बोलतां-(बा. १).
१२८ बेताळीस-(बा. १).
१२९. तुम्ही जाणत्यानें जाणा ॥ -(बा. १).
१३०. पुरे-(बा. २).
१३१. सत्य जाणा ॥-(बा. १).
१३२. पर-(बा. १).
१३३. कामिनी संगें ।-( बा. १).

आतां **स्वरज्ञान** सांगो : फाल्गुन मासीं कृष्णपक्षीं । अवसेच्या रात्रसमयेसीं । शुचिर्भुत होऊनियां मानसीं । चंद्र सूर्य शुभ तत्त्वीं पाहिजे ॥२३५॥ वामांग घालूनियां भूमिवरी। निद्रा शयन सावध[134] करी। अर्ध्व ऊर्ध्व चंद्र शुभ स्थानावरी। पाहे आपणियातें[135] ॥२३६॥ पूरक[136] रेचक आहे तो शुद्ध स्वर । रेचक दिसे पश्चिमे[137] पदें चार । पूरक दक्षिणे पदें चार । यात्रा कीजे ॥२३७॥ तेथें पवन सोडून पाहीजे । पूर्व उत्तर दिशा काळ वार तिथ चुकविजे; रेचक तो चंद्र जाणिजे । पूरक तो सूर्य ओळखिजे । येणें प्रमाणें पाडवा १ बीज २ तीज ३[138] ॥२३८॥ जे तिथि दिसे शुद्ध । वरीस एक बळ लाधे । पाडवा न दिसे शुद्ध । आषाढ पर्यंत बळ नाहीं मास चार ॥२३९॥ न दिसे बीजेस रेचक । बळ नाहीं पर्यंत कार्तिक । ऐसें जाणावें महा दुःख[79] । मास चार ॥२४०॥ तिजेस जरी न दिसे । फाल्गुनपर्यंत बळ नसे । उणें येईल सरिसें[79] । मास चार ॥२४१॥ जे तिथीस शुद्ध चंद्र देखेल । ते मास चार बळ लाधेल । संवछराचें[139] फळ घडेल । जाणावे याचपरी ॥२४२॥

आतां **पूर्णिमेचें** फळ : आतां **दक्षिणायन स्वराचें फळ** सांगो : पूर्णिमेचें रात्रीं भूमिवरी। दक्षिणायना आंगें निद्रा करी। सूर्य उदई पूर्व उत्तरे। यात्रा कीजे पदें पांच ॥ २४३ ॥ तीर्थ पवन सोडिजे । सूर्य शुद्ध पाहिजे । पश्चिम दक्षिण वार काळ चुकविजे । जे तिथि पाडवा ॥२४४॥ बीज २, तीज ३, सूर्य शुभ तत्त्वीं पाहिजे; तिहीं तिथीं सूर्य शुद्ध दिसे मास सा ६ बळ सांगे; जे तिथीस सूर्य न दिसे ते मास दोन २ बळ नाहीं ॥२४५॥ दक्षिणायन फळ साचे; मास सा ६ जाणिजे; रात्रंदिस संक्रमणीं विपरित वाहे; वदे मरण आलें सत्य, न रक्षवे हरिहरां समस्त; शुचिर्भूत असावें ॥२४६॥

आतां **सक्रांति स्वराचें फळ** सांगो : उत्तरायणीचें फळ; आधिलिये रात्रीं दक्षिणायना अंगीं भूमिवरी निद्रा कीजे ॥२४७॥ प्रातःकाळीं पूरक शुभ तत्त्वीं पाहिजे; पूर्वउत्तरे पदें पांच यात्रा कीजे; पश्चिम दक्षिणे[140] दिशा काळ वार चुकविजे; सूर्य शुद्ध वाहे ॥२४८॥ पाडवा १ बीजे २ तीजे ३ सूर्य पाहिजे; सहा मास बळ लाभे; पाडवा न दिसे सूर्य तरी मास दोन बळ नाहीं; बीजे न दिसे सूर्य तरी मास दोन बळ नाहीं; तीजे सूर्य न दिसे तरी मास दोन बळ नाहीं

---

१३४. ०शयन कीजे ।–(बा. १).

१३५. पाहिजे–(बा. १).

१३६. कुभंक–(बा. १).

१३७. तिन्हीं शब्दांचा लोप. –(बा. १).

१३८. तेथ पवन सोडून पाहिजे। रेचक तो चंद्र जाणिजे। येणें प्रमाणें पाडवा बीजें तीजें ॥२३८॥

१३९. सर्वेश्वराचें–(बा. २).

१४०. दोन्ही शब्दांचा लोप–(बा. १).

॥२४९॥ ऐसा संक्रांति स्वर । सूर्य जाणा तत्पर । **शेख महंमद** वदे भविष्योत्तर । सद्गुरुकृपें ॥२५९॥

**उत्तरायण स्वराचीं चिन्हें** जाणिजे : आतां **मास स्वर** सांगो : शुक्लपक्षीचिये पाडवा १ बीज २ तीज ३, वामांगीं निद्रा कीजे; तिथि दिशा वार चुकविजे; दक्षिणे पश्चिमे[१४१] पदें चार यात्रा कीजे; तीर्थ पवन सोडिजे;[१४१] चंद्र शुभ तत्त्वीं पाहिजे; तरी मास एक बळ सांगे; जे तिथीस चंद्र शुद्ध न दिसे, तरी दिवस दहा बळ नाहीं ॥२५१॥ चंद्राचा शुक्लपक्षीं, रवीचा कृष्णपक्षीं : चंद्राचे तिथे चंद्र शुद्ध पाहिजे । सूर्याचे तिथें सूर्याचें कार्य कीजे । हें ज्ञान जाणिजे । मास स्वराचें ॥२५२॥

आतां **पक्षस्वर** सांगो : पूर्णिमेस शुचिर्भूत होऊनि भूमिवरी दक्षिण भागे निद्रा कीजे; अरुणउदयीं पूर्वउत्तरें पदें पांच यात्रा कीजे; तिथें पवन सोडून पाहीजे; पश्चिमे दक्षिणे वार शुळ दिशा चुकविजे; पाडवा १ बीजे २ तीजे ३ सूर्य शुद्ध पाहिजे, पक्ष एक बळ लाभे; जे तिथेस न दिसे ते दिवस पांच ५ बळ नाहीं ॥२५३॥ येणेंप्रमाणें कृष्णपक्षीं जाणा; तिथि दिन दिशा मास एकाचा जाणावा; ऐसा प्रकाश पाहातां प्रातःकाळीं जाणिजे; एकवेळे विपरित वाहे मना उद्वेग सांगे ॥२५४॥ पाडवा दिसे उद्वेग नासे[१४२]; बिजे विपरित दिसे, धनाधान्यास हानि होय; तीजे विपरित दिसे, गमन सांगें; चवथीस ४ विपरित दिसे, मित्र हानि होय; पंचमीस विपरित दिसे, राज्यास भंगु सांगे ॥२५५॥ षष्ठीस विपरित दिसे, घोरांदर सांगे; सप्तमीस विपरित दिसे, आठ दिवस सुख नसे । हे जाणावे भेद ऐसे । **पवनविजयाचे** ॥२५६॥

आतां **वारस्वर** सांगो : आदितवार १, मंगळवार २, शनवार ३, अर्धा बृहस्पतवार, हे वार सूर्याचे; हे वारीं दिवसरात्रीं सूर्य शुभ तत्त्वीं पाहिजे ॥२५७॥ उजवे आंगीं भूमिवरी निद्रा कीजे; प्रातःकाळीं दिशा तिथ वार काळ चुकविजे; पूर्वउतरें यात्रा कीजे पदें पांच; सूर्य शुभ तत्त्वीं पाहिजे कार्य सिद्ध होय पदें पांच यात्रा कीजे ॥२५८॥ दक्षिण नाडी पूरक संपूर्ण वाहे, दिन चार ४ बळ लाभें; सूर्य बळाचीं कार्यें सूर्यबळें कीजे; चंद्रबळाचीं कार्यें चंद्रबळें कीजे; दिन दिवस एकाचा जाणिजे; यापरी सूर्य[१४३] जाणावा ॥२५९॥

आतां **चंद्राचे वारस्वर** सांगो : सोमवार १, बुधवार २, शुक्रवार ३, अर्धा गुरुवार हे वार चंद्राचे; पक्ष : शुक्लपक्ष चंद्राचा कृष्णपक्ष, सूर्याचा ॥२६०॥ चंद्राच्या तिथी वार दिशा जाणाव्यां; हे वारी दिवसरात्रीं चंद्र शुभ तत्त्वीं पाहिजे; भूमिवरी वामांगीं निद्रा कीजे; सूर्यउदयीं पश्चिम दक्षिण

---

१४१. हीं वाक्यें गहाळ.–(ब्रा. १).

१४२. अनारिसे–(ब्रा. २); हें वाक्य गहाळ–(ब्रा. १). १४३. चंद्र–(ब्रा. २).

पद चार यात्रा कीजे; ॥२६१॥ तेथें चंद्र पाहिजे । चार दिवस चंद्राचें । बळ लाभे ॥२६२॥ चंद्र सूर्य प्रकाशे देहीं । तो कदां न चुके[143] काळासही । तो देहीच असोनि विदेही । पूर्ण साधु बोलिजे ॥२६३॥

आतां **नित्य वारस्वर** सांगो : आदितवारीं प्रातःकाळीं उठतां पवन धरिजे, पश्चिम दक्षिण वार मूळ तिथ[144] चुकविजे, पूर्वउत्तरें यात्रा पाउले अकरा ११ चालिजे, तेथें पवन सोडून पाहीजे, सूर्य देखिजे ते सुफळ येरे निर्फळ ॥२६४॥ सोमवारीं प्रातःकाळीं उठतां पवन धरूनि पूर्व उत्तरे तिथ वार शूळें चुकविजे, पश्चिमदक्षिणें यात्रा चार पाउले चालिजे, तेथें पवन सोडून पाहीजे, चंद्र देखिजे तें सुफळ, येर निर्फळ ॥२६५॥ संक्रमण देखिला तो काळमुख जाणिजे, सप्तवार यापरी जाणिजे ॥२६६॥ आतां चंद्राची यात्रा जाणिजे, सोमवारीं पाउले चार ४, बुधवारीं पाउलें चार ४, शुक्रवारीं पाउलें चार ४, गुरुवारीं पाऊलें सात ७ ॥२६७॥

**सूर्याचे वार यात्रा** जाणिजे : आदितवारीं पाउलें पांच ५, मंगळवारीं पाउलें नव ९, शनवारीं पाउलें पांच ५, गुरुवारीं पाउलें सात ७ ॥२६८॥ हे वार यात्रा जाणावी, तेथें तिथि वार दिस पाहीजे, जे नाड वाहे ते पाउले पुढें घालिजे, सुफळ होय, चंद्राची सम रवीची विषम चालावी पाउलें, हे वार यात्रा बोलिजे ॥२६९॥

हा देहावरता[145] विचारु । ते पिंडी सत्यें जाणिजे ईश्वरु । ते **शेख महंमद** बोले प्रकारु[146] । ते ज्ञानयोगीं जाणावें ॥२७०॥

**अकार, उकार, मकार, ॐकार** यांत बोलिजे :

**अर्धशुन्ये ऊर्ध्वशून्ये मध्य शुन्ये त्रिशुन्ये च निरामये ।**
**चतुर्शुन्ये यो जानंति मुच्यंते जन्मबंधनांत्** ॥२७१॥

हे चारी शून्यें मिळोनी । जाली महाशून्यापासोनि । त्यांतें बोलिजे निधानीं[147] । पांचवा सूक्ष्म भेदु ॥२७२॥ चतुर पादातें अजपा जाणिजे । त्रिपदातें त्रिशुन्य म्हणीजे । तें गुरुमुखें लक्षीजे । गुरुपुत्रा ॥२७३॥ ॐकार शुन्यापासव पंचतत्त्व । शून्यापासाव अष्टधा प्रकृती । स्थूळ शरीर हें लिंगदेहाचें त्रिन्हाड । सत्य जाणावे प्राणभेदें ॥२७४॥ मनपवन नांदती । अर्ध्व ऊर्ध्व भक्ति मुक्ति । भोग भोगिती देहसंमधें ॥२७५॥ हं सः हीं दोन अक्षरें । त्रिलोक व्यापक थोर । शरीरामाजी निर्धार । जाणिजे श्रोतीं ॥२७६॥ दहावी अवस्था शरीरीं । आकाशीं तत्व निर्धारीं । देहीं आत्मखुण जाणती पुरीं[148] । सद्गुरुरायें योग निरोपिला ॥२७७॥

---

१४३. वचे-(बा. १).
१४४. सूळ-(बा. २).
१४५. देहीं वर्ते-(बा. १).
१४६. विचारु-(बा. १).
१४७. जाणोनि-(बा. १).
१४८. ज्ञानी-(बा. १).

**प्रकृती** सांगो **तत्त्वाच्या** : आहार निद्रा मैथुन । आळस जांभई जाण । हे पांचहि गुण । पृथ्वीतत्त्वाचें ॥२७८॥ लाळ मुत्र शुकलित । स्वाद तेज श्रोणित । हे गुण पांच सत्य । आपतत्त्वाचें ॥२७९॥ धांवणें वळणें चळण । पसरण[१४९] संकोचन । हे पांचहि गुण । वायुतत्त्वाचें ॥२८०॥ क्षुधा तृष्णा क्रोध । अहंकार दर्प । हे गुण पांच । आकाशाचें ॥२८१॥ येणें देह गा शुद्ध होती । अभ्यासितां पापें नासती[१५०] । पूर्व प्रालब्धें छेदिती । गुरुगमे होय ॥२८२॥ गुरुध्यानें[१५१] जाला प्रकाशे । कार्य करावें शुद्ध ऐसें । जेणें अज्ञानदृष्टि निरसे । नासोनि जाय ॥२८३॥ प्रचेसी[१५२] करावें जगत्र । सकळ सिद्धी नाशिवंत । परब्रह्म भासे सत्य तेंच अक्षर ॥२८४॥

रेचक पूरक त्राहाटक । चौथा जाणावा कुंभक । तरी सिद्ध[१५३] पंथे पूरक[१५४] । जाणीजेसु ॥२८५॥ रेचकें शांति कार्य करावें । पूरकें अशुभ जाणावें । त्राहाटकें मरण वोळखावे[१५५] । ही खुण गुरुमुखें[१५६] ॥२८६॥[१५७] अंगुळिया निरोधून करावें अनुष्ठान । करावा[१५८] कुंभकु पहावें लक्ष लावून । होऊनि तत्वीं सावधान । सर्व भेद मंडळाचे देखिजे ॥२८७॥ गुरुच्या प्रसादें प्रकाश ।[१५९] भ्रूमध्यें द्यावें लक्ष । योगी जाणती हे खुणेस । श्वेत पीत रक्त ॥२८८॥ काळा निळा वर्ण । हें तत्त्व अंतरीं लक्षावें ॥२८८ ब॥ शब्द श्रोत्र त्वचा चक्षु घ्राण । पांच हीं ज्ञानेंद्रियें जाण । योगीं जाणावी ही खुण । गुरुचे कृपेनें[१६०] ॥२८९॥ आणीक चौदा चक्रांचा मेळू । आसनीं समाधीचा खेळु । निराकारीं एक मेळु । सत्रावी जाणिजे ॥२९०॥ सादृश खुण नासिक नेत्र । मणिपुर भ्रमरगुंफा एक सूत्र । एकमेळ सहस्र दळीं उमटती ब्रह्मरंध्र । सहस्र वर्ण हे खुण जाणती योगी ॥२९१॥

आतां **मदनाच्या कळा स्त्रीच्या** सांगो : शुक्लपक्षीं चढे डावा । कृष्णपक्षीं उतरे उजवा । स्त्रियेचा काम शांत करावा । याचपरी जाणिजे काम ॥२९२॥ शुक्लपक्षीचिये अवसे असे तळवा; पाडवा डावे अंगुष्ठ, बीजे धूरे, तिजे घोंटा, चवथीस गुडघा, पंचमीस जांघे, षष्ठीस नाभी, सप्तमीस उरी, अष्टमीस खांदा,

---

१४९. शयन–(बा. २).
१५०. यापुढें "त्यासी वाचा उपदेशिती ।" हा अधिक चरण आहे.–(ब्रा.१).
१५१. लय–(बा. २).
१५२. परिचयेसीं–(ब्रा. १).
१५३. शुद्ध–(बा. २).
१५४. नीट–(ब्रा. २).
१५५. सत्य सांगे–(ब्रा. १).
१५६. हा चरण ब्रा. १ त नाहीं.
१५७. हाताचिया अंगुळिया० –(बा. १).
१५८. तळावा०–(बा. २).
१५९. शुद्धवर्ण भ्रू०–(ब्रा. १).
१६०. ३ रा व ४ था चरणलोप –(बा. १).

नवमीस कंठीं, दशमीस हनुवटीं, एकादशीस होंटीं, बारसीस गालीं, तेरसीस डोळां, चतुर्दसीस लल्हाटीं, पूर्णिमेस मस्तकीं; याचपरी कृष्णपक्षीं उजवे अंगीं उतरे ॥२९३॥

आतां **पुरुषाचें मदन** जाणिजे : कृष्णपक्षीं उजवा चढे। शुक्लपक्षीं डावा उतरे। हें जाणावें चतुरें। कामकळा ॥२९४॥ कृष्णपक्षीं पूर्णिमेस उजवा तळवा, पाडवा उजवा अंगुष्ठ, बिज धूरे, तिजा घोंटा, चौतीस गुढघा, पंचमीस जांघे, षष्ठीस नाभीं, सप्तमीस उरीं, अष्टमीस खांदा, नवमीस कंठीं, दशमीस हनुवटीं, एकादशीस होंटीं, बारसीस गालीं, तेरसीस डोळां; चतुर्दसीस लल्हाटीं, अवसेस मस्तकीं, याचपरी डावे अंगीं उतरी ॥२९५॥[१६१]

स्त्रीचा मदन[१६२] शरीरीं। प्रातःकाळीं निर्धारी। तिथें थानक जाणिजे चतुरीं। अंगुष्ठानें दडपुनि धरी ॥२९६॥ येरे ठायीं बोट खोविजे। काम संपूर्ण कीजे। काम चुकविजे। कामिनीचा ॥२९७॥ स्त्रीची कामकळा जाणिजे। काखेखालूनि हात मस्तकतळीं घालिजे। मुखावरी मुख ठेविजे। येणें युक्ती[७९] ॥२९८॥ हृदयासी हृदय मेळविजे; चरण ठेविजें, नंगासन कीजे, लंबासन करीजें, मन प्रदिप्त ठेवीजें, कामकळा कामिकीं ॥२९९॥

आतां **तत्त्व** सांगो : इडा पिंगळा सुषुम्ना जाणोनी। मुहूर्त पहावे साधुनीं। साधिती ते साधक धन्ये[१६३]। उत्तम शुक्ल कृष्णपक्षीं ॥३००॥ पाडवियापासोनि वर्म पाहातां। विपरित दिसे विचारितां। चंद्र सूर्य वाहातां। जे तिथी विपरित वाहे ॥३०१॥ दिसे विपरित पाडवा उद्वेग, बिज हानि, तिजे गमन सांगे, चौतीस विघ्न, पंचमीस राज्यास बोखट सांगे, षष्ठीस संकट, सप्तमीस महा घोरांदर, अष्टमीस विपरितु, मरण सांगे त्वरितु ॥३०२॥

सर्वस्वाचें कारण। तुम्ही ऐका जी संतजन। **शेख महंमद** करिती निरूपण। **पवन विजयाचें**[१६४] ॥३०३॥

आतां **नाडीज्ञान** सांगो : आणिक जाणावी खुण। आंग नाडीचें लक्षण। सांगतो उघडून। श्रोत्यांप्रती ॥३०४॥ व्याधीरोगें पिडिला। हस्तक दावाया आणिला। नाडीं चंद्र असे चालिला। तरी रोग सरला असे ॥३०५॥ नाडी विषम वाहे। जाणा बहु रोग आहे[१६५]। संक्रमण वाहे। तरी मरण सांगे सत्य ॥३०६॥ हें सार ज्ञान जाणा। श्रोतीं आणावें मना। सांगितल्या खुणा। रोगियाच्या ॥३०७॥ जेणेंचि उदयो तोचि अस्तु। मनीं दिसे तो काळ विपरितु। प्रातःकाळीं सायंकाळींतु।

---

१६१. ही ओवी गहाळ–(बा. १).
१६२. सा मदन–(बा. १).
१६३. धनी–(बा. २).
१६४. भाविकांस भावें ॥–(बा. १).
१६५. जाणा बहुत रोगें व्यापिला आहे।–(बा. २).

एकच स्वरु वाहे[१६६] ॥३०८॥ जेणेंचि निद्रा कीजे। तेणेंचि उठीजे। तो काळस्वर[१६७] जाणिजे। ज्ञातिया ॥३०९॥ प्रातःकाळीं सूर्य अस्तमानींहि सूर्य, जाणिजे उदय अस्त, ऐसा दिसे तो विपरित, निर्फळ करी ॥३१०॥ तो विघ्न करी रात्रीजे। मध्य स्थानकीं दिसेजे। तें स्थानक सोडून जाईजे। तरी इतके विघ्न चुकती ॥३११॥ सूर्यानें निद्रा कीजे। चंद्र उठिजे। कां चंद्रें निद्रा कीजे, सूर्यानें उठिजे। ऐसीं चिन्हें जाणिजे। उदयोस्तूचीं ॥३१२॥

आतां **तत्त्वाचें भेद कार्य** सांगो : पृथ्वीनें स्थिर कार्य करणें। शुभ अलंकारादि भूषणें। संग्राम प्रवेश[१६८] मुंजिबंधनें। इतकीं पृथ्वीतत्त्वीं करावीं ॥३१४॥

आतां **आपतत्त्वाचें कार्य** सांगो : आपतत्त्वें विवाहलग्नें[१६९]। यात्रा राज्यपद अभिषेक करणें। विहिरीं तळीं आड खांदाया लावणें। इतुकें आपतत्त्वीं कीजे ॥३१५॥ ऊंस लाविजे। राजा बंधु कीजे। समुद्रीं गंगाजळीं तरिजे। इतुकें आपतत्त्वीं करणें ॥३१६॥ भूमि बीज पेरणें। व्यवहारें कळांतर देणें। आणि मित्रांस भेटणें। इत्यादिक करणें, आपतत्त्वीं ॥३१७॥

आतां **तेजतत्त्वाचें कार्य** सांगो : जितुकीं शुभ कर्में। तितुकीं करूं नयेत नेमें। तेजतत्त्वीं जाणें। कुकर्में कीजेती ॥३१८॥

आतां **वायूतत्त्वाचें कार्य** सांगो : यात्रें जाइजे, नवरा मिरविजे। गज अश्व बैल गाई आणीजे। अनेक वस्तां घेईजे। इत्यादि कीजे वायुतत्त्वें ॥३१९॥

आतां **आकाशतत्त्वाचें कार्य** सांगो : याग दान जप कीजे। मोक्ष मंत्र उपदेश घेईजे। ज्ञान भेद चिंतिजे। आकाशतत्त्वें गुरुबोधु ॥३२०॥

आतां **चंद्रसूर्याचीं पाउलें** सांगो : चंद्र वाहे तरी डावे पाऊल पुढें घालिजे। पूर्व उत्तर दिशा पाठीसी घेईजे। पश्चिमदक्षिणे जाईजे। कार्यसिद्धि होय ॥३२१॥

आतां **सूर्याचीं पाउलें** सांगो : सूर्य वाहातां उजवे पाऊल पुढें घालिजे। पश्चिम दक्षिण दिशा पाठीसी घेईजे। पूर्वउत्तरेसी जाईजे। तरी शुभ कार्य निर्विघ्न सुखें ॥३२२॥

आतां **भरित शून्यें** सांगो : जे नाडी वाहे ते भरित, जे नाडी ना वाहे ते शून्य, शून्य[१७०] पुसे भरिताला। भरित्यानें प्रश्न केला। कार्याचा लाभ पुसला। तरी कार्य सिद्धि होय ॥३२३॥

आतां **पंचतत्त्वभेद** सांगो : पृथ्वीतत्त्व प्रश्न करी। शुभ[१७१] कार्यें होतीं जरी। रोगी आरोगी होती खरीं। संशय नाहीं ॥३२४॥ पिका अर्थीं प्रश्न करी। पिक

१६६. "०विपरितु.........वाहे।" मजकुर गहाळ.–(ब्रा. १).

१६७. कापुरुष–(ब्रा. २)

१६८. ग्राम परत्वेषु–(ब्रा. १).

१६९. विव्हळ ज्ञान–(ब्रा. २).

१७०. भरित–(ब्रा. २).

होय अवधारी। योद्धा अर्थी पुसे योद्धे जिते। इतुकें पृथ्वीतत्त्व कार्य कीजे ॥३२५॥

आतां **आपतत्त्व** सांगो : आपतत्त्व प्रश्न करिती। शुभ कर्में सुफळ होती। हे भेद जे जाणिती। साधु ज्ञानी ॥३२६॥

**तेजवायूआकाशे** । होतसे प्रश्नाचा उल्हासे । शुभ कार्य निर्फळसे । कुकर्माची सिद्धि होय ॥३२७॥ संक्रमणें निर्फळ जाणा। साधकीं आणावें मना। **शेख महंमद** बोले खुणा। परउपकारालागीं ॥३२८॥

**ॐकाराचीं अक्षरें** आठ : आतां **चंद्राचीं अक्षरें** जाणा : क ख ग घ ना, च छ ज झ यां, ट ठ ड ढ ण, त थ द, हीं अक्षरें चंद्राचीं जाणीजे ॥३२९॥

आतां **सूर्याचीं अक्षरें** : ध ना, प फ ब भ मा, य र ल व, स ष शा ह ळ क्षा, हीं अक्षरें सूर्याचीं ॥३३०॥

चंद्र नाडीं असतां। आणि प्रश्न करी जाणता। तरी कार्य तत्त्वतां। सिद्ध होय ॥३३१॥ सूर्य नाडीं वाहातां जरी। उदया दों प्रहरां कार्य करी। हें न चुके निर्धारीं। सत्य जाणा ॥३३२॥ चंद्र अक्षरीं प्रश्न करिजे। कार्य होय दों प्रहरींजे। हें चतुरीं जाणिजे। श्रोतेराज ॥३३३॥

आतां **यात्रा** सांगो **चंद्राची** : चंद्र पृथ्वीआपतत्त्वीं पाहीजे। पूर्व उत्तर दिशा वार काळ तिथ चुकविजे। जो स्वर वाही तोंच पाउलें पुढें कीजे। पश्चिम दक्षिण यात्रा कीजे पदें चार ॥३३४॥ दारोळ्याबाहेर पाव ठेवितां पदें चार। रेचक वाहे तो पूर्ण कीजे हा आधार। हें ज्ञान जाणिजे निराकार। कार्य सिद्धी होय ॥३३५॥

आतां **सूर्याची यात्रा** सांगो : सूर्य पृथ्वी आपतत्त्वीं पाहीजे। पश्चिम दक्षिण वार तिथ काळ चुकविजे। जो वाहे स्वर तो पाव पुढें घालिजे। पूर्व उत्तर दिशा जाईजे। कार्य घडे ॥३३६॥ दारोळ्याबाहेर निघतां पदें सात। गांवाबाहेर पाव घालितां पदें सात। वार शुद्ध यात्रा सुफळ कीजे ॥३३७॥ गांवाबाहेर जातां दोन वाटा होती। तरी सूर्य चंद्र पाहावेती। जो स्वर वाहे त्या वाटे चालती। शून्य नाडीकडे न जाईजे ॥३३८॥ गांवाबाहेर पावलिया उपरि। उभे राहीजे क्षणभरी। सूर्य पृथ्वीतत्त्वीं पाहोन संग्राम[१७२] करी। तरी कार्य सिद्धी होये ॥३३९॥[१७३]

आतां **समस्तां तत्त्वांचें फळ** सांगो : पृथ्वीआपें अस्थिर असे। जरी सर्व कार्यासी प्रवेशे। वायोतत्त्वीं बळ असे। जाणोनि जाणणें ॥३४०॥ वायुतत्त्वीं

---

१७१. अनुभव कार्यें०–(ब्रा. २).
१७२. ग्रामे प्रवेश–(ब्रा. १).
१७३. यानंतर "१०० + २०० मागील–येकुण ३०० तीनसे जाल्यां" असा ओव्यांचा हिशोब दिला आहे.

कार्यास जाताते । मना करी गांवा न जाय सत्ये । तेजतत्त्वीं उणें येईल कार्य जे ते । साधकासि ॥३४१॥

आतां **युद्धसंधि** सांगेन : पृथ्वीतत्त्वीं चंद्र असे । युद्ध न करावें राजसे । केलिया भय दिसे । हानि होय ॥३४२॥ पृथ्वी सूर्य शुभ असेजे । अपेशीं युद्धीं घाय घालिजे । यश पावशील सत्य जे । क्षण न लगतां ॥३४३॥ चंद्र वाहात असे जरी याच स्वरीं । युद्ध न जिंतीजे अंतरीं । संग्रामी घात थोरी । होय तयासी ॥३४४॥ सूर्य जरी वाहात असे । डावे हातीं घेईजे सुरी अपेसे । उजवें हातीं शस्त्र असे । येक :आहे ॥३४५॥ शुन्यें अंग पुढें न कीजे । सुरीं कंठीं धरिजे । युद्ध समर्थी कीजे । श्रीमंत ॥३४६॥ डावे हाताचिये अंगोळियामध्यें । अंगोठा पीजे आधीं । जिभ उफराटी टाळ्यास लाविजे शुद्धि । मुद्रा सुटो न दिजे जिते सत्य ॥३४७॥

आतां **चंद्राची परिक्षा** सांगो : चंद्र वाहे शुन्य हातीं लोखंड घेई । मग उजवे हातीं देई । शुन्यें अंग पुढें न कीजे रणभुई । नृपनाथें ॥३४८॥ उंच हात न करावे । त्यातें उलटे खोचावे झुंझतां झुंजावें । श्रीमंतें ॥३४९॥

आतां **संक्रमणाची कुसरी** सांगो : संक्रमणीं छेदु कीजे । मंद शस्त्रें खोचीजे । सरसीये भूमि उभा ठाकिजे । मग झुंजीजे रणभूमि ॥३५०॥ संक्रमण पृथ्वीतत्त्व शुद्ध दिसे । उभे ठाकिजे, यश न दिसे । चंद्र सूर्य पूर्ण भासे । तरी आग्नेय दिशे उभे ठाकिजे ॥३५१॥ सूर्याहूनि चंद्र संपूर्ण दिसेजे । तरी त्या उजवे अंगीं शस्त्र हाणिजे । चंद्र सूर्य आपलिया स्वरातें जाणिजे । पवन अभ्यासें ॥३५२॥ नाडी शुन्यें ह्रदयीं घालोन सांठविजे । आपुला काळ चिन्हें जाणिजे । साधकीं वर्म ओळखीजे । याचपरी ॥३५३॥ ज्याच्या मुखाचा चंद्र उतरे । तो काळाचिये ग्रासीं पडे । ज्याच्या तोंडावर तेज चढे । तो यशवंत गा ॥३५४॥ सूर्य असे परी जाणा । त्यानें आधीं निघावें भांडणा । मग धांवोनि साना । घालिजे रण सुरी ॥३५५॥ चंद्र ज्याचा नांवा असेरे । त्यानें न निघावें आधीं मोहरे । युद्ध न करावे मागे सरे । सिपाई पुत्रा ॥३५६॥[१७४]

आतां **जीवनमृत्यूचें चिन्ह** सांगो : चंद्र जयाचें नांवें आधीं घेतां मरेल । मधील तो जिवंत राहील । भांडणाचें प्रसंगीं कळेल । योद्ध धारी ॥३५७॥ दोघा चंद्र आधीं नांव घेये तो जिवंत । मागील मरेल सत्य । पहिल्या नांव येईल तयाचें मृत्य । पाठीचा जिवंत राहे ॥३५८॥ चंद्र सम ओळखा । तैसाच संक्रमण लेखा । प्रश्न अक्षरीं देखा । संग्रामीं मरेल तो ॥३५९॥ सूर्य विषम जाणा । घाव घालिजे निपाणा । पर दळ मोडील सत्य जाणा । येरु जिवंत राहे ॥३६०॥ चंद्र नाडी वाहतां । झुंज न करावें सर्वथा । सूर्य नाडी चालतां । तूर्त झुंजीजे जय पावे ॥३६१॥ संक्रमणीं झुंजों न निघावें । हानी होय झुंजाया निघतां स्वभावें ।

---

१७४. ओव्या क्र. ३४२ ते ३५६ बाड क्र. १ मध्यें नाहींत, गळल्या आहेत.

दोघांलागीं शस्त्राचें घायें । मृत्य पावे रणभूमीं ॥३६२॥[175] आकाश शुद्ध दिसे । तरी तेथेंचि मृत्य असे । हें न चुके निर्धारें सरिसें । म्हणे **शेख महंमद** ॥३६३॥

झुंजायासी जातां । आकाश आपतत्त्वीं मिश्रित देखतां । तरी सूर्य उगवतां । झुंजेल परि मरेल, ऐसें जाणावें ॥३६४॥ संक्रमण संपूर्ण तत्त्वीं दिसे । दोघां घाय लागतां सरिसें । तरी तेथेंच मरती दोघे सत्ये । निर्धारेंसी ॥३६५॥

आतां **काळस्वर** येईल तो सांगो : संक्रमणीं वाहातां । उरावरी घाव लागेल जातां । हे कधीं न चुकेल वार्ता । मृत्य तयासी ॥३६६॥ हांसत मुख दिसे जयाचें । तो यश पावे रणभूमीचें । घाय लावील शस्त्राचें । समोर येईल तयासी ॥३६७॥ ज्याचें तोंड जातां सुखेल । तो चूर जखमांनीं होईल । परी जिवंत घरासी येईल । रणांतुनी वांचोनी ॥३६८॥ ज्याच्या तेज चढे तोंडावर । तो शूर परी असूर । मोडील परदळ आणि भार । सर्व देखतां ॥३६९॥ काळें तोंड जयाचें दिसे । तो पडेल देह रणभूमीस । परतों न येईल घरास । येहि चिन्हें जाणिजे ॥३७०॥ पिवळें रक्त जयाचें दिसे चंद्र । तेही कितीक जखमी करिती सुरनर । तयासी घाये लागती पाठीवर । यामा दिवस युद्धसमयीं ॥३७१॥ युद्धासी जातां जयाचें । अंग भुजा थरथरीजे । तो एक शूर हजारांत जाणिजे । तयासी पाहातां सैन्यासी पळ सुटिजे । येरूनयेरास न धरिती ॥३७२॥[176] संक्रमणीं घाय लागोनी वांचेल । ऐसें जाणावें घरासि येऊनी मरेल । काळ तयापरी न क्रीडेल । सत्य जाणा ॥३७३॥ हांसतां जाईल तो जिवंत । ज्याचें तोंड कोमियलें रणांत । ज्याच्या मुखाचा चंद्र उतरत । तो मरेल घाय लागोनी ॥३७४॥

आणीक **भेद** सांगो : सूर्य नाडी असतां । शकुन पुसे जाणता । तरी सांवळा तत्त्वतां । तुरत मरेल ॥३७५॥ चंद्र नाडी असतां । प्रश्न करी पुसता । तरी रणीं झुंजता । गोरा मरेल ॥३७६॥ संक्रमणीं पुसे । झुंजतां विघ्न असे । घाव लागती सरिसे । काळा तुरत मरेल ॥३७७॥ दोघां झुंज पडलें । जयाचें नांव आधीं घेतलें । तो जितेल येरू न जितेल । जाणिजे सत्य ॥३७८॥ सूर्य वाहे तो जिते । चंद्र वाहे तो न जिते । संक्रमणीं थोर घात । सकळ सैन्याचा ॥३७९॥

आतां **तत्त्वाची कुसरी** सांगो : पृथ्वी आप तेज दिसे । तयानें घाव घालिजे सरिसे । तो मरे ना सत्ये । येरातें मारील ॥३८०॥ झुंजोनि[177] निघतां ।

---

१७५. या ओवीचें शेवटचे दोन चरण बाड क्र. १ मध्यें गळले आहेत.

१७६. ओवी क्र. ३६६ चे शेवटील दोन चरण व त्यापुढील क्र. ३७२ पर्यंतच्या ओव्या बाड क्र. १ मध्यें गळल्या आहेत.

१७७. ज़ुंझे०-(ब्रा. १).

पृथ्वी आप तेज पाहातां। चंद्र जरी असतां। रणसंग्रामीं ॥३८१॥ जरी लोहो वरुषती। संग्रामीं येरातें मारिती। आपण जिवंत येती। निर्धारें ॥३८२॥ तेजतत्त्व वायुतत्त्व दिसे मिश्रित। निर्वळातें राखे सत्य। परी झुंजेल तो नीट। तरी मरे ना ॥३८३॥ झुंजे निघतां। एकाला वायु दिसतां। तरी युद्धे थोर थोर (स्थिर धीर) होतां। झुंजेल परी घरासी येऊनि मरेल ॥३८४॥

आणीक सांगो **धारणा :** जयाचीं नांवें आधीं घेतलीं। त्यांची सम अक्षरें जाली। चंद्र वाहातसे चाली। परी येश रणभूमि ॥३८५॥ तरी झुंज न जिंतेल जाण। भरंवसा नाहीं घटिका तीन। तीन घटिका उपरांत झुंजणें। यश पावे ॥३८६॥ विषम अक्षरीं पुसत। झुंज जिते त्वरित। कां बुझावणी होत। घटिका चार ॥३८७॥ संग्रामाचे अवसरीं। नाडी न वाहे न शरीरीं। ते शुन्य दिसे जरी। भंग होय घटिका पांच ॥३८८॥ या दोघांचा एकचि स्वर वाहे। दोघां सरिसे होती वाहे। वरी शुन्य स्थानीं उभा राहे। तो हरविल घटिका सहा ॥३८९॥ जो स्वर वाहे निरुता। तें अंग करिजे मोहोरे झुंजतां। जरी जिंतेल सर्वथा। संशय नाहीं घटिका सात ॥३९०॥ म्हणोनि पूर्व दिशा असावी। शुन्य अंगें मोहोरे नसावी। शुन्यें मृत्युकाळ जाणावें। घटिका आठ ॥३९१॥ संग्रामाचे वेळें पाहातां। सूर्य दिसे निरुता। तुरत जाती जे सर्वथा। संदेह नाहीं घटिका नव॥३९२॥ चंद्र असे वाहात। तरी सर्वथा न जिंते। संक्रमणीं दोघां घात। कां बुझावणी होय घटीका दहा ॥३९३॥ सूर्य वाहे तोंवरी लोकरी जाय। येरू न सोडावे ठाये। **शेख महंमद** बोलताहे। घटिका अकरा यश ॥३९४॥ कीं वाहता पालटला सूर्य जाणा। तेणें न निघावे भांडणा। बुझावणी होईल दोघां जणा। श्रोतीं ओळखावें ॥३९५॥ जरी स्वर पाहिला। चंद्र वाहतां देखिला। येरू घाव पहिला। न घालावा घटिका बारा ॥३९६॥ सूर्य वाहे तोंचि पाउलें पुढें। तोंचि हात चालवावे पुढें। संक्रमणीं न धरावें गाढें। शस्त्रें हातीं घटिका चौदा ॥३९७॥

आतां **राजदळाचा संग्राम** सांगो : चंद्र वायुतत्त्वें आपुल्या स्थानीं पाहीजे। भरित पाहुनी पावडा पाव दीजे। झुंज संग्रामीं न वेईजे। म्हणे **शेख महंमद** ॥३९८॥

आतां **अश्व गज नर** बहु सांगो : पूर्व दिशा घोडा राउत उभा न कीजे। पश्चिम दिशे घोडे स्वार उभे कीजे। दक्षिण दिशे हस्ती उभा कीजे। मग झुंजीजे रणसंग्रामीं ॥३९९॥

आतां **तत्त्वभेद** सांगो : पृथ्वीतत्त्वीं गज विषम उभे कीजेती। पृथ्वी आपतत्त्वीं दक्षिण दिशे हस्ती। पश्चिम दिशे घोडा आणि राउती। उभे करावे नृपनाथें ॥४००॥ वायुतत्त्वीं एक वर्णाचे घोडे। उभे कीजे उत्तर दिशे घोडे आणि फरारे। बाण गंजिफा बंदुक तोफा भडभडे। पश्चिम दक्षिणे उत्तर दिशे ॥४०१॥

**संग्रामीं राजवाहन** सांगो : सूर्य आपतत्त्वीं पृथ्वीतत्त्वीं असे तरी। घोडियावरी स्वार होईजे लौकरी। मग झुंजीजे राजनिधि सत्वरीं। हें जाणिजे राजपुत्रा ॥४०२॥ चंद्र पृथ्वी तत्त्वीं असे। जरी स्वार होईजे रथावरी सरिसे। चंद्र आपतत्त्वीं जरी असे। स्वार होईजे हस्तीवरी ॥४०३॥ सूर्य तेज तत्त्वीं पश्चिमे दक्षिणे। उभे राहीजे तत्क्षणें। मग युद्ध संग्रामीं झुंजणें। रणभूमिका अयुती होय ॥४०४॥ आपुलिया भारांत जितुके येती। तितुके जखमी होती। लक्ष सैन्यासी हजार मोडिती। हे असत्य न होय ॥४०५॥ वायुतत्त्वीं चंद्रबळ। सकळ सैन्यास सुटे पळ। आकाशतत्त्वें चंद्रबळ। धरणी हानी होय आपणिया ॥४०६॥

आतां **संक्रमण** सांगो : संक्रमण शुद्ध वाहात असे जरी। ईशान्य दिशे उभे राहिजे शूरीं। संग्रामाचें अवसरीं। संदेह नाहीं ॥४०७॥ तेंच संक्रमण आपतत्त्वीं असे। उभे राहीजे नैऋत्य दिशे। संक्रमण पूर्ण दिसे। तरी आग्नेय दिशे उभे राहाणें ॥४०८॥ संक्रमण पूर्ण न दिसे जे। वायव्य कोनीं उभे राहीजे। येणें विधि शुद्ध झुंज कीजे। तरी या दिशा भंग होई ना ॥४०९॥ निःशंक युद्ध करी। जरी रणभूमिकेवरी। आपण जयवंत येरां मारी। न रक्षवे हरिहरां ॥४१०॥ पृथ्वीनें जिंत आप मारी। तेजें घाये लागती। बाजूनें सैन्यें पळती। आकाश मृत्यु सांगतो ॥४११॥ येणें विधि पर दळ मोडिजे। आणि पवनीं जय साधिजे। **शेख महंमद** बोले। सद्गुरुकृपेनें ॥४१२॥ संपूर्ण **पवनविजयो** समाप्त ॥[१७८]

## ३. काळ( मृत्यु ज्ञान :

आतां **काळज्ञान** सांगो। ज्याला हें तत्त्वज्ञान कळे ना। काय सिद्ध साधु होईल जाणा। येरेहि ठेवितसें जना अज्ञाना। गुरु गुरु म्हणोनियां ॥१॥ जे सद्गुरूचे कृपेनें सिद्ध साधु जाले। आपण तरून आणिकांतें तारिले। स्वयंभ ज्योतीसी मिळाले। सद्गुरुकृपेनें ॥२॥ आधीं तत्त्वज्ञान साधावें। मग राजदळासी पर्यसावे (?)। मग तो राज्य करील सुभावें। या जनांमध्यें ॥३॥

आतां **काळज्ञानाची कुसरी**। सांगतो श्रोत्यांलागीं खुणा जरी। योगी जाणती अंतरीं। काळज्ञानासी ॥४॥ कांहींच नलगे स्मरण। ती सांगतो खुण। तुम्ही ऐकावें चित्त देऊन। सद्गुरु कृपेनें परियेसा ॥५॥ आपलिया पाहो डोळिया। जरी न दिसे पाहिलिया। तरी एक घटिका भरलिया। काळ येईल जयासी ॥६॥ आपुलें नासिकाचें अग्र पाहावें। जरी न दिसे बरवें। तरी सत्वर जाणावें। पांचा घटिका मृत्यु ये ॥७॥ पहावें खुटे जरी ना दिसे नाक दृष्टीं। दिवसा अकरा

१७८. सेम ब्राड २-२; सेम ब्राड ३-१, पृ. १ ते १७४.

कष्टी । मरण येईल तयासी । सत्य जाणा ॥८॥ हृदयमध्यस्थानीं । संतानें पाहावें न्याहाळोनि । न दिसे दृष्टी नयनीं । तरी मरण येईल सत्य एक मासा ॥९॥ नेत्रीं पाहावी आपुली नाभी । जरी दिसे ना भीतरी । दो दिवसां भीतरी । मरणाची स्वारी आली असे पैं ॥१०॥ आपुलीं पहावीं लिंगस्थानें । लिंगस्थान दिसे ना डोळियानें । तरी दिवसा तेच मरणें । तयासी येईल ॥११॥ पाताळ मांडियादि सौजिरी । आयुष्याची गणना आहिक्य सत्वरीं । मरण कळे त्यासी परोपरी । दिवसां सहा ॥१२॥ आपुले गुडघे पाहिजेती । पाहिलीया जरी न दिसती । तरीं पांचवे दिवसांतीं । ये स्थिती मरण पैं ॥१३॥ पाहिलिया आपुल्या पोठऱ्या । जरी न दिसती बरव्या । दिवस तीन गेलिया । काळ पुसेल त्यालागीं ॥१४॥ वरील चरण न दिसे डोळा । चित्तीं जाणिजे काळा । दोन दिवस दोन पळा । मरण प्रमाण तयासी ॥१५॥ खालील पहावे तळवे । जरी नेत्रीं न दिसती बरवे । तरी अनुभवी सावध रहावे । एक दिवस तीन घटिका ॥१६॥ देखीजे आपुले कोपरे । डोळां न दिसती जरी । येरू दो मासां दो प्रहरें । मरणचि न चुके ॥१७॥ डावी कुसी देखिल्या न दिसे । तरी आयुष्याची गणना असे । चौ मास चार घटिकासे । प्राणाची होईल हानी ॥१८॥ कुसी न्याहाळावी उजवी । जरी ना दिसे बरवी । पांचा महिन्यांभितरीं । काळ येईल घरा ॥१९॥ वाम भुजे न्याहाळितां । जरी न दिसे पाहातां । एका वरुषां काळाच्या हातां । येईल तो पुरुष ॥२०॥ दक्षिण भुजा नयनीं न दिसे । दो वरुषांमधीं मरण असे । हें जाणावें योगिया मानसें । ईश्वर भजनीं राहावें ॥२१॥ कानीं घालोनियां बोटें । आहिक्य नव नाद झणझणाटे । मव ध्वनि नसे बरवी नेटे । नव दिवसां मरण आलें पैं ॥२२॥ दोन्ही भोंवऱ्या देखिजे । पाहातां न दिसती वोजे । तरी साता दिवसां सहजे । मृत्यु येईल तयासी ॥२३॥ बोटें घालूनियां नेत्रां । चंद्रसूर्याचीं चक्रें गरगरां । पाहातां न दिसती सुरनरां । पांच दिवसां मरण सत्य ॥२४॥ नासिकाचे दोन्हीं पडदे । पाहिलिया न दिसती सिधे । तरी त्रयोदिनीं भेदाभेदें । घटिका येईल काळाची ॥२५॥ अग्र देखावे जिव्हेचे । पाहिलिया न दिसे साचे । तेच दिवसीं मरणाचे । सांकडें पडेल तया ॥२६॥[१७९] **शेख महंमद** बोलिले खुण । हेंचि सिद्ध साधक योगियाचें चिन्ह । परउपकारालागून । **ग्रंथ पवनविजय** केला असे ॥२७॥[१८०]

आतां **छाया पुरुषाची धारणा** सांगो : छाया पुरुष कशासी म्हणावा । उभे ठाकोनि सूर्य पाठीसी घ्यावा । भूमीवरी पाहावी आपली छाया । दोन घटिका एक दृष्टीं ॥२८॥ स्थिर करोनियां मन । दृष्टि ठेवावी दोन्ही श्रवण । न्याहाळी अंगुष्ट मस्तकापासोन । वैराट पुरुषें ॥२९॥ पाहूनियां छाया पुरुषास । नेत्रीं पाहावें

---

१७९. यानंतर बाड क्र. ३-१ मध्यें वरील क्र. १२ वी ओवी पुन्हां दिली आहे.

१८०. सेम २-२; सेम ३-१.

आकाशास। जे जे कौतुक वर्ण दृष्टि भासे। साधकें आणावीं मना ॥३०॥ छाया पुरुषा नयनीं न्याहाळितां। जरी न दिसे पाहतां। ती वरुषा मरणाची चिंता। न राखवे हरिहरा ॥३१॥ छाया पुरुषाचें शीर। जरी न दिसे सादर। तरी मासां सहा उत्तर। मरण न चुके ॥३२॥ वर्ण छाया पुरुषाचा। जरी न दिसे डोळां साचा। तरी तीन दिवस (वरुष) मरणाचा। फांसा देखेल तो ॥३३॥ छाया पुरुषाचे धड। जरी दिसे ना धडफुडे। एका वरुषा आयुष्य झडे। देहपात होय ॥३४॥ छाया पुरुषाची नाभी। डोळा न दिसे नभीं। दो वरुषां सा दिवशीं। म्हणेल रामकृष्ण ॥३५॥ दिसे ना छाया पुरुषाचें पोट। जरी दिसे ना बहु कष्ट। माता मरेल जाण चतुष्ट। वरुषां एक दोन प्रहरां ॥३६॥ वैराट पुरुषाचे ना दिसे वाम भुज। मन चित्त लावावें निज गुज। मग दीड वरुषां मार्ग सहज। मूळ येईल काळ ॥३७॥ वैराट पुरुषाची भुज दक्षिण। नेत्रीं न दिसे जरी पूर्ण। वर्षा अडिचा सत्य जाण। सावधे साधकेश्वरा ॥३८॥ वैराट पुरुषाचें मुख। न्याहाळितां दिसे अंधुक। मृत पिता होईल देख। मासा सातवे ॥३९॥ न्याहाळितां वैराट संपूर्ण। जरी न दिसे उजवा चरण। रोग पिडले दारुण। तीन मासां ॥४०॥ न्याहाळितां चरण न दिसे डावा। वैरियाला लाभ दिसावा। कळी करोनि घात करावा। चतुर मासाभितरीं ॥४१॥ छाया पुरुष न्याहाळितां। लिंगस्थान न दिसे पाहातां। स्त्रीनाश होईल घाता। सहा मासा वर्षा एका ॥४२॥ पाहातां वैराट सत्वर। जरी दिसे ना दोन्ही कर। ती वरुषामाझारीं बंधु मरे। हें न चुके सर्वथा ॥४३॥ न्याहाळितां जरी हृदयांत। न दिसे परी सत्य। जाणिजे तरी बहिणीस भयांत। वरुषा एका ॥४४॥ न दिसे कंठस्थान। तरी राज्यास थोर विघ्न। एका वरुषांत संपूर्ण। परी मृत्य होय तयाचा ॥४५॥ नेत्रस्थान छायापुरुषाचें। पाहातां दिसे ना साचें। तरी मरण पुत्राचें। चतुर वर्षांमधीं ॥४६॥ दो प्रहरां सूर्यमंडळ। जरी पाहावें आपुल्या डोळां। जरी न दिसे किरण झळाळा। एकविसा दिसीं मरण पैं ॥४७॥ पौर्णिमेचा चंद्रमा। जळीं न दिसे महिमा। तीन मासा त्रयो दिना। नेमस्त मरण न चुके ॥४८॥ दोन प्रहरां रात्रीं। न पाहिल्या दिसे चंद्र नेत्रीं। एक मासा दिन रात्रीं। आत्मारामा जाणे घडे ॥४९॥ सायंकाळीं न्याहाळितां आकाशें। जरी न दिसे तारांगण नव लक्षे। तरी आयुष्य जाणिजे पुरुषे। त्रयो मासा मरण येईल पैं ॥५०॥ सूर्य पाठीसी घेऊनियां। निराभ्रेंसीं पाहावी छाया। दोन्ही कानावर दृष्टी देऊनियां। पहावें घटिका दोन ॥५१॥ पीत शुभ्र दिसे रंग ते उत्तम। नीळे सांगे मृत्यु जाण। काळें दिसे तें धनासी विघ्न। ऐसे जाणावें श्रोतीं ॥५२॥ कृष्णपक्षीं रात्रीं। सन्मुख पाहावें नभीं। सर्व पाप जळती देखिल्या नभीं। सत्य जाणा ॥५३॥ शामवर्ण ते उद्वेग सांगे। पीत शुभ्र आरक्त स्त्री नाश सांगे। नीळ ते मान भंगे। श्वेत वर्ण सदा सुखी ॥५४॥ **शेख महंमद** सांगे खुण। हेंचि योगियाचें चिन्ह। जे जपती ते धन्य। ब्रह्मस्वरूप ते ॥५५॥

आतां **काळाचे भोजन** सांगो : उदय घटिका मेषे वरसिका । काळ मैथुन कारका । अथवा उद्योग कार्यासिका । साधोनि करावे ॥५६॥ कन्ये काळ माध्यान्हेसी येई धना । कुंभ काळ आवणेसी जाणा । तुळा वरुपे भांकाळ आणा मना । यापरी जाणावे ॥५७॥ रविवारीं काळ घरामध्यें । यासी आहार देऊनी करी सावधे । गुळवणीसी पीडिजे घरामध्यें । चारीहि कोन्या तो ॥५८॥ सोमवारीं ईश्वराचे घरीं । त्यासी आहार सात फुलें ठेविजे पिंडीवरी । साता कोन्याभीतरीं । आहार त्याचा ॥५९॥ मंगळवारीं भानुवसीये असे । तयासी भोजन काय असे । हळद कुंकु द्यावें सवासिनीसे । आहार तयासी पावे ॥६०॥ बुधवारीं शिवेवरी । निंबोंणी आंबिये जांभुळ सालाइरी । यांचीं पांच पांच पानें ठेवी वाटेवरी । आहार तयासी ॥६१॥ गुरुवारीं देव्हाऱ्यांतें । गंध धूप दावी आपुले देवतातें । भोजन ठेवी फुलें तयावरुतें । घालिजे पानास पांचा ॥६२॥ शुक्रवारी येसीत असे । पांचा धान्याची भाकरी करी सरिसे । टाकावी येसीत तयासे । काळा भोजन ॥६३॥ शनवारीं हनुमंताजवळीं । करोनियां रुईची माळ । निंबु जांभुळ आवळे । ठेवोनियां माळ घालिजे गळां ॥६४॥ काळा हे भोजन देती । ते नर हरएक कार्यात यश घेती । काळ पाहोनि हरुषती । मानवीं सत्य जाणे ॥६५॥

आतां **धारणा** सांगो : कार्यास न जावे कोणते मासीं । भादवा आश्विन कार्तिक मास । पूर्व जातां स्त्रीचा नाश । मार्गेश्वर पुस माहो मास । दक्षिणेस जातां कार्य न घडे ॥६६॥ फाल्गुन चैत्र वैशाख । उत्तरे जाता कार्यासी होईल घात । जेष्ठ आपाढ श्रावण सांगे । पश्चिमे जातां घाये । तयास लागती ॥६७॥ मार्गेश्वर पुस माहो । पूर्व गमन केलिया लाभ बहु । भादवा आश्विन कार्तिकु । दक्षिणे गेलिया कार्या बहु सुखु ॥६८॥ जेष्ठ आखाढ श्रावणु । उत्तरेसी गेलिया कार्य बहु । फाल्गुन चैत्र वैशाखु । पश्चिमे कार्य साधी ॥६९॥ ऐसे साधोनि जे नर जाती । ते सुखी कार्यें करोनि घरास येती । ते दुःख कामना कधीं न देखती । चतुरें जाणावें मना ॥७०॥...( अपूर्ण )[१८१]

---

१८१. सेम ३–३ बाड १; सेम बाड ४–२.

# निष्कलंक प्रबोध

पाणी प्याल्याविण, नव जाय तान। तैसें नव्हें ज्ञान, प्रचेविण[१] ॥१॥ आव्हेरूनि साधु, पुजिल्या तेतीस कोडी। अक्कल होय वेडी, भक्तां[२] न पवे ॥२॥ दृष्टांतेंसी न्याये, सांगेन श्रोत्याला। चित्त द्यावें बोला, वक्तियाच्या ॥३॥ सुगंध सुग्रास, कोंदतां नेत्रद्वारा। दुःखें लागत धारा, अश्रूंचिया[३] ॥४॥ निमटून तोंड, नाकीं घाली[४] पाणी। मरे तत् क्षणीं, तान न जातां[५] ॥५॥ पुष्पयाति बुक्का, कानांत कोंदिल्या। नासिका धरिल्या, वास न ये ॥६॥ शिश्नगुदद्वारीं, कोंदिल्या अन्नपाणी। भुकें तान्हें प्राणी, निवेनाची[६] ॥७॥ षड्रस मार्जन, शरीरास केल्या। गोदेंत बैसल्या, तान न जाये[७] ॥८॥ श्रीमुख चुकल्या, नाना मार्गी ऐसें। वायो कोळपीसें, लागेल जनां ॥९॥ श्रीमुखीं पडल्या, धाय निवडि रसना। आत्मयासी मना, सर्वां तृप्ती[८] ॥१०॥ श्रीमुख राजमार्ग, साधूंचें भजन। तेणें समाधान,[९] **शेख महंमद** ॥११॥-१

रसना चवि निवडी, लोमेंद्रियें[१०] तृत। प्राणें[११] आत्मा घात, आसीर्वाद[१२] ॥१२॥ तैसे साधु पुजे, तेतीस कोडी धाती। अव्हेरिल्या पिडिती, परीसावें[१३] ॥१३॥ मुळीं पाणी पडतां, पावे[१४] विस्तार झाडा। तोडितां त्या[१५] खोडा, वाळे[१६] विस्तार ॥१४॥ दुखवितां[१७] साधु, देवाला जोहार। पूजा[१८] नमस्कार, साधुचरणीं[१९] ॥१५॥

---

१. तत्त्व प्रचेविण ॥
२. भगवंता न पवे
३. आश्रुपाताच्या ॥
४. घालितां पाणी ॥
५. नव जातां तान ॥
६. निवेनाचि मरे ॥
७. तान भूक न जाये ॥
८. सर्वां तृप्तता ॥
९. तेणें घालें समाधान ॥
१०. लोभ इंद्रियें०
११. प्राणेंसी०
१२. ढेंकुर आसीर्वाद ॥
१३. तें परिसावें श्रोतीं ॥
१४. पावेल०
१५. त्याच्या०
१६. वाळेल०
१७. तैसे दुखवितां०
१८. यालागीं पूजा०
१९ श्रोते साधुचरणी ॥

परजन्य[२०] द्रवे, पृथ्वीच्या पोटीं । उत्पन्न तृप्त कोटी, असंख्यानंत[२१] ॥१६॥ तैसे साधु पोटे, आनंद देवलोकां । दृष्टांत विवेका, परमार्थाचे ॥१७॥ सांगो[२२] वारंवार, श्रोत्यां करूनि मूढ । खिजती सुगड, ज्ञानी मातें ॥१८॥ मूर्खपण साजे, पांचा तत्त्वां खरें । तैशा अधिकारें, **शेख महंमद** ॥१९॥ —२

नरदेह लाधले, पुण्यें संचित कोडी । तेथें अक्कल वेडी, पाप संचितें ॥२०॥ नाम ने घे आवडी, उष्टा धुर वोढी । हीन अक्कल वेडी, पवित्रें[२३] केली ॥२१॥ अचेत तुलसी बेल, तोडूनि आवडी । पुजिती परवडी । अचेत धोंडा ॥२२॥ आपली आपण शास्त, करविती पाखांडी । चुकले जे गांगडी, सर्वेश्वर[२४] ॥२३॥ खोडे बेड्या कुलपें, करिती महा पापें । वाचे न ये सोंपें, अव्यक्तनाम ॥२४॥ वधून बोकड, बोंबलिती बगाडी । पडती ते झोंडीं, त्याच पंथें ॥२५॥ गोंधळेंसी डांका, अवतरती झडतरें । पावती कडतरें, फळे तैसी ॥२६॥ मोगलाचा तोरा, ब्राह्मणें केलिया । नटोन अवगळ्या, मोगल[२५] दिसे ॥२७॥ ज्याला[२६] जे आवडे, त्याला तैसें घडे । पेरूनि आघाडे, तांदुळ मागे[२७] ॥२८॥ दुध पिती त्यासी, पेंड्याची न ये भुली । तैसी रामबोली, भुलवी ना[२८] ॥२९॥ भुलले उन्मत, अविद्येच्या मदें । निवती निज बोधें, **शेख महंमद** ॥३०॥ —३

हांकलीं बोंबली रडे, भुलनि ताडें माडें । भले[२९] होती वेडे, अविद्येविषीं[३०] ॥३१॥ काढीतिल वीर, नाथलेच बंडें । संवदन्या कुंडें । तीर्थ त्याचें ॥३२॥ चोरानें मारिलें, हगवणीनें मेलें । त्या नांव ठेविलें, वीर ऐसे ॥३३॥ ज्यानें त्या[३१] मारिलें, त्याला कां न लगे । कांता त्याची भोगे, तोची वीर[३२] ॥३४॥ सुपली बैसे चित्तीं, हगवणें मेली रांड । तीवर भोगी झोंड, नें[३३] लगे त्याला ॥३५॥ नखटी बुची ऐसी, देव्हारां बसविती । नैवेद्य[३४] ठेविती, भाकर पहिली ॥३६॥ मग तिचा प्रसाद, रांडा पोरें सेविती । विटाळशाही नमती, स्वयंपाकिणी[३५] ॥३७॥ त्याचें उष्टें कुटकें खातां जे उरले । अधिकारी[३६] जाले, मतिभ्रष्टें ॥३८॥ सांडुनि कुळाचार, म्हणविती

२०. जैसा प्रजन्न०
२१. असंख्य अनंत ।
२२. किती सांगो०
२३. पवित्रांनीं केली ॥
२४. सर्वेश्वरा ॥
२५. तो मोगल०
२६. तैसें ज्याला०
२७. ०मागती ॥
२८. भुलवी ना कोणा
२९. तैसे भले०
३०. ०विषई ॥
३१. त्याला
३२. ०वीर जिता ॥
३३. ते न लगे०
३४. तिला नैवद०
३५. शुद्री स्वयंपाकिनी ॥
३६. त्या अधि०

पवित्र । निंदती अपवित्र, दरुशनें[३७] ॥३९॥ विप्र वैश्य क्षेत्रीं, भ्रष्टीं भ्रष्टविले । वक्ते ऐकती भले, **शेख महंमद** ॥४०॥ –४

विटंबुनि संसारा, बुडवुनि आचारा । पातले अविचारा, पवित्र म्हणुनी ॥४१॥ उच्छिष्ट हिनांची, वस्त्रें नीळे[३८] हीनें । घेऊनि[३९] आवर्णें, करा म्हणती[४०] ॥४२॥ अहिंसक म्हणविती, भिक्षे हिंसा करिती । ते मिथ्या त्रिपत्ति, सांगणें श्रोत्यां ॥४३॥ भिक्षा द्या उभे द्वारी, कोणाची भिक्षा हेरी । ऐसें जन न करी, त्याहि देसील ॥४४॥ भोगस्थानें चुकविती, देवता दुश्रीती । भिक मागों धांवती, देवताशेष[४१] ॥४५॥ द्वारावर गणेश, चरणा[४२] खालुनि शेष । पावती अपेश, सांगितलें[४३] ॥४६॥ शोधिव भिक्षा म्हणती, डोंबाळे[४४] नेणती । क्रोधी श्वानें दाविती, होऊनियां[४५] ॥४७॥ सांडूनि सोंवळें, भक्षिती वोंवळें । नाहीं तीहि शोधिलें, मूळकूळ ॥४८॥ डोंगर कपाटें, नांवें मिरविती । संसारीं नांदती, अविचारें ॥४९॥ रांडा पोरें नको, जनाला[४६] सांगती । आपण भोगिती, करूनि चेल्या ॥५०॥ दृष्टि न पडावी, चित्रींची वनिता । ऐसें बोले गीता, निष्कलंक[४७] ॥५१॥ अनंत योगाची, साही दरुषनें । दुषिती[४८] अज्ञानें **शेख महंमद**[४९] ॥५२॥ –५

वागवून वस्त्रें, करितील क्षौरें । त्रिपदा अपवित्रें, माथां उष्ट्या[५०] ॥५३॥ नव[५१] कोडी राजे, अठ्यांसी सहस्र ऋषि । नाहीं केली ऐसी, विटंबना[५२] ॥५४॥ वशिष्ठें रामाला, नाहीं विटंबिलें । आत्मज्ञानी केलें, राजयोगी ॥५५॥ नाहीं[५३] विटंबिले, अर्जुन उद्धव । ब्रह्मज्ञान ठेव, भगवद्गीता[५४] ॥५६॥ नाहीं[५५] सांगितलें, विटंबावें शरीरा । सुचित्त अंतरा, म्हणीतलें[५६] ॥५७॥ ब्रह्मा विष्णु रुद्र, पांडव घरबारी । सोळा सहस्र नारी, कृष्णनाथा[५७] ॥५८॥ सांडी मांडी मिथ्या, शरीराचे

---

३७. साहा दरूशनें ॥
३८, ३९, ४०. ०वस्त्रें, कर्मकाट नीळे० । त्याचे घेऊनि० । म्हणती शोधून ॥
४१. देवतांचे शेश ॥
४२. तया चरण०
४३. ज्या सांगितलें मागें ॥
४४. हे डोंबाळे०
४५. क्रोधी श्वानें होऊ०
४६. हें जनाला०
४७. निष्कलंक आध्या ॥
४८. त्या दुशीती०
४९. शेख महंमद म्हणे ॥
५०. ०उष्ट्या थिगळ्या ॥
५१. नव्या नव०
५२. त्यानीं नाहीं ऐसी, विटंबना केली ॥
५३. कृष्णें नाहीं०
५४. भागवत गीता ॥
५५. तेथें नाहीं०
५६. करा म्हणीतलें ॥
५७. कृष्णनाथाला ॥

चार । होणें ज्ञानशूर, विक्रमा ऐसें ॥५९॥ शरीरीं वसोन, निज तत्त्वीं उदास । तैसा नांदतोस, **शेख महंमद**[५८] ॥६०॥ –६

अहिंसक म्हणविती, शोधूनियां पाणी । असंख्य जिवानीं, शोध ना मरे ॥६१॥ जिवंत उदक, चौ खाणीचें बीज । शोधतां नये लाज, अज्ञानांधा ॥६२॥ जळांतूनि मासे, काढूनि टाकिले । क्षणा एक मेले, चर्फडोनी ॥६३॥ तैशा विंचू उवा, गांठोळ्या बांधिती । तेथेंचि[५९] मरती, आक्रंदोनीं ॥ ६४ ॥ दया नव्हे ऐसी, शरीर जिव पुजा । डोळे उघडा वोजा, जंतधारी ॥६५॥ नं[६०] ब्रोलतां तेथें, म्हणवी चतुर । यालागिं त्याचा केर, केला ज्ञानें ॥६६॥ सांगो त्याची कुळी, न यावी माझे वाचे । अधःपाती काचे, बेबुन्यादी ॥६७॥ बेबुन्यादी असतां,[६१] अगाध म्हणती । अधर्मी गोंविती, भाविक भोळे ॥६८॥ आडींचा दर्दुर, सिंधुच्या करि गोष्टी । तैसी तोंडपिटी, शाब्दिकांची ॥६९॥ या गुणें वक्तले, **शेख महंमद** । वोळखा सद्सिद्ध, साधुश्रोते[६२] ॥७०॥ –७

सांडुनि सलाम,[६३] दंडवत उच्चारी । अप्रतिष्ठा[६४] करी, राजाख्यान त्या ॥७१॥ दंडन या वाचे, साही जण म्हणणी । नामाविण भ्रांति, चोर भिक्षे ॥७२॥ घरच्या कुटुंबाचा, त्रास तो घेऊनि । भिक मागतां जनीं, आईबाई बरळे ॥७३॥ शरीर संमंध्याच्या, वैतागें पातले विटा । सवें इतरांच्या घटा, बोडक्या भोंवती ॥७४॥ हरणींत काळवीट, ते तरी सिंगाळ । हीन[६५] अमंगळ, संवऱ्या ऐसे ॥७५॥ संवऱ्याची सरी, तेहि न पवती । उदो जावों म्हणती, शुभाचरें[६६] ॥७६॥ वाळवंटीं मुतणें, त्या पाडें ते भिक । न घडे विवेक, परमार्थाचा ॥७७॥ आसीर्वाद नाहीं, चोराचे भिकेला । मोहट्याच घेतला, बगा ऐसा ॥७८॥ मोहट्याचे जन, त्याला भिक घाली । दोहींला पडली, नामाविण भुली ॥७९॥ आसनीं भोजनीं, शयनीं नाम घ्यावें । प्रबोधि भक्तिभावें, **शेख महंमद** ॥८०॥ –८

मुलाच्या हातची, सिंत्रूनि भाकरी । वायस अधिकारी, तदन्याय ॥८१॥ उफराटा मार्ग, थाटला कृष्णंभटें । त्याचें शिष्य चाटे, तेंच आचरिती ॥८२॥ पंडित कुशळ होता, चुकला कुशळता । सांगेन तत्त्वतां, श्रोत्या विवेकें ॥८३॥ शब्दज्ञानी पंडित, कुशळता बोलती । खोडी काहाडी विकती, ग्रंथीं वक्ता ॥८४॥ कातड्याच्या कोरा, वेशीचा द्रव्य सारा । त्यामागें म्हणियारा, झोडित असे ॥८५॥ निजायाचें नांव, गाठीं घाला म्हणती । घातलें नेणती, पायपोस ॥८६॥ सांगतां

---

५८. शेख महंमद तेवीं ॥
५९. त्या तेथेंची०
६०. बेबुन्यादि विवेक असतां,
६१. हें न०
६२. साधुश्रोते हो ॥
६३. ०सलाम हरी,
६४. दंड अप्रतिष्ठा
६५. हें हीन०
६६. शुभाचारें संवऱ्या ॥

त्याचें बंड, ग्रंथ तो उदंड। होईल प्रचंड, विस्तार विवेकें ॥८७॥ अवघे जे जपती, एकमेकां दुषिती। ठाईं ठाईं बसती, दुर्मुखले ॥८८॥ माया बहिणी गर्ती, सांडूनी पवित्रा। न्याहाळिती अपवित्रा, अनेकांच्या[६७] ॥८९॥ कुशळता संस्कार, त्याचें ऐसें वेड। ते अक्कलेचे मूढ, **शेख महंमदी**[६८] ॥९०॥ –९

सहा दर्शनांमाजीं, छत्तीस पाखांडे। त्यांतूनहि बंडें, महात्मी भोवळे ॥९१॥ वैतागें भ्रष्टलीं, अवगोन कर्मकाटे। आईबाई फल्गटें, म्हणती एकमेकां ॥९२॥ ब्राह्मण ब्राह्मणी, न्हावी कोळी साळिणी। कुंभार्णी वाणिनी, बाबा[६९] म्हणती ॥९३॥ सुतार परटिणी, सोनारी झारीणी। खाटिक पिंजारणी, आईबा म्हणतीं ॥९४॥ भूदेव ब्राह्मण, हिनांचे कोरके खाये। भोंवळ महात्मा होये, बाटोनियां ॥९५॥ पवित्र म्हणोनी, अपवित्रे ऐसीं। तुको खंडो नये तैसी, भ्रष्टविलीं ॥९६॥ वाघे भुते मुरळ्या, विश्वाच्या वोवळ्या। त्यांसी खेळत रळ्या, भक्तें भोगुनी[७०] ॥९७॥ शेवडे स्वप्निक, डौरकार मोठे। खसीहीन नखटे, छत्तिस पाखांडी ॥९८॥ जोंधळें पेरिले, विस्तारें पोटरे ओले। त्यांत निपजले, काह्नी गोळे ॥९९॥ तैसे ते अभक्त, छत्तीस अनेक। दुषिलें त्याचें भिंग, **शेख महंमदें** ॥१००॥ –१०

सेवी[७१] आवडी मध, दवुडुनी त्या[७२] माशा। आत्मा वंदुनि ऐशा, प्रकृति दुषी[७३] ॥१०१॥ कांटे केकती दुषून, घेई जे केवडा। आत्मा[७४] धडफुडा, वंदी दुषिल्या[७५] ॥१०२॥ अभ्र चाले पुर्वे, प्रति नभ असे। तें तों जातां दिसे, पश्चिम पंथें ॥१०३॥ तैसें साधुसंतां, येणें जाणें नाहीं। अनिवार ठाईं, सदोदित ॥१०४॥ वडवानळ पोकळीं, उत्तर मुखें जातां। रवि शशी पळतां, दक्षिणे दिसती ॥१०५॥ परी मिथ्या[७६] भूत, तैसे साधुसंत। नाहीं येत जात, मायारूपा ॥१०६॥ सोंपेसे दृष्टांत, कळे[७७] विश्वलोकां। विवेक युक्ति[७८] टीका, सांगेन श्रोत्यां ॥१०७॥ गाई म्हैसी अज, दिसति दृष्टि वोजा। नेणें[७९] घृतगुजा, दुहिल्याविण ॥१०८॥ दुहिल्या दुध दिसे, असुनि घृत न[८०] दिसे। मंथन केल्या भासे, लोणी गोळा ॥१०९॥ सुगंध दिसे घृत, जळल्या ताकटपाणी। **शेख महंमद** जनीं, निपजले[८१] ॥११०॥ –११

---

६७. अनेकांच्या ब्रोडक्या ॥
६८. शेख महंमदीं केलें ॥
६९. तेल्या बाबा०
७०. भक्तें भोगुनि त्याला ॥
७१. शेवीजे०
७२. त्याच्या माशा ।
७३. त्या प्रकृती दुषीलें ॥
७४. तैसा आत्मा०
७५. वंदीला दुशील्यांत ॥
७६. परि तें मिथ्या०
७७. कळेत
७८. वित्ती
७९. नेणीजे
८०. ना
८१. नीपजले तैसें ॥

निपजला खरें, दिसे ना[८२] जनाला। पावक अदृशला, गारे चमके[८३] ॥१११॥ गार दिसे नयना, तैसें साधु शरीर। नेणवे निजांतर, भक्तिविण[८४] ॥११२॥ चकमक झाडितां, स्फुलिंग उडती। कफे होय प्राप्ती, वन्ही त्यांत[८५] ॥११३॥ नाटोपे[८६] जाळितां, शुभाशुभ कांहीं। तैसे साधु पाही, पापपुण्यें[८७] ॥११४॥ साधु शरीर गार, भक्ति चकमक[८८]। भाव फुल विवेक, कफ तत्त्वें[८९] १ ॥१५॥ वंदिल्या निंदिल्या,[९०] अतर्क तर्के ना। सांगेन त्या खुणा, श्रोत्यांराया ॥११६॥ गार चकमक, विष्टेत पुरली। मस्तकीं[९१] वंदिली, योगियांनीं[९२] ॥११७॥ निर्विकार वन्ही, नेणें भुषण दुषण। तैसें साधुचिन्ह, मंगळामळ[९३] ॥११८॥ तरी शुच खरें, निर्गुण प्रायण। तरे महिमंडण, प्रतापें त्या[९४] ॥११९॥ यांची[९५] कृपा खरी, **महंमद शेखा**। प्रबोध विश्वलोकां, केला त्यानीं ॥१२०॥ —१२

अभक्तां पोटीं भक्त, जन्म आणि संचित। सांगेन[९६] वृत्तांत, अवधारा[९७] ॥१२१॥ तृणापासुनि शेण, शेणापासुनि तूप। तैसा तो कश्शप, प्रल्हाद घृत[९८] ॥१२२॥ कस्तुरी केवडा, मृगा केकती काय। तैशी नाहीं सोय, भक्ताभक्तां[९९] ॥१२३॥ सुगंध चोपडें तुप, निखर शेण घाणें। तैसा अभक्तपणें, भक्तपीता[१००] ॥१२४॥ धड म्हैस रेड्या, सुंदा नारी वेड्या। चंदन काबाड्या, काये व्हावा ॥१२५॥ तेलियाचे बैल, झांपडिनें फिरती। तेल तें नेणती, निघे[१०१] किती ॥१२६॥ तैसे[१०२] खळवादी, तीर्थें व्रतें पिडले। स्वहिता चुकले, पढोनियां[१०३] ॥१२७॥ चंदनाचीं काष्टें, मोगरेला[१०४] जोड्या। वागवितां गधड्या, सोय[१०५] नाहीं ॥१२८॥ बोलून ब्रह्म तैसें,[१०६] ब्रह्मगुज नेणती। अहं द्वैतें डुलती, भुजंगासे[१०७] ॥१२९॥ **शेख**

---

८२. दिसेत ना०
८३. चकमके ॥
८४. निज आंत्र, भाव भ०
८५. त्यांतील ॥
८६. मग नाटोपे०
८७. पापपुण्यें जाळी।
८८. भक्ति ते चक०
८९. तत्त्वें धरी ॥
९०. ०निंदिल्या साधु,
९१. अथवा मस्तकीं०
९२. राजयोगियांनीं ॥
९३. आमळ मंगळ ॥
९४. त्यांच्या ॥
९५. यैशाची कृपा०
९६. तो सांगेन०
९७. अवधारा श्रोते ॥
९८. ०घृत घृतीं ॥
९९. भक्तांची अभक्तां ॥
१००. पीते भक्तांचे ॥
१०१. निघालें०
१०२. तैसे ते खळ०
१०३. पढोनि कुशळ ॥
१०४. मांगरेलाच्या०
१०५. ते सोये०
१०६. तैसें ब्रह्म बोलोन,
१०७. भुजंगा यैसे ॥

महंमद त्याला, करा म्हणे स्वहित । तों तों ते उन्मत, करिती घात[108] ॥१३०॥
—१३

व्यतिरिक्त[109] शब्दें, आदि अंतीं आत्मा । सांगेन[110] महिमा, सद्गुरुप्रसादें ॥१३१॥ ब्राज्यापुर्वीं नाद, उकारापुर्वीं शब्द । तैसा परमानंद, सृष्टि पुरवी ॥१३२॥ बीजापोटीं वट, वटापोटीं बीज । अन्वयें समज, व्यतिरिक्तें[111] ॥१३३॥ तागापुर्वीं कागद, मैसपुर्वीं अक्षर । उजेडापुर्वीं अंधार, निर्गुण[112] मुळीं ॥१३४॥ कापुसापुर्वीं वस्त्रें, घडिल्यापुर्वीं शस्त्रें । लिहिल्यापुर्वीं चित्रें, रामायण[113] ॥१३५॥ हेमापुर्वीं तेज, जागृतिपुर्वीं नीज । मनापुर्वीं समज, तें तो सृष्टि[114] ॥१३६॥ जळापुर्वीं शेवाळ, वन्हीपुर्वीं जाळ । जैसें[115] मृगजळ, रविपुर्वीं ॥१३७॥ तैसा सृष्टिपुर्वीं, सगुण विधाता । व्यतिरिक्त पिता,[116] अव्यक्तत्त्वें ॥१३८॥ महिपुर्वीं पर्वत, नभापुर्वीं तारा । वडवानळ साकारा,[117] पातलें कैसें ॥१३९॥ व्यतिरिक्त टीका, अन्वयें निवाडा । वक्ते विज्ञान घडा, शेख महंमद ॥१४०॥
—१४

प्रकार स्नानाचा, आणि पंचविसाचा । निर्मळ सांगे[118] रुचा, साधु गुह्य ॥१४१॥ दृष्टि ठेवुनि तीर्थें, मूळबंद[119] मनीं । परमार्थ परतोनी, अनुभवेल ॥ १४२॥ उत्तमाहुनि उत्तम, वाग स्नान खरें । तीर्थ शुद्ध[120] सारें, चरणातळीं ॥ १४३ ॥ कायावाचामनें, भावें[121] दृढ धरा । हेळामात्रें[122] तरा, भवसागरीं ॥१४४॥ बाहेर भीतरीं, शुच[123] आत्मज्ञान । तत्त्वेंसी विज्ञान, दुजें शुद्ध[124] ॥१४५॥ हें ठेवा संचितें, थोरां दैवें जोडे । किंकर[125] धडफुडे, योग मुक्ति[126] ॥१४६॥ सकळ इंद्रियांचा, निग्रह करुनी । विग्रह दंडुनी, वासनेचा[127] ॥१४७ तिजें[128] अनुराग, घडे[129] नित्य स्नान । साधून भ्रमण, नलगे[130] कांहीं ॥१४८॥ करुणा सर्व भूतीं, स्नान[131]

---

१०८. ० घात निंदा ॥
१०९. वीतरेक०
११०. ते सांगेन०
१११. वीतिरेक्ते ऐसा ॥
११२. तेंवीं निर्गुण
११३. तैसे रामायणपुर्वीं ॥
११४. ०सृष्टीपुर्वीं० ॥
११५. जैसें तें मृ०
११६. ०त्या पिता ॥
११७. साहाकारा,
११८. सांगेन
११९. विवेक मूळ०
१२०. तीर्थें होती शुद्ध०
१२१. हें भावें०
१२२. तर हेळा०
१२३. शौच्य
१२४. शुद्धस्नान ॥
१२५. त्या किंकर०
१२६. रिद्धि सिद्धि याग मु०
१२७. चित्त वासनेचा ॥
१२८. हें तिजें०
१२९. ज्या घडे०
१३०. त्या नलगे०
१३१. चौथें स्नान०

परमार्थी । वितर्क साधिती, विरळा साधु[132] ॥१४९॥ जळति पापराशी, ऐशांच्या दर्शनें । तीर्था[133] उद्धरणें, चरणीं त्याचें ॥१५०॥ चतुर्देही त्रिपुटी, धुतली आत्मत्वें । शुच[134] नीत नवें, **शेख महंमदा** ॥१५१॥ –१५

पांचवें काया धुणें, मळीनाची मळी । हे हीन आंघोळी,[135] लौकिकाची ॥१५२॥ दंभ मद मत्सर, लोभ काम क्रोध । हीन दोष दुर्गंध, जीवापोटीं[136] ॥१५३॥ नांव ठावें आधीं,[137] विवेक वैराग्यें । साधुसंतांसंगें, चित्त शुद्धा[138] ॥१५४॥ अनंत जन्माचें, सत् प्रायश्चित्त । वाचे[139] प्रेमबोध, हरिकथा ॥१५५॥ शांति क्षमा दया, आनंदें[140] निवृत्ति । अनिवार खेळती, जवळ तया ॥१५६॥ सुखदुःखाविण, अनुभवानंदें[141] । ब्रह्मानंद प्रबोधे, श्रीमंत उर्ध्वे ॥१५७॥ पांचा आंघोळींहून, तत्त्व शांति अधिक । तेथें न्हाणी नापिक, विवेक धीरें ॥१५८॥ ऐशा न्हाणें सुचीळें, चौऱ्यांसी त्रिगुण मळी । धुपली तदा काळीं, साधुसंताची ॥१५९॥ तेंच न्हाणें खरें, **शेख महंमदा** । अनंत कल्पें[142] कदा, अशुच नव्हे ॥१६०॥–**१६**

नरदेह लाधोन, जितां मृत्यु पावती । सांगेन[143] उपमती, वैराग्यबोधें ॥१६१॥ शत[144] वर्षें ज्याले, पन्नासाचे घाले[145] । निद्रें[146] नागविले, असत्या ऐसे ॥१६२॥ बाळपणें गेलीं, अज्ञानत्वपणें । तारुण्यपणीं जिणें, उन्मत्त विषयीं ॥१६३॥ स्वहिताचा विसर । उमगी दासी गंधर्वें । पिसें नीत नवें, विषयाचें ॥१६४॥ मदनें होती वेडे, नोळखति मायबहिणी । स्वहिताची हानी, योनीसुखें ॥१६५॥ अष्टोत्तरशें व्याधी, दुःख विषयें उपाधि । तिडका लागुन शुद्धि, उडोनि जाय ॥१६६॥ नाक कान जाती, दडपे पारे घेती । दांत पडुनि होती, योनी ऐसी[147] ॥१६७॥ तरी नाहीं लाजा, भग ध्याती वोजा । स्वहिताच्या काजा, चुकोनियां ॥१६८॥ असंगतीं रंगले, रिते लवती भाते । गाला पडले पोचे, वाकत चालती ॥१६९॥ सरक्या जाले डोळे, मढ्याची आली कळा । आठवा गोपाळा, **शेख महंमद**[148] ॥१७०॥ –**१७**

योनी ध्यानें मरती, पुन्हां योन्यां होती । त्यानांहि भोगिती, हीन[149] दोषी ॥१७१॥ तारुण्यीं ऐसें केलें, वार्धकीं वायेकोळें । राहिले सत्ताबळें, खोंकी

---

१३२. साधुसंत ॥
१३३. तीर्थाला
१३४. शुद्ध सुच्य०
१३५. आंगवोहळी
१३६. देहे जीवा०
१३७. ठावें हें आधीं,
१३८. शुद्धावें ॥
१३९. जत सत प्राश्चीद । ज्या वाचे०
१४०. निजानंदें
१४१. अनुभव आनंदें ।
१४२. कल्पांती
१४३. ते सांगेन०
१४४. जे शत०
१४५. त्या पन्नासाचे०
१४६. निद्रेनें०
१४७. ०ऐसीं तोंडें ॥
१४८. ०महंमद म्हणे ॥
१४९. त्या हीन०

पादे[150] ॥१७२॥ उन्मताची[151] दैना, गमाविलें[152] जिवना। न भजतां निर्गुणा। स्वहित न करितां ॥१७३॥ ऐसे ते गवाविले, पूर्ण जन्म लाधूनि। घटका पळ निर्गुणीं, लागेच ना[153] ॥१७४॥ नरदेह लाधोन, स्वहित न करित। ते काय पतीत, उपेगा येती ॥१७५॥ नासक्या भावाची, विटक्या जिवाची। त्या जन्म जंताची, होती पापें[154] ॥१७६॥ चौऱ्यांशीचे[155] सूड, नरदेहीं घेती[156]। जरी फेडी भ्रांति, सद्गुरुस्वामी ॥१७७॥ सगुण जोड पुत्रा, पित्यानें दिली जोडी। तो व्यापारें प्रौढी, लक्ष करी[157] ॥१७८॥ अभागी उन्मत्ता, पितयाची जोडी[158]। अविचार परवडी, पूर्वज बुडवी ॥१७९॥ धर्मिष्ट निपजावें, चांडाळांध[159] नसावें। उजळि विज्ञान दिवे, **शेख महंमद** ॥१८०॥ **–१८**

पवित्रांच्या कीर्ति, अपवित्र वाणिती। स्वयें नादावती[160] पवित्रां ऐसे ॥१८१॥ वाखाणणें त्यांचें, उसनेपणाचें। आंधळ्यास सुराचें, कवित्व जैसें ॥१८२॥ निंब वाटुन सुखी, पाजी[161] परवडी। आपण आवडी, घोटुन दावी[162] ॥१८३॥ ऐकवती[163] शास्त्रें, वाचवती अक्षरें। होणें संगु धीरें, संचित भाग्य[164] ॥१८४॥ स्वतालागीं[165] साधी, अभ्यास[166] उपाधि। नाना वेशें वैदी[167], द्वैत[168] नाशी ॥१८५॥ भरले जहाजीं, आतळसी बैसल्या। डोलोनि बुडाल्यां, घात होय ॥१८६॥ तेंच जहाज तारी, एक पुण्य पुरुष। तैसा सत्य विश्वास, तारी[169] साधु ॥१८७॥ उपजुन निपजून, आप पर कीर्ति। करून जे असती, सुफळधारी[170] ॥१८८॥ ऐसा[171] नमस्कारून, **शेख महंमद**। प्रबोध स्वानंद, अहं जाळुनी ॥१८९॥ **–१९**

साधुसंताची चेष्टा, करितां बहु खोटी। यादव छपन्न कोटी, चेष्टें[172] बुडाले ॥१९०॥ खिळ्याचें काठवळें, पोटासी बांधिलें। पुरुषा सोंग दिलें, गरभारेचें

१५०. ०हगवण पादे ॥
१५१. ऐसी उन्म०
१५२. गवाविले
१५३. ०ना स्वहिता ॥
१५४. होती जाती पापें ॥
१५५. लक्ष चौऱ्यांशीचे०
१५६. घेई जेती
१५७. सगुण जोडण्या पुत्रा, पित्यानें दिधल्या जोडी ... लक्ष्यालक्ष करी ॥
१५८. आभागी उन्मत, त्यापें पित्याची जोडी।
१५९. चांडाळ आंध नसावें,
१६०. स्वयें होऊन नादा०
१६१. दुःखीया पाजी०
१६२. घोटून दाविना ॥
१६३. तैसी ऐकविती
१६४. सभाग्या
१६५. श्वेतालागीं
१६६. अभ्यासकर्म०
१६७. ०वेशें कष्ट कैदी
१६८. आहु द्वैत
१६९. भवाब्धी तारी
१७०. ते सुफळ०
१७१. यैशास
१७२. चेष्टे गुणें०

||१९१|| सोंगेसी यादव, गुंफेपासी आले । ध्यानस्थ देखिले, दुर्वास ऋषि ||१९२|| सोंगधारी कुंथे, हांकली बोंबली । शत वर्षें जाचली, रडती यादव ||१९३|| पुसती पोटीं[173] सांगा, भंगिली ध्यान मुद्रा । गांजे हे सुंदरा, तुम्ही असतां ||१९४|| वदे[174] ऋषेश्वर, इचे कन्या[175] कुमर । तुमचा[176] संहार, कृष्णेंसि करिल ||१९५|| ऐकोनि [177] वचन, निंदें हांसत अज्ञान । काठवळें सांगोन, टाकुन दिधलें ||१९६|| काठवळें जाणवे ना, साठी खंड्याचें बोणें । म्हणती ठकिले येणें, कृष्णादेखिल[178] ||१९७|| नेदीत[179] दुर्वासा, छळ[180] करूं लागले । शीघ्रवत[181] आले, कृष्ण तेथें ||१९८|| विपळ वृत्तांत, यादवीं सांगितला । काठवळें दावा चला, म्हणे राणा[182] ||१९९|| उमगलें काठवळें, यमुनेकाठीं घांसिलें । होणें [183] नाहीं चुकलें, **शेख महंमद**[184] ||२००|| —२०

तळहातां बुबुळां, केंस उगवती । तरीच असती, साधु वदे ||२०१|| काठवळें जालें पाणी, खिळा मत्सें गिळिला । मत्स्य[185] गंवसला, वाल्ह्या कोळ्या ||२०२|| यादव[186] पोह्या निघाले, पाणी[187] जालीं शस्त्रें । भोंकिती अविचारें, येरूनयेरां ||२०३|| सातां दिवसांमध्यें, छपन्न कोडी भस्मले । उरलें कृष्णें विंधिले, भालुकातिर्थी ||२०४|| सप्त ताड छेदुनी, तळवा डोहा विंधिला । उसनें पावला[188], राम द्वापारीं ||२०५|| डोळ्याची साक्ष पद्मे, जेथिल उसनें तेथें । आतां काय भुतें[189], चुकती उसनें ||२०६|| उसनें फिटलें[190] कृष्ण आसिर्वादला । त्यागुणें ज्ञानें संपला, वालंब[191] ऋषि ||२०७|| आतां उसनें देतां, श्रापितील लंडी । त्यागुणें जुगांडी,[192] हीन[193] होती ||२०८|| देत्यां घेत्यां ऐसे, येका धरा विश्वासें । राम जाला संतोषें, अवतार आठवा ||२०९|| **शेख महंमद**, अवतारावेगळे । निवांत तत्त्व कळे, व्यतिरिक्तें ||२१०|| —२१

---

१७३. पोटिचें
१७४. क्रोधे वदे०
१७५. इचे पोटीं कन्या०
१७६. तो तुमचा०
१७७. हें ऐकोनि०
१७८. आम्हां कृष्णा०
१७९. ब्रोणें नेदित०
१८०. छळणा
१८१. तों शीघ्रवत०
१८२. म्हणे यादव राणा
१८३. होणार
१८४. शेख महंमद म्हणे ||
१८५. तो मत्स्य
१८६. तंव यादव०
१८७. पाणीची
१८८. उसन्याकारणें पावला,
१८९. ०काये हें भुतें,
१९०. ०फिटलें म्हणोनी,
१९१. वाल्हा वालंब०
१९२. जुगागांडी
१९३. हिनें हीन०

परमार्थाचें सार, निज गोड गोष्टी। चित्‌चैतन्या[194] मिठी, आहिक्यें[195] त्या ॥२११॥ विवेकाचें गुज[196] सद्बुद्धीचे समज। विज्ञाना उमज, सांगेन अन्वई ॥२१२॥ शहाणा वोळखावा, जो जाणें आत्मत्त्वा। व्याहणा जाणावा, बुद्धि[197] द्वैतीं ॥२१३॥ सज्ञान जाणावा[198], जाणीव[199] विराली। अभिमानें हुंबर घाली, व्याहणा[200] चाट ॥२१४॥ पंडित जाणावा,[201] जो अहंता दंडी। अभिमानी[202] लंडी, मुर्खाधम[203] ॥२१५॥ धर्मिष्ठ[204] लक्षण, वारी[205] आयागमन। अधर्म्याची खुण, दंभ मोह[206] ॥२१६॥ लाभ त्याचें नांव, साधूची[207] पंगती। अधर्म अव्यक्तीं, जीवीं[208] हानी ॥२१७॥ साधु दीक्षा येका, ब्रह्में[209] प्राप्त कर्मी। कर्मी बद्ध अधर्मी, असाधु चंचळ ॥२१८॥ बळियाडा जेठी, जिंकी मन कामना। नपुंसक जाणा, मन चके[210] ॥२१९॥ तत्त्वीं भाव भक्ति, तो शुचि निर्मळ। अभावीं अमंगळ, तत्त्वीं[211] विन्मुख ॥२२०॥ सर्वांभूतीं व्यापला[212], तो **महंमद शेख**। प्रश्नीकें[213] विवेक, जयवंत[214] ॥२२१॥ —२२

भाव कैसा सांगेन, सर्वांपरी लीनता। अभावीं तत्त्वतां, सर्वांठाईं ॥२२२॥ सुख तें सांगतो[215], जैं[216] मीतूंपण पळालें। विषया किवनळे, भवदुःख[217] ॥२२३॥ साधून सद्वस्तु, दावील तो साधु। प्रपंचीं गोंवी भोंदु, असाधु[218] नष्ट ॥२२४॥ आत्मसखा आपला, सद्गुरुनाथ करा। वैरी[219] अवधारा, अहं क्रोध ॥२२५॥ सद्गुरू तो ऐसा, निर्गुण[220] तत्त्वीं निष्ठा। अगुरु कर्मकरंटा, अवगुण[221] पाहे ॥२२६॥ शकुनांची टीका, नित्य[222] एक चित्त। सर्वकाळ दुश्चित्त,

१९४. चित्त चै०
१९५. पडोनि आहिक्यें०
१९६. ०निज गुज
१९७. देहे बुद्धि०
१९८. तो जाणावा०
१९९. ज्याची जाणीव०
२००. तो व्याहाण०
२०१. ०तो जाणवा,
२०२. देहे अभि०
२०३. तो मूर्ख अधम ॥
२०४. धर्मिष्ठाचें
२०५. जो वारी०
२०६. ०मोह शरीरीं ॥
२०७. नित्य साधूची०
२०८. ते जिवित्वा हाणी ॥
२०९. ज्या ब्रह्म०
२१०. मन कल्पने चचके ॥
२११. नामतत्वीं०
२१२. ०एक व्यापिला।
२१३. जाणे प्रश्नीके०
२१४. साधु जयवंत ॥
२१५. ० ते ऐका सांगतो,
२१६. जेथें
२१७. ते भवदुःख रोगी ॥
२१८. तो धिग असाधु०
२१९. वैरी तोचि०
२२०. ज्या निर्गुण०
२२१. गुण अवगुण०
२२२. जो नित्य०

अपशकुनी[223] ॥२२७॥ क्षितीं निर्मळ ऐसा, तो जती निर्मळ । सांगेन अमंगळ, मळीया[224] पाहे ॥२२८॥ खर खळ जाणती, ज्यासी ना विचार । न[225] हेरा ते नर, विवेकीं[226] विवरे ॥२२९॥ रत्नें वोविजेती, जैसीं दोऱ्यामाजी । तैसी कवित्त्व वाजी, **शेख महंमदा** ॥२३०॥ –२३

बंधुपणें खरें, राम लक्ष्मण । सासुसूनपण, कौसले सीते[227] ॥२३१॥ सेवक हनुमंत, पुत्र तो श्रावण । पतिव्रतापण, अनुसये[228] ॥२३२॥ जगीं लेक उदंड, पूर्वजां बुडविती । नष्ट[229] अधःपाती, जन्मुनि जंत ॥२३३॥ पवित्र पुत्र ऐका[230], तत्पर[231] पितृकार्या । ओळखा तो[232] वैरी, पितृदुहिता ॥२३४॥ कन्या[233] ओळखावी, बेचाळिसां[234] उद्धारी । कुळीं नास करी[235], धांगडी[236] जाणा ॥२३५॥ विषयें लोभी जाणा, इंद्रियांसी[237] पोशी । इंद्रियां उदासी, निर्विषयीं ॥२३६॥ जिव्हा उपस्त जिंकणें, धृतीची[238] धारणा । सोलिव करंटा जाणा, बाष्कळ[239] बरळे ॥२३७॥ कृपणाचें लक्षण, चित्तीं[240] लोळंगतां । दरिद्री तत्त्वतां, द्रव्य[241] आशा ॥२३८॥ पावन जाल्या खुण, पुजी[242] साधुसंतां । अधम नेणता, लोभावारी ॥२३९॥ वरिष्ठ लक्ष्मीवंत, निरास सर्वाभावीं । अवलक्ष्मी स्वभावीं, आशापाश[243] ॥२४०॥ संन्यासी जाणावा,[244] त्यागी सर्व संकल्प । ममता अंगीं ऊमप, माया[245] प्रपंचीं ॥२४१॥ ज्या सर्वत्रीं सत्ता, भाग्यें[246] भाग्यवंता । स्त्री आधिन जिता, तो अभागी ॥२४२॥ सर्व तपांचें तप, नित्य नामस्मरण । असत्य जाणणें,[247] विन्मुखपणें[248] ॥२४३॥ वैकुंठवासी तोच, निराकारीं भजे । नर्कवासी निर्लज्जें, प्रपंचीं गुंतले ॥२४४॥ सर्वत्रीं ब्रह्म देखे, परमार्थी सत्य । मी[249] माझें म्हणें तें, असत्य[250] अधर्म ॥२४५॥ एक

२२३. तो अपशकुनी
२२४. जो जन मळीन०
२२५. वक्ते न०
२२६. जो विवेकीं विवरे ॥
२२७. ०सीते साजे ।
२२८. अनुसये साजे ।
२२९. ते नष्ट०
२३०. ०ऐका ऐसा,
२३१. तो तत्पर०
२३२. वोळखा सांगेन वैरी,
२३३. कन्या ते०
२३४. जे बेताळिसा०
२३५. ०नास सकळ करी ।
२३६. धिग धांगडी०
२३७. जो इंद्रि०
२३८. हे धृतीची०
२३९. जो बाष्कळ०
२४०. ज्या चित्तीं०
२४१. द्रव्याची०
२४२. जो पुजी
२४३. आशापाश ज्यास ॥
२४४. ०तो जाणावा,
२४५. तो माया०
२४६. तोचि भाग्यें०
२४७. ०तें जाणणें,
२४८. नामीं विमुखपणें ॥
२४९. देहे मी०
२५०. ते असत्य०

एकीं द्वैत, विवेकें सांडिलें । तत्त्वें चित्त रंगलें, चैतन्यस्वरूपीं ॥२४६॥ चतुर्देही आंघोळी, धुईल त्रिगुण मळी । ब्रह्मियाचा बळी, अढळ न ढळे ॥२४७॥ ऐशाच्या दास्यत्वें, सिंधु[२५१] तरे हेळा । नभीं[२५२] कळिकाळा, समर्थप्रतापें ॥२४८॥ आदि अंतीं संचितें, ब्रह्मांड देखिलें । प्रबोधीं कवि बोले, **शेख महंमद** ॥२४९॥ **–२४**

... ... ... ... ... ...

न होता पाखांडी, म्हणविती साधु । ने अज्ञान भोंदू, काळमुखें ॥२५९॥ सुईच्या वेज्या वाटा, हस्तिभार गेले । तेवीं ज्ञानें देखिले, **शेख महंमदा** ॥२६०॥ **–२५**

जाणती विचक्षण, ज्ञानाचे समुद्र । हांसती इतर, त्रिलोचनी ॥२६१॥ त्रिलोचनी अंध, भ्रांतीचे वडस । विज्ञान[२५३] अभ्यास, भासेचि ना ॥२६२॥ गर्भ अंध जैसे, निशी दिन नकळे । तैसे ते आंधळे, वेदिक भ्रमें ॥२६३॥ संत ऋषि महंत, बहु साल वाचावे । चांडाळ मरावे, शीघ्रवत ॥२६४॥ संत ज्याल्या घडीं, पुण्य संख्या कोडी । चांडाळ असंख्य जोडी, घटके पापें ॥२६५॥ मुर्खाचीं लक्ष वर्षें, संताची अर्ध घटका । त्या पुण्यें आइका, विश्व तरे ॥२६६॥ संत निपजल्या, नभ मही हर्षें । पतीतेंहि वासे, ऐकतां टीका ॥२६७॥ आतां भाग्यवंता, आवडे पुत्र पित्या । पतीतें ज्याल्या होत्या, दुःखकोडी ।२६८॥ किवनक माराया, अवघे आनंदती । अभक्तां लाधती, सुखें हरी ॥२६९॥ संत माय बाप, त्रैलोक्याचे दाते । कल्पयोगें जीते, **शेख महंमद**[२५४] ॥२७०॥ **–२६**

उपजीं निपज, दृष्टांतें सांगेन । साधुसंतांचें चिन्ह, परमार्थ[२५५] ॥२७१॥ निपजल्या रवि, प्रकाशें आगळा । तैशी साधुलीला, आत्मत्त्वेंसी[२५६] ॥२७२॥ उपजल्या मृगा, निपजली कस्तुरी । तैसे जगामाझारीं, निपजति साधु ॥२७३॥ उपजला शूर, रणांत निपजे । विवेकें साधु वोजे, निपजती[२५७] ॥२७४॥ उपजली उसीं, रायपुरी नाबद । निपजोन प्रबोध, साधुसंतां[२५८] ॥२७५॥ उपजल्या केकती, निपजले केवडे । तैसे संत निवाडे, जगतामाजी ॥२७६॥ निपजल्या धेनु, उपजे क्षीर घृत । तैसा तत्त्ववृत्तांत, साधुचा जगीं ॥२७७॥ उपजलें हेमीं, निपजे भांगार । तैसा संत विचार, सद्गुरुसंगें ॥२७८॥ उपजल्या धान्या, निपजवी[२५९] अन्न । तैसें आत्मज्ञान, गुरुप्रसादें[२६०] ॥२७९॥ जवादी उपजली, निपजल्या मांजरा । तैसा निपज अंतरा, **शेख महंमदा** ॥२८०॥ **–२७**

---

२५१. भवसिंधु०
२५२. ते नभीं
२५३. त्या विज्ञान०
२५४. ०महंमद वंदी ॥
२५५. विवेक परिमार्थ ॥
२५६. आत्मत्वें सुधीर ॥
२५७. संचितें निपजती ॥
२५८. साधुसंता तैसा ॥
२५९. सुग्रणी निपजवी०
२६०. साधु गुरुप्रसादें ॥

उपजलें तृण, निपजलें शेण। तैसें निंदक जन, यमपुरीं[२६१] ॥२८१॥ उपजल्या निगुऱ्या, जन्मले गांडुळ। जिवित्व[२६२] अमंगळ, चांडाळचांडाळीं ॥२८२॥ भूषण अंबाऱ्या, गजाच्या साजे गजा। गंधर्व मोडे माजा, ढाळें नये[२६३] ॥२८३॥ तैसें संत भूषण, वेशधाऱ्या दुषण। होय अपमान, आदि अंतीं[२६४] ॥२८४॥, हस्ती पाणी प्याला, सिंतोडी अंगावरी। तैसी नाहीं सरी, कोल्हा खोंकडा ॥२८५॥ दावाया[२६५] गजदंत, सन्मुख भिडती। चावाया[२६६] असती, मुखामाजी ॥२८६॥ तैसे प्रबोधी शब्द, सन्मुख संतांचे। निःशब्द तत्त्व साचें, स्वानंद[२६७] बोधें ॥२८७॥ तत्त्व[२६८] बोधें ध्याला, कां नसावें निवांत। विवेकें चेववित, हृदीं अव्यक्त ॥२८८॥ घाल्या ढेंकुर जैसें, देती जेवणार। तैसें ज्ञान उद्गार, वदविती[२६९] ॥२८९॥ सद्गुरु कृपा जाली, विज्ञान[२७०] सखोली। परमार्थ चाली[२७१], **शेख महंमदा** ॥२९०॥ —२८

चौ मुक्तींचा विधि, परमार्थ[२७२] बुद्धि। ऐकती त्रिशुद्धि, श्रोते प्रश्निक ॥२९१॥ निर अभिमानें, तीर्थें तीर्थ भजे। त्याला मुक्ती वोजे, पां[२७३] विराजे ॥२९२॥ दानशिला मुक्ती, घडे सलंगता। भिन्नाभिन्न होतां, शुभाशुभ ॥२९३॥ धारातीर्थीं शूर, त्याला समीपता। भिन्नाभिन्न होतां, देवघेव फेरे ॥२९४॥ तीर्थीं दाते शूर, त्यांची हे पावनें। आत्मज्ञात्या भोगणें, सायुज्यता ॥२९५॥ स्वरूप साक्षात्कारी, तत्त्वीं अनिवार। ते शूरांचे शूर, अव्यक्तात्मे[२७४] ॥२९६॥ धर्मिष्ठ राजेंद्र,[२७५] आयागमनाविण। सुवर्णीं तेंजपण, न्यायें[२७६] अलिप्त ॥२९७॥ धन्य तें शरीर, परउपकारी[२७७]। आदिअंतीं थोरी, वाढे त्याची ॥२९८॥ नाना भोग नरीं,[२७८] व्यर्थ जाये मास। पशुमांसें संतोष, मनुष्याचा[२७९] ॥२९९॥ ज्ञान पिकां आलें, संतांचें शरीरीं। फेडिली अंधारी, **शेख महंमदीं** ॥३००॥[२८०] —२९

(निष्कलंकप्रबोध हा ग्रंथ बराच मोठा असावा. त्यांत आचारधर्मावर टीका असावी असें एका अनामिकाच्या "शेख महंमदांच्या चरित्रा"

---

२६१. यमपुरीं निपजे ॥
२६२. तैसें जिवित्व०
२६३. ०नये कीं ॥
२६४. ०अंतीं त्याचा ॥
२६५. दावायाचे
२६६. चावायाचे
२६७. ते स्वनंद०
२६८. प्रेम तत्त्व०
२६९. वदविती मातें ॥
२७०. वृत्ति विज्ञान०
२७१. ०निःशब्द चाली,
२७२. वेद पर०
२७३. पावा पां०
२७४. अव्यक्त आत्में ॥
२७५. राजेंघर
२७६. तेणें न्यायें०
२७७. जे परउप०
२७८. ०भोग ते नरीं,
२७९. मनुष्याचा होये ॥
२८०. पोत १–२२९ व २३२.

वरून वाटतें. हा ग्रंथ श्री. वागळे यांस मिळाला असावा. त्यांनीं त्या ग्रंथांतील कांहीं अवतरणें* दिलीं आहेत तीं वरील मजकुरांत आलेलीं नाहींत. श्री. वागळे यांनीं आपल्या प्रस्तावनेंत जो मजकूर दिला आहे तो पुढें उद्धृत करून ठेवीत आहे. )

पडताळुनि सुऱ्या, पशु विदारिती । रडे बोंबा मारिती, कापतां बोट ॥८॥ मेल्या रांडापोरें, रडती परोपरी । नेणती अविचारी, परावें दुःख ॥९॥ अहिंसा विद्वान, दुःखीं सुख कळलें । आत्मज्ञान फळलें, **शेख महंमदा** ॥१०॥ –३०

स्वयें ब्रह्म असोनि, मी देह म्हणती । त्रिगुणाची भ्रांति, अविद्यें पडली ॥६॥ साधुसंग धरा, अंतर शुद्ध करा । कल्पना मन मुरा, ज्ञान विवेकें ॥७॥ तरंग साकारे उदकाचेनि अंगे । तैसी मनुष्य सोंगें, परब्रह्मीचीं ॥८॥ सुवर्णाचे नग, भांगार हीण डांके । तेंवी ब्रह्म निकें, देहकल्पनेहीन ॥९॥ देहकल्पना, विज्ञानें जाळिली । वैराग्यपुरीं घातली, **शेख महंमदें** ॥१०॥ –३१

स्वयें ब्रह्म झालों, शोधोनियां मूळ । हृदयीं ब्रह्मगोळ, सद्गुरुकृपें ॥—॥ जगदात्मा एक, प्रकृति भिन्न भिन्न । उजेडांत उष्ण, जपे जैसे ॥—॥ –३२

प्रतिमा दुपिल्याचा, राहिला अन्वय । ते सांगेन सोय, सभे श्रोत्यां ॥—॥ ओनामा एका खडी, आधीं मांडिती धडे । मग मोडिसी पाडे, अभ्यासिती ॥—॥ खाजण्या भाजण्या, हिशोब लिहिती । मग व्यापारी होती, राजेंदर ॥—॥ तैसी तीर्थ प्रतिमा, ओनाम्याचे धडे । स्वहिता धडफुडे, सेवा संत ॥—॥

खुळखुळा देऊनी, बाळ रिझविलें । काढाढून घेतलें, मातेनें आपणां ॥७॥ सोनें देतां बाळा, घेतां खुळखुळा । ते करी तळमळा, आंग घाली ॥८॥ तैसे ते जना, निज गुज देती । अज्ञानें सळिती, प्रतिमा हिरतां ॥९॥ शाहाणें झाल्या बाळ, टाकी खुळखुळा । मागे द्रव्यगोळा, **शेख महंमदा** ॥१०॥ –३२

तैसे होणें शाहाणें, साधुसंत सांगाती । प्रतिमा भक्ति, टाका खुळखुळा ॥—॥

दाटून दिल्या दान, घेत नव्हते भट । आतां जाले फळकट, लुलुतपणें ॥—॥ तोंडें बोलती वेद, नेणती त्यांचा भेद । करिती जगीं बोध, पाखांडाचा ॥—॥ बोलतील एक, आचरती अनेक । नेणती सवेग, निज तत्त्वाचा ॥—॥

आपले आपण बद्ध, आपले आपण मुक्त । पोटिस्तें बहुत, पर्वण्यां भटांच्या ॥१॥ वासना आसट, कल्पना मुरदार । त्या गुणें आचार, सांडवले ॥२॥ महाराज दाते, म्हणती उन्मत्ताला । नातरी त्या भुताला, कोण मानी ॥३॥ गाई काप्यांचे वंद, धरितील इतर । होती त्याचे चाकर, असोन गुरु ॥४॥ देशींचे तांदुळ, नारळेशीं मिठा । कोंकणा नेतां तोटा, आला वाण्यास ॥५॥ कोंकणीच्या करंडी,

---

* श्री. शिवराम सीताराम वागळेकृत " योगसंग्राम "–प्रस्तावना.

भरूनि आवडी । नेतसे परवडी, ब्रालेघांटा ॥६॥ तेथें आला तोटा, मुद्दल बुडालें । दिवाळे निघालें, उदम्याचें ॥७॥ मग रडे बोंबली । तोंडावर थुंकी जन । ऐसा उदिम व्याहान, जित्रत्र बुडाले ॥८॥ ऐसा ज्ञानें भट, चाट मंत्रवादी । पोटासाठीं कैदी, नाना मतें ॥९॥ यजमानाचें द्रव्य, घेऊनि कळंत्रीं लावी । जगीं लंड मिरवी, भट गोसावी ॥१०॥ यजमानाचें दान, गायी म्हसी दासी । विकून अपेशी, भटणी भांगारी ॥११॥........... –३३

ब्राह्मण विचार ऐका गाढा, द्वारीं क्षमा दयेचा सडा । घेतला अविद्येचा शिंतोडा, मनापासुनि ॥—॥ भक्तीची त्रिकाळ संध्या करी, श्वास उछ्वास माळा फेरी । हृदयीं हरिनाम उच्चारी, वासना सोंवळी करूनियां ॥३॥ धन्य ते ब्राम्हण, ईश्वरपारयण । नेणती महिमान, ब्रह्मादिकहि ॥४॥ ते शुच ना सोंवळें, ब्रह्मानदें ओसंडलें । नित्य चरणीं रुळे, वाराणसी ॥५॥...........

भूदेव ते ब्राह्मण, सकळ वर्णी श्रेष्ठ । ते सांगेन चोखट, श्रोतियांला ॥१॥ धोतर टिळे जानवीं, नव्हेति ब्राह्मण । हृदयीं शुचपण, तोचि ब्राह्मण ॥२॥ शेंडी मोचे कडदोरें, ब्राह्मण नव्हेती । कल्पना मुंडिती, ते ब्रह्मरूप ॥३॥ आचारे नव्हे ब्राह्मण, नेणती विचार । अनामिकाचार, केल्या ब्राह्मण नव्हे ॥४॥ आंघोळ संध्या त्रिकाळ, ब्राह्मण नव्हे खरा । हृदयीं निर्मळ बरा, तो ब्राह्मण ॥५॥ पन्नास कोटि मंत्र, गायत्री वेद चतुर । योग होम थोर, ब्राह्मण नव्हे ॥६॥ अनुष्ठान जपतप, नव्हे ब्राह्मण पूर्ण । तत्त्वेंशीं विज्ञान, ब्राह्मण विरक्त ॥७॥ सडा संमार्जन, तुळसी । वृंदावन । विधि कर्मबन्धन, नव्हे ब्राह्मण ॥८॥ निर्बंध उपनिषद, हा पहावा मोक्षा । न येतां गोही वोजा, शब्द ग्रंथ दुषावा ॥९॥ **शेख महंमद**, ब्राह्मणाला वंदी । अब्राह्मण निंदी, ब्रह्मविज्ञानें ॥१०॥ –३४

अनुक्रम ......... विः ..................
क्रमांक .. नोंः दिः ..................

# ३

# प्रकरणें

## १. गायका

हरि गाई तुझ्या बारगळा । मज नाटोपती गोपाळा । जरी तूं सांभाळिसी वेळोंवेळां । तरीच वळीन गा बापा ॥ १ ॥ सप्त रंग औट हात कांबळा । तो मज पांघरविला रे गोपाळा । आत्मज्ञान काठी दिधली राउळा । हातीं माझे ॥ २ ॥ थोडी आयुष्याची दोरी । निर्गुणा बांधली रे जन्मपदरीं । गाई घालोनि माझिये भारीं । धनीपणें मिरविसी ॥ ३ ॥ अनुहातें वाजतसे वेणुनाद । तेणें गाई करितसे सावध । सेवावया सत्रावीचें दुध । गोविंदें मज कपिला दिधली ॥४॥ अव्यक्त कृपेचा कनवळा । स्वारीस बैल दिधला मन पोंवळा । तो वैराग्य वळत्या करी वेळोंवेळां । चित्त सावधपणें ॥ ५ ॥ तुझ्या ठाईंच्या चंवचाळ गाई । त्या सांग कैशा लावाव्या सोई । कोठें रिती नाहीं भोई । उभ्या करावयालागीं ॥६॥ तुझें ब्रह्म सेत पिकलें गा मुऱ्हारी । चौदा भुवनांची एकच वोवरी । तुझे मज मारिती सेतकरी । रोकडे गायके दातारा ॥ ७ ॥ अष्टधा प्रकृतीचे दळवाडे । मी नेणतें गायकें वेडें । तूं सावध मागें पुढें । मज रक्षिता देवा ॥ ८ ॥ आशा मनसा कल्पना । तिन्ही गाई पहा दारूणा । त्या वेगळाल्याच नारायणा । नावरती मज ॥९॥ आशा मारी मुसांडी । तिजमागें धांवे कल्पना पुंडी । मनसा चारी रानें धुंडी । परी पोट न भरे ॥१०॥ तिखट शिंगाची गाय वासना । तिनें शिंगाटलें विश्वजनां । ती मज न वथरती निर्गुणा । तूं दटावी वेगीं ॥११॥ माया गाई बहुत निब्रर । तीस बैसल्यांचा ना आदर । तिचा देव करिती अंगिकार । ती वळवे ना माझेनी ॥१२॥ तिचें अढान मोठें भार ना शुद्ध । नखांवरी पिळल्या न निघे दुध । तिनें बहुतांस लाविला वेध । ब्रह्मादिकां नागवे ॥१३॥ ममता संगें निंदा गाई हुली । ती मार्गेच राहे एकली । चरूं अविद्या सोंकली । यालागीं कळपींच ना मिळे ॥१४॥ काम क्रोध मद मत्सर । हे खोंड अपेट चार । गाईमधें वावडती शिरजोर । शिग्र मातलेपणें ॥१५॥ मोह खोंड हा बहू मादा । तो गाई चाटीतसे सदा । भ्रांत गाई गोळा करितसे गोविंदा । मिस्किनपणें ॥१६॥ दंभ क्रोध वैर कुचर । तो आडवाच उडे अविचार । द्वैत उकिरड्याचा करी केर । तो ठकारे डुल्लीतसे ॥१७॥

**शेख महंमद** निज गायका। शरण आलो सद्गुरु नायका। गोफण मागितली गा टीका। गुजनिर्धारेंची ॥१८॥ —३५

अभाव स्वभाव तर्क धोका। हे लांडगे पिसाळले ऐका। गाई समजों घोलाविती मरण भुंका। आतां किती हृद्वेग करूं ॥१९॥ संकल्प विकल्प मानापमान। प्रपंच व्याघ्राचा घरटा व्याहान। आळस आणि अंगमोडा श्वान। ते मज पाठीं लागती ॥२०॥ पाटिल ब्रह्मा विष्णु महेश। ते मज नित्य करिती घसघस। आवरा गा सेत करावयास। आतां किती प्रार्थू ॥२१॥ शंका लज्जा लासी। त्या मजसी जपती दिननिसीं। एकला एकांग मी परदेसी। वनीं वेढलों देवा ॥२२॥ विवेक गोफणीचे गुंडे झुगारून। दापीले प्रपंचाचें रान। सावजें पळालीं जिव घेऊन। शिघ्र देशोधडी ॥२३॥ तम पाणी दिधलें सत्त्व कुऱ्हाडी। रजोगुण दांडा जडिला आवडी। अठरा भारांची केली तडातोडी। आंत किल्ला बाहेर कोट ॥२४॥ पुर्वेहुनी गाई चारित चालविल्या। पश्चिम विहंगम मार्गें लोटल्या। त्रिकुट गोल्हाट भेदूनि उभ्या केल्या। उन्मनी आखरांमध्यें ॥२५॥ इडा पिंगळा सुशुम्ना तिन्हीं वाट। तिकुन गाई घोलावुनि कोंडिल्या निकट। शांति झांपा लावुनि बळकट। विज्ञानें कोंडिल्या ॥२६॥ निळारंभ कळंबाची साऊली। तेथें कुळवाडी आनंदली। नांव सांगोन हवाला केली। ह्या श्री धन्याची ॥२७॥ ऐशा गाई वळूं नेणति ते अति नष्ट। तेहीं लक्ष चौऱ्याशीचा केला बोभाट। तो काढी घाली गा निकट। धन्य धनीपण ॥२८॥ बोभाटाची फजिती सोसिली। तों घरीं घरधन्यानें अधिक फजिती केली। ऐसी गायकेपणासी लाज लाविली। मुर्खा अभाग्यानें ॥२९॥ तंत वितंत घन सुस्वर। चौ मोहोऱ्यांचा एकचि झणत्कार। सोऽहं बोधें घाली हुंबर। ब्रह्मानंद जालों ॥३०॥ बुद्धि चकमक हेतु गार। सद्गुरु वचनें फुले अपार। एक फुल बिंबलें हृदयाभितर। भाव कफालागीं ॥३१॥ पांकुळकां गाईचीं वासरें। तेही हुंबरडा करिती एकसरे। तीं कोंडितसे विचारें। गहीन गोधनामधें ॥३२॥ स्वानंद क्षिरसागर। चार डेरे होता उद्धार। ते भरोनियां येतसे साचार। चार मुद्रा चार वाटा ॥३३॥ हरि राग संताप तुझीं येसकरें। तेणें मज लाविलें धाय कांवरें। बोले मले तुले उत्तरें। पोटास घांस मागे ॥३४॥ गायके म्हणविलें साही जणीं। शूरत्वें वळों जाणें विरळा कोणी। येर वेशधारी होऊनी। भोंदु जन ठकिती ॥३५॥ संतुष्ट भावें गा कृपा केली। गाइकेपणाची असामी मोडिली। **शेख महंमदा** दीधली। मूळ पीठ ॥३६॥ —३६

अहंकार उन्मत्त अज्ञान। हे दोन्ही पोळ महा दारुण। घेऊनि पळती गायेलागून। सत्वर मोहोपणें ॥३७॥ गाय सांभाळुं जाय सामोरा। तों अहंकार पाठी लागे होवोन खरा। मग मी पळतांचि दातारा। तुझा धांवा पुकारी ॥३८॥ अहंकार पोळ बहुत बावरा। त्यानें शिंगाटलें त्या दशशीरा। तैसाच मज मारिल पैं दातारा। मग हांसे होईल तुझें ॥३९॥ पोळ दंभ असे बहु चुकुर। त्यानें

थडकिले असंख्य अवतार । ते तूं बळविसी कवण्या विचारें । कैसा निष्ठूर जालासी ॥४०॥ काढी रे आपुल्या पोळाचे अंड । मजसी बोलों नको बहु उदंड । नाहीं तरी तुजसि दाखविना तोंड । पळोन जाईन निज घरा ॥४१॥ हरि तुझ्याच रे मनबळें । मज नानापरी रे छळिलें । परि पाहिजे म्यां काय केलें । सांग वेगीं मजला ॥४२॥ हुकुमें घेताति विकल्पाचें रान । विषय सराटे रुतती मजलागून । मन बैल जतन होय व्याहान । आतां बांध आपुलें पाई ॥४३॥ चेतना तृष्णा अहंता म्हैसी । हरि मजकून वळविसी । मदन मस्त टोणगा ऋषिकेशी । तो मज पाठीं लागे ॥४४॥ मदन टोणग्याची थडक मोठी । यालागीं सुखें घेतला कासोटी । स्वामी कार्तिकासी केलें हिंपुटीं । भेणें कपाटीं रिघाला ॥४५॥ मग बोलिले श्रीपती । सद्गुरु कृपा घ्यावी पुरती । आहिक्य गाई वळलियाविना वळती । सत्य जाण बापा ॥४६॥ कांबळा हिरोनि मोडिली काठी । दिवस पुरवितां जिवास जाली साठी । पुढें गाई वळी ना धुर्जटी । मन समचरणीं राखावें ॥४७॥ मग हांसोनियां श्रीअविनाश । हृदयीं आळंगी महा हर्षें । जो गाई वळितो सर्वस्वें । प्रेमभक्त म्हणोनियां ॥४८॥ हें ऐकोनी श्री वचन । **शेख महंमद** परम उन्मन । म्हणे नलगे वैकुंठभूवन । मज तद्रूप करावें ॥४९॥ –३७

ऐकोनी निश्चय निर्धारें । समदृष्टि न्याहाळिलें ईश्वरें । आतां तो पाहा तदाकारें । मूळ कूळ ग्रासोनियां ॥५०॥ सद्गुरुकृपेचा उद्बोध । मीन पथें चढलों ऊर्ध्व सिद्ध । ब्रह्मानंदें सद चिद । तेंहि विरोनि गेलें ॥५१॥ दृश्यादृश्य भावना । तेंचि तदाकार लोपली जाणा । तेथें **शेख महंमदपणा** । ठावचि नाहीं ॥५२॥ –३८

इति गायका संपूर्णमस्तु ॥*

## २. मदालसा

विवेक वैराग्य बोध, चर्चितसे **शेख महंमद** । उपदेश हा मदालसेचा, स्वहिताचा आनंद । पुत्रालागीं सांगे भावें, प्रेमें होई बा सावध । घडि जाते महा मोलाची, तोडी माया प्रपंच भेद ॥धृ॥ लक्ष चौऱ्यांसी भवबंधनें, मागें सोसिलीं अज्ञानें । करितां पापें असंख्यात, प्रालब्धेंसी क्रियमाणें । आलासी संचितें पोटा, महा पुण्याचें जोडीनें । कृपादृष्टी बोले तुज, समाधानें परिसणें ॥१॥ गर्भवासी जाच तुजला, भ्रांतिभ्रमें नाहीं कळला । रज तेज नळ कंबळीं, सप्त धातु स्नेहे[1] जाला ।

* सेम ५–५.

१. धातुस नये–रा. १–६९.

विटाळाचें अशुद्ध अळें, तयामाजी जन्म तुला[२]। जठरिक[३] ब्रह्म मूळ अग्न, विरजन[४] होतसे स्थुळाला ॥२॥ त्वचेविण सुक्ष्मता, जंत क्रिमींच्या हुतहुता। मळ मुत्र हें जननीचें, शुकलित शोणीत[५] अद्‍भुता। फुटती अंकुर तेथें[६], पांचा पंचविस अवस्था। वायो नसतां वायो जाला, सोऽइं दुःखें गुणवंता ॥३॥ आर्तें गर्भीं तुज बाळा, तेणें जननी ये डोहोळा। सेवी लवण अंबिल माती, चर्के बसती तळमळा। प्रकार बहू यातनेचा, दुःख सांगतां कळवळा। ऊर्ध्व कुडी अधो मुख, नाकीं दुर्गंधीचा उबाळा ॥४॥ सहज माता हाले चाले, या दुःखाचे दुःखीं घाले। बोलतां न ये शद्ध कांहीं, आहार ॐकार साचले। फुगलें पोट पोटामाजी, वेदना विंचू ऐसें सले। नेणती दुःख जननी जनक, विषयभोगासी गुंतलें ॥५॥ जंतर वोटी जन्मा आला, भ्रम लौकिका गुंतला। सांडूनियां सोऽइं जप, कोऽहं कोऽहं करूं लागला। रडे फुंदे निधान गेलें, मुर्ख म्हणती आजा आला। काढी ना कां पहिली ठेवणी, कोऽहं ज्ञानें सांडवला ॥६॥ नश्वर शरीर विटाळाचें, मूर्ख मानिती शुच साचें। अहं द्वैतें मन कल्पना, जन्म मरण या बीजाचें। देह घडी हाडांचा भारा, आयुष्य नासूनि महा मोलाचें। नेणती मुळींचाच धर्म, नातें आचरती पाखांड्याचें ॥७॥ बाळपणीं असंख्य जाती, तारुण्यें पुढती येती। वार्धक्यानें वाळलीं कोळें, पोरें बागुल म्हणती। यालागीं तूं सत्वर, सेवी सद्गुरुसि सती। भोगीच विदेही असे, रिद्धि सिद्धि न पावे मुक्ति ॥८॥ भवनदीची बेंद मोठी, गिळल्या अवताराच्या कोटी। वासनेसी चढती पडती, जैसे वट बीजा पोटीं। फळा फुलासी वर जाये, पिकुन पडे उगवे शेवटीं। ऐसी होतां घालमेल, हरिहर ब्रह्मादिक कष्टी ॥९॥ दुःख भ्रमणीं उदंड आहे, उघडे डोळे तूं तंव पाहे। चराचर चारी खाणी, यातीत यातना वाहे। नदीमध्यें वाळू जैसी, खोल उथळ रुळत आहे। ऐसे फेरे तुजलागीं, सद्गुरुचरणीं ज्ञान राहे ॥१०॥ इंद्रपद असंख्य जोडी, देतां राज्यें कल्प कोडी। न येच घडि या नर देहाची, व्यर्थ वोढिसी विषय वोढी। अझुनी तरी उघडी डोळे, कां रे बुद्धि केली वेडी। कां करिसी टाळमटाळा, अंतीं यमाची बांदवडी ॥११॥ यालागीं तूं स्वहित करी, साधुचरण दृढ धरी। तर्कूं[७] नको अणुमात्र, जन्म मरण संहारी। भाव भक्ति बोध शांति, अंग मन भूतें आवरी। कृपा करितील महाराज, शीर तूं तयाचें अंतरीं ॥१२॥ त्यांत शिरतां तूंचि होसी, मी–तूंपणा मुकलासी। जळ जिरालें फिरंगेसी, फीरंग म्हणती तयासी। मोल चढे पाणीपणें, अटल्या तत्त्व धारेसी। गुरुचरणीं निःशंक होय, सद्गुरु सर्व देसी होसी

२. तुजला–रा. १–६९.
३. जगीं–रा. १–६९.
४. मार्जन–रा. १–६९.
५. श्रोणित
६. तेज–सेम १–१९, पोत १–६.
७. शंको–रा. १–६९.

॥१३॥ ऐसे होतां बहु सायास, बाळा धरीं तूं विश्वास। भाळूं नको कामिकपणें, करी सर्वत्र निरास। तत आत्मा मुळींचा होय, जैसा सुवर्ण पुटीं सुरस। जाळीं अहं कल्पना डांक, पडोनि वैराग्यें मुसेस ॥१४॥ विवेकें विवेकीं निवांत,[८] कामा काजा विरहित। ब्रह्मांडा एव्हढा होसी, नाहीं आयागमन घात। चौदा भुवनें तुजमाजी, पवित्र उपदेशाची मात। **शेख महंमद** सांगे जना, ऐका **मदालसा** वृत्तांत ॥१५॥[९] **–३९**

८. ०विवेकीं निज निवांत–रा. १–६९.

९. रा. १–६९; सेम १–१९; पोत १–६

# ४

## [1] सद्गुरुमहिमा

धन्य चांद बोधले । जानोपंता[1] लोधले । त्यांच्या शेषें धाले । येकोजनार्दन ॥१॥ केली भागवत टिका । उद्धार विश्वलोकां । तेंच दिसे सायेका । स्वामीपासीं ॥२॥ त्रिपदा पिळिली । कुत्री पान्हायेली । उच्छिष्ट कृपा केली[2]। जानोबासी ॥३॥ अगाध[3] तुमचा महिमा । न कळे मेघःशामा । लघमीं केली क्षमा । जयेरामासी ॥४॥ दासीपुत्र विदुर । तैसा मी तुमचा किंकर । सरता जालों साचार । **शेख महंमदीं** ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–५३). –४०

सद्गुरु साचे पिरु । दो भाषांचा फेरु । नाहीं भिन्नाकारु । ज्ञान विवेकीं ॥१॥ जैसें एका झाडा । पत्रें खांद्या निवाडा । तैसा भाषा पवाडा । गुरुपिरांचा ॥२॥ एका अवतरणें । साही दरुशनें । भांडती भांडणें । भासतां आभास ॥३॥ गुरुपिरांची कळा । कोणी जाणें विरळा । देती[4] तळमळा । अहं अज्ञानें ॥४॥ अहं ज्ञान छेदिलें । विज्ञानें तत्त्व भेदिलें । मनाचें उन्मन जालें । **शेख महंमदा** ॥५॥ —(गीत ओवी–पोत १–२६०). –४१

धन्य तोचि भाव, धन्य तेचि भक्ति । जोडलेसें संतीं, परब्रह्म ॥१॥ धन्य तो सद्गुरु, धन्य आत्मज्ञान । देखिलें दर्पण, अंजन शुद्ध ॥२॥ अंजना त्या नांव आइका उन्मनि । प्रकाश परतोनि, सुदला डोळां ॥३॥ लोपलें तें बिंब, खंडलिया ध्वनि । आनंदाची धनी, हृदया आली ॥४॥ बाहीजभीतरीं, मी माझारीं एक । सम दिसे लोक, **शेख महंमदा** ॥५॥[5] –(गीत ओवी–पोत. १–४३). –४२

वोवो रसें ओंविया, अव्यक्ता[6] आवडीं । गाये[7] परवडी, भक्तिभावें ॥१॥ भाव द्रवला भक्ति, तुज आली[8] वोल । गातूसे सखोल, सद्गुरुस्वामी ॥२॥ स्वामीया सद्गुरु, जीवाच्या जिवना[9] । तुजविण मना, सखा नाहीं ॥३॥ नाहीं सखा ऐसें,

---

१. त्यानीं जानोपंतां०

२. ०लाधली ।

३. स्वामी अगाध०

४. येरे देती०

५. या अभंगावर शीर्षक " चांद बोधले " असें आहे.

६. अव्यक्ताला–पोत.

७. गातूसे–पोत.

८. गाये आली०–पोत.

९. ०सज्जना–पोत.

११९९६

पुरतें कळों आलें[10] । महावाक्य बोलिले, अनेक गोष्टी[11] ॥४॥ ह्या रचना रचिल्या, **शेख महंमदा** । आहिक्य जालें सदा, अविनाशीं ॥५॥—(दाम यमक, गीत ओवी–रा. १–१२; पोत. १–३७). –४३

पहिली ओवी माझी, सद्गुरुचें पायीं । मग सोऽहंसहि, आठवलें ॥१॥ आठवलें मज, गर्भाचिये खोळे । होताति डोहोळे, जननिये ॥२॥ जननिये आवडे, खापर आणि माती । तेणें दुःखें सती, दुणवलीं ॥३॥ दुणवलीं दुःखें, तें मी सांगो किती । विनवी श्रीपती, काढ वेगीं ॥४॥ वेगीं दिधलीं वाट, पुरल्या नव मास । संचित बहुवस, फळा आलें ॥५॥ आलें कोण न्यायें, तें तूं परियेसा । पडतो पाऊसा, भरती नद्या ॥६॥ नदियांचें पाणी, मिळालें सागरीं । तैसेंच अवधारी, मन जालें ॥७॥ जाल्याचा दृष्टांत, आठवला दुजा । मक्षिकांनीं बोजा, मध केला ॥८॥ लागवेगें जोडी, केली बहुवस । मग ते सुरस, गाढी आले ॥९॥ लेईलें अंजन. सद्गुरुच्या वरें[12] । उजडले बरें, **शेख महंमदा** ॥१०॥—(दाम यमक, गीत ओवी–रा. १–१४). –४४

अंतरींहि चक्र, बाहेरहि चक्र । जाणती योगींद्र, डोळ्यांपुढें ॥१॥ पुढें मागें धन, वर विश्वजन । चौदाहि भुवन, तया पोटीं ॥२॥ पोटीं दृश्य असे, भासल्याविण भासे । जगांत न दिसे, तत्त्वकळा ॥३॥ कळा सर्व देशीं, नाहीं दिननिशीं । देखिलें आपणासी, आपणांमध्यें ॥४॥ सद्गुरुची कृपा, वृत्ति निज रूपा । जपाविण जपा, **शेख महंमद** ॥५॥–(दाम यमक, गीत ओवी–पोत. १–४४.) –४५

येईं बा सद्गुरु, माझिये भेटीस । तुजविण उदास, चित्त माझें ॥१॥ माझें चित्त आहे, तुझ्या पायापासीं । तुजविण परदेसी, हिंडे जन ॥२॥ जन विजन एक, तव कृपा अहिक्य । परब्रह्मीचें सुख, तुझेनि मज ॥३॥ मज तुज भिन्न, मानवतें अज्ञान । चरणीं संपूर्ण, जाली मूस ॥४॥ मुसेमाजी सुवर्ण, एक होय आन । तैसी आहे खुण, विश्वनाथा ॥५॥ –( दाम यमक, गीत ओवी–रा. १–१५ ). –४६

सद्गुरु सर्वेश्वरु । मायेबाप गुरु । तिसरा सहोदरु । जेष्ठ बंधु ॥१॥ साधु संत ज्ञानी । नित्य ध्याय मनीं । सांडावी भ्रमणी । बाष्कळ ती ॥२॥ जतसत भावें । गंभीर विवेकावें । निःशब्दीं निवावें । प्रेमबोधें ॥३॥ हृदयकमळीं । आनंद[13] कल्लोळीं । तत्त्वें सोऽहं मेळीं । शांति श्रद्धा ॥४॥ आदि अंतीं सद्गुरु । भवसिंधूचें तारु । त्या पायीं निर्धारु । **शेख महंमदा** ॥५॥–(गीतओवी–पोत. १–२५९ ). –४७

आंधळियानें संगती, डोळसाची धरावी । दैना चुकवावी, पडापडिची ॥१॥ आंधळे लागले, आंधळ्याचे पाठीं । पडले शेवटीं, भवडामध्यें ॥२॥ गुरुशिष्य आंधळे, नेणती साधु कळे । उद्धरी भाविक भोळे, **शेख महंमद** ॥३॥—( गीत ओवी–पोत. १–२४० ). –४८

---

१०. दुजा नाहीं–रा.
११. ग्राह्या–पोत.
१२. कृत्यें.
१३. ब्रह्मानंद०

चित् शब्द हृदयीं । जतन तत्त्व बोधीं । ते पुजावे आधीं । वितर्क साधु ॥१॥ क्षमा दया शांति । ज्ञान भाव भक्ति । विज्ञान तत्त्व वृत्ती । संतें[14] खरे ॥२॥ परमार्थे[15] योगी । अनुभवें सौभागी । वंदी[15] अनुरागी । **शेख महंमद** ॥३॥ —( गीत ओवी–सेम. १–१३; पोत. १–१९० ). —४९

तैसें नव्हे म्हणती वेडे । तान्हें मेलों म्हणती बापुडे ॥१॥ अक्षर म्हणे दावा कागद । कोठें तूप म्हणे दूध ॥२॥ भाविति अंबे अंध्याचें डोहळे । तेविं जनार्दन जगीं न कळे ॥३॥ पुष्पें नेणति गंध गोडी । जनार्दनाविण[16] जन चर्फडी ॥४॥ रविप्रकाशें रवि सिद्ध । गुरुज्ञानें **शेख महंमद** ॥५॥—( गीत दुचरणी–सेम. ५–८; पोत. १–२७९ ). —५०

वागा सद्गुरुचे पथेन । कदा काळीं न ये दूषण ॥१॥ मनें[17] वाचा इंद्रिय वृत्ती । त्याला काळ इंद्र कांपती ॥२॥ क्षमा दया शांति करुणा । बोध प्रेम निफते[18] जाणा ॥३॥ निंदा अपमान क्रोध अहं । द्वैता गाळुनि जपा सोऽहं ॥४॥ भाव भक्ति विवेक स्वानंद । **शेख महंमद** हृदयीं शुद्ध ॥५॥–(गीत दुचरणी–पोत. १–३०५). —५१

साबुन सांडुन नासली कावी । विटंबोनी जनास दावी ॥१॥ स्वप्नीं काम क्रिया उठी । पाहे खरखटली लंगोटी ॥२॥ मन कल्पना आवरे ना । न करावी देह दैना ॥३॥ आशा चातक चकोर निष्टे । नका झकों नाना चेष्टे ॥४॥ **शेख महंमद** गुरु उपायी । कीटक भृंगियेच्या न्यायीं ॥५॥–(गीत दुचरणी–पोत. १–२५७). —५२

विटंबिले कांदे परसातीं । सापिक्याच्या पैक्या लाविती ॥१॥ तों तों गिन्हाइक ओढुनी धरी । मग केज्याला पदर पसरी ॥२॥ ऐसे कृत्रिम कुतर्की । दादुन चेले करून ठकी ॥३॥ मोला तुटे ना खरें नाणें । परसातें सांठवी समाधानें ॥४॥ मोडूं गेल्या खोटा सोनटका । तों जहरी भेटल्या उडवी फका ॥५॥ कोणा[19] दारीं नाटें चांदें । शुद्ध दरबारीं विके आनंदे ॥६॥ संतांचे शिष्य फांदडी । घ्या[20] म्हणोनि लावी गोडी ॥७॥ सद्गुरु शुद्ध सेवा साधु । **शेख महंमदीं** लाविला बोधु ॥८॥–(गीत दुचरणी–पोत. १–२५१). —५३

जेंचि साधन, तेंचि बंधन । ऐका वचन, गुरुमुखें ॥१॥ रवि प्रकाशे, रविला न दिसे । तैसा मी भासे, मजलागीं ॥२॥ निर्गुण प्रकाश, भासे आभास । विटला

---

१४. ०ते संत०–सेम. पोत.
१५. प्रेमें पर० । त्या वंदी०–सेम. पोत.
१६. तेविं जना०–सेम. पोत.
१७. सत्य मन०–पोत.
१८. ०हें निफते०
१९. यैसे कोणा०
२०. माझे घ्या०

वास, जाणिवेचा ॥३॥ **शेख महंमदीं,** अनंत सिद्धी । वादवेवादीं, सुख नाहीं ॥४॥ —( दिंडचरणीं गीत–रा. १–६१ ). –५४

जेथें शब्द तो न समाये । तेथें बोलोनि काये । सद्गुरु कृपा होये । तरी अनेक भासे ॥१॥ जेथें भांबावल्या वेदश्रुती । तेथें पंडित काये करिती । मती तर्क व्युत्पत्ती[21] । न पावत तेथें ॥२॥ अष्टांग योगें सम । तेथें वेडावलें षट्कर्म । निज गुजाचें वर्म । सद्गुरु जाणे ॥३॥ रिद्धि सिद्धि साधन । मंत्र शक्ति आराधन । तेणें जीवा बंधन । होये बापा ॥४॥ सेवितां सद्गुरुचीं पाउलें । तेणें असंख्यात उद्धरले । **शेख महंमद** बोलिले । आत्महित[22] ॥५॥ —( ग्रंथी ओवी–रा. १–५ ). –५५

भाडियाचें घर । घेतलें बिऱ्हाड । नाहीं याची चाड । जाईल लया ॥१॥ संसारा जाईजेणा जाईल टाकूनी । माया ममता सोडुनी । पर अवघी वांया शोक करुनी । भ्रमली ॥२॥ शोक करितां मायेचा । म्हणती होता आमुचा । त्यानें ठाव निजाचा धरियेला ॥३॥ लोक करिती कटकट । म्हणती होता बरवंट । टाकूनि निकट । गेला कैसा ॥४॥ आतां निज ठायासी । शोक वृथा करिसी । मायेसी झळंबसी । मग तुज कैसी, मुक्ति होईल ॥५॥ शरण जाई श्रीगुरुसी । मग तू जन्मा न येसी । पावला होसी । वैकुंठीं ॥६॥ वैकुंठीचा ठावो । दावी श्रीगुरुरावो । **शेख महंमद** चरणीं भावो । सखा लावी ॥७॥—( मिश्र ओवी–रा. १–२० ). –५६

ॐ नमो जी निर्गुणा । गण गंधर्व मनमोहना । येथुनी तुझिया स्तवना । आरंभ केला ॥१॥ माया ब्रह्याचें संनिधान । सांगेन ऐका चित्त देऊन । जैसें साखरेचें गोडपण । निवडितां न ये ॥२॥ ब्रह्म म्हणजे गोडी । पीठ मायेची परवडी । या दोहींस कोण निवडी । चतुरपणें ॥३॥ सप्त सिंधूची लेखा रे । निवडूं नेणती चतुरें । तैसी माया ओळखा विचारें । निवडे ना पां ॥४॥ जरी या हिरियाची प्रभावळी । निवडितां येईल वेगळी । तरी हे मायाहि समुळी । वेगळी पडे ॥५॥ रविशशीचा प्रकाश । धरितां ना गंवसे मुष्टीस । तैसें माया ब्रह्म उदास । ये जग जगीं ॥६॥ जैसी उदकें केली घागरी । तैसी निर्गुणें माया इच्छिली दुसरी । घागर भाजिलियावरी । उदकें वेगळें नव्हे ॥७॥ घागर भाजिलिया उपरी पाणी । जरी सांडो पाहे मेदिनी । तरी हे माया ओळखा ज्ञानी । ब्रह्मीहून सांडे ॥८॥ पेरिल्या उगवे जोंधळा । मोडुनी कडबा करिजे वेगळा । बाळका बीजापोटीं वेल्हाळा । कडबाचि असे ॥९॥ ऐसें माया ब्रह्याचें मिश्रितपण । कैसें चुकों पाहे आयागमन । उदंड करिती साधन । देखोवेखीं ॥१०॥ भाजिल्याउपरी जोंधळा । होय जन्ममरणावेगळा । तैसा वैराग्यें करी वेल्हाळा । सद्गुरुसंगें ॥११॥ तप्त

२१. वित्पत्ति.

२२. मूळ नकलेंत हें "गौडी रागा"चें पद म्हणून दिलें असून प्रथम चरण धृपद केला आहे.

लोखंडीं जिरे पाणी । पाणीपणें मिर्वेजुनी । परी तें सांडितां नयनीं । ना दिसे बापा ॥१२॥ ऐसा जो निर्गुणीं आटला । तो आयागमना चुकला । सद्गुरुपणें यातायाती मुकला । लक्ष चौऱ्यांशीच्या ॥१३॥ एका सद्गुरुच्या संगें । निवळीं अष्टहि अंगें । **शेख महंमदा** नाना सोंगें । पारुषलीं ॥१४॥–( ग्रंथी ओवी-रा. १७९ ). –५७

गोविंदाचे अंगणीं । पडलोंसे मेदिनी । कां बा कृपा अझुनीं । न ये देवा ॥१॥ तिडकाळू कुश्चिळ । महा दोषी अमंगळ । करितो तळमळ । भवरोगानें ॥२॥ चौऱ्यांशी लक्ष फांदी । ह्या विषयाच्या व्याधी । त्या माझिया छेदी । हरि दातेपणें ॥३॥ गर्भांतील यातना । जंत कृमी उत्पक जाणा । जठराग्नि निर्गुणा । पोळे प्राण ॥४॥ कोणा यावें काकुळती । तुजविण गा श्रीपती । जन्म मरणाची सुती । नको मज॥५॥ये परब्रह्म अविनाशा । जालों भ्रमिष्ट पिसा । पाहातोसी तमाशा । पतिताचा ॥६॥ मज योगिस्ता औषध । देईं प्रेमाचा बोध । निज नामाचा सिद्ध । काढा द्यावा ॥७॥ हे ऐकोनि करुणा । आले सद्गुरु वैद्यराणा । उद्धरिलें दीना । हेळामात्रें ॥८॥ रोगिस्त जालों कल्याण । त्रिवेणीचें नाहाण । नाहीं भवबंधन । पुनरावृती[23] ॥९॥ जाळूनियां दुखणीं । असे निर्बंधनीं । **शेख महंमद** जनीं । विजनपणें ॥१०॥—( ग्रंथी ओवी—पोत. १–३५ ). –५८

फुलसे फुलांमाजी । देखिलें अनुभवें आजी । साधु न करिती बाजी । तयाची जगीं ॥१॥ शुन्य त्याचें ऊर्ध्व खोड । अधु खांदा तोंवरी धड । लक्ष चौऱ्यांशीचा पाड । जीव जिनसां नांव ॥२॥ ते अनेक रंगावेगळे । घन सुकुमार कोंवळे । पांचा फांळीं सोडूं मेळें । विकाशे झडे ॥३॥ एका फुला अनेक जाती । कर्म धर्म विपत्ती । इतुक्यावेगळी धृती । न दिसे कवणा ॥४॥ सद्गुरुराज विवेकी । बोधें कृपा केली निकी । अनिवार प्रेमळ तुकीं । **शेख महंमद** ॥५॥ —( ग्रंथी ओवी–पोत. १–४५ ). –५९

अनंत जन्में दासी । पुत्र जाला तयेसी । तो बोधल्या हरिसी । हरि डिंगर त्याचें ॥१॥ प्रेमभाव देखती । अव्यक्त व्यक्तीं येती । स्वनामासाठीं होती । हरिदासांचे दास[24] ॥२॥ कुब्जेसी विदुर । गणिका मेळा महार । पांडव अविचारें । सरते नामें ॥३॥ वाल्मिक अजामेळ । पतीत अमंगळ । मुक्ति वैकुंठ तात्काळ । निज नामासाठीं ॥४॥ हरि पतित शेवे[25] । निवाले अनुरसें । सद्गुरुचरणीं विश्वासें । **शेख महंमद** ॥५॥––( ग्रंथी ओवी–पोत. १–२६२ ). –६०

प्रीतिविणा रुसणें मूर्खवाद । विटलें अन्न नेदी स्वाद । तैसा भावाविण भक्तिवाद । साक्षात्कारें नोव्हेचि कांहीं ॥१॥ उचलिलें रत्न परद्वीपा नेलें । मूर्खीं केज्यासाठीं मागूं ठेले । पहा शुद्ध असतां कैसें विटंविलें । जेथील विका तेथेंचि

---

२३. पुनरावृती. २४. दास्य
२५. शेले

अनुक्रम ............ नि: ............
क्रमांक ............ नों: दि: ............

बरा ॥२॥ मूर्ख मिळाले लक्ष कोटी । तेथें कोण मानी सायुज्याच्या गोष्टी । उन्मत्त करिती तोंडपिटी । जैसे कूपावरी अमृत द्रवलें ॥३॥ स्वाती सकळा ठायीं द्रवती । सागरीं शिंपल्यापोटीं होय मोती । तैसे सज्जनाचें चित्तीं । भावबोध प्रकाशे पाहे ॥४॥ भुजंगामुखीं स्वातीचें तोये । अवगुण म्हणोनि विष होये । तैसा साधु वचनास दुराचारी पाहे । विषेकरूनी अधोगति गेला ॥५॥ भुजंगन्याये ऐसें ज्याचें मन । त्यासी काय करितील साधुसज्जन । सुशब्द समता भाविक अवगुण । पापिया अति नष्ट ॥६॥ **शेख महंमद** विनवी साही दरुशना । आधीं सत् शिष्य आणावा मना । मग निरोपाव्या ब्रह्मबीज खुणा । तरी शिष्या गुरुत्व लाधे नांव साजे ॥७॥—(ग्रंथी ओवी–सेम. १–३२). —६१

ऋतुवंती जालियावरी । वनिता गर्भू धरी । तैसा सांठवावा हरि । हृदयामाजीं ॥१॥ नर भोगी वांझ नारी । जैसा जोंधळां काहणी । तैसे पंडित शब्दज्ञानी । ब्रह्म बोलोनि काळे ॥२॥ वैखरी षड्रसें । हृदयीं सद्गुरु विकासे । प्रेमें धाले सावकाशे । **शेख महंमद** ॥३॥—(ग्रंथी ओवी–पोत. १–१४). —६२

सकळ तीर्थांच्या अधिष्ठाना । सद्गुरु निधाना माझ्या तोडी बंधना ॥धृ.॥ सद्गुरु नाम गुणातीत रूपाविरहित महांकाळाचा काळ । नव्याणव कोडी राजे मुंडुनि शिष्ये करूनी तोडिलें भवजाळ ॥ **महंमद नबी** अलि मुर्तुजा शिष्य आले बोजा चवेताळिसांचा मेळ । यावेगळे अनेक पीरीं गुरू घेऊनि शिरीं राहिले प्रबळ ॥ १ ॥ शिवशंकर राजा भर्तरी नारद शुक्राचारी सद्गुरुला सेविती । पार्वती मैनावती मदाळसा गुरु उपदेशा केली भावें भगती ॥ मच्छिंद्र गोरक्ष हनुमंत दत्त अवधुत गुरुसेवक म्हणविती । ऐसे प्रसिद्ध ऐकोनि झकले अज्ञान भूतकेत पुजिती ॥२॥ राम कृष्ण दीर्घ अवतारु तेहीं केले गुरु वसिष्ठ दुर्वास । ऐसें गुरुत्व पारंपार चालिलें साचार वंदवे ना पापियास ॥ साधुसंताला छळती दगड पुजिती अंतीं येईल अपेश । भूत पुजणार उद्धरिले दावा वहिले नका करूं घसघस ॥३॥ थोडा सद्गुरु बहु गैबानें म्हणविती शाहाणे गुंतुनि आणिकां गोंविती । शास्त्र पुराण बोलुन ठकती जन ब्रह्मस्थिती नेणती ॥ यालागीं सद्गुरु सेवा शूर चुकवा येरझार नका करू अधोगती । **शेख महंमदीं** सद्गुरु सोऽहं उच्चारु चुकविली फजिती ॥४॥—(पद–पोत. १–४). —६३

ऐसे सद्गुरु क्षेत्रपाळा । भावें प्रणिपात दयाळा ॥ महाराजा दीनवत्सला । सगुणनिर्गुणा वेगळा ॥धृ॥ पंच क्रोशी पंच तत्वें । आत्मा निजलिंग स्वभावें ॥ वर त्या अनंत लिंगे नांवें । शिवशक्तीला दावी सर्वें ॥१॥ साळोंखा धरित्री जाहिर । मेरू गिरी लिंगें वर ॥ स्थावर जंगमीं चराचर । तर्पण मेघ न्हाव्या सागर ॥२॥ तेज धूप दीप पवन । घंटा अनुहातें गर्जन । नभ कवंचाळ महिमान । मंडप ताराग्रहगण ॥३॥ भानु सोम दिवटे दोन्ही । निसीं दिनीं बिंब मेदिनी ॥ त्याहुनि प्रभा निरंजनीं । **शेख महंमद** जुगुत ज्ञानी ॥४॥—(पद–पोत. १–१९५). —६४

## ६

# भक्तिबोध

## १. भक्ताभक्त :

अकल्पित सांडे, मांडे अभिमान । त्याचें नांव ज्ञान, अपरोक्ष ॥१॥ सांडिलें म्हणणें, हेचि नागवण । जैसी हगवण, पिटपिटी ॥२॥ धाऊनि बैसला, मागुती मुळमुळी । उठे तो सरळी,[1] आथुरणी ॥३॥ वेगामागे वेग, येतील उद्भट । धूता तिचा वीट, ज्याचा त्याला ॥४॥ गोंगाती माशिया, राहिलीसे शक्ति । उचला म्हणे माती, देवालागीं ॥५॥ सांडी मांडी दोन्ही, अभिमान बीज । तेणें निरय सहज, प्राणियासी ॥६॥ सांडीचा अभिमान, मांडीचा विशेष । या गुणें बहुवस, नाडानाडी ॥७॥ न करितां सुखी, दुःखित्व करितां । म्हणोनि दोही माता, सिनलगावे ॥८॥ केल्याविण करणें, भक्ति तेचि सद । **शेख महंमद,** बोलियेले ॥९॥––( गीत ओवी–रा. १–९ ). –६५

साधु बळियाचे बळी । कळिकाळ पायातळीं ॥१॥ नव्हों वाघे भुतें खेतें । मनुष्य देहीं न भुंकते ॥२॥ नव्हे महात्मे भोंवाळ । डोई बोडके थीगळ ॥३॥ न हो नाना मतें भोंदू । जन करील विनोदु ॥४॥ न हो बसव्या मुरळ्या । शुक्रीं खंडोच्या वोंविळ्या ॥५॥ न हो सटवीचे भक्त । हातीं परडी दांत खात ॥६॥ न हो मोठे डोरकरी । ज्ञान सांगुन किवें मारी ॥७॥ न हो घुमारे पुजारे । भुतांखेतांसी अवतरे ॥८॥ न हो देवी देवताळे । नष्ट दुष्ट तोंड काळें ॥९॥ नेणें चौंड कांता योनी । पुजितां जिवित्वा हो हानी ॥१०॥ न हो पंचाक्षरि गारोडी । दासी देवता तेतीस कोडी ॥११॥ नेघो रिद्धि सिद्धि पदें । सद्गुरूच्या हो आनंदें ॥१२॥ आत्मा नाहीं जिणें मरणें । अनिवार वस्तुपणें ॥१३॥ उत्पत्ति प्रळय आम्हांवर । स्वयें अनंत योगें धीर ॥१४॥ **शेख महंमद** शूरत्वें । आत्मज्ञानी नीत नवे ॥१५॥–– ( गीत दुचरणी–सेम. १–३७; पोत. १–१८३ ). –६६

घडीक वंदी घडीक निंदी । चांडाळ दंदी, बोलिजे तया ॥१॥ घडीक वाचा घडीक बोचा । स्वभाव त्याचा, मन्हडळन्यायें ॥२॥ सरडा गुहिरे घातकी पुरे ।

---

१. सरला.

तैसें नव्हे बरें, कपटिमुख ॥३॥ कुसुंब रंग होय असंग । तैसे असंग, सन्निधानीं ॥४॥ अभक्त नयनीं न पडावे झणीं । **शेख महंमदें**, दुपियले ॥५॥—(गीत दीडचरणी–रा. १–२२). –६७

जे आपुले स्वहित न करिती । ते परावे काय जाणती । जैसे मातेला नेणती । पोसणीं पोरटीं ॥१॥ आप जाणती ते पर । पर जाणती ते परमार्थी । ते त्रैलोक्याचे सारथी । अविनाश साधु ॥२॥ निर्गुण साधु सेविती । भावें **शेख महंमदीं** । मग विश्व प्रबोधी । विवेक वदले ॥३॥—(ग्रंथी ओवी–सेम. १–४२; पोत. १–१६९) –६८

ठायींचीच भ्रष्ट दिवाणी । वर सेवित अमल पाणी । तों बहुच जाली गैबानी । विषय कळपीं ॥१॥ त्या विषयांच्या संकल्पें । करितसे मती द्रव्य पापें । चित्तीं न बैसेच पैं सोपें । परब्रह्म नाम ॥२॥ नळ्याळ खस्याळाचे पंगतीं । तेथें संतालाहि तोपिती । पर नेणत आपली स्थिती । आम्ही कवण ऐसी ॥३॥ म्हणोनि संत समारंभ । निज भक्ति जोडे मेघःशाम । वल्कलें विवेकबोध वर्म । **शेख महंमद** ॥४॥—(ग्रंथी ओवी–पोत. १–२४३). –६९

चौदा भुवनें निर्गुणाची करणी । आणि इच्छिले पवन पाणी । आनंद करिती खाणी वाणी । रवि शशी केले उजेडालागीं ॥१॥ मज मातापित्यासी न होता ठाव । संसार रचिला उपाव । तो सकळ देवतांचा देव । फुकाचा न ये जनाचे वाचे ॥२॥ ज्यानें केला मनुष्याचा आकार । आणीक नाना परिचे उपचार । त्यास कां विसरले गव्हार । ढवाळी करितील, उन्मत्तपणें ॥३॥ जेव्हां हा जन्मा आला प्राणी । तेव्हां कांहीं सवें न होती गोणी । पान्हां फोडिला मातेच्या स्तनीं । तुज दुध आहारालागीं ॥४॥ ऐसा हरि करुन अकर्ता थोर । त्याचा जन मानीच ना आभार । बगाडी लागे देवतेसमोर । म्हणे मज काकाई प्रसन्न झाली ॥५॥ देवता नवस मागती गाडा । पायीं बेडी हातीं खोडा । आणीक नवस ऐका वेडा । शेणीं अमंगळाच्या वळती ॥६॥ देवता भक्तांचा सांभाळ करी । लेंकुरें ब्राळें घाली अनाचारी । घरोघर मागवी पहा वारी । देखतां रे देखत बुडविलें ॥७॥ देवतांचे पराक्रम कितीं । सांडनीं भूतें तोंडीं मागती । आडकियाच्या शेंदरें तृप्ती । म्हणवुनी श्वानें मुखावर मुतती ॥८॥ श्रीहरिं न ये जयाच्या चित्ता । त्यास गांजिती देवता । मनुष्यास केलें वाघा मुता । मुंकी श्वानाची भुंकवी ॥९॥ ऐसी हे ऐकतां बोली । निगुर म्हणती निंदा केली । सत्य हे सिद्धांत खुण सांगितली । गुरुविण देवते जाणा भुतें ॥१०॥ जे सद्गुरुनामाचे उपवासी । सकळहि देवता त्याच्या दासी । काळ देखोनि कांपें त्यासी । ते प्रेम भक्त म्हणवुनी ॥११॥ चारी वेद साही शास्त्रांसाहिक । **शेख महंमद** बोले वहिक । भावें स्मरा जगदीश नायक । सद्भावें लाधाल निज पद ॥१२॥—( ग्रंथी ओवी–पोत. १–२९ ). –७०

आम्ही भक्तराज देवा । भावें करूं तुझी सेवा ॥१॥ कां न होयेसी प्रसन्न । नष्ट धरिलें जोदपण ॥२॥ नेघो तुझी वैकुंठ मुक्ती । रिद्धि सिद्धि न लगती ॥३॥ नेधों पदें न करी तप । क्षमा दया दे उमाप ॥४॥ तत्त्व शांति निज वृत्ति । प्रेमत्रोधें द्यावी भक्ति ॥५॥ जन्म द्यावा पुढतांपुढती । उद्धरूनी[2] करूं कीर्ति ॥६॥ **शेख महंमद** विवेक ज्ञान । हरि म्हणे मी सर्व आशेन ॥७॥--(गीत दुचरणी –पोत. १–३९). –७१

भलतिये यातीचा असो पैं भक्त । वेऊं नये तयाचा अंत । तो सांडूनियां द्वैत । तद्रूप जाहाला ॥१॥ पहा वेश्या होती नारी । जाली समर्थाची अंगिकारी । मग तिची उष्टी पुरी । बोलूंच नये ॥२॥ ग्रामांतील आज वोहळा । जाऊनि मिळाल्या सागरा । तेथें त्याचिया अमंगळा । निवडूं नये ॥३॥ आलंगिल्याची भाली । परिसा लागतां कनक झाली । लोखंड मोलें मागूं ठेली । परी ते देतां नये ॥४॥ हिरव्या चर्माचा बुधला । अन्यत्र यातीच्या घृतें भरला । तो वासुदेवमुखीं समर्पिला । उत्तम म्हणवोनियां ॥५॥ विष्ठा भक्षी धेनु । क्षीर सेवी ब्राह्मणु । निज लिंगासी तर्पणु । होत असे ॥६॥ नाना यातीच्या रसा । मक्षिकें मध केला परिसा । तो नैवेद्यासी कसा । समर्पिला असे ॥७॥ विष्ठा भक्षून भरे कावळा । तेथें जन्म जाला पिंपळा । पवित्र म्हणोनियां वेळोवेळां । नमस्कारिती ॥८॥ तैसे **शेख महंमद** याति मळवंस । परब्रह्मीं जाहाले समरस । विटाळ म्हणावया त्यास । ठावचि नाहीं ॥९॥—(ग्रंथी ओवी–सेम. १–६). –७२

## २. योगी :

हृदयवासी आम्ही । विज्ञान राजयोगी । जाणती सद सौभागी । साधुसंतराज ॥१॥ धरूं नेणें वेश । भस्म नेणें केस । विटंब शरीरास । न करूं अज्ञानें ॥२॥ मुळींच देह नाहीं । तेथें भूषण मिथ्या वाई । अखंड सम ठायीं । स्वयं जैसे तैसे ॥३॥ अनंत लोचनीं ज्ञानें । नाहीं जन्म मरणें । विवेकीं स्वधर्मानें । परब्रह्मीचे ॥४॥ अष्टांग नखाग्रीं । रिद्धि सिद्धि सिद्ध वर्णी । नाम तत्त्व भरलें मनीं । **शेख महंमद** सिद्धें ॥५॥—(ग्रंथी ओवी–पोत. १–२४४) –७३

परमार्थ विवेक वैरागी भोगुनि अभोगी **शेख महंमद** योगी ॥धृ.॥ सती करून निघे अळंकारु मिरवे बाजारु चित्त पति प्रीति ध्यानीं । हांसे बोले मुखीं विडा चावी जना देख दावी हेतु गुंतला दहनीं ॥ उडि घालितां भोगावरी म्हणोनि

---

२. जन उद्धरुनी ०

देह धरी वेश्या होय परतोनी । वैराग्यें दहनीं घालुनि कल्पनेला जन्म चुकविला साधु निज अनुसंधानीं ॥१॥ दुडी घेऊन शिरावरी मोकळे करीं चाले ठकारे गुजरी । हांसे बोले पाहे चहूंकडे सभाग्ये नटे मोडे लक्ष दुडीवरी ॥ बाजारीं बैसले सुवर्णी द्रव्य पसरोनी गुळ गल्बला थोरी । आपलें न देती कोणाप्रती उणें न घेती खरें खोटें विचारी ॥२॥ जैसे लोभी धनी हिंडे बाहेर जनीं त्याचें चित्त तये ठायीं । करितां काम धंदा सुंदरी मोहो बाळावरी पान्हा ये लवलाही ॥ पति पल लावी भ्रतारीं रमे परद्वारी विभिचारिणी बाई । पतीचा घरचार करी नेटका धरुनि समोका सिंदळा म्हणे दादा भाई ॥३॥ ऐसी संपादुनी प्रवृती राहे निवृत्ति धन्य तो राजयोगी । पतितां मूढांचा तो तारक समें पहा एक आत्मज्ञान अनुरागी ॥ अनेक दृष्टांत श्रोतेंनो आईका सांगतो टीका विनवुनी तुम्हांलागीं । शूर प्रश्निक ऐकती भावें आनंदती छळिती पतित अभागी ॥४॥ जैसी कुर्मींग असे जळाभितरीं अंडी बाहेरी कृपेनें अवलोकी । कवडा बग तिसरा पारधी मच्छकांमधी नित्य आहार घोकी ॥ तत्त्व तें लावावें ईश्वरीं असोन व्यापारी सांगितल्या सायेकीं । तदन्यायें **शेख महंमदीं** प्रेमाचा बोधी सोऽहं स्वर एकाएकीं ॥५॥—(पद–पोत. १–५). –७४

आम्ही परात्पर योगी । कोणी वोळखे मजलागीं । म्हणवुनी उदास फिरों जगीं । गुरू अलक्ष जागा ॥ धृ ॥ पांघरलों साठ तीनशां थिनळांची गोधडी । वर दोरे भरले नव नाडी । करी घेऊनीं फाउडी । गुरु अलक्ष जागों ॥२॥ सन्मुख घातला वैराग्याचा गोंवर । अंतरांहून चेतविला भाव भक्तिचा अंकुर । जाळिले राग दंभ प्रपंच अहंकार । गुरु अलक्ष जागो ॥३॥ जोगवठा वळून केलें हें मन । कुपीं न कासवठा तो पवन । काखे भस्म राख आत्मज्ञान । गुरु अलक्ष जागो ॥४॥ अंतरीं लंबिका अष्ट दळ कमळाची झोळी । भीतरीं भरली निज ज्ञान नवाळी । दुर्भिक्ष नाहीं कदा काळीं । गुरु अलक्ष जागो ॥५॥ बहात्तर कोठड्यांचा बटवा पोटीं । करीं घेऊनि सावधपणाची काठी । विपय श्वानें पळालीं उठाउठीं । गुरु अलक्ष जागो ॥६॥ हा योग केला पांचाचे संगती । वा (पांच) भुतांचे निगुती । बैसले पन्नास चेले पंगती । गुरु अलक्ष जागो ॥७॥ औट हात किंगरी अवधारा । क्षमा दया वरी जोडिल्या दोन्ही तारा । आशा मनिशा पिळुनियां अवधारा । गुरु अलक्ष जागो ॥८॥ बारा कळा सोळा स्वारी । चतुरपणें बोलिली वैखरी । त्रिगुण तीन तुंबड्या अवधारी । गुरु अलक्ष जागो ॥९॥ पात्र अर्धमात्रा मातृका गहन । भीतरीं सत्रावी ते भोजनाची खुण । मोह वासना प्रसिद्ध जटा जाण । गुरु अलक्ष जागो ॥१०॥ शुभाशुभ मुद्रिका श्रवणीं । रवि शशी शंख गर्जती दोन्ही । इडा पिंगळा चक्रध्वनि । गुरु अलक्ष जागो ॥११॥ साही दर्शनें बंधु आमुचे जाण । शहाण्णव कुळीचे सोयरे सगुण । **शेख महंमदीं** भिक्षा केली संपूर्ण । गुरु अलक्ष जागो ॥१२॥ –७५

सहा सात एकविस हजार फेरीली रत्न जपमाळ । सत्त्व वैराग्यासगट सकळ निश्चळ । सांडी रिद्धिसिद्धीचे पाल्हाळ । गुरु अलक्ष जागो ॥१३॥ सोळा सहित कल्पना रंगून कडासन केलें । बोढिया नागबंध देऊनि दृढासन साधिलें । पद्मासन देऊनि येत्रो अंतरीं भासलें । गुरु अलक्ष जागो ॥१४॥ मठमन्य परमहंस । तत्त्वबीज भासल्या भासाची भास । निद्रेसहित गिळिले रात्रंदिवस । गुरु अलक्ष जागो ॥१५॥ भिक्षा केली चौऱ्यांशी खंडे । रितीं वागविती निज नामाविण सोंडें । मनुष्य जन्मास येऊनि घेतले धेंडें । गुरु अलक्ष जागो ॥१६॥ भिक्षा करावया सद्गुरुनें दाखविली मीनाची वाट । पूर्व पंथें ऊर्ध्व चढलों नीट । सहज स्वरूप भिक्षा लाधलों साद्दष्ट । गुरु अलक्ष जागो ॥१७॥ मग प्रसन्न जाले श्रीहरि आम्हालागीं । ते न घालिती मनुष्यजन्माच्या मार्गीं । अवघीं पातकें गेली भंगी । गुरु अलक्ष जागो ॥१८॥ **शेख महंमद** अनुरागी । आकारीं निराकार योगी । अनुहातें प्रेमें वाजविली शिंगी । गुरु अलक्ष जागो ॥१९॥—( पद–पोत. १–२२३ ). –७६

## ३. साधुअसाधु

परासी उपदेश, करित नेटका । आपण फुटका, परळ जैसा ॥१॥ आंघोळी रांगोळी, सडा संमार्जन । दाविती घालून, जनालागीं ॥२॥ शब्दज्ञानें मेरु, करित टंगणा । असोनि निजांगना, दासी भोगी ॥३॥ गुरुकृपेविण, अवधीच चावटी । बोलियेली नीति, **शेख महंमद**[3] ॥४॥ ( गीत ओवी–समर्थ वाग्देवता मंदिर, बाडांग ५५०, क्र. १७२ ). –७७

साधूची लक्षणें, नसतां जयापासी । साधु म्हणतां त्यासी, ब्रह्महत्या[4] ॥१॥ लोखंडाची मोहर, सोनियाचा[5] धूर । ठके सौदागर, पारखीविण ॥२॥ तैसे ते ठकती, अज्ञान भ्रांति । शाब्दिकां म्हणती, साधूसंत ॥३॥ दामोक्या[6] तांदुळ, म्हणतां पापे तुंबळ । पुजूनि[7] चांडाळ, साधु न म्हणावे ॥४॥ अनंत लोचनीं साधू, विश्वलोकीं प्रबोधू । तया **शेख महंमदु**, अनन्य शरण ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–२७२ ). –७८

शूर म्हणविती, पाठीवरी घाय । त्याचा लौकिक काय, वाढेल जगीं ॥१॥ भजन भजितां, दांड परोपरी । कांपतील टिरी, रण देखोनी ॥२॥ हत्यारें वागवुनी, चुलीकडे लपती । माराया जपती, रांडा दासी[8] ॥३॥ साधू जाल्याविण, साधू

३. शेख महंमद म्हणे ॥
४. कोटी ब्रह्म०
५. वरी सोनियाचा०
६. दामोक्याला तांदुळ०
७. तैसे पुजुनि०
८. त्या मारा०, ०भींडा दासी ।

म्हणविती । होय त्यांची फजिती, साधुसंतीं ॥४॥ साधूच्या उपाधी, अष्टांग तोरा विधी । परमार्थ[9] बुद्धि, **शेख महंमदा** ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–१७४).

–७९

दुरूनि डोंगर, दिसती शोभिवंत । जवळ गेल्या आंत, कांटवण ॥१॥ तैसे दंभधारी, अविद्ये ब्रावरे । त्यांचे शिष्य गुहिरे, कपटी चेटकी ॥२॥ पुजूनियां साधु, घ्यावा निजानंदु । विवेकीं प्रबोधू, **शेख महंमद** ॥३॥—(गीत ओवी–पोत. १–२६९). –८०

श्वानाच्या ढुंगाला, प्रीति श्वान चाटी । तेथें चोंची गोमटी, न लवी हंस[10] ॥१॥ तैसें भ्रष्टा आदरें, दुष्ट पुजी प्रकारें । भुंकतील धिःकारें, पवित्र भले ॥२॥ पवित्र साधु पुजें, ईश्वर भक्ति रीझे । आनंदती दुजे, भाविक भोळे ॥३॥ नव्हटियालागीं बुचे, मनवती काचे । ते येरूनयेरांचे, आत्मसखे ॥४॥ आत्मसखे हरि, तत्त्व[11] बोध उपकारी । विवेकिली वैखरी, **शेख महंमदाची** ॥५॥–(गीतओवी–पोत. १–२७४) –८१

ज्ञानीं होती बहु, विज्ञात्यांचा दुकाळ । साधुसंत निर्मळ, याहुन थोडे ॥१॥ एकाएके खंडी, असेचि एखादा । जाणों[12] खांब सुधा, नभ मंडपाचा ॥२॥ अठरा भार तरू, त्यांत जैसा साव । समुद्रीं उपाव, जहाज जाला ॥३॥ येरें झाडें पानांचीं, पानानें नासती । सरी ते न पवती, सावरायाची ॥४॥ बारा कळी सूर्य, जैसा फोडितो अंधार । तैसा ज्ञानप्रकार, साधुरायाचा ॥५॥ नव लक्ष तारा, त्यांत जैसा धुरु । दुसरा तो मेरु, साधुधीर[13] ॥६॥ दिधले दुष्टांत, न येत साधु तुका । कल्पांति तो ऐका, दृष्टांत नासती ॥७॥ नासेत ना साधु, सायुज्यतेचे वासी । कल्पांती तयासी, प्रळयो नाहीं ॥८॥ महा वाक्यें बोलती, साधु दाते थोरु । न कळे त्या पारु, परब्रह्मीं ॥९॥ ऐसें जाणूनिया, **शेख महंमदीं** सेविले । शीघ्र त्यांनीं केले, आपणासारखे ॥१०॥—(गीत ओवी–पोत. १–२२५). –८२

भक्त कवेश्वर, जन्मतील सृष्टीं । तुटारी बहु मोठी, आत्मज्ञात्यांची ॥१॥ रिद्धि सिद्धि साध्य, कर्मनिष्ठ सद । होती मंत्री बोध[14] । नातुडे ज्ञानी ॥२॥ पंडित मूढ साही, मार्ग साळविती । परि ज्ञानी नव्हेती, सांगेन तैसें ॥३॥ वंशी[15] ब्रह्मज्ञानी, पवित्र तो वंश । पतित पामरास, उद्धरितसे ॥४॥ छपन कोडीमध्यें, ब्रह्मज्ञानी कृष्ण । दास गोवळे जन, पुनित केले ॥५॥ व्यास वाल्मिक लोला, हनुमान ज्ञानी । गोरक्ष भुवनीं, मूळमाया ॥६॥ ज्ञानदेव शंकर, येका नामा कबीर । रोहिदास खेचर, मुक्ताबाई ॥७॥ सांगता सद् ज्ञानी, वाढेल पसर । अळुमाळु चतुर, मांडले दृष्टांता

९. जाली परमार्थ०
१०. हंसराज ।
११. तत्त्वबोध०
१२. तो आणा०
१३. तोचि साधुधीर
१४. प्रबोध.

॥८॥ खोडा पाणी घालितां, पावे त्या विस्तारा । तैसे ते अवधारा, दृष्टांतीं संत ॥९॥ **शेख महंमद,** साधूचे लडिवाळ । म्हणोनि सांभाळ, करित भावें ॥१०॥ —(गीत ओवी-पोत. १–२२४). –८३

तैसा एक कुळीं, पायें करी चांडाळ । पुर्वजां अमंगळ, पतनीं घाली ॥१॥ एक धोंडा पडे, पर्वतावरून । अनेक घातून, पाषाण पाडी ॥२॥ एका झाडा कांचणी, प्रज्वळत वन्ही । डोंगर जळोनि, पिडिती जीव ॥३॥ एका पुंडासाठीं, गायेकारी पिडिती । बंध धरिजेती, पवित्राचे ॥४॥ यालागीं संसारीं, साधुसंता थोरी[१६] । पतितां उद्धारी, **शेख महंमद,** ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–२०९) –८४

अंतरीं तत्त्वकळा, वाचे निज नाम । ते संत उत्तम, धर्मराज ॥१॥ जळती पापरासी, ऐशांच्या दर्शनें । पतितां उद्धरणें, नामें त्यांच्या ॥२॥ भवनदीचे तारू, ऐसे साधुसंत । **शेख महंमद** नीत, वंदी त्यासी ॥३॥—(गीत ओवी–पोत.१–१९४) –८५

साधुला पहातां, परावृत्त दृष्टी । भवकर्माच्या कोटी, दडती पापें ॥१॥ साधु मागें पुढें, अंतर्बाह्य चहुंकडे । श्रीहरी क्रीडे, नामासाठीं ॥२॥ पक्षिणीमागें पिलें, मत्स्य मीनामागें । तैसें साधुसंगे, अव्यक्ताव्यक्त ॥३॥ साधु आणि गोविंद, नाहीं भिन्न भेद । चंदन आणि सुगंध, सन्निध जैसा ॥४॥ दुर्गंधीमध्यें घृत, वेगळें मिश्रित । तैसे व्यक्तीं अव्यक्त, **शेख महंमद** ॥५॥—( गीत ओवी–पोत.१–२६६ ) –८६

आवडीनें वोढी । विटोनियां सांडी । तंबाखुची गोडी । तैसें नव्हें नाम ॥१॥ मुंगळ्या गंवसे आहार । वोढिल्या तुटे शरीर । तैसा धरा निर्धार । साधुचरणीं ॥२॥ ऐसा धरितां निश्वास । साधु होईजे अनियास । वक्ते ज्ञान वोरस । **शेख महंमद** ॥३॥ ( ग्रंथी ओवी–पोत. १–२६८ ). –८७

तूं संन्यासी मी संन्यासी । विरळे हरिचे[१७] उपवासी ॥१॥ नाहीं न्यास देहीं आस । हृदयीं नाहीं हृषिकेश ॥२॥ हृदयीं शुद्ध प्रेम बोध । अहर्निसीं **शेख महंमद** ॥३॥—( गीत दुचरणी–पोत. १–३०७ ). –८८

१५. जे वंशीं

१६. साधुसंतांची थोरी.

१७. ते विरळे जे हरिचे०

## ४. भावभक्ति :

वरदळें आंघोळी । अंतर्यामीं रांगोळी । वासना सोंवळी । करी आपा ॥१॥ आचारें सोंवळें । विचारे वोंवळें । विधीच्या विन्हळें । झकले देखा ॥२॥ हृदयीं शौच्य सडा । मनीं भाव गाढा । तोंवरी निवाडा । नाहीं रया ॥३॥ बोध[१८] वृंदावनीं । भक्ति तुळस लावुनि । सत्रावी त्रिवेणी । तर्पणाला[१९] ॥४॥ ज्ञान पुण्य याती । वैराग्य धूपे मती । पांच प्राण ज्योती । उजळिल्या ॥५॥ अनुहातें गर्जे[२०] । लिंग[२१] पुजिलें वोजे । प्रेम प्रेमें लाजे । निशिदिन नाहीं ॥६॥ **शेख महंमद** एकला । पुजावें[२२] कोणाला । स्वयंभु मति त्याला । लागोनि गेली ॥७॥—(गीत ओवी–पोत. १–३४). ८९–

आमुचे नाचणीं, कोणी नाचूं नका । ज्याला असे धोका, लौकिकाचा ॥१॥ लौकिकाची लाज, कांचणी मनाची । भक्ति जाणा त्याची, जैसी सिंदळी ॥२॥ सिंदळी पर पुरुषीं, चित्त मन रंगे । पतीसीं वरपंगे, चांडोल लावी ॥३॥ लावी चांडोल ऐसी, प्रवृत्ति संपादा । वेगें आनंदकंदा, राता भावें ॥४॥ भावें ऐस, सूर, **शेख महंमद** । भक्तीच्या विद्रद, अव्यक्त दावी ॥५॥—(दाम यमका गीत ओवी–पोत. १–४८). –९०

ॐकार विस्तारला, वर्णत्रया भक्ति । परमार्थें विकती, अनुमतें ॥१॥ मातेहुनि अधिक, भक्ति माझी सखी । तिचियानें सुखी, सर्व काळ ॥२॥ काळ वेळ नाहीं, सद्गुरु भेटले । चौऱ्यांसी[२३] खुंटले, माझे मार्ग ॥३॥ माझेंचि म्हणतां, साधुसंतां तेंचि । वैकुंठ मुक्तीची, पाउटणी ॥४॥ पावटणी काशानें, ऐसें कोणी म्हणा । न कळे महिमा,[२४] वैकुंठराया ॥५॥ चालतां भक्तिमेळें, सहज पायातळीं । नेणत[२५] आंधळी, भक्ति सुख ॥६॥ सुख संगत सांडुनि, ध्याती रिद्धि सिद्धि । त्रेचाळीस बीदी, लक्ष चौऱ्यांशी ॥७॥ शीघ्र हें ऐकतां, सळतील सिद्ध । सांगती अगाध, **शेख महंमद** ॥८॥—(दाम यमक, गीत ओवी–पोत. १–२५४) –९१

भाव भक्ति निष्ठा कवी । तत्व विवेक अनुभवी ॥१॥ प्रेमबोधें वैराग्य ज्ञानी । निःशब्दीं अनंत लोचनीं ॥२॥ जहाज सिंधुमध्यें साव । भवनदीस[२६]

---

१८. बोधाच्या०
१९. तर्पणालागीं ।
२०. अनुहातें घंटा गर्जे ।
२१. निज लिंग०
२२. तेथें पुजावें०
२३. चौऱ्यांसीचे०
२४. ०भक्तीचा महिमा०
२५. दे नेणत०
२६. तैसी भव०

संत उपाव ॥३॥ शब्द कवित्व कीर्ति त्यांची। जैसी तुंबी मायेपेटयाची ॥४॥ **शेख महंमद** ताती तैसी। सुत प्रसवली पुण्यराशी ॥५॥—(गीत दुचरणी -पोत. १–२४२). –९२

भाव भक्ति बोध शांति। तत्त्वें पापाण लिंगें दिसती ॥१॥ क्षमा दयाविण गळां लिंग। उण्या[२७] पारड्या पासांग ॥२॥ प्रकृतीचीं अष्टहि अंगें। **शेख महंमद** सोऽहं वेगें[२८] ॥३॥—(गीत दुचरणी–पोत. १–२३३). –९३

ऐसी भक्तीची लालुच। होतो नीचापरीस नीच ॥१॥ सांडुनि थोरीवेच्या लाजा। जो होऊनि घेतो पुजा ॥२॥ काष्ट पापाण प्रतिमा। पुजवितो करुनि जमा ॥३॥ म्हणउनी तत्त्वा वेगळा। रामकृष्णेसी वेगळा ॥४॥ जें जितुकें दिसे डोळां। तितकियांत स्वरूपलीळा ॥५॥ निज स्वरूप जन्मा न ये। तैसेचि **सैयदा** होये ॥६॥ —(गीत दुचरणी–रा. १–१८). –९४

ऐसा संतांचा मारग।[२९] भावीक करिती लाग ॥१॥ मुंगी मुंगियेच्या मागा।[३०] मुंगिच पैं पावला गा ॥२॥ मीन नीट धारे चढे। मार्गे मार्ग ना सांपडे ॥३॥ पक्षी अंत्राळीं उडाला।[३१] मार्ग नाहीं उमटला ॥४॥ कुडिंत आत्मा आला गेला। **शेख महंमद** कळला ॥५॥ —(गीत दुचरणी–पोत. १–४९; संद. ६५९). –९५

ऐक नष्ट तूं भगवंत। कळों नेदी कोणा अंत ॥१॥ भुवनें पुरोनि उरला। दिसों नेदी आपणाला ॥२॥ जळ थळ काष्ट पापाण। भक्ति म्हणतो आपण ॥३॥ **शेख महंमद** तत्त्वज्ञानी। हरि केला भक्त ऋणी ॥४॥—(गीत दुचरणी–रा. १-१७). –९६

## ५. नाममहिमा :

विठला दातारा, कृपेच्या सागरा। तारीं सर्वेश्वरा, अनाथासी ॥१॥ तुझें नाम घेतां, तरले असंख्यात। तुझिया नामाचें, आर्त मज ॥२॥ तारिली गणिका आणीक आइका। अजामेळासारखा, पावन केला ॥३॥ नामा तुझा प्यारा, नामें तरला गजेंद्र। शिळेस लावितां कर, उद्धरली ॥४॥ रिद्धि सिद्धि मुक्ति, नामा ओळंगती। न कळे तुझी गती, ब्रह्मादिकां ॥५॥ तुझें नाम केशवा, हृदयी विसांवा, तेणें या जडजिवा, संतोष वाटे ॥६॥ नामाची आवडी। **शेख महंमदा** गोडी। अखंड नामप्रौढी, हृदयीं धरिली[३२] ॥७॥—( गीत ओवी–रा. १–२१ ) –९७

---

२७. जैसें उण्या०

२८. हे प्र० अष्टधा अंगें। ०लिंग सोहं०

२९. मागुन भाविक०–पोत.

३०. मागुन मुंगिच०–पोत.

३१. मार्गे मार्ग० न आटला ॥–पोत.

३२. ऐसी तुझ्या नामाची गोडी। मज अखंड आवडी। **सैयद महंमदा** लागली तत्त्वज्ञान गोडी। अखंड नामप्रौढी। हृदयीं धरिली ॥७॥

गोविंदाचें नाम । जिवाचा विश्राम । तुटलासे श्रम । उच्चारितां ॥१॥ लक्ष चौऱ्यांशी भ्रमणा । दुःखाच्या यातना । चुकविल्या जाणा । नामासाठीं ॥२॥ नामाचे औषधीं । हरल्या सर्वव्याधी । आणिक उपाधी । गळालिया ॥३॥ पतितांचा मेळा । नामें तरल्या शिळा । मार्ग हा मोकळा । वैकुंठींचा ॥४॥ रिद्धि सिद्धि मुक्ति । नामासी ओळंगती । त्या न येती चित्तीं । **शेख महंमदा** ॥५॥—(गीत ओवी-पोत. १–८१). –९८

डोळे गेले परी, न जाय वासना । किती सांगो निर्गुणा, अंतर्चळालागीं ॥१॥ असतां डोळे दृढ, नाहीं धरिली क्षिती । लिहियलें भिंती, चित्र जैसें ॥२॥ कान गेले म्हणूनि, चरफडत मनीं । नाम सुमरणीं । बोध नाहीं ॥३॥ मुके जालें म्हणोन, सभोवतें पाहे । निश्चय तो न ये, रहणीचा ॥४॥ **शेख महंमद** म्हणे, ऐसे अभागी जनीं । त्यासी नामस्मरणीं, बोध नाहीं ॥५॥—(गीत ओवी–रा. १–२७). –९९

नाम जिवाचें जीवन । भावें करितों जतन ॥१॥ वाचा निःशब्दीं आवडी । प्रेमबोधें ध्यातो घडिघडी ॥२॥ आसनीं भोजनीं अनिवार[33] । अहर्निसीं न पडे विसर ॥३॥ अनंत गोड्या नेणें रसना । ॐकार पिकला कीर्तना ॥४॥ **शेख महंमद** उद्भट पिकले । भोळ्या हरिदासीं विकले ॥५॥—(गीत दुचरणी–पोत. १–१७७). –१००

मागें शुन्य पुढें शुन्य । तेथें कैचें पाप पुण्य ॥१॥ काळ कंठूं आनंदाचा । मुखीं घोष हरिनामाचा ॥२॥ जनीं वनीं अवघा देव । त्याविण नाहीं दुजा भाव ॥३॥ **शेख महंमद** सोऽहं बोधे । हरला भेद जाले सिद्ध ॥४॥ —(गीत दुचरणी पोत. १–३३६). –१०१

मले तारी बा गोविंदा । तूले धातूसे गा सदा ॥१॥ प्रेमें उच्छीष्ठाची आस । ...घास ॥२॥ निज ख्याति मज हडवळा । क्षमा दया देई सबळा ॥३॥ सहस्र नामाच्या नायका । **शेख महंमद** करी टीका ॥४॥—(गीत दुचरणी–रा. १–३३). –१०२

राम जपा मंत्र सोपा । महा पापा, हो धुनी ॥१॥ शिवा कंठीं राम गांठी । शांति उठी, हळहळाची ॥२॥ विश्वासें तत्त्व उच्चारी । नाहीं भवपुरी, **शेख महंमदा** ॥३॥—(गीत दीडचरणी–पोत. १–१६६). –१०३

...राहावे दुरी ॥...कल्पना...हे सैव करावी बरी ।...अहंकार । मज नको बा श्रीहरी ॥३॥ भाव भक्ति प्रेमबोधा । ज्याच्या...त्यामधीं...तोचि ते तीर्थव्रत । रूप चितीं वदावा आधीं ॥ **शेख महंमद** सावधान । सादावितो बिदोबिदी ॥ नित्य नाम दाब मागे । सहज लहरी यामधीं ॥४॥ (पद–रा. १–१). –१०४

---

३३. ०शयनीं अनिवार ।

## ६. पंचतत्त्वें :

पृथ्वी आप टीका, विवेकें चर्चिली । पुन्हां ऐका खोली, तेजवायुनभाची ॥१॥ तेज तत्त्व खरें, सर्वां ठायीं प्रभा । अनिवार शोभा, सदोदित ॥२॥ तेज घट मठिका, दश दिशा पूर्ण । कोंदलें चिद्घन, तत्त्व तेजें ॥३॥ स्वयंभु घनवट, शुभाशुभीं प्रभा । जैसा बिंबे गाभा, सुवर्णाचा ॥४॥ तीर्थ पुण्यक्षेत्रीं, कनिष्ठांचीं घरें । तेथें तीं जब्रें, अजड सूक्ष्म ॥५॥ तेजा तेज चाली, तेजा तेज न्याहाळीं । तेजापुढें काळी, वितळे पळे ॥६॥ तेज तें तिखट, खाणी वाणी तपे । चराचर वोपे, तेजाकारें ॥७॥ अंधार शिरजोर, वाघा त्याच्या मागें । तेज लागे वेगें, अंधारामागें ॥८॥ सृष्टि दृष्टि व्याप, तेज तें समीप। अभिन्न उमाप, भिन्न भासे ॥९॥ भासला आभास, **शेख महंमदा** । तेजाची प्रमदा, विवंचिली ॥१०॥—(गीत ओवी–पोत. १–२२६) –१०६

तेजरूप सम, विषम होतें जातें । घांट भंगी नादातें, विषम जैसें ॥१॥ तेजाच्या प्रकाशें, सकळिक दिसे । नाहीं तरी भासे, शुन्याकार ॥२॥ श्वेदज उद्भीज, अंडज जारज । सहज निज गुज, तेजापोटीं ॥३॥ तेज विके तेजें, जैसें मनुष्य लाजे । लाज गेल्या दुजें, म्हणती भूत ॥४॥ वसुंधरा छपन्न, कोडी चौदा भुवनें । तेज वेवष्टनें, किरणीं जैसीं ॥५॥ तेजाची शुद्धता, तेज न ये हातां । तैसें शब्द-मता, ब्रह्म न कळे ॥६॥ पाहातां पाहाणें, तेजाचें देखणें । ज्याचें तोचि जाणें, जाणिवेविण ॥७॥ सोंवळें वोवळें, नाहीं तेजाठायीं । दुषितील वाई, कर्मनिष्ठ ॥८॥ आधीं मुका बहिरा, श्रमलासे भ्रमें । तेविं कर्मिष्ठ कर्में, भ्रांत कूपीं ॥९॥ जाली तेज चर्चा, अवधारा वायूची । **शेख महंमदा**ची, विनंति श्रोत्यां ॥१०॥—(गीत ओवी –पोत. १–२२७). –१०७

वायुरूप हरि, वंदक निंदक । कथीन विवेक, सद्गुरुकृपें ॥१॥ वायु तत्त्व वाजे, तंत घन सुस्वरें । वितंत स्वधीरें, नभातीत ॥२॥ झळके मळियानीळ, पळे मेघावळी । जळहि निवळी, जैं हुल झळके ॥३॥ उकार मायम राग, सप्त स्वर उपराग । भार्या मूर्ध्यांग, वायु विकती ॥४॥ एकविस हजार, सातशें अजपा । अर्ध्व ऊर्ध्व उमपा, खाणी वाणी ॥५॥ कवित्वाची स्फूर्ती, सहस्र नाम जपती । पियुषा दिमती, काळवंचनीं ॥६॥ वाचा शिश्न स्फुरण, उचकी ढेंकुर । गुरुद्वारें उच्चार, देहीं वाळवंटीं ॥७॥ सम विषम वायु, विंझण्यानें विझे । वाळवंटीं सहजें, पवनभोंवरे ॥८॥ भाता भरे वारा, वन्हि पावे विस्तारा । धातु अलंकारा, पंचाळ पाते ॥९॥ तेंवी वायु जाणें, अक्कल विवेकानें । वागेश्वरी वरदानें, **शेख महंमद** ॥१०॥—(गीत ओवी–पोत. १–२२८). –१०८

## ७. द्वैताद्वैत :

तैसा तो श्रीहरि । नेणती अविचारी । होती अधिकारी । अविद्येचे ॥१॥ शेण आणि घृत । धेनु प्रसवत । गोचिडाला प्राप्त । अशुद्ध होय ॥२॥ जीव शेणापोटीं । उत्पन्न लक्ष कोटी । त्याची आवड मोठी । कागां शुकां ॥३॥ गोमाशा गोचिड । कासें पैं चिऱ्हाड । शेण ना चोपड । दुर्गंधी घाण ॥४॥ क्षिरा निरा निवडी । मोतें सेवी आवडी । हंसा नाहीं गोडी । अमंगळाची ॥५॥ चातक जीवन । नेघे मेघाविण । तैसेंच लक्षण । चकोरचंद्रा ॥६॥ अविद्येसुविद्येचे । निवाड केले सांचे । परमार्थी हरि रुचे । **शेख महंमदा** ॥७॥—(गीत ओवी–पोत. १–१६७). –१०९

निर्गुण म्हणों नये, आकार निराकार । टीका ऐका चतुर, दृष्टांतेसी ॥१॥ काळी तांबडी गाई, दुध तें पांढर । आकार निराकार, म्हणों नये ॥२॥ दुध म्हणों गोड, आंबट होतें दहीं । घृत तयामधीं, गुप्त असे ॥३॥ घृत म्हणों काळें, गोठुन कण्या शुभ्र । आकार निराकार, म्हणा कैसा ॥४॥ तरुवर म्हणों, हिरविया रंगें । फळपुष्पां भिगे, नानारूपीं ॥५॥ सांवळें शुभ्र, म्हणों नये जळ । चौ खाणी ब्ररळ, नाना रंगीं ॥६॥ अनाम उपमा कोणा, देतां न ये खरी । विवेकें निज हेरी, **शेख महंमद** ॥७॥—(गीत ओवी–पोत. १–१८२). –११०

मध्यशेवटाविण, नाहीं पाठ पोट । स्वयंभ घनवट, शुन्यापरत ॥१॥ परत आरता, दोन्हीं न साहेत । चौदा भुवनें व्यर्थ, जया ठायीं ॥२॥ ठायीं वाई बोले, ॐकार निःशब्द । वेदभेद सिद्ध, न पवती ॥३॥ तिन्हीं ताळें व्यापून, सोऽहं निज निर्मळ । अचेत केवळ, ठसवावें ॥४॥ वावें पाड घालितां, नलगे ज्याचा ठाव । रवि शशी धांव, आंधळीं जाली ॥५॥ लिखित करितां, शिणल्या वाचा श्रुती । शास्त्री तर्कमती, भांबावले ॥६॥ लेहावीं अक्षरें, समजाविसीलागीं । विवेकाची उगी, समाधान ॥७॥ समाधान होये, तेंच ते समाधि । आयागमन उपाधि, जळे ठाईं ॥८॥ ठाईंचे इंगळ, जळतां निमे अग्न । न सांपडे अग्न, कोळशापाशीं ॥९॥ शिण हा दृष्टांत, मानला संताला । आयागमन चुकला, दिल्हा त्यासी ॥१०॥ सिळा पर्वत मेळ, आयागमन नेणती । जन्म मरण भक्ति, शांत व्हावें ॥११॥ व्हावें तें न व्हावें, ऐसा भाव मज । मिळवावें तुज, तुजमाझारीं ॥१२॥ माझारीची शरणी, सद्गुरुची जाली । उमटली बोली, शब्देंविण ॥१३॥ विसरूनी आपण, मग व्हावें निर्गुण । जैसें दिपीं दहन, कर्पुराचें ॥१४॥ चे म्हटल्याची उरी, तुटे हा दृष्टांत । जळखडवा पडत, जळीं जैसा ॥१५॥ साहे हा दृष्टांत, **शेख महंमदा** । द्वैताद्वैत सदा, नांवरूप ॥१६॥—(दाम यमक, गीत ओवी–सेम. ५–१२). –१११

**शेख महंमद** एकसरें । पिटी धांडोरा चौफेरें ॥१॥ सवें विवेक गुरव । जंगट अनुहातें गर्जत ॥२॥ शाणव कुळाच्या घरा । मन वोढाळ जतन करा ॥३॥

निज नामाच्या फोडतां हाकां। म्हणे द्वैतअविद्या टाका ॥४॥ **शेख महंमदीं** प्रेमबोध। प्रसन्न जालिया गोविंद ॥५॥—(गीत दुचरणी–सेम. १–२१). –११२

मन मुरालें, द्वैत विरालें। भावें देखिलें, अविनाश ॥१॥ वाचक वाचाळ, वैदिक तोंडाळ। न होय सुफळ, प्रेमेंविण ॥२॥ **शेख महंमदा**चा, सुबोध रुचा। सांगतो वाचा, पांगुळली ॥३॥—(गीत दिड चरणी–पोत. १–१८). –११३

आपुलिया नामासाठीं। घालितो वैकुंठीं। हृदयसंपुटीं। धरिल सद्भावें ॥१॥ देवता तेहतीस कोडी। जे पुजितील आवडी। ते पडतील बांदवडी। लक्ष चौऱ्यांशीचे ॥२॥ शेंदूर गुग्गुळ दिवा। महा पातकांचा ठेवा। तेथें न घडेचि जीवा। निज मोक्षपद ॥३॥ सिद्ध साधु वली भले। देवी देवता चुकले। निजीं निर्विकार जाले। सद्गुरुकृपेनें ॥४॥ **शेख महंमदीं** पुजारा। प्रेमें स्मरे सर्वेश्वरा। शीघ्र तोडूनियां थारा। द्वैतअविद्येचा ॥५॥—(ग्रंथी ओवी–पोत. १–२६). –११४

वस्त्रा आड नग्न। काष्टा आड अग्न। द्वैता आड निर्गुण। देखिलें भावें ॥१॥ जंव मृतिका ठाईं। तंव भिंती पैं नाहीं। कर्तव्याचें पाईं। द्वैत[34] जालें ॥२॥ जैसा लोहासी जंग। तैसें द्वैत सोंग। कल्पनेचा धिग। विषयरूप ॥३॥ द्वैत अद्वैत गोळा। रविरश्मिकळा। करितां निर्वाळा। माझाचि मज ॥४॥ भजन भजक। दिसे भासे एक। **महंमदीं शेख**। एकएकत्वें ॥५॥—(गीत ओवी–योगसंग्राम प्रस्तावना, पोत. १–१९). –११५

## ८. विवेक :

श्रीहरि तूं देव कैसा। आमची दशा। सांग बा अविनाशा। विवेक पुसे ॥१॥ विश्वरूपीं मी खरा। अनु नाहीं दुसरा। बोलसी दातारा। महापुराणीं ॥२॥ श्रीहरि बोले भावें। विवेकें तें ऐकावें। गुज पडेल ठावें। अनुभवाचें ॥३॥ देव भक्त द्वैत जाणें। प्रभा अनुरत्नें। अभक्त तें जाणें। जैसे केकती कांटे ॥४॥ भक्तराज निवाडे। जैसे सुगंध वडे। वदेल धडे। **शेख महंमद** ॥५॥—(ग्रंथी ओवी–वर शीर्षक "वैराटिका".–रा. १–१६). –११६

## ९. स्वानुभव :

नाहीं जात येत, शिवशक्तिमेळीं। रविशशी जळीं, दिसे तैसा ॥१॥ वाळवंटीं केला, वारामृतें फेरा। तैसा अवधारा, चौऱ्यांशीचा[35] ॥२॥ दर्पणीं जें दिसें, येतें जातें भासे। तैसा विश्वीं असे, **शेख महंमद** ॥३॥—(गीत ओवी–पोत. १–३०६). –११७

---

३४. दैव–पोत. ३५. चौऱ्यांशीचा फेरा.

परमार्थाच्या द्वारीं, लावूनि बोरांटी । बोलतील गोष्टी,[३६] ब्रह्मविद्या ॥१॥ त्या भुताला ब्रह्म, कल्पांति नातुडे । काशीं धुतां गधडे, तेजी न होती ॥२॥ अंतर्शुद्धिविण, वसे विटंबना । हृदयीं ब्रह्म जाणा,[३७] **शेख महंमद** ॥३॥—(गीत ओवी–रा. १–२३). –११८

प्रकृति देह ढाळ । जिवासी जंजाळ । जन्मोनि शेवाळ । पाणी झांकी ॥१॥ जैसा व्योमाकारा । उमटोनि भारा । रवि शशी तारा । लोपलिया ॥२॥ मृगजळाकार । दिसतें अपार । तैसी माया थोर । जना वाटे ॥३॥ कोसल्याचें घर । एक तंतु फेर । ऐसें ओडंबर । महदेचें ॥४॥ **शेख महंमदीं** । ब्रह्म माया छेदी । जैसी मुंगी शोधी । गोडीलागीं ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–१७). –११९

मज निज रूपीं आवडी । विसर नाहीं क्षण घडी ॥१॥ सर्व व्यापूनि अलिप्त । डोळा डोळ्यापुढें दिसत॥२॥ अनिवार अविनाश । चराचरीं ज्याचा भास ॥३॥ भासीं भासाविण वेगळें । जैसा सुगंध पुष्पमेळे ॥४॥ यातिनामाविण सद । तेच ज्योती **शेख महंमद** ॥५॥—(गीत दुचरणी–पोत. १–४६). –१२०

मूर्ति एकली मी देखिली । मसुरेपरी रेखिली ॥धृ.॥ आरक्त पीत वर्णीं । श्वेत रंग भरित कारणीं ॥१॥ कृष्णवर्णें सांवळी । जे कां ब्रह्मांडातें गिळी ॥२॥ साहेबनाथ गुरुकिल्ली । सेख सुलताना दाखविली ॥३॥—(शिर्षकः " पद **शेख महंमद** "—समर्थ वाग्देवता मंदिर बाड क्र. १७३३, क्र. ५६२). –१२१

रामापरते कृष्णा अरुते । डोळां बैसते, निरूतें ॥१॥ गुप्त प्रकटे स्वयें मन विटे । ते पाहाती गोमटे, साधु भले ॥२॥ गिळिलें ज्ञान पहाणेंपण । नरनारीविण, मुसलमान ॥३॥ जित ना मेले आले ना गेले । भरूनि उरले, सदोदित ॥४॥ उरोनियां बिंब असे स्वयंभ । **शेख महंमदीं** तो, निजलाभ ॥५॥—(गीत दीडचरणी–पोत. १–२०). –१२२

**शेख महंमद** मुळीं आले । सोऽहं सद्गुरूस वाहिले । त्यानें परतोनि गिळिलें । मायबाप ॥१॥ निपजले शुन्य वेळे । नामघोष[३८] आरंदळे । प्रेमे फिरवी डोळे । ऊर्ध्वगत शांति ॥२॥ त्याचें अन्य चरित्र । हृदयीं पडलें नक्षत्र । संहारिले कुळगोत्र । आपणा देखीं ॥३॥[३९] ज्याचा पाहे भक्तिभाव । त्याचा सिमा पुसो ठाव । बेऊं नेदी वाव । चौऱ्यांशीस ॥४॥ तत्त्वबोधीं कवि श्वान । देखोन पळतो जन । विपरीत ध्यान । सहज समाधि ॥५॥[४०] नष्ट संगतीचा द्राड । देतो वैकुंठीं बिऱ्हाड । परतोनि तोडी खोड । कल्पनेचें ॥६॥ अझुनि तरी भल्यानीं । हानी पहावी नयनीं ।

---

३६. नष्ट बोलतील गोष्टी, ब्रह्मविद्येच्या ॥
३७. हृदयीं ब्राह्मण जाणा,
३८. मागे पुढें आ०–पोत.
३९. या कडव्याचा लोप–पोत.
४०. या कडव्याचा लोप–रा.

सर्वत्राची हानी । करीतसे ॥७॥ चित्त मन घडफुडें । भक्तिभावें साबडें । त्याला त्याचें घडे । निज दर्शन ॥८॥ जाळूनि न्याहतर खोडीं । केली ईश्वराची जोडी । लागली तत्त्वबोध गोडी [41] । **शेख महंमदीं** ॥९॥—(ग्रंथी ओवी–रा. १–७ : पोत. १–१९८). –१२३

**शेख महंमद** रे राउत । क्षमा दया दोन्ही हात । शांतीनें प्रजीत । या सद्गुरुपुढें ॥१॥ आत्मज्ञान हें बोन्हाटी । उद्भटाची धाटी । विभूत शोभे गोमटी । या निज नामाची ॥२॥ भेटी अर्ध मातृका । प्रेमाचा सरा निका । बोंबली तो ऐका । अनुहातें ॥३॥ चढविला सद अमलु । मयनीं नेत्र लालु । सवें [42] पाहाती ख्यालु । साधु आणि सज्जन ॥४॥ मीन उफराटा चढे । सहस्र हाकीं पडे । हरुषें पाया पडे । सहज तत्त्वीं ॥५॥ रण पील धैर्याचा । तोडरूहि ब्रीदाचा । चंग शोभे सत्त्वाचा । या ब्रा स म त्र रणीं ॥६॥ भक्ति गा नवविधा बळ । विना मती ही सकळ । भोगिले सकळ । देह चारी ॥७॥ विवेकाचा खंजिर । परमार्थें केलें क्षेत्र । वर्जिलें कुळगोत्र । सद्भाविकांचे ॥८॥ अभागी उभे कोडी । तयाकडे अन्या झाडी । नेटेत ना क्षणभरी । पळतील धाकें ॥९॥ झुंजलों गा लक्षचौन्यांशी । तितके ठिकाणीं अपेशी । संचितें ये देहेंसी । यशवंत जालों ॥१०॥ एकविस सर्ग मैदान । मनपवनातें काढून । मग भेदणारहि सगुण । तदंकारसें ॥११॥ वीड पावे विज्ञानें । मग सद्गुरूनें दिधलें देणें । मग राहिलें भेदणें । स्वयं द्रष्टा ॥१२॥ खंजिर आणि बाणी । हृदयमंदिर फोडुनी । साक्षात्कार पाहुनी । साधुवल्या ॥१३॥ **शेख महंमद** झुंजार । छेदिले आप पर । शक्ति समचरण थोर । मरणास येते ॥१४॥—(ग्रंथी ओवी–रा. १–४). –१२४

## १० आत्मज्ञान :

आत्मज्ञानी नर, धन्य जिवीं जाले । त्रैलोक्य देखिलें, ऐशाच्या दर्शनें ॥१॥ तत्वें साधु उदास, हरि त्याचे दास । त्या पायीं विश्वास, **शेख महंमदा** ॥२॥ —( गीत ओवी–पोत. १–२७५ ). –१२५

देहे सावधान, आत्मा कोठें आहे । निमालिया जाये, कवण्या ठाया ॥१॥ हें आधीं शोधन, करा गुरुमुखें । संवसार दुःखें, चुकवावया ॥२॥ विज्ञान विवेकें, आत्मज्ञान बोला । विनवी संताला, **शेख महंमद** ॥३॥—(गीत ओवी–पोत. १–३०६ ) –१२६

जन्मा नाहीं आलों, मज [43] लागीं जीणें । न घडे मरणें, रडाल वांई ॥१॥ रवि शशी तारा, जळ डोहीं दिसती । जळ गेल्या अदृश्यति, मेल्या न म्हणाव्या ॥२॥

---

४१. लागली शांतिबोधे०–पोत. ४२. स्वें

४३. कैचें मज०

जळ न्यायें आयुष्य, स्थुळ हाचि डोहो । स्वतःसिद्ध पहा हो, स्वयें न्यायें ॥३॥ देह असो नसो, वडवानळ न्यायें । नीळारंभ समयें, अनिवार ॥४॥[44] शेख महंमद, न्यायें जळ तरंग । येणें जाणें सवेग, मिथ्या बोलणीं ॥५॥—(शीर्षक "वैराटिका". गीत ओवी–रा. १–६५) –१२७

**शेख महंमद** रडे ना, माया[45] अश्रुपातें । तों तों जन म्हणते, निष्ठुर धोंडा ॥१॥ धोंडा घामेजेल,[46] परि नाहीं ओलावा । अहं ममतेचा[47] ठेवा, हृदयीं नाहीं ॥२॥ सव्वालक्ष[48] घडे, सव्वा लक्ष मोडे । नेणती हे वेडे, संतान माझें ॥३॥ अनुभव साक्षात्कार, जनाचें स्वहित । सोऽहं बोधें विरक्त, **शेख महंमद** ॥४॥—(गीत ओवी–पोत. १–५१). –१२८

सुगंध चंदनी, धांवे घृति झांका । तैसी कवि विवेका, अनुभवें ॥१॥ चंदन साये तुटी, सहाणेच्या संगें । निवति अष्ट अंगें, भोगित्याची ॥२॥ विषयाचे तुटीं, विवेकाचें जिणें । अव्यक्ताला माने, **शेख महंमद** ॥३॥—( गीत ओवी–पोत. १–६१). –१२९

ताडावरील मोहोळ, पाण्यामध्यें दिसे । तैसा ईश्वर असे, जगदाकारी ॥१॥ पाण्यांत बुड्या देतां, मोहळ न ये हातां । तैसा विश्वीं पाहातां, हरि ना लाधे ॥२॥ ताडावरी[49] जाय, तोचि मध खाय । तळीं टोंकत राहे, आशावंत ॥३॥ प्रपंच[50] पदार्थीं, माया भस्म भूर्ती । अव्यक्ताला पहाती, मूढमती[51] ॥४॥ रवि तारा गगनीं, जळ दिसत मेदिनीं । बुड्या उड्या टाकुनी, गंवसती ना ॥५॥ तैसें अधो देखणें, अधो बिंबीं भासणें । ऊर्ध्व पाहिल्यानें, रवि दर्शन ॥६॥ अधोऊर्ध्वाविण, तत्त्वरूप लक्षण । सहज समाधि ध्यान, **शेख महंमदा** ॥७॥—(गीत ओवी–पोत. १–२७१). –१३०

आम्ही निर्गुणपुरचे वाणी । वस्तु आली घ्या बा कोणी ॥धृ.॥ वस्तु आली नका भिऊं । जितुकें लागेल तितुकें देऊं ॥१॥ वस्तु तारक मारक आहे । गोड आंबट चिंबट पाहे ॥२॥ सेर पावसेर दुसेरी धडा । जितुकें लागेल तितुकें जोडा ॥३॥ सत्त्व तागडें धरलें हातीं । रामनामाचीं भरलीं पोतीं ॥४॥ **शेख महंमद**[52]

---

४४. अनिवार पूर्ण ।
४५. मायेच्या०
४६. ०तरी घामे० परी यासी नाहीं
४७. अहं ममतेचा०
४८. नित्य सव्वा०
४९. जो ताडा०
५०. तैसा प्रपंच०
५१. ते मूढमती ।
५२. हाच अभंग तुकोबांच्या नांवावरहि येतो. चरण क्र. धृ. १, ३, ४, ५,–पांच चरण त्यांत असून पाठ भेद असे : " ०आलीं पाहू नका । तुम्हा, लागेल० ॥१॥ ०पांसरी दुसेरी० ॥३॥ तुका म्हणे आम्ही वाणी । पाल दिलें निरंजनीं ॥५॥—(समर्थ वाग्देवता मंदिर, बाडांक ५५४, क्र. ३२७).

ब्रह्मज्ञानी । येथें अवघे चक्रपाणी ॥५॥—(समर्थ वागग्देवता मंदिर, बाड क्र. १५१०, गीत क्र. ५६–गीत दुचरणी). –१३१

कातीं सांडवला भुजंग । परि न संडे विषयसंग ॥१॥ ऐसें नको मज देवा । तोडी अविद्येचा मावा ॥२॥ बक बैसलासे ध्यानीं । घात अवलोकितो मनीं ॥३॥ खारिक कोंवळीं वरिली । भीतर निब्रर आठोळी ॥४॥ तैसें वृंदावन पिंवळें । तैसें नको मज सोंवळें ॥५॥ वचन ऐकुनि सद्गुरु आनंदलें । **शेख महंमद** उजळ केले ॥६॥—(गीत दुचरणी–समर्थ वाग्देवता मंदिर वाडांक १००७, क्र. १६). –१३२

उंसा अंगीं खरड कांटे । भीतरीं साखरेचे साटे ॥१॥ ऐसें केलें मज गोपाळें। मज न लागे सोंवळें ॥२॥ मोहळ माशांची गोंगाणी । आंत पहातां मध धनी ॥३॥ काळी वोखटी कस्तुरी । झांका तुटती बाहेरी ॥४॥ कांटे केकतीच्या झाडा । भीतरीं निपजला केवडा ॥५॥ वचन ऐकुनि (सद्गुरु) आनंदले । **शेख महंमद** तैसे जाले ॥६॥—(गीत दुचरणी–समर्थ वाग्देवता मंदिर बाडांक १००७ क्र. १७). –१३३

आत्मनिष्ट ज्ञानी । ईश्वर त्याचे ध्यानीं । तीर्थांचिया खाणी । चरणीं त्याचे ॥१॥ अनंत दान पुण्य । मेदिनीसी गगन । तुका न येत जाण । क्षणैक त्याच्या ॥२॥ तो एका श्वासें जीये । वैकुंठ तुका न ये । मग मुक्तीसी इंद्र काये । येईल तुका ॥३॥ अनंत लक्ष याग । त्याचे पाऊल माग । देखतांचि श्रीरंग । साष्टांग घाली ॥४॥ ऐशाच्या निजबोधें । चित्त रंगे शुद्ध । **शेख महंमद** । वोसंडले ॥५॥ (ग्रंथी ओवी–पोत. १–२५५). –१३४

मोतियाचे डोहीं । चंद्रमा बुडाला । तो म्हणे विहंगमाला । काढी मला ॥१॥ तेथें विहंगम झेंपावला । तो जळचरीं ग्रासिला । सूर्य मावळला । मुंगिये मुखीं ॥२॥ तेथें कैचें चंद्रबिंब । कैच्या कळा ज्योती । निर्गमन रूपासी । गमन कैचें ॥३॥ डोळ्यांतील बाहुली । गऱ्हवार जाली । ते जाऊन झेंपावली । चंद्रबिंबीं ॥४॥ तेथें कैचें चंद्रबिंब । सदा सदोदित । न कळे येत जात । गर्भवासा ॥५॥ तेथें पिकवलें चांदणें : सुटती अमृताचे कण । **शेख महंमद** म्हणे जाण । निवविलें मज[५३] ॥६॥ (ग्रंथी ओवी–पोत. १–१५). –१३५

ज्यांसी रूप नाहीं रेखा । तो अव्यक्त माझा सखा । भाव भक्तिचिया सुखा । साहाकारिला[५४] ॥१॥ साहाकारिला हरि । या गोकुळा भितरीं । गौळणी सुंदरी । मोहियेल्या ॥२॥ बारा सोळा गौळणी । त्यांत सत्रावी शाहाणी । रखुमाई मुखरणी अर्धमातृका ॥३॥ चौदा भुवन हें गोकुळ । आणि पन्नास गोवाळ । मांडियेला खेळ । चराचरीं ॥४॥ तेथें उन्मनि आखर । नीळारंभ तरूवर । मांडियेला

५३. ०म्हणे दिगांबरा जाण । निवविले मज चातकाचे परी ॥

५४. साहाकारिला हरि ।

सूर । स्वानुभवाचा ॥५॥ तेथें झुगारिला मन सूर । चढिन्नलो तरूवर । जितिला चौऱ्यांशीचा फेर । एकचि डाईं ॥६॥ तेथें विहंगमऊर्ध्व निरुतें । ब्रह्मरंध्रा नीट वरुतें । तेथें कैचें येतें जातें । स्वयंभूचि असे ॥७॥ तेथें विराली वासना । आणि निमाली कल्पना । तेथें **शेख महंमद्**पणा । ठावचि नाहीं ॥८॥—(ग्रंथी ओवी –पोत. १–६२). –१३६

रामीं आराम । आरामीं राम । सांडुनि भवश्रम । आत्मज्ञानी वोळखा । ॥धृ.॥ जितुकें दिसें । तितुकें नासें । नाशांत अविनाशे । अनिवार राम ॥१॥ सद्गुरुकृपें । अजपजपे । **शेख महंमद** समत्वें । दीर्घ दम ॥२॥—(पद–पोत. १–३४५). –१३७

अष्टधा प्रकृति लेणें जाया रे । कर्ण छेदुनि भनवीं मुद्रा वांया रे ॥ सेवी सद्गुरुचरण लवलाह्या रे । तेणें सकळिक अभ्यंतर पडेल ठाया रे ॥१॥ सांडी सांडी गोवळ्या नाना मतें रे । मीमाजीं हरपे हित आहे तेथें रे ॥ एक म्हणती रोखो नादें बिंदें भेदे रे । तया नाहीं आत्मज्ञान ते मूढ अंधे रे ॥२॥ सांडा भ्रांति तत्त्व मानसीं रे । मन करुनी एकाग्र अहर्निशीं रे ॥ **शेख महंमद** विनवी स्वरूपेंसी रे । तेणें अवतार घेतला मल्वंशी रे ॥३॥—(पद, पोत १–३१). –१३८

माझें मी जाणें हो जाणणें ॥धृ॥ पाहातां पाहाणें द्वैता नाहीं ठाणें । बोलतां न ये वाचेनें ॥१॥ सद्गुरु तुष्टती तरी ते फिरे भ्रांति । हृदयीं पडे चांदणें ॥२॥ मनाचें मुरणें परब्रह्मीं शिरणें । **शेख महंमद** धालेपणें ॥३॥—(पद, सेम. ५–२). –१३९

धन मना तूं सज्ञाना, घेतला हरिनाम लाहो । तोडिली भवबंध यातना, आत्मज्ञान करुनि उपावो ॥धृ.॥ एका आत्मज्ञानापुढें, सर्व कर्म दिसें वेडें । नयनीं लेऊनि उन्मनि अंजन, परब्रह्म पाही निवाडें ॥१॥ एक म्हणती पहाणें पाहातां, हें तंव दृश्या अदृश्य । जैसी दिपी दिपाच्या पोटीं, तैसें जालें आत्मयास ॥२॥ हा अनुभव ऐकतां, साधु निवाले मनीं । ज्यासी परि (चय) नाहीं तेथींचा, तिहीं हांसे मांडिलें विजनीं ॥३॥ जनीं जनार्दन, हें जन जनार्दनीं । प्रसिद्ध जनासी कां न कळे, जैसा काष्टी वसे वन्ही ॥४॥ जन विजन एकत्र भासे, मध्य शेवट नाहीं । जिकडे पाहे तिकडे श्रीहरि, जैसा मीन पाहे डोहीं ॥५॥ येणें न्यायें **शेख महंमद**, सहज खेळे सहजामधीं । आले कामाविण काज, सद्गुरुकृपें सिद्धि ॥६॥—(पद, रा. १–५५). –१४०

## ११. ब्रह्मज्ञान :

आमुचे संचितीं, होतें तैसें जालें । परब्रह्म आलें, भावें घरा ॥१॥ घरांत बाहेर, कोंदाटली भक्ति । सायुज्यता मुक्ति, होऊन ठेली ॥२॥ ठेली अनिवार,

यावें जावें नाही । सद्गुरुच्या पायीं, ऐसें जालें[५५] ॥३॥ जालें बोलों काय, निःशब्दीं ठकार । अजपा उच्चार, जप नाहीं ॥४॥ नाहीं आहे मिथ्या, द्वैताची निरास । अद्वैतीं समरस, **शेख महमंद** ॥५॥–(दाम यमक, गीत ओवीं—पोत. १–४७; रा. १–११). –१४१

जेथें मनपवनाची धांव खुंटली । तेथें वाचा काय बोलेल बोली । जैसी साकर मुक्यानें खादली । परी गोडी सांगतां न ये ॥१॥ जैसी व्याली जाणे वेदना । अबला म्हणती मज कां दावा ना । तैसे जन साधुसज्जना । गुज पुसों पाहाती ॥ २ ॥ विश्व आपण देखतें मेलें । स्वयें मरण कळों नाहीं आलें । मिथ्या सौभाग्यें डौरविलें । त्या मढियालागीं ॥३॥ जेणें काळें पूर्ण[५६] मरावें । तेव्हां त्या मरणातें पहावें । तैसें तें निज ओळखावें । निजीं मरोनीयां ॥४॥ निज सुखाची प्रेमबोध गोडी । सद्गुरु पंगती नित्य परवडी । **शेख महंमदा**सी आवडी । ब्रह्मानंदीं ॥५॥—(ग्रंथी ओवी —पोत. १–७७; १–२६५). –१४२

चराचर व्यापुनी । उरता त्रिभुवनीं । ओळखती ब्रह्मज्ञानी । गोंविंदा रामा ॥१॥ निगुरे ते बावळे । त्याला स्वरूप ना न्याहाळे । डोळे असोनि आंधळे । जेवीं मयूरपत्रें ॥२॥ अविद्येचें धुमंड आलें । काम क्रोध नागवले । भवजळीं बुडविलें । मन कल्पनेनें ॥३॥ संवार याचे दराडे । अवस्थानीं केले वेडे । वेदां ब्रह्मादिकां सांकडे । पडली भ्रांति ॥४॥ सद्गुरु विवेकराजें । उपदेशिलें ब्रह्मबीजें । जाळिलें लक्ष चौन्यांशी राजे । **शेख मंहमदीं** ॥५॥—(ग्रंथी ओवी–रा. १–२८). –१४३

## १२. कूट :

बुबुळांत बुबुळें । त्यांत रूप निराळें । बाहुली त्याच्या मेळें । सोंवळीं असे ॥१॥ डोळ्यांतून प्रकाशे । त्याच्यानें विश्व दिसे । भिन्नत्वें भिन्न भासे । यातायाती ॥२॥ तेंच परा परतें । पाताळाहि खालुतें । सदोदित बिंबातें । **शेख महंमद** ॥३॥ —(गीत ओवी–पोत. १–२३४) –१४४

सत्यार्थ बोलतीं । अधःपाता जाती । असत्य बोलती वैकुंठवासी ॥१॥ अभक्ष करिती । ते उत्तम गती । सोंवळे पीडती । भवरोगानें ॥२॥ जेऊनि उपवासी । होतीं मुक्तवासी । व्रतधारियांसी । जोडती पापें ॥३॥ पाणियानें जळती । आगी नेणवती । न करूं करिती । ते हरिभक्त ॥४॥ तीर्थयात्रे जाती । त्यांना यम गांजितीं । निवांत बैसती । ते साधु होती ॥५॥ आपलें घर जाळिती । जेष्ट पुत्र मारिती । गाय कापून

५५. अनिवार्य वोजा जावो नाहीं । भगवंताचें पाई मज तैसें जाले ।–रा.

५६. ०काळें आपण मरावें ।—पोत. १–२६५.

खाती । ते ब्राह्मण ॥६॥ आपपर नेणती । जाणावे जाणती । शास्त्रज्ञान धुंडिती । ते मूढमती ॥७॥ मुखेंविण बोलती । करेंविण लिहिती । कोरे कागद वाचिती । ते परब्रह्मज्ञाते ॥८॥ हृदयीं बोध जाला । निराकारें धाला । **शेख महंमद** आला गेला । नकळे पंडितां ॥९॥–(गीत ओवी–सेम. १–१७; पोत.१–८०). –१४५

माझ्या चित्ताची मीच ग्वाही । परस्त्री माझी आई ॥१॥ बाप आत्मयासी म्हणितलें । आई कुडीस बोलिले ॥२॥ येथें नाहीं दुसऱ्याची रीघ । **शेख महंमद** अनुवैराग्यें ॥३॥––(गीत दुचरणी–पोत. १–१८८). –१४६

**शेख महंमद** परद्वारीं । चौघी भोगुन बाळब्रह्मचारी ॥१॥ नीळारंभ ते धवलार । सुचे उन्मनि सादर ॥२॥ अर्ध मातृका कर्ण कुमारी । ऊर्ध्व भोगिली सुंदरी ॥३॥ यावेगळ्या अष्ट नायका । बावन मातृका अनेका ॥४॥ प्रेमबोधाचा प्यालों प्याला । बारासोळांनीं आनंद केला ॥५॥ **शेख महंमदीं** सोऽहं लीळा । ऊर्ध्व भोगूनि वेगळा ॥६॥—(गीत दुचरणी–सेम. १–५०). –१४७

जाणारे अनुभव जाणा । गाई व्याली वच्छ घाली पान्हा ॥१॥ सद्गुरु कृपेचा नवलाव जाला । मांगापोटीं एक पुत्र जन्मला ॥२॥ ऐका एक विवेकाची युक्ति । बंधनाविण बांधला हस्ती ॥३॥ म्हैस फोडुनि खुंटा गेला । मीनमार्गें धन्या सांपडला ॥४॥ घोडें राउतावरी जालें स्वार । पाखांड्यासी सांगे व्यवहार ॥५॥ उदक तहानेनें तळमळी । ताट भुकेलें जेवी तुपपोळी ॥६॥ पाताळ गंगा ऊर्ध्व वाहिनी । आंघुळ करी तत्त्व भेदुनी ॥७॥ राई एवढें स्वरूप लहान । तिहीं ताळीं त्याचें पालन ॥८॥ **शेख महंमदा** नवल जालें । सून सांडून सासूपें गेलें ॥९॥—(गीत दुचरणी–सेम. १–१३). –१४८

आमचा आचार आइका । तुम्ही गर्वें जाऊं नका ॥१॥ आम्ही जातीचें ब्राह्मण । आमचे सोयरे मुसलमान ॥२॥ आमचा आचार बहु भारी । लेक दिली महारा घरीं ॥३॥ लेक दिली त्या लेकासी । कांकरा बांधिलें बापासी ॥४॥ बोलूं नयेचि ते बोला । माझा बाप गऱ्हवार जाला ॥५॥ **शेख महंमद** बोले बाणी । अंदर घडा बाहेर पाणी ॥६॥—(गीत दुचरणी). –१४९

स्पष्टीकरण :

ऐका नवलाव, हो अनुभवार्थ । गर्व हो किमर्थ, करूं नका ॥१॥ स्वधर्म आमुचा, हाचि हा विचार । ब्राह्मण साचार, महान थोर ॥२॥ अज्ञान अविंध, ज्ञान हो ब्राह्मण । संबंध हो जाण, सोयऱ्याचे ॥३॥ जीव हे अत्यंज, सुविचार कन्या । जाणूनि पराज्ञा, लग्न केलें ॥४॥ शांति हेचि लेक, दिली त्या लेकासी । मन निश्चयेंसी, लग्न केलें ॥५॥ बोलूं नका कोणी, बाप माझा शिव । पोरें व्याली सर्व, बिस्तारिलें

॥६॥ अंतरींचा घडा, सत्रावीं जीवन। प्रेम पाणी जाण, **शेख महंमद** ॥७॥ —(गीत ओवी, बहुळकर संग्रह, बाड संदर्भांक ३११, क्र. ७१). –१५०

राम नाहीं कृष्ण नाहीं। शुन्याच्या आनंदीं शुन्य होई ॥धृ॥ मनुष्य निमालें ताखेंपण आलें। सावध पाहातां शुन्य बुडालें ॥१॥ मृगजळ राउत पळती बहुत। धरूं गेल्या तया न लगती हात ॥२॥ तैसा निराकारी आकार अवधारी। असंख्य बुडाले शुन्याच्या विहिरीं ॥३॥ केळीचे खोड अनेक झाड। घडन्यावें **शेख महंमदीं** निवाड ॥४॥—(पद–पोत. १–५८). –१५१

# ६

# आचारबोध

## १. नरदेह :

श्वानापरिस हीन, मज केलें हरि । लागे उपकारी, आपले करी ॥१॥ गोचिड गोमाशा, श्वास हें पोषितें । हें मज निरुतें, न घडे देहीं ॥२॥ शुद्री केरसुणी, झाडी फेडी करी । हे गुण शरीरीं, नाहीं मज ॥३॥ चर्म रंगोनि जाल्या, पायपोस वाहाणा । माझें चर्म पावना, नलगे कांहीं ॥४॥ मृतिका खापर, मृत्तिके मिळे ना । जिवाच्या या दैना, लक्ष चौऱ्यांशी[1] ॥५॥ गंधर्व कुक्कुट, अधिक दिसती । कातेनें मुंकती, प्रहरोंप्रहर ॥६॥ अमंगळ उकिरडे, गाडा बैसुनि गेले । साखरे गोड जाले, मज अधिक ॥७॥ षड्रस पाणी, मजसी मळ मुत्र । कैसा मी पवित्र, म्हणवूं जगीं ॥८॥ वाळविली × हे, अष्टा × गुनी । छीःथुपणीं घाणीं, आदि अंतीं ॥९॥ वायां जातो हरि, मज अंगिकारी । पावलें निर्धारीं, **शेख महंमदा** ॥१०॥—(गीत ओवी–रा. १–१९). –१५२

अंगाचिया बळा, पाहे भुजांकडे । अभिमान चढे, मेंढा जैसा ॥१॥ वांकडी पगडी, चौड्यावरी चाल । अंतीं नाहीं बोल, हरिनामाची ॥२॥ हातीं दिड पान, वरतीच मान । नाहीं तो सन्मान, भलियाचा ॥३॥ ज्याला नाहीं शक्ती, नाक डोळे गळती । देखूनियां पळती, रांडा पोरें[2] ॥४॥ स्त्री म्हणे आतां, मरता तरी बरें । थुंकुनियां घर, नाशियेलें ॥५॥ **शेख महंमद** म्हणे, धरा देहशुद्धि । नाहीं तरी मध्यें, नागवाल[3] ॥६॥—(गीत ओवी–आतार संग्रह, बाडांक ३२, पृ. ५; बहुळकर संग्रह, संदर्भांक ५१६, क्र. २३ अ). –१५३

देह अभिमानें, नटशील झोंडा । अंतीं तुज धोंडा, शेणीसी जाळी ॥१॥ संचित असेल, तरीच हे प्राप्ती । नाहीं तरी माती, तोंडीं तुझे ॥२॥ विष्ठा होईल

---

१. ०चौऱ्यांशीं दुःखें ।

२. पाठ : फक्त ४, ५ व ६ चरण. हा अमंग तुकोबा व नागनाथ आणि गोसावीनंदन यांचे नांवांवरहि कांहीं बाडांत आढळतो. परंतु हा अभंग गोसावीनंदनांचाच आहे.

३. हीन जाल्या शक्ति० । सोडूनियां जाती० ॥

तुझी, श्वापदीं भक्षिल्या । साधुचरण भजिल्या, स्वहित तुझें ॥३॥ पांचांचें जायाचें, तें म्हणसी माझें । भ्रांतीचें हें वोझें, जोडलें मूढा ॥४॥ **शेख महंमद** म्हणे, सद्गुरु सेवा माथा, भवनकींची व्यथा, आवडी[४] वाढी ॥५॥—(गीत ओवी–पोत, १–२६७). –१५४

नरदेह लाधल्या, स्वहित तें करा । पापें यमपुरा, नका जाऊं ॥१॥ विषयाचें सुख, भावविल दुःख । अविद्येनें मूर्ख, नाडिले बहू ॥२॥ **शेख महंमद** ज्ञानी, परात्पर ध्यानीं । जनांत विजनीं, तत्त्वबोधें[५] ॥३॥...(गीत ओवी–पोत. १–२५६). –१५५

वाचा शिश्न योनी, आवरा नरनारी । असत्य परद्वारीं, नका करूं ॥१॥ चवंग्या भरासाठीं, जाईजे यमपुरा । जाचणी नारीनरा, सोसणें लागे ॥२॥ चवंग्या एवढीं असे, वाचा शिश्न योनी । त्याच्यानें भवपतनीं, जिवशिवात्मा ॥३॥ स्वर्गीं वाट पहाती, बेचाळिस पूर्वज । स्वयें चुकवा लाज, चौऱ्यांशी लक्ष ॥४॥ **शेख महंमद**, समस्तां विनविती । साधूंचे संगती, स्वहित करा ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–२४८). –१५६

नरदेह लाधोन, बोलत ना गोड । करिती बडबड, अधर्माची ॥१॥ सद्गुरु नाम गोड, उत्तम चांगलें । तें नाहीं बिंबलें, पाप्या चित्तीं ॥२॥ चित्तीं धरुनी नाम, वाचे उच्चारिती । ते संत आवडती, **शेख महंमदा** ॥३॥—(गीत ओवी –सेम. १–१२; पोत. १–१८९), –१५७

नाशीवंत काया, जाईल विलया । म्हणवुनि सखया, शरण आलों ॥१॥ आलों संचितानें, कल्पांतीचे जोडी । व्याहतर खोडीं, लागलिया ॥२॥ लागले[६] गुणदोष, त्रिगुण त्रिपुटीं । अद्वैताचे भेटीं, द्वैत नाहीं ॥३॥ नाहीं जाली सरिता, सिंधुमाजी जैसी । माझी परी तैसी, निर्गुणांत ॥४॥ तदाकार सद्गुरु, मज तैसा विचारु । चौऱ्यांशीचा फेरु, दहन[७] जाला ॥५॥ जाला म्हणतां वेळ, कर्पुर वन्हि जैसा । दशांत परियेसा, **शेख महंमदीं** ॥६॥—(दाम यमक, गीत ओवी–रा. १–१३; पोत. १–३८). –१५८

आम्हां ऐसे गेले किती । करितां नाम कीर्ति ॥१॥ गेले वैकुंठीं उरले हाली । जैसी पुष्पें मोगरेल जालीं ॥२॥ **शेख महंमद** त्यामागें गेलें । उरले युगानयुगें ॥३॥—( गीत दुचरणी–रा. १–२५ ) –१५९

देह[८] गेला जातो सांडूनी । याची करा बुझावणी ॥१॥ जैशा नद्या जाति

---

४. आवडीनें वाढी ॥
५. ०तत्व शांति बोधें ।
६. गळाले–पोत.
७. शुन्य–पोत.
८. नरदेह
९. नरिनरा.

सागरा। तैसें वोझे सांडी नरीं ॥२॥ व्यर्थ[१०] परमार्थ लाविती। वैकुंठ[११] मुक्ति भोगिती ॥३॥ जाल्याविणें[१२] हृदय शुन्य। **शेख महंमदा** तत्त्व नेम ॥४॥—(गीत दुचरणी –रा. १–५८) –१६०

नरदेह संचित पुण्य। धिगें[१३] केला जैसा श्वान ॥१॥ धिग जाले चांडाळ दोषी। कल्पकल्पांतीं अपेशी ॥२॥ **शेख महंमद** विनंति करी। नामीं बोधा नर नारी ॥३॥—(गीत दुचरणीं–सेम १–२५; पोत. १–१८२) –१६१

मनुष्य जन्म रत्न। तेथें कां हो वाईटपण ॥१॥ नरदेह संचित दैवें। सर्वांभूतीं गोड व्हावें ॥२॥ नका निघूं अधःपाती। **शेख महंमद** विनविती ॥३॥—(गीत दुचरणी–पोत. १–१८५) –१६२

काळतोंडे नखटे बुचे। त्याला हरिनाम ना रुचे ॥१॥ नरदेहीं अधःपाती। लक्ष चौऱ्यांशी भ्रमती ॥२॥ धिग त्याचें जन्म जिणें। जैसें किवनक सुनें ॥३॥ कृमी कीटक गांडुळ। पापें दर्शनें तुंबळ ॥४॥[१४] **शेख महंमद** निषेधी। त्याचें तोंड पडों सांदीं ॥५॥—(गीत दुचरणी–सेम. १–४४, पोत १–१७०). –१६३

किती सांगो बेश्रमाला। नरदेह व्यर्थ गेला ॥१॥ सांगितलें न धरी मनीं। चित्त कामिनीचे ध्यानीं ॥२॥ नरा रंग करी तोरा। अंतीं जाय यमपुरा ॥३॥ परमभूमिसी भंडती। आत्मनिरास नेणती ॥४॥ **शेख महंमद** विवेक सांगे। भावें, न घेती लंडी मागे ॥५॥—(गीत दुचरणी–राजवाडे संशोधन मंदिर, बाडांक १५ क्र. २३५). –१६४

मनुष्य देहीं अति नष्ट। बेइमानी क्रियाभ्रष्ट ॥१॥ आदि अंतीं ज्यासी काम। त्याचें नुच्चारितां नाम ॥२॥ पुर्वजांचें जें माहेर। त्यातें विसरले मुरदार ॥३॥ दास उन्मतांचे होती। जाच यमाचे सोसती ॥४॥ साधुसंतांचे आशिर्वादीं। **शेख महंमद** निज पदीं ॥५॥—(गीत दुचरणी–सेम. १–४५; पोत. १–१७१). –१६५

जन्मा[१५] येऊनि काय काज। जोंवरि नाहीं चुकली लाज ॥१॥ देह[१६] सरल्या उपरी। होईल विषयाची कामारी ॥२॥ देहा[१६] सारिखें रत्न। पाहातां[१७] चुके भ्रमण ॥३॥ पाळी आली थोरां कष्टी। भजतां राहीजे वैकुंठी[१८] ॥४॥ **शेख महंमदीं** सद्गुरु वचन। ग्रासीलें आयागमन ॥५॥[१९]—(गीत दुचरणी–पोत. १–२५)–१६६

---

१०. गेला व्यर्थ०
११. पदें वैकुंठ०
१२. गेला जात्या०
१३. तो त्वां धिग–सेम. पोत.
१४. ०कीटक ते गां०। त्याच्या दरुशणें०–पोत.
१५. मनुष्य जन्मा०
१६. मनुष्य देह०
१७. परतोनि पाहातां०
१८. मनुष्य देह पाळी०। ईश्वरीं भजतां०
१९. ० महंमदीं भजन स०। जन्मा येऊनि ग्रा०॥

ऐका श्रोते राजभाविक महा प्रष्टिक शेख महंमदीं विवेक ॥धृ०॥ मनुष्य जन्म देह रत्न करुनी यत्न लावा ईश्वरभजना। टवाळी विषयाचा संगती जळे अधोगती चित्त द्यावें वचना। काळ संव चोर कठीण यम दारुण हो कां तुम्हां कळे ना। होता बहिर सेवा सद्गुरु चरणा ॥१॥ जे जे रातले भगमुखा ते पावले दुःखा जैसे दरडीचें झाड । दरड धुपोनि गेली माती मुळ्या दिसती उमळलें खोड । तैसा नारीसंगे उन्मत्त सारी जिवित्व लागल्या भगवेड। मळ मुत्राची योनी तुझे ध्यानीं जैसे सुकरका गोहाड ॥२॥ श्वान फोडी कोरड्या हाडा दुखती दाढा पोट न भरे कांहीं। भागोन वदनें गेली लाळ भुकेनें तळमळ झांक दिशा दाही। दिपोन मदनबाण सारिती किंचिल दिसतीं कळा मद्याची पाही। वोरंगोन जाले भूमिभार म्हणती फटमर हुंमत नाहीं ॥३॥ आणीक उपदेश अवधारा सांगो तो खरा देवें झकविलें जन। दिव्या नीट पतंग उडे तेलामधें पडे तैसे चुकलें अज्ञान। दीपले कांतेच्या टकारा वरु तोरा भगीं पडलें गळोन। जैसी शेणाची बाहुली हिंगुळें चित्रीली उदकीं पडतां बाहोन ॥४॥ तैसी तारुण्य नारी करें भाळली गव्हारें चित्तें मनें एकाग्र। धन्य ज्याले पशु भूमंडळीं रमेत ऋतुकाळीं थोर त्याचा विचार। भले जे ऋतुकाळीं रमती येरा अधोगती रुती कन्या कुमर। **शेख महंमद** संसारा काम आवरी साधल्या कळा थोर ॥५॥—(पद—रा. १–४६; सेम. ५–३). —१६७

थोडा हा संसार जाइजना लाहे घेई मना वंदी सद्गुरुचरणा ॥धृ॥ पर्जन्यकाळीं रान हिरवें दिसे बरवें तैसें तारुण्य असे । चैत्रमास दिन परतला उष्ण काळ आला रान वाळलें दिसें। तैसें हें रूप पालटतें वृद्धपण येतें देखत देखत नासे। ऐसें दृष्टींस देखोन झकले अज्ञानें जाले विषयाचें पिसे ॥१॥ जाई जुई चांपे तरुवर पुष्पें सुकुमार देठीं बरवीं शोभती। विकासुनियां ते कोमिली भूमि पडली कोणी न धरती हातीं। तदन्यायें शरीर चळलें बरें म्हणे जन मृत्यु जाल्या थुंकती। नैश्वर शरीर विटंबना सावध करीं मना सद्गुरुचे भक्तीं ॥२॥ पर्जन्यकाळीं हो सरिता पूर्ण भरिता उल्लाळतील लाटा। डहुळ्या पाण्यां मत्स्य रातले सिंधु विसरले जाला आनंद मोठा। वोहळ सरिता आटल्या जिवनें सांडवल्या आंतून पडतील वाटा। बग ढोक पारधी फिरतीं मत्स्य मारिती जाला आकांत मोठा ॥३॥ येणें न्यायें विषयासी रातती हरि विसरती त्यागी ऐसें पावन। मनुष्य देहातें सरतीं नाना जीव होतीं भोगिती ते पतन ॥ चौऱ्यांशी लक्षीची जाचणी भव भ्रमणी नाहीं आठव ज्ञान। **शेख महंमद** बोलिले उपेगा आले वंदा सद्गुरुचरण ॥४॥—(पद–पोत. १–७५). —१६८

## २. जन्ममरण :

द्विज सरलिया, विझोनि जाय दिवा। तैसी होय जिवा, आयुष्यहानी ॥१॥ कमानेचा तीर, चिल्लारा सांडुन गेला। आयुष्या नागवला, उन्मत्त प्राणी ॥२॥

पाणी निघोन गेल्या, आटलीं डबरें। आक्रांत जळचरें, करिती तेथें ॥३॥ गंवसल्या पारध्या, रांधिली भाजिलीं। तैसी यमें गांजिली, अविचारीं ॥४॥ रत्नें मुक्ताफळें, राजेते सुढाळें। तैसें संता विठ्ठळे, हरि लेती ॥५॥ नष्टां दुष्टां माराया, पवित्र जपती। साधुसंत वंदिती, विश्वमुखें ॥६॥ शुभाशुभ निवाडे, ज्ञानें केले पवाडे। वक्ते विवेक धडे, **शेख महंमद** ॥७॥—(गीत ओवी-पोत. १–२७३). –१६९

कोणी नाहीं मेला, रडावें कोणाला। स्वतःसिद्ध संचला, आत्मानाथ ॥१॥ जळन्यायें आत्मा, तरंग साचार सिमा। घडे मोडे महिमा, आपेंआप ॥२॥ आनंद नाहीं ज्याल्या, दुःख नाहीं मेल्या। विवेकीं पाहिल्या, **शेख महंमद** ॥३॥ —(दाम यमक, गीत ओवी, पोत. १–५०). –१७०

अंतकाळीं मती। तेच जाणा गती। विधि वित्पती। देहढाळ ॥१॥ अष्टांगहि योगें। नव्या जाणें सोंगें। ना चुकती भिंगें। आयागमनाची ॥२॥ जैसी जे कल्पना। तैसा देह जाणा। धरीं जन्म मरणा। सुचित्ताच्या[20] ॥३॥ चित्त मन मुरे। कल्पनाहि विरे। जन्म[21] मरण कीं रे। चुकलें तुझें ॥४॥ **शेख महंमद** खरे। बोलिले निर्धारें। वोळखा विचारें। श्रोतें तुम्ही ॥५॥—(गीत ओवी, पोत. १–२८; योगसंग्राम प्रस्तावना). –१७१

आत्मज्ञानी ब्रह्मऋषी। देव दानव त्यांच्या दासी ॥१॥ पोटासाठीं नाठऊं हरि। परउपकारी सर्वं धरीं ॥२॥ नेणें शक्ति चौंडे कांता। मुंज्या म्हैशासुरा प्रेता ॥३॥ नेणों मेसोविणें गिऱ्हे। वैद पंचाक्षरी विदरे ॥४॥ फुलें मेलीं मोगरेल ठेवा। तैसा आमचा जगीं रहावा ॥५॥ नेणों साही दरुशनें। आम्हां मरोनि उरणें ॥६॥ देह गेला उरली कीर्ति। **शेख महंमद** म्हणती ॥७॥—(गीत दुचरणी-सेम. १–३०; १–३८; पोत. १–१८४). –१७२

## ३. यातिश्रेष्ठत्व :

असो हीन याती। जाणें ब्रह्मस्थिती। तो ब्राह्मण संती। पुजावा आधीं ॥१॥ असोनि ब्रह्मबीज। नेणें ब्रह्मगुज। न घ्यावा सहज। सितोडाहि ॥२॥ वेदांत बोलिले। सिद्धांत सांगितले। गुप्त प्रकट केलें। **शेख महंमदीं** ॥३॥—(गीत ओवी-सेम. १–३९). –१७३

तैसा साधुसंता, उपज निपज। ऐका टीका गुज, विवेक निवाड ॥१॥ उपजले चांपे, निपजती फुलें। संताहृदयीं तैसें, निपजणें ॥२॥ निपजे कस्तुरी, उपजल्या मृग। तैसे साधु जगीं, निपजती ॥३॥ उपजले उंस, निपजे शर्करा।

---

२०. चित्त सुति पाती ०–पोत.

२१. तरीच जन्म कीं रे चुकेल तुझा।–पोत.

निपज शरीरा, ज्ञानवैराग्यें ॥४॥ **शेख महंमद,** नरदेहीं निपज । तत्त्वविवेक गुज, सद्गुरु वैराग्यें ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–१८१). –१७४

विप्र जन्मां आलिया, नाहीं नाम विवेक । ते नष्ट बटीक, अनामिकांची ॥१॥ छीःथूः मरमर, आदि अंतीं त्याला । यमदूतांचा घाला, उंच याती ॥२॥ जैसें उंच झाड, शिंदीचें वाढलें । वारियानें केलें, कासाविस ॥३॥ उत्तम कुळी काय, जाळावी विप्राची । जो नाहीं हरीची, बोधें भक्ति ॥४॥ न करितां श्रम, उच्चारी निज नाम । सद्भक्त उत्तम, **शेख महंमद** ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–१७९). –१७५

सगुण वंदिती, अवगुण निंदिती । कैसें नाम पावती, शष्पें मिशा ॥१॥ फिरंगी पाणी वंदे, खाटिक सुरी निंदे । तैसा हरि प्रबंधे, शुभाशुभीं ॥२॥ जळ काशीपणें, तें कां वोहळीं उणें । ऐसे वंदी निंदणें, प्रकृतिपुरुषीं ॥३॥ सोनें छत्री कळस, पाई पैंजण दास । उंच नींच हरीस, येणें न्यायें ॥४॥ उत्तम मध्यम कनिष्ट, ऐसा जाणा चतुष्ट । चराचरीं अविट, **शेख महंमद**[२२] ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–१८०). –१७६

## ४. यवन :

बाभळेच्या झाडा । आंबे आले पाडा । अपरोक्ष निवाडा । **शेख महंमद** ॥१॥ याति मुसलमान । मऱ्हाष्ट्रीं वचनें । ऐकती आवडीनें । विप्र शूद्र ॥२॥ इंद्रावळी वेली । खरबुजें पिकलीं । ते भावें सेविली । सदाचारी ॥३॥ मुसलमान याती । निपजली मती[२३] । अधिकारी होती । अठरा पगड ॥४॥ अनामिकाचा दिवा । मंदिरीं[२४] लावावा । तेथें दूषण ठेवा । ठेवितां न ये ॥५॥ पुल कसाचें सोनें । घेतल्या ब्राह्मणें । त्याला दुषण उणें । म्हणतां न ये ॥६॥ कापसा नांव वस्त्र । राजाशिरीं छत्र । कोरडा तरकर । टांगलासे[२५] ॥७॥ विश्वरूप एक । भिन्न भिन्न लोक । वोळखा साइक । उत्तम कनिष्ट[२६] ॥८॥ फिरंगी नांव तिखणें । राजा वागवणें । धोकटींत विखणें । नापिक काखे ॥९॥ पाणी तातले धारे । शीतळ उत्तरें । वंदी निंदी खरें । **शेख महंमद** ॥१०॥—(गीत ओवी–सेम. १–११, पोत. १–२५३). –१७७

बरवा जालों मुसलमान । नाहीं विटाळीं आठवण ॥१॥ तो[२७] खानोऱ्याचा व्यापारी । पाप पिडी गायेकारी ॥२॥ होतो भटेसी मुलाणा । अभिमान जातो

---

२२. ०महंमद तत्त्वें ॥
२३. ०ज्ञान मती–सेम. पोत.
२४. राजमंदिरी–सेम.–पोत.
२५. झोडी टांगलासे–सेम. पोत.
२६. उत्तम मध्यम कनिष्ट–पोत. सेम.
२७. असे तो०

पतना ॥३॥ द्वैतें बुडविले सा चारी । अठरा......॥४॥ सुमुसे हृदयाचे वासी । **शेख महंमद** नाम मजसी ॥५॥—(गीत दुचरणी–रा. १–५७). –१७८

[28]ब्रह्मपुरीचे तुरुक । द्वैत मिळोनि जालो एक ॥१॥ अहं टोणगा भक्षिला[29] । निज प्रेमाचा प्यालों प्याला ॥२॥ सांडवलों आचार विचारा । कोणी भले म्हणा बुरा[30] ॥३॥ कोणी आम्हांसी बाटले । बाटुनि मूळ ठायां गेले ॥४॥ **शेख महंमदीं** बाटले । यातीवेगळें[31] घातले ॥५॥—(गीत दुचरणी–सेम. १–७; पोत. १–५४). –१७९

**शेख महंमदा**च्या विटाळें । जाले भाविकांचे वाटोळें ॥१॥ वाटोळयांत दहा खंडे । चौदा भुवनें प्रचंड ॥२॥ सिंधु रवि शशी तारा । वनस्थळी अठरा भारा ॥३॥ तीर्थ पर्वत मेरु मांदारा । खाणी बाणी चराचरा ॥४॥ ऐसी टोका वाटोळ्याची । **शेख महंमद** विटाळाची ॥५॥—(गीत दुचरणी–सेम. १–८; पोत. १–५५). –१८०

## ५. सोंवळें ओंवळें :

हरिनामीं मरतां । हरिनामीं मारितां । हरिनामीं भोगितां । विषयरूप ॥१॥ हरिनामीं आसन । हरिनामीं भोजन । हरिनामीं शयन । निजीं निजेले ॥२॥ हरिनामीं बोलतां । हरिनामीं चालतां । हरिनामीं रडतां । हांसे देखील ॥३॥ हरिनामीं भावें । हरिनामीं असावें । हरिनामीं स्वभावें । लागलें चित्त ॥४॥ **शेख महंमद** भोळा । निजनामीं सोंवळा । वोंवळ्याचा प्रकाळा । दहन केला ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–२७). –१८१

शुच[32] सोंवळी हीन याती । नेणें विटाळ विल्पती ॥१॥ भित करूं जातां सोंवळी । तों अधिकचि निघे मळी ॥२॥ येणें न्यावें विप्र याती । पाणीयानें पाण्या धुती ॥३॥ विप्र विटाळाचें माहेर । आंघोळींत गेला संसार ॥४॥ **शेख महंमदीं** धुतलें वोंवळें । जन विजन दिसे सोंवळें ॥५॥—(गीत दुचरणी–पोत. १–२३). –१८२

सोंवळें वोवळें भाविती लटिक्या व्युत्पती **शेख महंमद** बोलती ॥धृ.॥ वोजरे सोवळ्याची दैना मनासी आणा सांगतो उघडुनी । कुशलता स्वयें स्वयंपाकी विटाळा घोकी अहं द्वैत मानी ॥ जनी जनार्दन प्रबळा तया अमंगळा म्हणती अवगुणी । विधिकर्म प्रतिष्ठान नागवण अवघी हगवण आन[32] धुतां उठे घाणी ॥१॥ तुज मंगळ जालिया झाडिती गारी भरिती तेथें पचले उकरड । खत म्हणोनि गाडे लाविती काळींत मेळविती त्याचा ऊंसा रस चढे ॥ कढे पाक गुळ शर्करा

---

२८. आम्ही ब्रह्म०

२९. ०टोणगा वधूनि भक्षिला

३०. ०भले म्हणा कोणी बुरा

३१. यातिकुळावेगळें ॥

३२. शौच्य०

गोडी विकरा सेवन करितां आवडे ॥ थुंकोनि होतें जें टाकिलें आवडी भक्षिले विधि निषेधे चर्फडे ॥२॥ नाना याती चराचर नासुनि जाली मेदिनी वरून पर्जन्य पडे । रक्त रेत पृथिविचे उतरे त्याचे येती झरे आड भरती धडफुडे ॥ किरवे बेटकुळ्या जळवासरे विती अपारे जार मरे घार पडे । अग्र उदक तया म्हणती ब्राह्मण घेती पिती तोंडें रा × सडे ॥३॥ दहा खंडाचा तुंबारा नद्या सागरा धोवूनि नेती कुश्चिळ । फेणावुनी समुद्रीं होय मीठ अवघे खारट लक्ष चौऱ्यांशीचा मळ । सोंवळ सईपाक खडु रस लोण सुरस रसना रुचाळ । ऐसे सोई करुनी वोंवळें म्हणती सोंवळें त्याचें नव्हे बा सुफळ ॥४॥ मूळ ऐका हो हिंगाचें चर्म टोणगियाचे त्यावरी मुसरद करिती । आन ते भक्षिती विप्र वेश आवडे हिंगवास सर्वेच जाणते म्हणविती । हिरवे चर्माचे बुधले भरत नाना याती घृत वैश्वदेवासी अर्पिती । सद्गुरुकृपेनें बोधसुधा **शेख महंमदा** फिटलीसे भ्रांती ॥५॥—(पद–रा. १–३).

–१८३

## ६. तीर्थें व्रतें

पृथवीचीं पापें, तीर्थजळीं फिरती । तीर्थें धुवटती [33], साधुचरणीं ॥१॥ गया गौतमी काशी, कुर्कुटाच्या दासी । ऐशा प्रत्यक्षासी, प्रमाण काय ॥२॥ ऐसे साधुनि बंध, ज्ञानें कळों आलें । भक्तिबोधें सेविले, **शेख महंमदीं** ॥३॥ (गीत दुचरणी–पोत. १–४३).

–१८४

मन कल्पना बोडीत ना । करित शरिराची विटंबना ॥१॥ बारा वर्षांची पर्वणी । केंस बोडुन नासलें पाणी ॥२॥ कामें अभिलासी नर नारी । काय करिल काशी गोदावरी ॥३॥ विधि प्रयाग वांया गेले । काग बग गोंदीं नाहाले ॥४॥ **शेख महंमद** हृदई चांग । गोदा वाराणसी अष्टांग ॥५॥—(गीत दुचरणी–पोत. १–२६३).

–१८५

ज्ञानगोंदेचे वासी । सोंवळे वोंवळे नाहीं आम्हांसी ॥१॥ जळ आंघोळी मळ त्यागी । ज्ञान आंघोळी शुच योगी ॥२॥ प्रेम बोधाचा प्रयाग । शुद्ध जाले अष्टहि अंग ॥३॥ त्रिवेणी[34] सत्रावीचा झरा । नाहीं त्रिगुण मळ शरीरा ॥४॥ शांति विवेक भट सद्गुरु । **शेख महंमद** केलें स्थिरु ॥५॥—(गीत दुचरणी–सेम. ५–११).

–१८६

काय करील गोदा काशी । वांया कष्टतील अपेशी ॥१॥ पाप फेडाया तीर्थां जाती । तिर्थीं संन्यासी अभिलासिती ॥२॥ भद्र करोनि होती होडें । त्रिविकल्प काळतोंडे ॥३॥ मन कल्पना विधवा करा । हरि तीर्थेंसी येती धरा ॥४॥ रागीं[35]

---

३३. तीर्थजळें धुव०    ३४. वाहे त्रिवेणीं०

३५. राग धरूं नका०

नका प्रेम बोधा । **शेख महंमद** शुंधा ॥५॥—(गीत दुचरणी–पोत. १–३०८).
–१८७

तीर्थांव्रतांचें अधिष्ठान । सत्य सद्गुरुचें चरण । ॥१॥ हें वचन नव्हे असत्य । रामकृष्ण गुरु सेवीत ॥२॥ तीर्थ आणिकांचें बोंगळ । महारमांगीचें रजस्वळ ॥३॥ नव्याणव कोडी राजे । गुरुचरणीं तरले वोजे ॥४॥ वोळखोनि[३६] **शेख महंमदीं** । सद्गुरु सेवीले निबंधीं ॥५॥—( गीत दुचरणी–पोत. १–२३९ ) –१८८

## ७. दुष्ट दुर्जन :

संत म्हणवी आपणा । पाते संताच्या निंदना । काळें वदन जाणा । आदि अंतीं त्याचें ॥१॥ संत हृदयीं हरि । त्याची निंदा करी । दूषण अंतरीं । हरीस पावे ॥२॥ कुडी निंदिल्यानें । आत्मा व्याकुळ पीडे । तैसी निंदा घडे । निर्गुणासी[३७] ॥३॥ स्तुती आणि निंदा । संतासंगें गोविंदा । शुभाशुभ द्वंद्वा । हरि पाववी ॥४॥ यालागीं निंदक । धरावे विवेक । विनविती भाविक । **शेख महंमद** ॥५॥—(गीत ओवी–सेम. १–४१; पोत. १–१६४). –१८९

अपवित्रासी संग । पवित्रानें केला । प्राणासी मुकला । परिसा श्रोतीं ॥१॥ पर्जन्य द्रवला । नदीं पूर आला । भुजंग कष्टीं जाला । लाटाखालीं ॥२॥ खल्लाळीं आदळतां । दुःखें उफळता । जळचरें धावतां । गिळावया ॥३॥ हंस[३८] तटीं बैसला । वाहाता[३९] देखिला । उपकारें काढिला । वांचावया ॥४॥ बहु[४०] हंस मिळाले । वर पंख घातले । कृपें पोसूं लागले । भुजंगासी ॥५॥[४१] सावध होतां काळें । घातलें वेटाळें । भक्षिलें तात्काळें । राजहंसा ॥६॥ विश्वास[४२] पवित्रें । कुजातीचा न करणें । बोलिले वचनें । **शेख महंमद** ॥७॥—(गीत ओवी–पोत. १–२५२). –१९०

दुसरा पाठ : पर्जन्य पडला । नदी पूर आला । भुजंग वाहिला । जळामध्यें ॥१॥ खल्लाळीं पडला । बहु कष्टी जाला । म्हणों जे लागला । काढा मज ॥२॥ राजहंस पक्षें । चंचुसी धरिला । कृपेनें पोसीला । भुजंगासी ॥३॥ सावध होऊनी । घातलें वेटाळें । भक्षिले तात्काळें । राजहंसा ॥४॥ अपवित्र हंस । पवित्रानें केला । वचन बोलिला । **शेख महंमद** ॥५॥—(गीत ओवी–राजवाडे संशोधन मंदिर, बाडांक १५, क्र. २३७). –१९१

---

३६. ये ऐसे वोळ०
३७. घडे हरि निर्गु०
३८. तंव हंस०
३९. भुजंग वाहि०
४०. मग बहु०
४१. मग सावध होऊनिया० तयाघा०
४२. यालागी वि०।०प्रचेनें शेख०

लटिकें आलें लटिक्याचे भेटी । आहिक्य दोघां होय चाउटी ॥१॥ नकट्या नकट्या ऐक्य जालें । त्याचें प्रेम बुचास आलें ॥२॥ चोरा सिंदळा मैत्रिकी चाळे । त्यास चांडाळ म्हणती भले ॥३॥ निंदक कपटी भाविक ढवे । पवित्रासी चालविती दावे ॥४॥ नष्टा नष्ट लागती बरे । **शेख महंमदा** सद्गुरु त्वरे ॥५॥—(गीत दुचरणी–रा. १–३०). -१९२

मैंदा नष्टाच्या गावीं । तेथें एकचि ग्वाही । सिंदळीस म्हणे आई । गर्ती भोगोनिया ॥१॥ लांच घेऊनि कुंटीण । खोट्याला म्हणती खरें । चळविती अविचारें । पतिव्रतालागीं ॥२॥ ढवाळी कुचेष्टा । साधुसंतांची निंदा । न...नष्ट गोविंदा । नावडती ॥३॥ पवित्र मोडती । अपवित्र घडिती । त्याला जाच होती । यमपुरीं ॥४॥ तस्कर परद्वारीं । हिंसक मारेकरी । अष्टांगें अघोरी । होती विष्टेचे किडे ॥५॥ विश्वासघातकी उन्मत । आई बाई म्हणत । कुकर्म भोगित । तयालागीं ॥६॥ नखटे बुचे लंड । एकाचे एक सोयरे । तयांचे धायरे । कोडी कुरचळ ॥७॥ एकोनविस विश्वें सांडे । या पापियाचे निवाडे । साधुसंत धडफुडे । ते अर्ध विश्वा ॥८॥ न सरले अभागी । म्हणविती भले । राहूकेतूचे घाले । त्या आदि अंतीं ॥९॥ दुष्टां उपदेशी । **शेख महंमद** । भावें भक्ति गोविंद । उच्चारा प्रेमें ॥१०॥ —(ग्रंथी ओवी–सेम. १–४८; पोत. १–१६३). -१९३

साधुसंतांचे धुवट । करितील निंदक । पुर्वजांसी नर्क । भोगवितील ते ॥१॥ लक्ष चौऱ्यांशी जन्मीचा । निंदका दिला कौल । निंदा करा घ्या मोल । आशिर्वाद संतांचा ॥२॥ **शेख महंमदाचे** । निंदक परिटे । धुतलें कुरटें । अविद्या मळीं ॥३॥—(ग्रंथी ओवी–पोत. १–१८५ अ). -१९४

पुरे पुरे या जनासी संनिधान न करी येथुन आलें हें गुज ॥धृ०॥ नाना परी सांगता उपदेश न धरिती लवलेश कष्टीं केलें गा देवा । गोडा गोष्टी बोलती वरदळ पोटीं कर्म जाळा ऐशा अविद्येच्या भावा ॥ विश्वास दाऊनि मजला अपघात केला दिला विषाचा मेवा । ऐसी कपटाची भावना ऐक निर्गुणा कांहीं न येचि जीवा ॥१॥ निगुऱ्यासी बोलतां वचन होय अपमान जैसी केळीसवें बोरांटी । सांगतां सिद्धांताचे आभास न धरिती लवलेश श्वान लक्षी गोफाटी ॥ मनुजासारिखें वदन व्यर्थ केलें जाण हगवण न्यायें पिटपिटी । **शेख महंमद** करी नमस्कार ऐका विचार दुर्जनसंगत खोटी ॥२॥—(पद–सेम. १–२२). -१९५

## ८. पाखांडी

अंतरीं नाहीं प्रेमा । वाचे म्हणे रामा । पाखांड्याची क्षमा । न करा कांहीं ॥१॥ संवऱ्याच्या पोपणा । नेणें स्तन पान्हा । तैसें जालें जाणा । निगुऱ्या पाखांड्या ॥२॥ दासीचे डिंगर । नेणतील पित्र । त्याला कुळ गोत्र । भ्रष्ट नष्ट ॥३॥

ऐशाचा अंगिकार । साधु करिती उद्धार । वक्ते ज्ञानधीर । **शेख महंमद** ॥४॥ —(गीत ओंवी–पोत. १–१७८). –१९६

हुरळल्या मेंढ्या, लांडग्यापाठीं लागल्या । त्यानें त्या भक्षिल्या, फाडफाडूं ॥१॥ मेंढ्या अज्ञ जन, लांडगे वेशधारी । फाडती परोपरी, करुनी शिष्य ॥२॥ शिष्यत्व नसतां, गुरु म्हणवी जगीं । पाखांड्याचे संगीं, अधःपात[४३] ॥३॥ नसतां तत्त्वनिष्ठा, पुजा मुत्र[४४] विष्ठा । भोगवी अप्रतिष्टा, नाना याती ॥४॥ **शेख महंमद** विनवी[४५], समस्तांलागूनी । नरजन्मा येऊनी, ठकूं नका ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–२४९). –१९७

गर्भ नसतां पोटीं, वनिता कळाहीन । तैसे शब्दज्ञान, आत्मप्रचेविण ॥१॥ पत्रें पुष्पें खांद्या, आंबियाच्या झाडा । फळाचा निवाडा, गोडी पोटीं[४६]॥२॥ शब्दाचें कवित्व, अनुभव पुष्प फळें । बरळे बाष्कळें, वाय फुलें[४७] ॥३॥ उचक्यां जांभया, ढुंग वायो सरे । तैसे शब्द गुहिरे, पाखांड्याचे ॥४॥ धालियाची खुण, ढेंकुर जाणावी । विज्ञान तत्त्व कवी, **शेख महंमद** ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–१७३). –१९८

म्हणवी[४८] गरोदर, घड्या बांधुनि पोटा । गर्भाविण चेष्टा, होती तिच्या ॥१॥ अनुभवाविण, तैसी जनीं सोंगें । नाहीं त्याला अंगे । आत्मप्रचा ॥२॥ सुख दुःख सोसुनी, पुत्रवंती जाली । ते जगीं मिरवली, वरमाइपणें ॥३॥ सन्मुख झुंजती, तेचि नर शूर । येरीं कटक भार, साजिरा केला ॥४॥ **शेख महंमद**, हृदयीं गरोदर । गर्भी सर्वेश्वर, सामावला ॥५॥—(गीत ओवी–पोत.१–१३). –१९९

अविनाशा निज निर्गुणा । माझ्या जीवाच्या जिवना ॥१॥ देवी देवता पाखांडं । धिग् जळों त्याचें तोंड ॥२॥ भुतें मागती सांडनें । नर्क त्यांच्या हो भजनें ॥३॥ मागोन करविती हिंसा । भक्त[४९] उद्धरेल कैसा ॥४॥ पाणी पाषाण प्रतिमा । तेथें उन्मत होती जमा ।॥५॥ वोळखोन[५०] ज्ञानदृष्टी । **शेख महंमद** निज भेटी ॥६॥—(गीत दुचरणी–सेम. ५–९). –२००

---

४३. शिष्यत्व नसतां, अंगीं तो गुरु म्हणविती जगीं । त्या पाखांडियाचे संगीं, अधःपात ॥

४४. ०पुजा घेणें मुत्र०

४५. ०महंमद ज्ञानी विनवी०

४६. ०गोडी त्याचे पोटी०

४७. जन बरळे बाष्कळे, शब्द वायफुलें ॥

४८. वांझ म्हणवी०

४९. त्यांचा भक्त

५०. ऐसें ओळखोन०

## ९. स्त्रैण

स्त्री[५१] आधीन, असेल जो प्राणी । त्याची होईल जनीं, फटमर ॥१॥ राजा दशरथ, कैकई आधीन । राम लक्षुमण, दवडी वना ॥२॥ जानकीच्या बोलें, मृगापाठीं राम । दुःख जालें श्रम, कपिराक्षसां ॥३॥ न लागे रावण, मंदोदरीच्या बोले । देहसार्थक केलें, रघुनाथें ॥४॥ सद्बुद्धि कल्पना, परमार्थीं लावावी । सायुज्जता पावावी, **शेख महंमद**[५२] ॥५॥—(गीत ओवी--पोत. १–३०३).

–२०१

साधुच्या नमस्कारा, लाजसी गव्हारा । दासीचिया घरा, पुजों जासी ॥१॥ दासी वेश्या मुरळी, सदा ती वोंवळी । ते तुज सोंवळीं, जाली कैसी ॥२॥ तिची गुडगुडी, उच्छिष्ट प्रबळ । तेथें नित्य काळ, लावी मुख ॥३॥ म्हणविसी विडा, करिसी अनाचार । करी शुद्ध आचार, **शेख महंमद**[५३] ॥४॥—(गीत ओवी–समर्थ वाग्देवता मंदिर, बाडांक ५५०, क्र. ५५०). –२०२

## १०. संचित :

**शेख महंमदा**चे संगती । असत्या ऐसे मनुष्य मरती ॥१॥ तरि हें ब्रह्म लिखित लटकें । खळ बोलती नाना तरंगें ॥२॥ अनंत अवतार गेले जाती । त्या काय याचीच संगती ॥३॥ तत्त्वबोधें सूर खरा । चुकवी चौऱ्यांशी वेरझारा ॥४॥ याचे ग्वाहीं साधुनि बंध । नव्याण्णव कोडी राज्यां केला बोध ॥५॥—(गीत दुचरणी–सेम. १–१६; पोत. १–१९३). –२०३

दुसरा पाठ : दुसऱ्याचे ठावे गुण, आपण सळों नये । परब्रह्मीची सोये, धरवी माव ॥१॥ आपलें संचित उत्तम, दुसरा पापरासी । बैसोनि त्यापासी, विभाग न घेणे ॥२॥ संचितें संचित, करूनि जतन । भाविकां दिधलें धन, **शेख महंमदीं** ॥३॥—(शीर्षक " वैराटिका "–रा. १–६; पोत. १–१६८). –२०४

ज्याचें मुखीं नाम कीर्ति । ते हो विश्वाचे सारथी ॥१॥ करिती आनंदें कीर्तन । तेणें पुनित होय जन ॥२॥ ऐसे प्रताप जयाचे । **शेख महंमद** वदे वाचे ॥३॥—(गीत दुचरणी–सेम. १–३). –२०५

कर्म करूनि अकर्ता । जैसा वाजोनि मृदुंग रिता ॥१॥ दर्पणीं भासोनि आभास । रूप न लागे तयास ॥२॥ डोळां बाहुली हालत । परि डोळियांसि

---

५१. " अस्त्रि " असा उच्चार सर्वत्र येतो.

५२. ०महंमद म्हणे ॥

५३. हा अभंग तुकोबा व गोसावीनंदन यांचें नांवांवरहि येतो. पंडित गाथा क्र. २०६६.

अलिप्त ॥३॥ जळीं कमळिणी प्रबळ । पाण्यां न धरिती जळ ॥४॥ **शेख महंमदीं** तत्त्वकळा । रंगा न धरी स्फटिक शिळा ॥५॥ – (गीत दुचरणी–सेम.१–२).
-२०६

कर्म बळिवंत दारुण । यातायाती दावी भ्रमण ॥१॥ देव दानव नारदमुनि । कर्मे विष्णु केला मोहनी ॥२॥ कर्मे पिडिलें इंद्रचंद्रा । ब्रह्म कपाट जोगी शंकरा ॥३॥ कर्मे पार्वति भिल्लिण केली । वनीं अहल्या शिळा जाली ॥४॥ सीता रामाची पतिव्रता । गेली राक्षसांच्या हातां ॥५॥ धर्मराजा पवित्र जाला । कर्मे कळी खांदा सुळ दिल्हा ॥६॥ कृष्ण पांडवांचा सारथी । कर्मे वनवासी पीडती ॥७॥ नळ दमयंती आव्यशंक । कर्मे लाविली त्याला भिक ॥८॥ कर्मे गुंजेसी तुकलें सोनें । नद्या गोड सिंधु खारेपणें ॥९॥ रामलक्षुमण कर्मे पिडिले । अहिरावणें बंदीं घातलें ॥१०॥ पालथ्या पाये राया नवग्रह । कर्मे रावण त्यावरून फिरे ॥११॥ अमर सोन्याची लंकापुरी । परि रावण केला भिकारी ॥१२॥ म्हणती ब्रह्मलिखित चुके ना । ब्रम्हा कन्या भोगी कर्मपतना ॥१३॥ ऐसीं कर्मे सद्गुरुची दासी । नष्टा दुष्टा पतिता नासी ॥१४॥ **शेख महंमद** भावें नीट । कर्म जन्मांतरिपासूनि सुटे ॥१५॥ —(गीत दुचरणी–सेम. १–७८; पोत. १–२८). –२०७

संचित आचरे जना । जें आंवडे निर्गुणा । चादुकोळ दुःख दैना । बांधित ना कर्मे ॥१॥ काजी मुल्ला शरियेत । करावा न्यायनीत । नाहीं तरी होती घात । आपपरासाठीं ॥२॥ राजे करिताती पापें । प्रधान वज्रलेपें । पृथ्वीचीं उमपें । कारकुना शिरीं ॥३॥ ग्रामातें पाप जोडे । पाटिल मुळ्या पिडे । भवकर्म पीडे । जीव जैसा ॥४॥ भट गुरु यवनांचें । पापी दंदी यमाचे । पांडे मात्रागमनाचे । काशींत जैसे ॥५॥ यातींत पापें चोऱ्या । ते पापा अंतरल्या । साधुसंतीं बरिया । जाळिल्या कैदी ॥६॥ स्त्री ज्याची पापी । त्याला यम दापी । जैसा खाटिक कापी । अजापुत्र ॥७॥ शहाण्णव कुळें याती । पुरोहिताला वंदिती । त्यानीं राखावे जती । सतत पैं ॥८॥ शिष्याच्या पापें गुरु । पावेत पीडा उपचारू । जैसे जळता डोंगरु । पाषाण फुटती ॥९॥ अनंत पाप अपार । घडले असतील अविचार । साधूचा निर्धार । **शेख महंमद** म्हणे ॥१०॥—(ग्रंथी ओवी–रा. १–३२). –२०८

## ११. आचार बोध

कासी नेस उडसी । जनाला सांगसी । ते गुण मानसी । न धरी लंडा ॥१॥ सांगसील जैसे । वर्तसील तैसें । उद्धरे विश्वासें । सकळ लोक ॥२॥ सांगे तैसी करणी । परमार्थ विज्ञानीं । भावें तत्त्व ध्यानीं । **शेख महंमदा** ॥३॥—(गीत ओवी–पोत. १–१८६).
–२०९

प्रपंची असतां, परमार्थ साधिले । आत्मज्ञानी बोधिले, **शेख महंमद** ॥१॥ अंडी घालुनि थडी, जळांत कासवी । तैसा लक्ष लावी, परब्रह्मीं ॥२॥ कीटकाची लक्षी, भृंगीपाशी होती । ते जाली उडती, अनुसंधानें ॥३॥ चाकर चकोर, भूमिवरी असती । त्याचे निष्ठे द्रवती, रवि शशी ॥४॥ ऐसी निष्ठा देखुनि, सद्गुरु आत्मज्ञानी । हृदय भेदुनि, प्रकाश केला ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–२५८). –२१०

मी माझें कवण, हें करी शोधन[५४] । वावगे कथन, वरळूं नका ॥१॥ मीपण हें माझें, मीपण हें तुझें । भ्रांतीचें हें वोझें, टाकुनि पाहे ॥२॥ मीपण हें जळे, तूंपण हें पळे । तंव ते न्याहाळे, स्वरूप डोळां ॥३॥ खुपे ना हें नेत्रीं, व्यापक जगत्रीं । जेवीं कमळपत्रीं, ना थरे[५५] पाणी ॥४॥ बाहुली ही ऊर्ध्व, द्वैताचा हा छेद । तया **शेख महंमद, महंमदीं**[५६] ॥५॥—(गीत ओवी–सेम. १–३१ पोत. १–२७०). –२११

हरिभक्त म्हणविणें, शुद्रीसी रमणें । तें पाप जाणणें, वज्रलेप ॥१॥ बोले ब्रह्मवाणी, मन विषय ध्यानीं । तें वदन खंदणी, परिटाची ॥२॥ हृदईं शुच[५७] सोंवळा, नाम जपे सोऽहं लीळा, कमळिणी सोज्वळा, अतित जैसी ॥३॥ परद्वारीं लंपट, नका मानूं वाईट । सेवा पैं चोखट, साधुचरण ॥४॥ **शेख महंमद** वचन,[५८] बोलिले सगुण । सांडुनियां अवगुण, भाव धरा ॥५॥—( गीत ओवी–सेम. १–४७ पोत. १–७६, १–२६४). –२१२

मनाची भाकरी, मज द्या न्याहारी । मग द्यावी द्वापारी, लक्ष चौऱ्यांशी ॥१॥ पाणी पाणी म्हणतां, जरी जाय तहान । तरी उद्धरते जन, म्हणतां हे ॥२॥ साकर साकर म्हणतां, होय तोंड गोड । ऊद्धरती मूढ, म्हणतां राम ॥३॥ विष्णु वस्त्र ध्यातां, त्वरित हिंव पळे । तरीच ब्रह्म कळे, शब्द वाचाळा ॥४॥ शेळीच्या गलोल्या, दुध मुत्र नाहीं । हालतील वांई, स्तनें जैसीं ॥५॥ **शेख महंमद**, झकेत ना खरा । ऐक सर्वेश्वरा, विभुति बोध ॥६॥—(गीत ओवी–सेम. १–४७). –२१३

श्रोतेराज ऐका, सांगतो गुज टीका । विवेक आइका, परमार्थाचा ॥१॥ श्वानाच्या लवेच्या, काश्मिरी शाला । बांधिती डोईला, ब्राह्मण संत ॥२॥ हिरव्या चर्मावरी, हिंग तो मळिला । तोंडिये भक्षिला, सोंवळ्यांत ॥३॥ मांजराचें अंडी, जवादि निपजावी । तें भावें चर्चिली, पवित्रांनीं ॥४॥ कस्तुरीची बुन्यादि, मृगनाभीं सुसरी । तिचे अधिकारी, वलीऋषिसंत ॥५॥ चारी खाणी नासुनी, सिंधु फेंस मीठ । विप्रा तिर्थ साद्दष्ट, चराचराचें ॥६॥ साधूच्या तिर्थाला, लाजतील लंडी । दिसती पाखांडी, **शेख महंमदा** ॥७॥—(गीत ओवी–सेम. १–२६). –२१४

---

५४. साधन–सेम.

५५. घरे–सेम.

५६. महामुनि–सेम.

५७. शौच्य.

५८. यवन–सेम.

तमाखुचा धूर, इतरां वोंगळ । द्विज घोटी लाळ, हुरका मागे ॥१॥ खिस्तिलागी फिरे, महारामांगीचीं घरें । बोलत अनिवारें, झवाझवी ॥२॥ खांद्यावरी वह्या, महारामांगीचीं नांवें । वसे झवाझव, स्वप्नामाजी ॥३॥ वोंवळे शुद्री महारें, बाटयिली घरें । कुंथाकुंथी अविचारें । कृत्रिम्याची ॥४॥ शुद्रीचें चरण, जानव्या लागती । ब्राह्मण जाये होती, दासीच्या कुसीं ॥५॥ सिंदळिक लाव, हिनाची चाकर । ते कैसे पवित्र, म्हणावेत ॥६॥ जैसी वांछा पेरिती, पुन्हां तैसेच पावती । बोल हरिप्रती, ठेवूं नये ॥७॥ परमार्थाचें बोलणें, शूरत्व वचनें । विवेकाचें जिणें, **शेख महंमदा** ॥८॥—(गीत ओवी–सेम. १–४). –२१६

आपली वाणी थोरी, संताची निंदा करी । यातना यमपुरीं, होती नष्टा ॥१॥ आपली स्तुती आनंद, संतांच्या पातें निंद । भोगितो नष्ट दंद, लक्ष चोंऱ्यांशी[५९] ॥२॥ म्हणोनि साधुनिंदा, न करावी कदा । वंदावें सर्वदा, अनन्य भावें ॥३॥ संतांचें स्तवन, न करी जें वदन । ते जाणावी वाहाण, चांभाराची ॥४॥ संत स्तुति जे वाचे, ते दारवंटे मुक्तीचे । आत्मनिष्ठा साचे, म्हणे **शेख महंमद** ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–२). –२१७

दिलें दान उच्चारी, हिन भांडणगारी । होऊनि संवरी, मागे रुका ॥१॥ हरिभजनीं भजले, वांछेसी पाव जाले । ग्वाही घ्या वहिले, बंध[६०] मुखे ॥२॥ पेरिलें फळां येतें, बुडे ना सत्य जाणा । सोळा सहस्र गोपांगना, सोळाच्या कृष्णा ॥३॥ साक्षी ग्वाही असोनि, मागे पुढें पाहाती । जोंधळे घालिती, भूमिपोटीं[६१] ॥४॥ साधु भूमि हरित्या, आशिर्वाद देती । भावें संकल्पिती[६२], दानशिला ॥५॥ भाव तैसी सिद्धि, संचित तैसी बुद्धि । कर्मा ऐसा विधि, आचरों लागे ॥६॥ ऐके ना म्हणीले, किती सांगो बोले । कष्टीं संतां केलें, खळ पाखांड्यानीं ॥७॥ नाहीं काम भजन, पाप पुण्य जळे । आयुष्य मावळे, मुळचेंमुळीं ॥८॥ विवेक सांगती, **शेख महंमद** । भाव भक्तिबोध, सद्गुरुचरणीं ॥९॥—(गीत ओवी–पोत. १–७५). –२१८

ब्रह्मा विष्णु रुद्र, फोद्याचे कामारी । तेच चाली थोरी, या लोकांत ॥धृ.॥ फोद्यापुढें देव, आठवीना दुजा । ब्रह्मचारी वोजा, स्वप्नीं भोगिती ॥२॥ फोकलीनें नाथिले, देव दानव ऋषी । हरिहरब्रह्मादिकांसी, चेंड्याचें वेड ॥३॥ बोचा अमंगळ, शरिराची मोरी । तेथें अविचारी, माळती धिग ॥४॥ मुखें वाचितो पुराण, पुदडियाचें ध्यान । व्याकुळ जिव प्राण, योनीलागी ॥५॥ सरे मळ मुत्र, पादाची दुर्गंधी । वाहे वोंगळ पुदी, विटाळानें ॥६॥ चर्म त्वचा रक्त, मांस हाडें गुद । जंत कृमी बुदबुद, जठरापोटीं ॥७॥ घाम शेंबूड लाळ, मेंदु चिपडिका

---

५९. ०चौऱ्यांशी दुःख ॥ ६०. ०वहिले साधुनि बंद०

६१. द्रव्यें जोंधळे० भूमिच्या पोटीं. ६२. ०संकल्प पडती दान०

जळ। यावेगळीं वळवळ, वालिखांची ॥८॥ साबां नाडीचे झांट, कवटाळित खोट। विषई मन न विटे, कैसेनि जोडे हरि ॥९॥ भग ऐसी आवडी, ईश्वरीं लावा गोडी। सद्गुरु बंधन तोडी, लक्ष चौऱ्यांशी ॥१०॥ जिव वित्त सर्वस्व, भगाचा लुलुस। ध्याती नित्यानित्य, पंडित भले ॥११॥ बाळा चेतना असे, कल्पिता ना फोदा। **शेख महंमदा,** विषय तैसे ॥१२॥—(गीत ओवी–पोत.१–१). –२१९

नकट्याची बुचा देतसें ग्वाही। जिसी रमे तिला म्हणे आई ॥१॥ आईबाई म्हणोनि भोगिसी रांडा। आदि अंतीं काळतोंडा रे भांडा ॥ २॥ साधुसंतांच्या करी चेष्टा। आपण स्वदासीचा बेटा ॥३॥ पवित्र साधु वैकुंठ जाले। चांडाळ दोषी निरय पावले ॥४॥ निटनिटके आचरावें बरें। **शेख महंमद** संती विचारें ॥५॥ —(गीत दुचरणी–रा. १–३१). –२२०

जळो पापियाची दृष्टि। पापरूपें पहाती भ्रष्टी ॥१॥ नाहीं बंधन वासनेस। परनारीचा अभिलास ॥२॥ होती जन्म मदनें वेडे। तीर्थीं व्रतीं पाप घडे ॥३॥ कल्पनेच्या झांका थोरी। गीता वाचुनि अविचारी ॥४॥ पापें पाप विस्तारें त्याचें। **शेख महंमद** वचन साचें ॥५॥—(गीत दुचरणी–पोत. १–३०४). –२२१

ज्यानीं लवण सेविलें। त्या विश्वाचें तीर्थ घडलें ॥१॥ कैसें दुपितां हिन विप्र। दावा विवेकें पवित्र ॥२॥ क्रोध कल्पना वोंगळ करी। मिथ्या विधिनिषेध थोरीं ॥३॥ जनार्दनें जन सोवळें। पापें संज्ञा म्हणतां वोंवळें ॥४॥ समदृष्टी विवेक उक्ती। **शेख महंमदा** भावें भक्ति ॥५॥—(गीत दुचरणी–पोत, १–२४१). –२२२

दो दिवसांचा पाहुणा। संवसार जाईजे ना ॥१॥ चित्त शुद्ध आचरावें। कोणा वाईट न बोलावें ॥२॥ एकएका मरामरी।[६३] वैराग्यें नाठवी हरि ॥३॥ जैसें दानवें रेंग्यांत। तैसे अविचारी मातत ॥४॥ जन्मोनी देवा पावला। **शेख महंमद** कीर्ति आला ॥५॥—(गीत दुचरणी–पोत. १–२४०). –२२३

काय दाखवितां थोरी। नाम मांडोनी बाजारीं ॥१॥ नाम विकोनियां नफा। म्हणती पुण्यें जोडती पापा ॥२॥ न भरे पोट जया। तेणें कांस्या त्या भराव्या ॥३॥ **शेख महंमद** म्हणे शुद्ध वागा। न भरे पोट भिक मागा[६४] ॥४॥—(गीत दुचरणी –सेम. ५–४). –२२४

ऐसा आचार नव्हे बरा। आधीं हृदय निर्मळ करा ॥१॥ तैसें भजन नोव्हे रे भोंदु। पोटी अविद्या वाचे गोविंदु ॥२॥ डौरकार दांभिक बोले कां बरा। उदकीं मच्छालाची वाघुरा ॥३॥ चंचळ परीं याग भट बोलती वाचे। चंचळ अविद्या नागवी नाचे ॥४॥ कवडियानें पहा अभ्यास केला। आंघोळी करून घाता

६३. एक पुढें एका० ६४. शेख महंमद शुद्ध वागा।

पातला ॥५॥ **शेख महंमद** हृदईं स्मरा । नामें तोडिला अविद्येचा थारा ॥६॥ —(गीत दुचरणी–पोत. १–२१०). –२२५

ऐसा आचार नोव्हे बरा । आधीं हृदय निर्मळ करा ॥१॥ कागा गोदेची आंघोळी । बाहेर आल्या विष्टा रवंदळी ॥२॥ जप तप केली काशी । मन उमगी शूद्री दासी ॥३॥ विधि निषेधेसी भला । चंचळ चित्तें नागवला ॥४॥ **शेख महंमद** सद्गुरु भक्ति । नेणें आचार ना व्युत्पती ॥५॥—(गीत दुचरणी–सेम. १–४९). –२२६

नको सांडू घर रे नको सांडू दार । एक सांडी देहप्रपंच दांभिक अहंकार ॥१॥ घेतला योग प्रकार नेणसी । वासना फिरे दाहीं दिशीं ॥२॥ घरचे केसकरीचा घेऊनियां वीट । बोडकी कल्पना वागविसी धीट ॥३॥ राग द्वैत प्रताप महार मांग । शुच होऊं नेदी चित्त कां घेतलें सोंग ॥४॥ यावेगळें बावशाचे दळवाडे । काय तजीले सांग मजपुढें ॥५॥ याचें प्रायश्चित घेऊनि होई पां साधु । म्हणे **शेख महंमद** न लगे बाधू ॥६॥—(पद–पोत. १–२१). –२२७

...ग...ने भाडानें बुडविलें संतपण । पुतळीचे सोनें पितळ केलें परमार्थासी हा...ईली घाना । छेदावी ती ग्रहण उठा...चे ॥ त्यागिल्या रांडापोरें । लाविले दारोदारीं । सि...जीने घर बळकाविले । टाकुनि मुंडासे । बांधिलें रुमाल । . कान भले हिजड्याचे ॥ फोडोनि बांगड्या मनगट्या बांधल्या । वेश्या दासी भल्या न ते संत ॥ वेश्या आराधे नी...मुरल्या गोसाविणी देवाच्या...हे...नी भागविसी ॥ प्र...से प्रमाण करिती अनाचार । माराच मारप जाराचे ॥ **शेख महंमद** वाचे बोलिले साचे । आचार विप्राचे ॥—(पद–सेम. ५–१). –२२८

भावेंचि स्मरा तुम्ही एक सर्वेश्वरा । सांडुनि दांभिक त्यजा अविद्येच्या थारा ॥धृ०॥ जोंवरी जिवास नाहीं स्वरूपीं ध्यान । पुस्तक वाचिलें त्वां राव्यासमान ॥ पारव्या मांसाचें नित्य करिसी भक्षण । अंतीं तुज होय यमपुरीचे हनन ॥१॥ आपुल्यासी आपण आधीं ओळख रे जना । सांडुनि दांभिक गाळी प्रपंच कल्पना ॥ तरीच लाधसी मुक्ति भुवना । जन्मोजन्मींची मग चुकवी भ्रमणा ॥२॥ जनांस दावाया कर्णीं घालसी तुळसीच्या माळा । या मनेंकुन होई रे सोंवळा ॥ ईश्वर भजनीं लक्ष लावी वेळोंवेळां । जैसा बाळकालागीं मातेचा ळळा ॥३॥ बहुत देखोवेखीं सद्गुरुचे म्हणविती बेटे । कमाई हिन मुख जाले खोटे ॥ पारव्यास मारितां आनंद वाटे । मोहजबा देतां अंतीं तींबई फाटे ॥४॥ ऐसें प्रचेचे बोलणें अनुभवें ओळखा रे भाई । या शब्दाची घ्या निबंधीं ग्वाही ॥ मोझा आल्यावरी काढा नाक दुन्हाई । मग भाज धरूं लागा भक्तिचे सोई ॥५॥ आधीं भावें सत्य मानिलें सद्गुरु वचन । भेदुनि षड् चक्रें केलें मन उन्मन ॥ उल्लंघूनि सायुज्जता धरिलें निज ध्यान । ये लक्ष स्वरूपीं मिळाला **शेख महंमद** मुसलमान ॥६॥—(पद–पोत. १–६४). –२२९

**शेख महंमद** बोले विज्ञान कर जोडून वंदा सद्गुरु चरण ॥ धृ ॥ ईश्वरीं भजा तुम्ही साजणी भाव समर्पुनी त्यजा दंभ अहंकारा। तारुण्य दशा हे तो चंचळ नाहीं निश्चळ माप लागलें शरीरा ॥ सकाळीची छाया दिसे थोर निशीं अंधःकार तैसें होईल अवधारा। मनुष्य जन्म ओळखा साक्षेपें नका करूं पापें स्वहीत विचारा ॥१॥ उदकीं उमटती तरंग तैसें जन्म सोंग फुटतां न लगेचि वेळ। ऐसा देह लोपेल जाणा परतोनि जोडे ना करा नाम उच्चार ॥ प्रसिद्ध उपदेश सांगितला योग्यां मानवला गर्वें नाडले गव्हार।......॥२॥ तन धन म्हणती माझें हें भ्रांतीचे वोझें पाहे स्वप्नीचें सुख। निद्रेचे अवसरीं भोजन होय समाधान जागृति जाल्या लागे भूक ॥ कन्या कुमर येणें न्यायें अनुभवें पाहे मृत्युकाळीं वाटे दुःख। बेगडाची बाहुली गुणवंता तैसी जाणा कांता मिथ्या मानस सुख ॥३॥ स्वार्थ करितां सायास महा हव्यास पाहे वोळंब्याची वोढी। पाताळीं बांधोनि मंदिर महा पसार भुजंग नांदती...डी ॥ परि ते तुम्हां तैसे होईल जाणा सावध कां व्हा ना काळ मोजितो घडी। राखत देखत पडल स्वान निजेल निधान सोडा विषय वेलांडी ॥४॥—(पद-पोत. १-२९७). —२३०

# ७

# रूपकें वगैरे

## १. गणेश :

नमिला अविनाश गणेश । खाणीवाणीचा प्रकाश । शास्त्रां न कळे ज्याच अभ्यास । वोळखा हो असोनि नाहीं जाला ॥१॥ नटारंभ मांडियला चराचरीं पहा पुरुष ना स्त्री । एक तोडिला बाहिज्याभितरीं । नाना रंगें सोंगें ज्याचीं ॥२॥ दहाहि अवतार त्याचिया घाता । भक्त तारावयाची चिंता । निर्गुणीं सगुण श्रोता वक्ता । चारी शुन्य जाले विचित्र भुजा ॥३॥ चवदा भुवनें गण्याचेनी । स्थल जाणा बेंबिये ध्रुवपणी । शेष बारा मदभुवनी । कटी तारांगण पुष्पमाळा ॥४॥ दोन्ही दिवटे रवि शशी । धरत्री आथुरिळीती वासी । आकाश मंडप परियेसी । वासना सोडुनि मिळाली ॥५॥ पांचहि प्राण गुणाचे श्रुती । पंचविस खेळिये त्या संगती । पांकुळला घागरिया रुणझुणती । क्षमां दया टाळ वाजती ॥६॥ सवें माया हे सारजा । मन हंसावरी बैसली ते गिरिजा । करी वैखरी पुस्तक सहजा । बोलती अनुर्वाचे ॥७॥ डंब्र अहंकार प रु मा दोन्ही । शुभ अशुभ दोन्ही श्रवणी सर्व...। नारद तुंबर अनु...॥८॥ पंधरा खंडे पंधरा द्वारें । आ...औट कोडी विवरे । तेथें ब्रह्मा विष्णु रुद्र । गणासी पूजा मांडियली ॥९॥ सांगतां गणराजाचें बळ । कथा जाईल पाल्हाळ । **शेख महंमद** जीवीं निश्चळ । निर्गुण बोधीं विनटलें ॥१०॥
—(ग्रंथी ओवी–रा. १–२). –२३१

## विनायक :

विनायका स्वयंभा । कथेचिया आरंभा । आनंदें येई बा । शीघ्रवंत ॥१॥ आळवितां भावें । हृदयीं संचरावें । प्रेमें डोलवावें । बोध मतें ॥२॥ अनुहात ध्वनी । नटारंभ ज्ञानी । सत्रावी साजणी । स्त्रवें गिरिजा ॥३॥ अनुभवाचे जंत्र । गातसे[1] पवित्र । पोहिले जगत्र । सुख शांति ॥४॥ **शेख महंमद** विकती । पांचहि प्राण श्रुति । आले गणपती । विनायक ॥५॥—( गीत ओवी–रा. १–१० ).–२३२

---

१. नाम गातसे०

## २. राम :

राम नव्हे दाशरथी । कृष्ण नाथाचा पिता । तो राम तत्वता । धरा मानसीं ॥१॥ असंख्य ब्रह्मांडाची कौडी । क्षणामाजी घडी मोडी । तो राम धराडी । अंतरबाह्ये ॥२॥ असे साक्षात भूत । जीत नाम रत । **शेख महंमद** पुनित । तत्वज्ञानी ॥३॥—(ग्रंथी ओवी–पोत. १–२८०). –२३३

## ३. विठल :

कटावरी कर, चंद्रभागा ठाणा । दावितसे खुणा, भवसिंधूच्या ॥१॥ पतितां कडसूत्र, भाविकां पायवाट । दावी खुणां निकट, तटीं उभा ॥२॥ भवसिंधूची खोली, ब्रह्मांड बुडे ऐसी । तळवा संतऋषी, भिजती ना ॥३॥ आषाढी कार्तिकी, बोलाऊं धाडिती । अनुभव जाणती, ज्ञानराज[2] ॥४॥ विज्ञान तत्त्वबोधें, कळलें स्वधीयें । ब्रह्मानंद[3] स्वयें, **शेख महंमद** ॥५॥—(गीत ओवी–पोत. १–६९, १–२१२). –२३४

वि म्हणजे विकासला । ठ म्हणजे ठसावला । म्हणोनि विठल बोला । टीका प्रश्नीक ॥१॥ विठल नव्हे धोंड्या सायक । खाणी वाणी व्यापक । जैसा जळवायू पावक । सर्वत्राठायीं ॥२॥ विरहित मही व्योमा । ठकटकी शम दमा । लौकरी लाधे आम्हा । भाविक भोळयां ॥२॥ भाविक भोळयां रक्षण । श्रीहरि व्यापून निर्गुण । जैसी करिते जतन । जननी बाळका ॥४॥ हें कळों आलें पुरतें । **शेख महंमदा** भावें । कृपा केली ज्ञानदेवें । सद्गुरुभक्ति ॥५॥—(ग्रंथी ओवी–पोत. १–१७२). –२३५

## ४. पंढरी :

अनिवार पंढरी । अविनाश श्रीहरि । वाहीन अंतरीं । व्यापुनि अलिप्त ॥१॥ मूर्ती लपविल्या । अविंधीं फोडिल्या । म्हणती दैना जाल्या । पंढरीच्या ॥२॥ अढळ न ढळे । ब्रह्मादिकां न कळे । म्हणती[4] आंधळे । देव फोडिले ॥३॥ चराचरीं अविट । गुप्त ना प्रकट । ओळखावा निकट । ज्ञानचक्षें[5] ॥४॥ हरि जित ना मेले । आले ना ते गेले । हृदयांत लक्षिले । **शेख महंमद** ॥५॥—(गीत ओवी–पोत १–२६१). –२३६

---

२. ०जाणती साधु ज्ञानराज–पोत. १–२१२.

३. विवेक ब्रह्मानंदें०–पोत.– १–२१२.

४. त्या म्हणती०

५. गुरुज्ञान०

पंढरीचा महिमा । कोठें न दिसे आम्हां । पापें होतीं जमा । अनेक तिर्थी ॥१॥ तुकाईच्या द्वारीं । रोगी घुमती भारी । कोणी ना उच्चारी । हरिनाम ॥२॥ अजापुत्र शिजवती । बगाडी रांदळती । माणसें श्वान होतीं । मल्हारीचीं ॥३॥ देवतें भूतें नाचती । पापीया लागती । सांडणी मागती । वोहळे कोहळीं ॥४॥ त्रैलोक्याचा दाता । **शेख महंमद**[६] पुजिता । शरण जाय[७] अनंता । **शेख महंमद** ॥५॥—(गीत ओवी-पोत १-७९). —२३७

निर्शून्ये निराळा श्रीहरि । सगुण साकारला पंढरी । रुक्मिणी माया हे सुंदरी । इच्छियेली दुजी ॥१॥ चौदा खणाची पंढरी । सप्त सागर भीमा साजिरी । निःशब्द वेणुनाद धुमधुम करी । अनुहातें ॥२॥ नव खंड पृथ्वीचा फेर । भीतरीं मेरु आणि मांदार । आणीक अष्टहि गिरीवर । पवन धूप दीप ॥३॥ अकस्मात मेघांचें तर्पण । पुष्पें पुजा तारांगण । रवि शशी दिवटे गहन । फेरे घेती ॥४॥ ध्रुवाएवढी उंच दीपमाळ । तेज प्रकाशलें प्रबळ । व्यापुनि श्रीहरि निश्चळ । स्वयंभु असे ॥५॥ मही एवढा बैसकार । यात्रा भरली चराचर । आनंद करिती सुर नर । हरिनामाचा ॥६॥ उत्तर दक्षिण पूर्व पश्चिम । चारी दारवंटे कायम । त्यांत चौऱ्यांशीचा नेम । होय जाये ॥७॥ तरुवर अठरा भार वनस्थळी । देवता तेहतीस कोडी न्याहाळी । तीहीं आंत वनमाळी । क्रीडत असे ॥८॥ ऐसी बाहिजकार पंढरी । देह शुद्ध सांगेन परोपरी । सावध व्हावें क्षणभरी । **शेख महंमद** म्हणे ॥९॥ —२३८

ऐसी बाहिजकाराप्रमाणें । औट हात निर्मिली निर्गुणें । तिची सांगेन ऐका ठिकाणें । संतश्रोत्यांप्रती ॥१०॥ आधारीं गण स्वाधिष्ठानीं ब्रह्मा । मनपुरीं विष्णूचा महिमा । अनुहातीं शंकराची सिमा । शिवपुरी ॥११॥ विबुध कंठकमळीं आत्मा जाण । अग्नि द्विदळीं प्राणाची खुण । औट मातृका हंस अनुसंधान । परिसा श्रोते ॥१२॥ पिंडापासूनि ब्रह्मांड जाण । त्रिकुटी विहंगमाचें उड्डाण । पुढें मीन मार्गाची खुण । अर्ध्व ऊर्ध्व गती ॥१३॥ आहिक्यीं श्रीहाटापासून । पुढें गोल्हाट जाण । औट पीठ अर्ध मातृका निरंजन । लक्षीयलें ॥१४॥ पुढें भ्रमर गुंफा सीखर । सत्रावी भीमा वाहे साचार । भाव पुंडलिकाचा निर्धार । देखोनि उभे हरि ॥१५॥ गरुडाची टीका दिधली मना । बारा सोळा गोपिका जाणा । भक्ति नवविध निर्गुणा । राधा भाळलीसे ॥१६॥ सांडुनि छत्तिसाची यात्रा । **शेख महंमद** जाला सामोरा । ब्रह्मरंध्रीं स्वयंभ ईश्वरा । दरशन जालें ॥१७॥ —२३९

मग ग्रासिले ज्यालेपणें । जैसें काष्टीं निवडे हुताशन । आपल्यास आपण करी दहन । तदन्यायें जाणा ॥१८॥ हें तंव संचिताचें फळ । संतामहंतांची पायधूळ । सद्गुरुकृपा जालिया निर्मळ । साध्याविण ॥१९॥ **शेख महंमद** नाहीं नांव । स्वयंभु सदोदित वसावें । जैसें रविबिंब दिसावें । शुभाशुभ ठायीं ॥२०॥—(ग्रंथी ओवी-पोत. १-३६). —२४०

---

६. त्यासी शेख०

७. जाये त्या अनंता । म्हणे शेख०

## ५. ललित :

ललितीं ललित जालें । भक्तिबोधें फळासी आलें । शाम गुज बैसलें । डोळां माझ्या ॥१॥ कथा केली पूर्ण भावें । मग जालें ललित ठावें । सावधपणें ऐकावें । श्रोताजनीं ॥२॥ ललित कथेचा विश्राम । भक्तिबोधाचें तें प्रेम । ऐकतांचि तुटे श्रम । अविद्येचा ॥३॥ **शेख महंमद** पर गाता । लोपोनि गेल्या अनेक वार्ता । श्रोत्यांच्या स्वहिता । केला उपाय नामें ॥४॥—(ग्रंथी ओवी–पोत. १–२४). **–२४१**

## ६. वासुदेव :

वासुदेव मिसें गा संत घालिती फेरा । संचित थोर होतें वासुदेव आले घरा ॥ मन बुद्धि वाहिली ज्यानीं त्याचा चुकला फेरा । अखंड मुखीं नाम तेथें धरिला थारा ॥धृ॥ शरीर संपत्ति याचा काय भरंवसा । तारुण्यें विटंबलें आली वार्धक्य दशा ॥ गात्रें हे गळून गेलीं दिसे मढें जैसा । तरी काळ सोडी ना हातीं घेतला फांसा ॥१॥ आणीक एक दृष्टांत ऐकावा प्रचिती । जळीं जळचरें आनंदें फिरती ॥ कोणीकून ढीवर आला जाळें घेऊनी हातीं । अवचितें जाळें टाकी बापुडीं काय करिती ॥२॥ तैसी परी होईल नको राहूं निश्चिती । कांहीं एक हित करी धरी संतसंगती ॥ उंदिराचे टोपे बा कौतुकें फिरती । अवचितें बोका झडपी बापुडीं काय करिती ॥३॥ तैसा काळ देहाला जपतो वेळोंवेळा । शरीर जाइजणें यास मृत्यू लागला ॥ सद्गुरुकृपेविण कैसा व्यर्थ गेला । सद्गुरु महाराज मदारी **महंमद** शरण तुला ॥४॥—(पद–पोत. १–१६). **–२४२**

वासुदेव घालितो घिरटी ॥धृ०॥ अरुण रूप पांवलों भिकारी । वेष धरुनि आलों बाहेरी ॥ शाण्णव कुळ्यांस म्हणे वदा हरि । देखोनि पळती सुंदरा नारी ॥१॥ नगर नारी म्हणती वासुदेवा । निद्रा भंगितो हा मारावा ॥ सावध करितो सासुरा भावा । भीक न घालित करिती दावा ॥२॥ मग वासुदेव बोले बोल मशीं दावा केल्या वंचाल ॥ द्वारा नर्काच्या शीघ्र जाल । लक्ष चौऱ्यांशी फेरे खाल ॥३॥ सोऽहं सावध धरा तत्त्व धीरा । तेजा रळी विषये अनाचारा ॥ भावें भक्तिसी आनंद करा । तेणें आवडाल तुम्ही ईश्वरा ॥४॥ तोडुनी अहंकार द्वैत भ्रांति । धरा क्षमा दया निज शांति ॥ **शेख महंमदीं** सद्गुरु भक्ति । नामें पावले सायोज्य मुक्ति ॥५॥—(पद–रा. १–६४). **–२४३**

वासुदेव घालितो फेरा ॥धृ०॥ वासुदेवाचे मिसें फिरे । सावध करिती लहान थोरें ॥ एक आइकोनि अडकती द्वारें । कोणी न ये निज भिक सामोरें ॥१॥ त्रिकाळ चुकवुनी करितो फेरा । कोणी जागा कोणी निदसुरा ॥ भावें भजा सांडा अहंकारा । शरण रिघा सद्गुरु माहेरा ॥२॥ आरतें सोडूनि परतें जागा । घर जाळून

वैरागी व्हा गा ॥ विषय कल्पना संग तुम्ही त्यागा । साधुसंतांचे चरणीं लागा ॥३॥ अनुहातें टाळ वाजविती । क्षमा दया चिपळिया बोलती ॥ विवेक अक्षर नाम गाऊं सती । बोध भिक्षा दिधली श्रीपती ॥४॥ सांडा वाद द्वैत भ्रांति । त्यजा मी तूं–पण धरा क्षमा शांति ॥ नका जाणीवेची अहं मती । ऐका वासुदेवाची विनंति ॥५॥ शीघ्र जागा रे पहिला पहारा । दीप आहे तों करा वारा सारा ॥ ना तरी पडाल चौऱ्यांशी अंधारा । **शेख महंमद** वासुदेव खरा ॥६॥—(पद–सेम. ५–७). –२४४

## ७. जोगी :

जगीं जागे जयवंत योगी । निजवी उठवी जगालागीं ॥ नर नारी नव्हे सौभागी । सर्व भोगूनी तो अभागी ॥१॥ चराचर खाणीवाणी पाळी । त्याचा दास चंद्रमौळी ॥ लक्ष चौऱ्यांशी न्याहाळी । ऐसी ज्याची ब्रीदावळी ॥२॥ मायादेवी त्याची चेली । जन्मा आली नाहीं गेली ॥ बाळें बावन पंचविस व्याली । खाऊन वांझपणे मिरविली ॥३॥ भोगी चौदा भुवनें उंच । सत पाताळाही नींच ॥ ऊदरीं दहा खंडें नाच । भोगी अभोगाची रुच ॥४॥ मुक्ति रिद्धि सिद्धि दासी । माळा तारांगण रवि शशी ॥ **शेख महंमद** वंदी त्यासी । तेथें नाहीं दिन निशी ॥५॥—(पद–चौचरणी गीत–पोत १–२४५). –२४५

## ८. पांगुळ :

धर्म जागो म्हणतसें, सोऽहं बोधाच्या हरुषें । नीळारंभ तरुवर ऊर्ध्व चढलों बा सायासें ॥ नवहि खांद्या सांडूनि दसवे खांदीवरी बैसे । आळविता बा दातियाला नांव सद्गुरुचें पुसे ॥धृ०॥ सहज नेत्र गेले वोजे पराहुनि परतें समजे । खुंटली धांव मनपवनांची द्वैत अद्वैतीं लाजे ॥ कामाविण काम जाले प्रेम प्रकाशीं माजे । कर्म धर्म नाहीं तेथें आनंद आनंदीं निजे ॥१॥ उत्तम दान सद्गुरुचें तेणें कोंदलें त्रिभुन । येरें सुखें काय देती ज्याचें चित असें हिन ॥ तेणें दिधली निज रोटी त्याणें जालें समाधान । उदक पाजिलें सत्रावीचें तेणें गेली माझी तहान ॥२॥ दाते म्हणविती परोपरी न ये सद्गुरुचि सरी । जन्म मरण खंडण तेणें केली पुरुषार्थाची थोरी ॥ दोन्ही नेत्र दवडुनि माझे केलों ज्ञानाचा भांडारी । **शेख महंमद** धर्म जागो नित्य हरिनाम उच्चारी ॥३॥—(पद–पोत. १–२४७). –२४६

धर्मदाता जनार्दन, पांगुळ मागती दान ॥धृ॥ मन पवन दोन्ही हाले पन्नास पांगुळ बैसविले । मागावया चारी हाट लक्ष चौऱ्यांशी सिद्ध आले ॥ सद्गुरु दाता न भेटतां बहु चुकुर कष्टी जाले । दुःख यातना नानापरी यमनेमेंसी गांजीलें ॥१॥ दाटण जाली पांगुळला ईश्वर उचिता आला । दिधला मज मदन मस्त तोहि बहु दापूं लागला ॥ पांगुळें आधाडिलें वेसन बुद्धीची घाला । चित चऱ्हाट लावूनियां

ज्ञानफोक मारा त्याला ॥२॥ पांगुळका गोमाशांनीं व्याकुळ केले तिन्ही हाले। दंभ क्रोधें शिंगे झाडी मदन अभिमानें डुले॥ फुंपतसे चेतनेनें नाकें द्वैत श्वास चाले। आंवरेत ना पांगुळाला दटाविती साधु भले ॥३॥ मनुष्य जन्मा पांगुळ आले भावें सद्गुरु आळविलें। भादे जाले उन्मत टोणगे मुठ विवेकें घातलें॥ पुर्वेहूनि पश्चिम पंथें हाले पांगुळें चालविलें। **शेख महंमद** निर्गुणीं सोऽइं मीन मार्गे भेटले ॥४॥—(पद–पोत. १–२४६). –२४७

## ९. वणजारा :

**शेख महंमद** वणजारा। शीघ्र चालिला बंदरा। संचित भाव खरा। भांडवल ॥१॥ बैल मनपवन। ढवळा पोंवळा जाण। मुठ गर्व गुमान। थापटियेला ॥२॥ कड्या वोढे पठाडा। कल्पना वासना घडा। अभाव स्वभाव वोढा। खांदले दोन्ही ॥३॥ आंडदोरा मागले। मोहो संताप लाविले। लुलु आशा आकळिलें। दोऱ्या निबंध ॥४॥ हेतु बुद्धि वेसणीं। या परमार्थें घालुनी। घंटा गर्जा दोन्ही ध्वनी। संकल्प विकल्प ॥५॥ प्रकृति घागरवेलें। हाहूं तोरड लाविले। शांतीनें श्रृंगारिलें। क्षमा दया चंवरे ॥६॥ विधी सडका सगुण। चिताचे दाभण। धैर्याचें अटण। धरिलें धर्मा हातीं ॥७॥ स्वानंद वैराग्य। गोणियांचा सवेग। चढलों लागवेग। पश्चिमेचा घाट ॥८॥ एकविसां कड्यांवर। त्रिकुट महा खेचर। उलटोनी प्रकार। विहंगम गती ॥९॥ विवेकें शोधिला। मीन मार्गें लाधला। पुढें सिद्ध देखिला। सौदागर सद्गुरु ॥१०॥ पुजुनी गुरुधन्या। नामें भरिल्या गोण्या। परतोनि आलों पेण्या। निळारंभा ॥११॥ तळीं उन्मनीचा हाट। सिद्धां साधकांची पेठ। तराजु बळकट। जत सत पारडी ॥१२॥ प्रेमघडा उद्बोध। दांडी तत्त्व सानंद। जोखून **शेख महंमद**। देतो भाविकाला ॥१३॥—(ग्रंथी ओवी–पोत. १–३३). –२४८

## १०. सौरी–मुंढा :

सलाम गुरुनाथा, चरणीं ठेविन माथा ॥धृ०॥ हातीं डौर केलें क्षौर नेसले त्रिगुणाची साडी। अहंकार ताळ तोडून द्वैत ढुंग मोडी ॥१॥ अहा गनी प्यार मुंढा जिकीर करे ॥धृ०॥[८] किला फफरा मनी फतरा मुंढे नलिया हात। सीर फोडकर लहु दिखलावे फिरे सौऱ्याके सात ॥२॥ कानीं भोंवऱ्या निःशंक सौऱ्या फिरती चारी पेठा। सीर धनिया उचिता आला सापिका दिधला खोटा ॥३॥ तुंबा बजावे सौऱ्या नऱ्याचे दील मुंढकी जानी। आशा मनिशा चंचळ चपळा कल्पना गैबानी। ४॥ दौडिली अविद्या कुडपिली सुविद्या सौऱ्या आनंदमय। **शेख महंमदीं** सायोज्यता आतां नाहीं भय ॥५॥ हिरीस मारा चुकाया फेरा मुंढा भया

---

८. हें धृपद मुंढ्याबाबतच्या किंवा हिंदी चरणापुढें गावयाचें आहे.

रहिमानी । **शेख महंमद** मिरांके मुरिदे अल्लापर कुरबानी ॥६॥—( पद–रा. १–६२). —२४९

हरि गाऊं निर्गुणराया । तूंचि आमुचा साया ॥धृ०॥ मुळचें पाहे व्यसन आहे त्यागुणें जाले संवरी । नांव सांडी मानस दंडी उच्चारी सोऽहं हरि ॥१॥ दील सफा दीदार इनसानों नजर ॥धृ०॥ हिरीस हावा दाये मनवा ज्यान बुढा न होये । काजी मुल्ला पंडित तपी जपी पढिक न गाये ॥२॥ कल्पना संवरी आहेव नवरी मामी तीसंगें अष्टधा । पित्याचे पाठीं बसली नेटी वासना चोट फोदा ॥३॥ दील गैबाना मुंढा दिवाना सात छेतीस मुंढे । अल्ला बिस्मरे हराम करे हातमें नफस लांडे ॥४॥ नर नारी वाध्ये ना कुमारी अनिवार वोवळी । **शेख महंमदा** लाविलें बोधा न करी रळी कळी ॥५॥ खशखश भीतर आफिम जोहर तैसा जीव म्यानें हिरीस । **शेख महंमद** खाये दील हुशियार होये बेपीरसो भये खबीस ॥६॥ —(पद–पोत. १–१८७). —२५०

११९६६

## ११. कैकाये :

कैकाये सुंदरा बाळा चौदा भुवनें माझी लिळा । अनंत योगें करुण कुंवारी अबला ॥ पिता त्याला भ्रतार केला ब्रह्मचारी सोंवळा । नाम घेतां नातळे पापा जैसा रवि शशी जळा ॥ धृ ॥ येतां जातां नाहीं पिता मी तयाचें पोटीं । बीजीं झाडे पल्लव खाडे तैशा अवगाराच्या कोटी ॥ लाटा तरंगें ऐसी सावेगें आयागमनें भेटी । ज्यालें मेलें बोलती बोलें समुळीं भ्रांति खोटी ॥१॥ तत्त्वें पांच दृढा उंच ब्रह्मगोळ शिरीं । सप्त पाताळें तिन्ही ताळे दहा खंडें उदरीं ॥ मेघ चार सप्त सागर पान्हा घाली सचराचरीं ॥ सरीग नाहीं खंडें कोव्हाडी असे जिव्हाळा अंतरीं ॥२॥ खुळखुळेच्यानि ध्वनी गजर स्थावर जंगमीं गर्जती । ग्रहगण गळां भगवी लीळा शोभे सोम चंद्र ताइतीं ॥ पदार्थ चार सप्त वार अठरा भ्रांती । साहीजण चतुर गण सोऽइं आणि शक्ति ॥३॥ अक्कल कांटी आशा बोराटी धरिली विवेक हातीं । विषये श्वान पंचविस गुण कामक्रोध घोलाविती ॥ धरूं हात शकुन सांगत चैतन्या गणवती । जितुकें दिसे नितुकें नासे भ्रुवो वित्पती ॥४॥ जत सत राखा हरिनाम चाखा परमार्थी द्या बुडी । मन आंवरा कल्पना मारा नका अक्कल करूं वेडी ॥......साधुसंग धरा तोडा वासनेची बेडी ॥५॥ प्रवृत्ति मांडा मूळबंदी घाला मिठी । ज्ञानवैराग्यें अनिर्वाच्य करा गोष्टी ॥......चित भ्रु गुंडा उलटा भेदा विकंठ आत्मत्वीं पडेल मिठी ॥६॥ प्रेम बोध भाव सिद्ध त्यजा रिद्धि सिद्धि । वैकुंठपदें फजिती सांडा मंत्र विधी ॥ अपरोक्ष सांधा कर्म छेदा नका नाना बुद्धि । विश्वीं आहे सकळ हें धरा त्याची शुद्धि ॥७॥ अजासारिखें मंडळ निकें अंतर बाहिर स्वरूप । त्याचा लेश डोळां प्रकाश मध्य आणि समीप ॥ ऊर्ध्व पाहा निवांत राहा नाहीं गमन खेप । साधु संत हेंच पाहातीं जपीं तपीं बंध लेप ॥८॥

सद्गुरुसवें तोडिलें दावें ब्रह्मानंदें परब्रह्मीं । सगुणां निर्गुणां वेगळी जाणा अर्ध मातृका अवलमी ॥ नाहीं तें दिसें आभास भासे अहं सोऽहं निर्गमीं । **शेख महंमदु** आसाध साधु कैकाये स्वहीमी (स्वयंभू) ॥९॥—(पद–रा. १–६०).
–२५१

माया हे आदि शक्ति भवानी । तिच्यानें आनंद माझ्या मनीं ॥ शकुन सांगते कैकाये नारी । म्हणे भू होतील चारी खाणी वाणी ॥धृ०॥ भववी माया गुण गोरटी । उत्पति प्रळयो होय तिच्या पोटीं ॥ शुभ अशुभ वस्त्रांची घेतली घाटी । रूप कांचोळी अंगीं तटतटी ॥१॥ तिणें त्रिगुणाची विचरुनी घातली वेणी । काम क्रोध दोन्ही कुंडलें शोभती श्रवणीं ॥ माया सदा बाळंतिणी । आपुलीं बाळकें ग्रासितां न पुरे तिची धणी ॥२॥ कैकायेचें एकविस स्वर्गे उंच स्थळ । तिचे दोन्ही बाहोटे तें काळ वेळ ॥ मेघ द्रवती ते प्रेमपान्हा घालीं निश्चळ । निशीं अंधःकार तिची छाया पडे सकळ ॥३॥ कैकाये पाहतां वृद्ध ना तरुणी । सहज व्यालिया चारी खाणी ॥ आणीक गणित नाहीं ये मेदिनी । अवतार घेतां न पुरे तिची धणी ॥४॥ कैकायेचे वर्णितां आदी क बी क । तिणें भुलविलें इंद्रादीक ॥ आणीक गाळिले नेणों कितीक शंक । सिद्ध साधकां लाविला धाक ॥५॥ योगी तिच्या धाकें जागती । सुषुप्ति अवस्थे सळी बहु निगुती ॥ परि कळों नेदी आपुली मती । मदन चेतवी मस्त हस्ती ॥६॥ कैकाये अवतरे शाहाणी थोर । चौ भुवनें तिचें उदर ॥ कुसीस सादर मावले सप्तहि सागर । आणीक अ सु ही गिरीवर ॥७॥ कळ अकळ तिचे दोन्ही वाळेकरी । आणि अभिमानाची गळां सरी ॥ श्रवणीं रागा प्रपंच्याच्या दोन्ही भोंवरी । आणींक पाकोळी कामेखा जोडिल्या आर्दरी ॥८॥ ते मनपवनावरी स्वार । कल्पना वासना दोन्ही दाढा थोर ॥ आशा जिव्हा शोभे मुखाभीतर । नाना रंगले बत्तीसहि अखर ॥९॥ ऐसाच कैकायेचा वर्णिता सिणधार । पुढें बहुत वाढेल विस्तार ॥ म्हणोनि निर्गम केला लौकर । आतां श्रोते जनीं सावध व्हावें झडकर ॥१०॥ सकळ श्रुंगार ते कैकायेचे उदरीं । जेथें अवतरे तेथें तैसीच नवलपरी ॥ श्रुंगार तीमधीं ते श्रुंगाराभीतरीं । तिचा अविनाश पिता अवधारी ॥११॥ कैकाये सावधपणें वचन बोले । म्हणे माझे पोटीचं वांध्या आकळ पाहिजे जिरवितील ते भले ॥ त्यासी पहा कांहीं माझें न वले । ते जन्मा यातायाती चुकले ॥१२॥ तिचा हुडा पांचा कांबीचा । भीतरीं संचार निर्गुणाचा बोली बोले ते छपन्न वाचा । तीपासून जन्म झाला चहूं वेदांचा ॥१३॥ कैकाये ब्रह्मगोळ हुडा सिरीं घेऊनि खेळे । तिचिये हुडा चारी शुन्यें खुळखुळे ॥ रवि शशी दोन्ही मोडिती डोळे । कितेका कळविसी न कळे ॥१४॥ तिचे करी घात बोरांटी । लागे सगुणाच्या पाठी ॥ वांछा बाळक कळवळी ते पोटीं । म्हणोनि जन्म घेते सृष्टी ॥१५॥ कैकाये सावध व्हा म्हणोनि बोले उत्तर । म्हणे मज शकुन सांगतां गेले असंख्य अवतार ॥ परी मी आहे तैसीच साचार । भक्ति करा म्हणे सोडा अहंकार

॥१६॥ भ्रू म्हटल्या भ्रू होये । भ्रूवामधेंच सुर पाये ॥ जैं मी दर्पणीं रुपाची सोये । ये गा हीन निवांतराये ॥१७॥ कैकायेनें शकुन सांगितला **शेख महंमदा**लागून । म्हणे दादा पश्चिम पथिचे हातां चढेल एक निधान ॥ तें तूं पाहे पां ऊर्ध्व गहन । राहे राहे निधान होऊन ॥१८॥ आतां कैकाये बोले ते पुढिल भविष्य वचनें । हे श्रोत्यांही ऐकावीं सावधपणें ॥ बहुत थोर पातकें होतीं गहनें । ते चुकवावी श्रोताजनीं शाहाणपणें ॥१९॥ आतां पुढें होईल रे दादा एकंकार । आणि पतिव्रता निघती अनामिकांचे घर ॥ आणि जावयानें सासु होईल गरोदर । पुढें ओळखा विप्र भक्षिल गोमसार ॥२०॥ पुढें पापें करितील शिवालयामधीं । आणीक मानभावाची उडेल सुधी ॥ पुरुषासी पुरुष रमती बेकैदी । शिष्य तो गुरुतें कौतुकें निषेधी ॥२१॥ पुढें पर्जन्य द्रवेल चैत्रवैशाखाचें दिनी । आणि पीक सांडील हे मेदिनी ॥ पांचा वर्षांची कन्या रमेल परपुरुषालागूनी । पुत्र नेदी मातापित्या अन्नपाणी ॥२२॥ आतां वीस विश्वें पाप अवधारा । उत्तरमुखें शनिवारीं सायंकाळीं सुटेल वारा ॥ त्यानें पहाडे पर्वत उडोन जाती अवधारा । मग हे धरित्री निर्झर होऊनी कांपेल थरथरां ॥२३॥ वायो राहिल्या उदक वरुषेल एक मास । त्या उदकें चारी खाणी आकारतील उदास ॥ जिव जन्मल्या नेत्र होती माथ्यास । मग बारा गांवावरी येऊनि रवि तपेल सावकास ॥२४॥ याकारणें जे कोणी करितील दान पुण्य । त्यावरी ते वेळे छाया होईल जाण ॥ आणि पापपुण्याचा निवाडा करितील निर्गुण । निज भक्तांस देईल वैकुंठभुवन ॥२५॥ ऐसा कैकायेचा **शेख महंमदास** घडला ठोका । तेणें नेत्र झांकुन करेंविण लिहिला निराकारीचा रोखा ॥ आणि जन्मा येऊनि सांडिला विषयाचा धोका । परतोन जन्मा न ये कवनीं या भाखा ॥२६॥—(पद–रा. १--६७ व ६८). –२५२

## १२. जखडी

फट गे रांडे झट गे केले । अर्ध्वासाठीं ऊर्ध्व गेलें ॥धृ॥ काजळ[९] डोळां कुंकुम भांगीं । आदळ पडे अर्ध्व आंगीं ॥१॥ काजळ कुंकु वर्दळ सोंवळें । अर्ध्व टीका अंतर वोवळें ॥२॥ चंचळ रांड कल्पनाहीन[१०] । वरील गेलें वैकुंठभुवन ॥३॥ शिश्न योनी वासना[११] आंवरा । **शेख महंमद** बोले कासुरा ॥४॥ लागला बोधु खंडला वादु । जाला साधु साधनेंविण ॥५॥—(पद–रा. १–५९). –२५३

## १३. फत्तेहनामा :

**शेख महंमद** शूरपणें शब्द रत्नें । बोले संतांसी वचनें ॥धृ॥ वैराग्यें उपदेशिती स्वार कतीचा पार खडतरे हृदयीं । रंजक पेटोनि दारुगोळा करी

---

९. तुझें काजळ०  १०. कल्पनाहीन आचरण ॥

११. ०योनी मना वासना०

निर्वाळा आवाज होये ठायीं ॥ कडक कमानेचा तीर पाडी छिद्र विंधी विंधणार सोई । खंजीर माहू चाणा नेल्या पडताळीजे वोजा तैसी ॐकार कमाई ॥१॥ वाहीजे भोई नांगर दाते पिकती शेतें होती पुण्याच्या राशी । अनेक दांत उदंड असती भक्षिती कोण वर्णी तयासी ॥ तैसें कवित्त्वें उदंड चरळती पाखांड नेणती त्या तत्त्वांसी । आंधळा धर्म जागो झाडावरी नववे उच्चारी न देखतां कोणासी ॥२॥ उदंड फुलें परोपरी मिरवे थोरी न ये पाल्हाळाची सरी । चांताचे अणीवरून तंतु निघोनि वहु सुतु झांकिले नर नारी ॥ आहेत पक्षें कुळें अपार म्हणविती थोर हंसाहुम्याची कुसरी । वग ढोंक काग नदीतटीं वासना खोटी आंघोळी विष्टा विदरी ॥३॥ रात्र प्रवर्तल्या अंधारा दिसेत जनीं तारा रविप्रकाशें लोपती । अंधारा न्यायें जन अज्ञान त्यांत भूपण वेशधारी मानिती ॥ चोलतां आत्मज्ञान उजेड पळती मूढ सरड वेडुक होती । बत्ती लागतां जबर जंग चाणा करी विंगाणा भार हस्ती पळती ॥४॥ विजवा चमकोनी गगन कडाडी पापाणा फोडी तैसें सद्गुरुवचन । राजनीति नगारे कर्णे भेरी निशाणें ॥ नकटे बुचे शाब्दिक पाखांड त्याचें टेंची तोंड आत्मज्ञानेंकरून । हजरत मिरां कुफुर भजन **शेख महंमद** दीन फत्तेनामा संपूर्ण ॥५॥—(पद–पोत. १–३२). –२५४

## १४. महात्मा :

कैसा जाहालासी महात्मा । शीघ्र संग धरुनी क्षमा ॥१॥ कुळनारीचा कंटाळा । स्वयें बोडक्यांचा चाळा ॥२॥ आत्मा निश्चळ निर्विकार । तुज प्रकृति अहंकार ॥३॥ पोरें लाऊनि दारोदारीं । भोगीसी कल्पना नारी ॥४॥ डोळां न साह्य करिती । **शेख महंमदा** विरक्ती ॥५॥—(गीत दुचरणी–सेम. १–१). –२५५

## १५. तेली :

हरि दुर्बळ तुझा तेली । सद्गुरुनें कृपा केली ॥१। औट[12] हात रोविला घाणा । तत्त्वें[13] लाट फिरे जाणा ॥२॥ तीळ कल्पना वासना । शांति वोहोळुनि घाणा[14] ॥३॥ माया विपय रगडिले[15] । भाव तेल निवडिलें ॥४॥—(गीत दुचरणी–रा. १–३५). –२५६

## १६. नापिक :

**शेख महंमद** नापिक । भारणीं[16] दावी विवेक ॥१॥ काखे धोकटी हृदय जाणे । सात सांठविली विखणें ॥२॥ करी आत्मज्ञान वस्त्रा । बोडी पतिताच्या अंतरा ॥३॥ मुळुम्याची भादरी[17] दाढी । विषयांचीं नखें काढी ॥४॥ विज्ञान चिमटा

१२. धैर्य औट०

१३. मन तत्त्वें०

१४. शांति वोहोळून घाणा रगडी ।

१५. माया विषयांचे पेडींतून ।

१६. भादरपणीं०

१७. मुळुम्यासी मायाची भादरी दा०

तिखट। वेंची अहंकाराचे खुंट ॥५॥ वेऊनि वैराग्य कातरी। रज तम सत्त्व सितरी ॥६॥ सद्गुरुच्या मारण्या। थुकेविण देतो मारण्या ॥७॥—(गीत दुचरणी–रा. १–३४). –२५७

## १६. हाटकरी :

सहज हाटा आले हाटकरी। उत्तमाधम नष्ट अविचारी ॥१॥ चार खाणी चार बाजार। लक्ष चौऱ्यांशी दुकानदार ॥२॥ संचित प्रालब्ध क्रियमाणी। तोटा मुद्दल नफा हानी ॥३॥ भाव भक्ति सप्रेम वळें। नाम सांडुनि कैट जाले ॥४॥ अभक्त पापें करूनि खोती। नये पावले छीः थूः म्हणती ॥५॥ खऱ्या भांडवलें खरें घ्यावें। पेंडा विऊनि कां बोंबलावें ॥६॥ **शेख महंमद** हाटकरी भोळा। घडियाळु नाटकशाळा ॥७॥—(गीत[१८] दुचरणी–रा. १–८). –२५८

## १७. कवि :

कवि ऐसा निंदक। नाहीं हो आणिक। तत्त्व शांति पातक। नाश पावे ॥१॥ जाणीव विरोनी। कथील अनुभवी। त्या नांवें लाघवी। परब्रह्मींचा ॥२॥ अज्ञानेंसी ज्ञान। गिळलें अहं विज्ञान। समाधानें उन्मन। **शेख महंमद** ॥३॥—(गीत ओवी –रा. १–२६). –२५९

निष्ठेविण[१९] कवि भांड। जैसा गुरगुरे बुऱ्हांड ॥१॥ गोळीविण रिता आवाज। तैसी कवित्या नाहीं लाज ॥२॥ पादणार सभेंत लाजे। हांसती थुंकती दुजे ॥३॥ संवऱ्या मुंळ्या लाज नाहीं। तैसे श्रोते कवीठायीं ॥४॥ ऐसे कविते भांड नष्ट। **शेख महंमद** निज निकट ॥५॥—(गीत दुचरणी–पोत. १–१७६). –२६०

## १८. तरु–झाड :

जो दिसे तो सर्वेश्वर। भिन्नें[२०] पहाणें अविचार ॥१॥ शेंड्याकुन पहातो तरु[२१]। पत्रें[२२] पुष्पें फळें अपारु ॥२॥ खोडाकुन पहातां दिसे[२३]। **शेख महंमदा**[२४] हरि भासे ॥३॥—(गीत दुचरणी–रा. १–२४). –२६१

सुपरित[२५] विपरित। **शेख महंमद** भासत ॥१॥ अर्ध्व खांद्या ऊर्ध्व खोड। नाचे उफराटे झाड ॥२॥ मुळ्या उघड्या नाहीं माती। पल्लव थाक तोडिती ॥३॥—(गीत दुचरणी–रा. १–२९). –२६२

---

१८. मूळ नकलेंत या गीतावर "काफी राग" असें शीर्षक आहे.

१९. तत्त्व निष्ठे०

२०. भिन्नाभिन्न पहाणें०

२१. ०एक तरु।

२२. खांद्या पत्रें०

२३. एक दिसे।

२४. तैसा शेख०

२५. सम सुपरित०

## १९. हिंदोळा :

ऐका संत साधु श्रोते सज्जन । मन एकाग्र करून । एक म्यां देखिलें स्वप्न । स्वप्नामाजीं ॥१॥ स्वप्नीं जागा न निजेला । जीत ना मी मेला । ब्रह्मानंद देखिला । नेत्रेंविण ॥२॥ स्वप्नीं देखियलें वन । तें निराकार निर्शुन्य । तेथें फिरतसे वाघिण । चरणेंविण ॥३॥ वाघिण चरणाविण पाठी लागे । तयेच्या धाकें योगी जागे । मनुष्य खावयालागीं मागें । मुखेंविण ॥४॥ भयासुर वाघिणीची गर्जना । तेणें कांप सुटला साधुजनां । चौपट घात करिते प्राणां । चवडियाविण ॥५॥ आणिक एक पाहिला तमासा । पंखेविण घार झडपी दाही दिशा । उघड वागों नेदी परियेसा । शूरत्वपणें ॥६॥ आणिक एक मातला कुंजर । दहा चरणांचा भयासूर । सोळा डोळे चौफेर । खंदळी करित असे ॥७॥ त्याच्या एका एका डोळियांत । रविचंद्राहूनि अधिक प्रकाश । ढगा टाकी त्रिभुवनास । निमिष्य न लागतां ॥८॥ खंदळी करी चराचरी । तेंणें कांपतसे धरित्री । मज पाठी लागे तोंवरी ॥ ब्रैसलों हिंदोळा ॥९॥ हिंदोळा साधुसंत ब्रैसले । चौपट घातातें चुकले । विश्वातें तारक जाले । निमग्नपणें ॥१०॥ सुवेळे प्रसवला माता पिता । सद्गुरु भेटला अवचिता । **शेख महंमद** निरुता । हिंदोळा दाविला ॥११॥ —२६३

ऐका त्या वनाची रचना । लक्ष चौऱ्यांशीं भ्रमणा । उत्पत्ति प्रळयो जाणा । केल्याविण होये ॥१२॥ त्या वनामध्यें योगेश्वरा । नगरें देखिली अकरा । त्यामाजी तीन शुद्ध विचारा । वसती येरें वोस ॥१३॥ वोळखा सुईच्या अणीवर । त्या तिहीं नगराचा फेर । सप्त सागर मेरु मांदार । रवि शशी तारांगणें ॥१४॥ त्या तिन्हीं नगरास एक वाट । मुंगीच्या डोळ्याएवढी वाट । कोणी येते जाते न भेटे । तये ठायीं ॥१५॥ त्या तिहीं नगराच्या चौबारा । मुळेंहून वृक्ष लागला ब्ररा । त्यासी हिंदोळा अवधारा । लांब्र विलासे ॥१६॥ वोळखा हिंदोळा उफराटा । झोंका जातसे त्रिकुटा । तेथें मी साना मोठा । होत नसे ॥१७॥ हिंदोळा सहजें सहज हाले । झोंकें देखिले पूर्वज आपुले । हे खुण जाणती ते साधक भले । पूर्ण आत्मज्ञानी ॥१८॥ उफराटा हिंदोळ्याचा झोंक । विहंगमें देखिले तिन्हीं लोक । सिद्धां साधकां सायेक । **शेख महंमद** ब्रोले ॥१९॥ —२६४

हिंदोळा ब्रैसोनि तमासा । देखियेला कैसा । सांगतो परियेसा । श्रोते हो तुम्ही ॥२०॥ आणीक एक देखिला विचार । निशींदिनीं नाहीं अंधेर । सून नांदविल सासुरें । महा सत्ताब्रळें ॥२१॥ पांगुळ पळतसे । आंधळे पहाती तमासे । उदकाविण मासे । तळपताती ॥२२॥ पर्जन्याविण पूर आला । कोरडे नदीस विश्व बुडाला । ऐसा तमासा देखिला । सद्गुरुचेनि संगे ॥२३॥ हेत चित्त मन बुद्धि । विरोनि लागली समाधि । तेथें लोपली उपाधी । त्रिगुणाची[२६] ॥२४॥ स्वप्न

२६. ‘ द्वैतपणाचा ’ असा नकलेंत शोध दिला आहे.

स्वप्नामाझारीं । वैराग्यबोधें केली हेरी । तेथें मी पुरुष ना स्त्री । अव्यक्त असे ॥२५॥ ऐसें स्वप्न पहावें सद खेळें । तरीच मनुष्य जन्म सुफळ । नाहीं तरी धिग जिणें देहे ढाळ । विषयांची ॥२६॥ पहाणेंपण गिळुनियां तमासे । देखियले कैसे । **शेख महंमद** विश्वासे । सद्गुरुसी ॥२७॥—(ग्रंथी ओवी–पोत. १–५६). –२६५

## २०. राधा :

राधा सुंदर चतुर कामिनी । अंग टाकी धरणी । म्हणे व्याकुळ केली ये कामबाणीं । वेगीं भेटवा मज चक्रपाणी ॥धृं॥ वीयें व्याकुळ करी तळमळा । जाणवी ती विजनें गोपिका बाळा । अगरचंदनें धुपविल्या चित्रशाळा । ते सुगंध लागती अग्निज्वाळा ॥१॥ जैसें तान्हेलें सोखी पाणी । दुजें चकोर उलटें चंद्रध्यानीं । धेनु वत्सला हुंबरे अंतःकरणीं । ऐसी अति निष्ठा राधे मनीं ॥२॥ सीतें पीडिलें ध्याये उष्णता । बाळक चुकल्या व्याकुळ माता । दीन याचक सारे अन्नदाता । हे राधिके चित्तीं अखंड चिंता ॥३॥ नवविधा तेचि राधा सती । भक्ति निर्गुण अव्यक्ताला ध्याती । **शेख महंमदीं** सोऽहं स्थिती । सद्गुरुकृपें फिटली भ्रांती ॥४॥—(पद–पोत. १–६३). –२६६

## २१. आशीर्वाद

जनालागीं आशिर्वाद । देती **शेख महंमद** ॥धृ०॥ सेवा[२७] संतांची घडावी । तुमचीं निसंतानें व्हावी ॥१॥ तुमचा शेणें[२८] ठाव पुसो । तुम्हा जन्ममरण[२९] रुसो ॥२॥ तुमचे दारा लागो कांटी । आयागमन पडों तुटी ॥३॥ तुमच्या नांवें यम[३०] रडो । मोक्ष सायुज्यता घडो ॥४॥—(गीत दुचरणी-सेम. १–१४; पोत. १–१९१; समर्थ वाग्देवता मंदिर क्र. ५५४, बाड ३७०, पृ. ८६). –२६७

## २२. श्राप :

**शेख महंमद** जनाप्रती । विवेकज्ञानें श्रापिती ॥धृ०॥ कनक संतान संपत्ती । तुम्हा होवो चारी मुक्ती ॥१॥ तुम्हां ऐसें बहुत होणें । भोगा राज्याचीं महिमानें ॥२॥ ब्रह्मा विष्णु रुद्र ऐसीं । भोगा पदें लक्ष चौऱ्यांशी ॥३॥ लंकानाथ ऐसें देणें । तुम्ही भोगा विषयपणें ॥४॥—(गीत दुचरणी–सेम. १–१५; पोत. १--१९२). –२६८

## २३. कलियुग :

कलयुगाभीतरीं । पातकें परोपरी । होती बा श्रीहरि । तुज देखतां ॥१॥ उन्मत्त अविचारी । लेक बापाचे वैरी । सून सासूला मारी । तोंडातोंडीं ॥२॥

२७. दास्यें–सेम. पोत. २८. शेनी–समर्थ.
२९. तुमच्या नांवें यम रुसो । ३०. काळ–समर्थ.

मायलेकी सवती । विप्र पाट लाविती । ब्राह्मणी रमती । अनामिकांसी ॥३॥ ध्वाडी भोगी चुलता । कन्या भोगी पिता । मामा करी सत्ता । भाचीसी पाप ॥४॥ पुरुष पुरुषालागीं । रमती अभागी । बहु सुटे आगी । नरनारींसी ॥५॥ पतिव्रता चळती । ब्रह्मचारी भ्रष्टती । दोघी बहिणी होती । बंधुच्या नवऱ्या ॥६॥ सासरा भोगी सून । आजा नातीलागून । रमती अवलक्षण । जावईसासू ॥७॥ पांचा वर्षा सुंदरा । इच्छिती भ्रतारा । होती गरोदरा । वर्षा साता ॥८॥ होईल एकंकार । बुडेल आचार । विप्र मद्य मच्छर । भक्षित आवडी ॥९॥ याहून पापें होतीं । श्रोत्या न सांगती । स्वहित साधुपंक्ती । **शेख महंमद** ॥१०॥ --(गीत ओवी-पोत. १-३०२). -२६९

ह्या कलियुगीची भक्ति । कोणी एक विरळा जाती सती ॥ सांडे सांडे मानभाव म्हणविती । व्यापार मैदाचे हे करिती ॥धृ०॥ शास्त्रें अविद्येची डिंबिती ने चांडाळ देखा । महद् माया सबळ हे काय निरसे ना तुम्हां । मायेच्या आसऱ्यानें ओळखिलें परब्रह्मा । त्याचा भाव सांगतो तुम्हा खातिर राखा जमा ॥ मायाचि परब्रह्म तेचि माया इतकीच करावी सिमा ॥१॥ हें मन केलें निर्गुणीं ठाऊक पडली मज खुण । निरसे हे माया जैसा बीजीं वृक्ष जाण ॥ नव्हे होय करितां वेवादिती साही जन । नव्हे म्हणतां होय जाण परब्रह्मीं दर्शन ॥ बरवी परब्रह्म मायेची शोभा भरोन । उरती चौदा भुवन ॥२॥ साकरेंत गोडीचा गाभा । वोहट नाहीं निर्गुण बसला ना उभा ॥ भरोभरीं वेगळा पोटीं मायारंभा । ॐकार कोठून उमटला याचा वोळखा । मूळ वोळख जालिया तेथेंचि तुटे जिवींचा संदेहो ॥३॥ वर्म नाहीं कळलें तोंवर पिडूं नये जीव । वोळख स्वरूपीं बोधल्याविण तोंवर म्हणूं नये मानभाव ॥ ज्यानें मानभाव म्हणवावें त्यानें मन हें आधीं वोळखावें । चित्त परब्रह्मीं लावावें **शेख महंमद** विनवी मनोभावें[31] ॥४॥—(पद–सेम. १–२७).

-२७०

## २४. प्रळय ;

अविनाश निज लिंगा दौड पातकभंगा । तुज दीन शरण आलों चुकवी चौऱ्यांशी सोंगा ॥ व्युत्पति करूं नेणें प्रेम दे श्रीरंगा । एक चित्त घेई बोध चढवुनी अंगा ॥धृ॥ सगुण या लिंग मूर्ति प्रळयकाळीं भक्ती । पर्वत मेरु गिरी रवि तारा गळती ॥ उत्तरेचा सुटेल वायो ठायीं न राहे क्षिती । होईल उदकमय सप्त सिंधू मिळती ॥१॥ ब्रह्मा विष्णु रुद्र मुनि तेच वाहे चार खाणी । देवता या तेहतीस कोटी सकळ जाती भंगोनी ॥ ब्रह्मांडीं गोळ कैचा राहे चराचर वाणी । निशिदिन दोन्हीं जाती अर्क लोपोनी ॥२॥ सद्गुरुकृपें गुज कळूं आलें हें मज । परब्रह्म धरिलें चित्तीं जालें कामाविण काज ॥ दृढ होतों स्वयंभ जालों

---

३१. ०मनोभावें या निर्गुणाला ॥

चुकली चौऱ्यांशी लाज । उत्पत्ति प्रळय नाहीं **शेख महंमदा** सहज ॥३॥ —(पद-पोत. १–२७७). –२७१

## २५. दोहोरे

नसे परनारीचा अभिलास ॥१॥

**शेख महंमद** नयनीं पाहे निर्गुण जनीं विजनीं ॥१॥ —(रा. १–५६) –२७२

शेख महंमद वैरागी । मन केलें अनुरागी । कल्पना केली सौभागी । सद्गुरु प्रेमबोधें ॥१॥—(रा. १–५७, पोत. १–१९६). –२७३

## २६. आरत्या

जय जय सद्गुरु दिगांबरा कृपाधरा माझा चुकवी फेरा ॥धृ०॥ सद्गुरु सांडुनि देव्हारे पुजिती पुजारे ते निरय भोगिती । सोनें रुपें पितळ कांसें मूर्ति सायासें सोनार ओतारे ओतती ॥ पाथरट घडिती प्रतिमा पाषाण करुनी जमा वर बैसोनी झोडीती ॥ शेंदुर गुग्गुळ विकी वाणी मुर्खालागुनी त्यास देव म्हणती ॥१॥ कींटण लेप करी चितारी हिंगुळ सारी त्यास म्हणती वीर । पहिली भाकर त्यापुढें ठेवी हावा दिवा लावी करुनी उपचार ॥ सचेतन याचे तोडुनि पाले म्हणविती भले ठेविती निचेतनावर । कावळयाच्या विष्टेंत जन्मला पिंपळ उगवला तेथें घालिती फेर ॥२॥ तुकाई ना नरसो मायराणी वसती स्मशानीं भोगें घालिती गोंधळ । अजापुत्रास वधिती भक्त म्हणविती पापें करिती तुंबळ ॥ भक्ताचे लेकीकून मल्हारी मागवी बारी वाघा वाजवी घोळ । मनुष्याच्या आकारें असती श्वान म्हणविती पिंवळे करूनि भाळ ॥३॥ ऐसें भजन आवडे जनासी नेणती दोषी करिती पापाच्या कोडी । दिड विश्व पुण्य साधकाचें तें तारक साचें सांगेन आचार्य जाडी ॥ विश्वें साडेअठरा दोषी अवधारा नर्क भोगितो परवडी । **शेख महंमद** म्हणे जनासी बंदा हृषिकेशी मनोभावें आवडी ॥४॥—(आरती-रा. १–४५). –२७४

आरते आरती सद्गुरु नभा । पंच तत्त्वें वाती प्रेमें प्रकाशल्या प्रभा ॥धृ०॥ बाहुल्या ऊर्ध्व नयनीं तटस्थ तन्मयें । लागली तत्त्वमुद्रा मन अमन होये ॥१॥ सहज समाधि बोधें विजये अरुण उदये । अनंत लोचनीं शांति **शेख महंमदा** होये ॥२॥—(आरती–पोत. १–२३०). –२७५

अविनाश दिगांबरा श्रीपरात्परा । तुजमाजी एक जालों जैसा ओघ सागरा ॥ सगुण हे तरंगन्यायें स्वयंभूषण साजिरा । असशीं निश्चळपणें उत्पत्ति प्रळयो आकारा ॥धृ०॥ तुज मज नसतां भेद मिथ्या वादविला वाद । लक्षचौऱ्यांशीं फेर हे तों बोलती वेद ॥ देवभक्त दोन्हीं नामें यांचा केलासे छेद । जीव शिव ग्रासूनियां जालों स्वयंभु सिद्ध ॥१॥ काष्टांत हुताशन तो नाहीं दिवटी आपण । मंथन केल्यावरी प्रकाशला गहन ॥ येणें न्यायें सगुण निर्गुण विस्तारलें जाण । मावळल्या उपरि हो नाहीं काष्ट हुताशन ॥२॥ डोहांत कमळिणी तैसा अलिप्त जनीं । तप्त लोही नीर

जिरें सन्निधानां दिसे नयनीं ॥ तैसा हा **शेख महंमद** निवाला निर्गुणीं । हे खुण जाणती ते साधु शुद्ध आत्मज्ञानी ॥३॥—(आरती-पोत. १-२७६). –२७६

आरती अंतरीं लक्ष दसवे द्वारीं। उन्मळ लोचन ध्वनि अनुहातें गजरीं ॥धृ.॥ जैसा हा चकोर चंद्रालागीं सादर । अंधारांतुन उठोन पतंग दीपकावर ॥१॥ मीन सांकें सांडुनि परतें लक्षण धुंडी। मत्स्य होऊनि धांवें तत्त्वें फोडूनि अंडीं ॥२॥ नभा चढते घारी परते आहारावरी । प्रेमबोधेंकून उतरून भक्ष तयाचा करी ॥३॥ तंतु ह्व्यापासुनि ऊर्ध्व चढे कांतिनी । तैसें **शेख महंमद** मन कल्पना गिळुनी ॥४॥—(आरती-पोत. १-२३७). –२७७

जयजय आरती जयवंत परब्रह्म । सहा चौ अठरा न कळे **शेख महंमद** महिमा ॥धृ.॥ जयवंत प्रभा बसला ना उभा। विधी अविध कैवल्य गाभा ॥ प्रबोधी प्रश्नीक अतीत नभा । सद चिद छेदका तत्त्व आरंभा ॥१॥ चौदा भुवनांचे औट पांड मापा । स्थावर जंगमीं पुरोन चळी द्वारीं बापा ॥ अनंत ब्रह्मांडीं निरूपम्य उमापा । अकळ न कळेसी सद्भाविका सोपा ॥२॥ वेदां श्रुति मौन्य तेथें मज कैचें ज्ञान । वाचेसी वैखरी करूं नेणें स्तवन ॥ **शेख महंमदीं** आरती करसंपुष्ट जोडून । भक्तिप्रेमें वोवाळी अव्यक्त प्राण ॥३॥—(आरती-पोत. १-२३१). –२७८

जय जय आरती अविनाशरूपा । धूप दीप वोवाळिला अजपजपा ॥धृ.॥ निर्गुण परी भासे सगुणीं शोभत । रात्र ना दिवस तेथें कैचें येत जात ॥ बाहिर ना अभ्यंतर स्वयंभ सदोदित वसत । तेथें हा निःशब्द आकाशे मात ॥१॥ पहातां ना दिसे धरत्री अंत्राळ । शब्दच नाहीं तेथें कैंचा पाल्हाळ ॥ माया नाहीं तेथें कैंचा मोहजाळ । द्वीजच नाहीं तेथे कैचा कांटाळ ॥२॥ आपच नाहीं तेथें कैंचें गुज । वायो नाहीं तेथें कैंचें तेज ॥ मनच नाहीं तेथें कैंचें निज । श्रोता ना वक्ता तेथें कैंचा परिक्ष ॥३॥ रज तम तत्त्व नाहीं तेथें कैंचा देव्हारा । द्रव्य नाहीं तेथें कैंचा व्यवहारा ॥ राजा ना प्रजा तेथें कोण मागे सारा । कर्म ना धर्म तेथें कोण दंडी तस्करा ॥४॥ यंत्र ना मंत्र पुण्य ना पवित्र । यातीच नाहीं तेथें कैंचें गोत्र ॥ प्रीतच नाहीं तेथें कैंचा मित्र । सद्गुरुकृपेनें भासे एकत्र ॥५॥ खाणी ना वाणी लक्ष चौऱ्यांशीं योनी । तेथें मी गेलों मजमाजी हरपोनी ॥ जैसें सागरीं मिश्रित सरितेचे पाणी । तैसी गत जाहाली आम्हां निर्गुणीं ॥६॥ नर ना नारी तेथें कैंचा ब्रह्मचारी । गांव ना सिव तेथें कैंचा शेजारी ॥ विप्र ना शूद्र तेथें कैंचा आचारी । सींका ना सूत्र तेथें अवघाचि हरि ॥७॥ बद्ध ना मुक्त तीर्थ ना व्रत । कूळच नाहीं तेथें कैंचें दैवत ॥ मूळचि नाहीं तेथें कैंची भ्रांत । चळ ना अचळ तेथें कैंचें येत जात ॥८॥ जती ना सती तेथें जोग ना जुगती। ॐकार नाहीं तेथें हरपल्या वेदश्रुती ॥ भावचि नाहीं तेथें कैंची भक्ति । आकार ना निराकार तेथें कैंची आरती ॥९॥ माता ना पिता तेथें कैंचा ध्येय ध्याता । भूत ना भविष्य नाहीं वर्तमान वार्ता ॥ सुषुप्ति ना

अनुक्रम .................... दि: ..................
क्रमांक .................... नों दि ..................

जागृति तेथें कैंची अवस्था । **शेख महंमद** आरती **शेख महंमद** वोवाळिता ॥१०॥
—(आरती–सेम. १, पोत. १–२७८). –२७९

जय अव्यक्ता निज गुजा ऐकें ब्रह्मबीजा पावे भक्ताच्या काजा ॥धृ०॥ निराकारीहून आकारा आणिलें दातारा मज मूळ करुनी । घातले मज संसारीं काळा शेजारीं किती सोसूं जाचणी । कामक्रोध दंभ अहंकार मद मत्सर थोर यांची सदा दापणी । अहंता ममता साजणी अक्कल शाहाणी तीस मानी ना कोणी । संकल्प विकल्प दावेदार नष्ट महा चोर बहु त्यांची कांचणी ॥१॥ मोह गर्व गुमान जाणा अविद्या वासना थोर यांचा संदेहो । मानापमान दोन्ही श्वानें भांडती अज्ञानें त्यांचा येतसे भेवो ॥ तुम्ही पण दोन्हीं राउत होऊं नेदी हित प्रसिद्ध वाजे तो घावो । रज तम सत्त्व गुण पंचविस गहाण घेऊं नेदित वावो । मन ऊर्ध्व एकें केला शिखरा चढविला जाला चौऱ्यांशीचा क्षेवो ॥२॥ निद्रावस्था सर्पिणी महा नागिणी ह्या लागल्या देखा । शंका निद्रा चिंता तिघीजणीं संता साजणी करिती पापाच्या लेखा । प्रपंच द्वैत भावना आळस नागवणा जुनाट कीं तो देखा । जांभई उचकीं ढेंकरें भूक फिरवी घरें पावो नेदीच सुखा । तरुण-पणाचा तरंग जाईजणें सोंग खरें वाटलें मुखा ॥३॥ अभावचि फिरे घरटी संताप म्हणवी जटी प्रकृतिचें जंजाळ । चेतना चेष्टा रुसी फुगी लज्जा न राहे उगी इच्छे कल्पनेचें बळ । ऐसी देहसमाधिची नांदी भंगल्या सादो ब्रिदी सांगतां वाढेल पाल्हाळ । हेत चित्त लावा निर्गुणीं दृढ होऊन ज्ञानी सांडा भूषण वेल्हाळ । जते सं......॥४॥......विध सगुण मार्ग गाईला अनुभव केला **शेख महंमद** वदला ॥५॥[३२] —(आरती–रा. १–४८). –२८०

---

३२. या आरतीवर " राग बैराटिका " असें शीर्षक आहे.

# ८

# हिंदुस्तानी कवीत

## १. वासुदेव :

आलेखोन भिश्तम्याने । सांचे पिरोंके सात ॥ खिलाफ गुस्सा मनीं मारों । मत बोलो झुठी बात ॥ चुगुल बदफैली । वो पावेंगे नालत ॥ यकीन साबुतीसु बोलो । कलिमा शहादात ॥१॥ चोरी मारी दगाबाजी । अल्ला नहि उसे राजी ॥ विरानीमें हरीधन । जिन्हे सिधी रहा समजी ॥ हिसाब लेयेंगे मौला । होकर बैठेंगे काजी ॥ खातिर रखो जमा । नसियेत सुनोजी ॥२॥ बेदर्द बेइमानी । न्याज-खोर नालती ॥ भूत पलिद् संगदिल । वो खबिसोंके साती ॥ खैर मेहर निकी नहि । बंदे दोजखी कुलफानी ॥ हाजी गा गाजी कुरान पडे । नबी रसुलके उफती ॥३॥ हलाल हक समजेगा । वोही अल्लाका प्यारा । मर्दसु मर्द जना जुमी मारगीं न्यारा ॥ इसलिये खबरदारी । करो ताकिद शरा ॥ कामिल रास्त बाज । पडेगा उन्होका पुरा ॥४॥ अजब चीज मुसलमानी । दिल सफा दरुद ॥ जाहीर बातीन कुदरत यैया । समजे औजूद मौजूद ॥ गौरा खुतुब पीर वली । चली आई बुन्याद ॥ मिरां कादर खानवादें । बोले **शेख महंमद** ॥५॥—(पोत. १–९; रा. १–६६). –२८१

## २. लळीत

सलाम मोहमद । नबी सादात । विप्रां शूद्रां देतो हा आशिर्वाद ॥१॥ आबिल काबिल ये दोन्हो भाई । कवि धनिकाला निर्गुण सोई ॥२॥ **शेख महंमद** जन जाहीर । हजरत मिरां पीर जग उद्धार ॥३॥ –(पोत. १–६८). –२८२

## ३. नसिहतनामा

बिसमिल्ला अल्ला हो अकबर । महंमद नूर । कुल्ल मंडानके सीर । हक ला–इलाह इल्लाहाल्ललाहो । महंमद रसुलुल्लाहो । वो है हजिर हजूर ॥धृ०॥ बंदे दिलसे ध्यावे । चुकेगा दोजख उन्हेका । किल अल्लाका । लाशक भिश्तमें जावें । हराम छोडे हक समजे । नेकी चलेंगे । उन्हों कोई ना सतावे । यकिन साबित करे जिकिर । तोडे फिकिर । साचे अल्लाकुं भावे चश्मों पाक परहेजगार । इमान करार ।

हक हलाल पछ्याने ॥१॥ खैर मेहर सखावत करे। कुफुर तोरे। बुरे फैल ना जाने। न्याज नमाज रोजदार। चाइतबार। मनी मनसाकुं भाने। दर्द पछाने बिराना। गिबत फना। बोनबा अल्लाने ॥२॥ नेक बखतों के कहे माने। गुज बुख्वाने। सुनो बे पिरोंकी यारी। सुनतकर कल्मा पढे। बद अमल चढे। इजार शराई छोडी। जुबासें बोले भलाई। कपडे रमाई। दिलमें काली जीरी। ब्याजखोरे नजीस लानती। जुबा चलती। हातों तसबी धरी ॥३॥ आखर पावेंगे आजार। कालके मार। जलेंगे देखम्यानें। दोजखकी आंचहे बहुत करी। होवेंगे ख्वारी। कोई ना आसी छडावे। येसा कुरआनका बोलना। सीधा चलना। **शेख महंमद** बुखाने। सुनेजी हाजिर चमा जात। नेक बख्त। गोते खावे गैबाने ॥४॥ —(पोत. १–७). –२८३

## ४. पंजीज मुसलमानी

सूनो मुसलमानीका चीज माना। आधीं अलहंमदेलिल्ला म्हणाना ॥ तोडे दिलमझनेका कुफराना। अद्वैतबोधें ॥१॥ ला इल्ला कलमा आवल चीज। इल्लल्ला वोळखा पैं ब्रह्मबीज। महंमद रसुलल्ला रसुलल्लाकूं समजो। स्वहितालागीं ॥२॥ दुयेम चीज वजु गुसुल निमाज। सांडा अविद्या अहंकार सहज ॥ कबुल पडेगे सुनत फरज। अविनाशापासी ॥३॥ सियेम चीज रोजे रमजानके। एकविध केलिया नर्क चुके। यकिन साबित रहना भुके। एकाग्रपणें ॥४॥ चहारम चीज करो माल जकात। होईल पुण्यें पुरुषार्थाची मात। उसके नाम नेकी सखावत। धर्मात्मा म्हणती ॥५॥ पंचवा चीज मके हाज करना। सांडुनि विषयांचा कुफराना। भिष्तम्यानें जोग करना। युगानयुगीं ॥६॥ **शेख महंमद** भये मिती। सद्गुरुकृपा जाली पुरती। सोऽहं बोधें प्रकाश ज्योती। अल्लाके मेहरसुं ॥७॥—(सेम. १–९; पोत. १–७३). –२८४

## ५. आरती

या अल्ला या अल्ला। या महंमद नबी। कुदरत इनसान। सलुक यारबी। या अल्ला ॥धृ.॥ पल म्याने झाड। पेड डाल फुले। जड पातो बोये। बेशुमार फले। तैसा अल्ला म्याने। खल कुल्ला फले। कुल्ल श्यइन माहित। जल्लजल्लाल ॥१॥ अल्लासे महंमद। मोहमदसे उमर। बीजोमें दरखत। वैसा ये भेद। दाजिष्ता समजे। बे पीरांबाद। अकल नजरोंसे। होवे वाहिद ॥२॥ कहतां हू सुनो। पाक पंचतन। फातेमा अर्शुल्ला। अलि आसमान। बमदल आबर। हसन हुसेन। नूरमहंमद हजरत। खा लेक सुबहान ॥३॥ इन तत्त्व सीधा। चराचर पैदा। हिंदु मुसलमान। किस कहूं जुदा। जाहीर बातीनमें। कुदतरमें खुदा संगमें आतश। तैसा मोजुदा ॥४॥ हफत धात त्रिगुण। जैहिर निशान। बादलोंमें जल जैसा।

रंगी आसमान। धूपोंसे झलंया। दौडे मैदान। **शेख महंमद** जैसें। कामिल अर्कान ॥५॥—(पोत. १–१२). –२८५

या अल्ला या मौला। तबारक ता अला। नूर महंमद। दीन दुनिया उजाला ॥धृ.॥ इमान कुरआन। तफसील खुलासा। जल्ले जल्लाल। माबुद खासा। करीम रहीम। खाकुल इनसान। सतार जब्बार। पैगंबर मुसा ॥१॥ हबीब साहेब। लाख अस्सी हजार। पैगंबर तुम्हारे। नबीके उमेदवार। कलमेसुं छुटेंगे। हो दामसगीर। दोजखमें जलेंगे। बेपीर काफर ॥२॥ हजरत गनी। मोजूद धनी। हजार नाम तुम्हारे। बेनमुना निशानी। सब तौर पैवस्त। खल कुल इनसानी। निसिदिन पाये। अबिल काबिल सुबहानी ॥३॥ शरिआत, तरिकत। हकिकत, मारेफत। चौदा इल्मका ताबा। दिल कुरआन साबित। पीर वली गौस कुतुब। कामिल सलवात। **शेख महंमद** जिकिर। आया सीफत ॥४॥ —(पोत. १–१०). –२८६

ला इलाहा इल्लल्ला हो। मोहमद रसुलुल्ला हो। जल्ले जुल्लाल। सुबहान हूत अल्ला ॥धृ.॥ जाहिर बातीन कुल्ल मंडान। जैं नीचा पानीमें दिसे आसमान। आवल समजों। कुदरत इनसान। लाहूत, मलकूत। जबरूत, लामकान ॥१॥ कुतुब जोहार। शमसो कमर। नुर हिलाल तारे। मगरिब सुफे। निसिदिन वारें। आरती जाही। सब तुम्हारा दिदार। करीम कर्तार ॥२॥ खलकमें सलुक। सलुकमें खलक। जैसा घी दुधमें। पैवस्त एक। कहुं दुजे माने। समजो तहकिक। फुलों बास जैसा। पानीसुं नमक ॥३॥ मौज्यां सुंदरिया। दिसताहे फेरिया। कायम दायम। तैसा अल्ला हे भरिया। जिंदे जेहन सेतीं। चमक जोतियां। **शेख महंमद** कहुं। आया ना गया ॥४॥—(पोत. १–८). –२८७

## ६. स्फूट कविता

**शेख महंमद** बोले बानी। अंधर घडा बाहेर पानी ॥१॥ म्हैसा गाडीनी चोडा खुटा। मर्द भया जारूका बेटा ॥२॥ एक तमाशा हम जो देखा। कपडे धोता धोबी फाटा ॥३॥ एक तमाशा हम जो पाया। हरणीनें चित्ता पकड लाया ॥४॥ गाये चरती बाग बैठा रखता। गोस्तकु देखकर कुता भागा ॥५॥ **शेख महंमद** कहे सुनो नर गुणी। बैल उपर तल्लार गोवी ॥६॥—(सेम. १–२०). –२८८

खाना खाकर पकडे रोझा। सोकर नमाज नहि काजा ॥१॥ एकवीस हजार फेंरू मनके। दिल जिकिरमें लालन ललके ॥२॥ पांचो पंचास जमात जुरे। जुबां बिन बांग पुकारे ॥३॥ हजरत मिरां पीर सय्यद। **शेख महंमद** उनके मुरीद ॥४॥—(सेम. १–५१). –२८९

नेकांके सात अल्लाकी बात। पापीके सात जीवका थात ॥१॥ नेक जो भले पुहेझ चले। बहिश्त मिले रहे निराले ॥२॥ अल्ला विसरे हराम करे। दोजख फिरे नालत भरे ॥३॥ सांचे पिरांके मुरीद निके। हम उनोके दिदार भुके ॥४॥ **महंमद शेख** दिलहि शेख। आपमें देख अल खलक ॥५॥—(सेम. १–५१).
–२९०

अल्लाकी रहमत होय तीनकूं। आप तरे तरावे औरनकूं ॥१॥ हलाल खाते हक बोलते। तोडे बदफैलकूं ॥२॥ हिरिस जाले रबसे झुले। **शेख महंमद** पऱ्हेजकूं ॥३॥—(पोत. १–२३५).
–२९१

लानत होय तीनकूं। डुबे डुबावे औरनकूं ॥१॥ बदफैली करे, अल्लाकूं ना डरे। बिगरे बिघोर औरनकूं ॥२॥ नसिहतनामा, हरदन कलेमा। **शेख महंमद** कहे जीवेकूं ॥३॥—(पोत. १–२३६).
–२९२

झुटे आये दुनियाम्याने। अल्ला बीन भटके गैबाने ॥१॥ झुटु झुट्यांसु करे यारी। होवे दोजखम्याने ख्वारी ॥२॥ **शेख महंमद** दुनियाम्याने। अल्ला नबी मिरां पछयानें ॥३॥—(पोत. १–२०४).
–२९३

अल्ला हजरत मौला। मुसलमान विनवी तुला ॥१॥ नापेदसुं पैदा कीते अल्ला। म्हणवून शरण आलों तुला ॥२॥ गनी लेता मानु येहसान। मज ऐकाया दिधले कान ॥३॥ औजूद म्याने दिल तेरा। सांडुनि पुजती देव देव्हारा ॥४॥ दोन्हों आख्यांका एकीच देखता। दो भाषीं वर्णिला एकचि जाणा ॥५॥ धनी के तयीं पछयानों दरहाल। भूतें पुजितां अधोगती जाल ॥६॥ मोजदकूं पछयान बंदगी करे। ओळखा **शेख महंमद** भक्त खरे ॥७॥–(पोत. १–२२).
–२९४

जाहिर बोले **सैयद महंमद** मुलुक भेद सुनना अकलबंद ॥धृ.॥ बातीन महाल तन औजूद। भये मुस्तेद। हुकुम अलीकी रजा ॥ पाचो हुन्नरबंद अखिर पच्यास मिल। हफत रंगोकी वजा ॥ साट तिनसे वदकडे अनघड जोडे दिल गैबी दरवाजा ॥ बहात्तर कोठड्या आसपास। खण एकवीस बारा सोळा काल रजा ॥१॥ पंधरा दरवाजे नव कोट उलटी सिदी वाट। तिन्हो संगिन बालेखाने ॥ एकवीस हजार हशम फिरे दाईम। चित ठाणेदार कने ॥ आधार स्वाधिष्ठान मणिपुर लाहूत अदरा। अनुहात के माने ॥ इखुद दिवी दळ मलकूत। बखछेजे सात सहस्रदळ हाउदखाने ॥२॥ शहा रंगा इडा पिंगळा अपेकिया मौला। कहुंगा सीका तारीफ ॥ त्रिकुटके नांव जामुत उपर तखतसु सुनो अरीफ ॥ अरहासेके बत्तीस कंगुरे। जबा कुरानपर। खेले अकार कुलुफ ॥ श्रीहाट गोल्हाट दरबारा चौक बाजार सदर नूरके गलेफ ॥३॥ छपर पराग सोऽहं उन्मनि करजे त्रिबेनी उडे सत्रावी कळ। कै लाख अंजीतोके उजाले बाजें बजे आले उदबत्या हिल्लाल ॥ मुस्तेद महाल भेजा कुदरुद। लगे नव प्यादे। खोल्या दसवा मंजील ॥

**सैयद महंमद** पलंगपर करे जिकिर । साचा लल्ले जल्लाल ॥४॥–(रा. १-४७; सेम. १-३६; पोत. १-११). –२९५

अल्लाका हे बिसारा अभिमानी । पलेपल घटे उमर तेरी ज्यानी ॥धृ॥ पहाड पर घन बरसे । पाछे कछु ना रहे पानी ॥१॥ तैसी उमर जाती हाय । थीर ना रहे तेरे ज्यानी ॥२॥ कागज गिरे आब बिच । ताहां कछु ना रहे निशानी ॥३॥ तैसा एक दिन गल जायेगा । अकल होयेगी तेरी खिशानी ॥४॥ पानीबीचे मछीने खुशी मानी । पानी गया मछी भई दिवानी ॥५॥ तैसा वख्त आयेगा । बंदगी कर तूं धनी ॥६॥ तन धन औलाद । सब होयेगा फनाफनी ॥७॥ दुनिया हिरीस देखते । तूं बहूत खुशी मानी ॥८॥ आखर वख्त तुजे कोन छुडायेगा । तूं हरदम याद कर धनी ॥९॥ वैराग नसीहत सुन लोको । मत करो तुम गीबत मनीं ॥१०॥ कहत **शेख महंमद** अल्लाके बंदके बीन । सांची नहे रहनी ॥११॥—(पोत. १-२३८). –२९६

आपनेकु हलाल करना दर हाल । और कीसी जंजाल मत करो भया ॥१॥ खुशी मेजबानी किडे आबादानी । गलेकाटु गैबानी अकल केवी ॥२॥ जुबा म्याने लज्जत पैलाड बुरी बख्त । छोडे नही आकबत दोजख जावें ॥३॥ आपना कोई मरे रोवे बोंबड्या मारे । दुध खाये के मेडे कैसे भावे ॥४॥ छेली गाई भेडमाई बैल बकरे भाई । उन्हों गले छुरी लाई अकल वाहाबते ॥५॥ चिरकिन हयवान ना जाने मा बा हन । उसे मुल्ला जान गोतका क्या पडे ॥६॥ **शेख महंमद** बोले अंधेकी आंख्या खोले । अकलसे ती झुले दिल खुलासे ॥७॥—(पोत. १-२०५). –२९७

हमारी जिकिर पडे तुम्हारी जिकिर कथा । दोन्होका माना एक लालहि समजेना ॥१॥ तुम्हे जावे कासी हम जावे मक्के । खिलाफ नहि बैठा कुफुर काहेके ॥२॥ हम कहे अल्ला तुम कहो देवा । समजेबिन झुटा पराया दावा ॥३॥ तुम्हे कहे राम हम कहे रहिमान । दोन्हो विचारो एक खुनमान ॥४॥ एकयी मनसुं एक समजेना । **शेख महंमद** कहे दानाबिना ॥५॥—(पोत. १-२०८). –२९८

अल्ला ना दिसे हर कीसे । नजरो खुलासे अल्ला दिलके भीतर ॥१॥ जैसी वो शिरी गंगेकु मिसरी । जुबां कहना जाने बिचारी ॥२॥ खाबमें देखे वोहि लेखे । भला बुरा जागते कहते नामानु दुसरा ॥३॥ जेनी जाने दुख माने आपना । सुखी सहिल्याना समजे माना ॥४॥ जुफती खाचे हिरीस भावे । नरनारी वैसे **शेख महंमद** आलख धारी ॥५॥—(पोत. १-२०६). –२९९

साचे अल्ला सुनीके मन लागो । किला फगुसामनी सब दूर भागो ॥धृ.॥ बम्हनकी रांडी । प्रीतों माथा मुंडी । तैसा यो मन बैरागो ॥१॥ चकोर चंदा

ध्याये। ओर ना कछु भाये। ऐसा नीत यो मन जागो ॥२॥ अंडे बाहेर डोर। कछवा पानीतीरे। तैसा प्रेम चित रंगो ॥३॥ **शेख महंमद**में। लय लागा दिलमें। नसीयेको उन कुछ दगो ॥४॥-(पोत. १-५७) -३००

दायम कायम रहेंगे साचे अल्ला। महद प्रळये होईल आकाराला ॥ अलफ ते अखरीका रोज सुबहानल्ला। ते वेळे कोणी न धरिती कोणाला ॥१॥ उतरतां साई काळाचा पहारा। जुनुब तरफसे छटे गाबडा बारा ॥ तेणें झडती नव लक्ष तारा। कुल मंडानका होवे गा अंधारा ॥२॥ एक मास सुटुन राहिल वारा। बादजमें है बरसेगा माहे पुरा ॥ गतले जीव येतील आकाराला। नेकी बदिका भयेगा नीबेडा। मही तांब्याची होईल बोजे ओळखा ॥३॥ तन आफताब आवेगा सवानेजा। डोळे टाळुसी करिसी ब्रह्मबीजा ॥ देखने सखावतका अजमुदा। काजी होईल अविनाश ॥४॥ तख्तमवकुलपर उदास। पापपुण्यें जोखिती रहिरास ॥ सच्चे पीर मुरीद अल्ला के पास। पाखंडी निगुरिया यमयातना ॥५॥ मौत जुबे करावेंगे रवाना। नेकोने भीष्त म्याने सुखी रहना ॥ **शेख महंमद** कहे कलिमा भरना ॥६॥—(सेम. १-१०, पोत. १-७४). -३०१

राखील जो मोरी लाज साईयां ॥धृ.॥ खुला टांकनवाला नहि तुजबिन अल्ला। सवारी जो जन्मोके काज ॥१॥ बातीन जाहिर करिम करतार। तूं अव्यक्त राजाधिराज ॥२॥ हजार नाम तेरे बंदगी सुबंदा करे। अय दो अलमके सिर ताजे ॥३॥ हजरत अल्ला मलिक मौला। **शेख महंमद** दीनराज ॥४॥—(सेम. १-४६). -३०२

## ७. दोहोरे :

दिल भये बैरागी। प्रेमें सुरत लागी ॥१॥ हे दुनियाकी यारी बहुत लागे बुरी। मन मन शाहु हुं जागी ॥२॥ **शेख महंमद** हमदम। महिदे बालम सीर त्यागी ॥३॥—(सेम. १-३३). -३०३

प्रेम सुरत लागी। दिल भया वैरागी। मन मनसें हूं त्यागी ॥१॥ **शेख महंमद** हमदम हिरदे। खुमारी नयनों लागी ॥२॥—(पोत. १-५९). -३०४

साचे पीरके मुरीद निके। पिया प्रेमका प्याला। **शेख महंमद** बोध खुमारी। प्रेमसु मतवाला ॥१॥—(पोत. १-७२). -३०५

औजूद में मौजूद नहीं पाया।.बाहेर अल्ला पुकारे। **शेख महंमद** कहे समजकर बोलो। अल्ला सुनते कीं बहिरे ॥१॥—(पोत. १-२०२). -३०६

औजूद मौजूद इलाहि। **शेख महंमद** कहे। उसे समजो भाई। आव्वल आखर एक साचा वोही ॥१॥—(पोत. १-२०७). -३०७

**शेख महंमद** कहे । लिखे कागज सब कोई पढे । कोई ना पढे कोरे । कोरे कागज सोहि पढे । ज्यो पीर पाये सच्चे पुरे ॥१॥—(पोत. १–२०१). –३०८

**शेख महंमद** कहे दोखज रोजी बहुत होवे । नेक बहेस्त रोजी थोडे । जैसे ना चीज केवडेउपर काटे । नेक बख्त बहस्ती ज्यों सुगंध केवडे ॥१॥—(पोत. १–१००). –३०९

**शेख महंमद** कहे बहुत पढ्या मनी धरे । नाले उंतीन का न नाम रुहुंरुहुं तत्त्व शुगुल मगन भये । लागुं उस नेकोंके पाऊं ॥१॥—(पोत. १–१९९). –३१०

**शेख महंमद** कहे । हिंदु कहावतो मैं नहि । और जात कहावत लागे बार । पंचतत्त्वका पुतला बनाया । वामे गैबी बोलन हार ॥१॥—(पोत. १–१९७). –३११

**शेख महंमद** कहेना मानो बहुत बडे । मानों इमान सिदक रहे निसार । वो जाहाज भवदरियाको । आलम उतरे पार ॥१॥—(पोत. १–१९८). –३१२

मुसलमान लि पछान । सत गुमान घर इमान । हक सुबहान सच्चा कुरआन । दूर शयतान कुफर जान । **शेख** समीना **महंमद** दीन ॥१॥—(पोत. १–६०). –३१३

एक मुसलमान व्हावे शाहाने । मूमे मसीद पेटमें भूतखाने । दीन छोड बोले कुंफरके माने । व्याज लेकर खावें ॥१॥ झूटी बात साच कर बोले गैबाने । वो मुसलमान नव्हें खविस दिवाने । **शेख महंमद** बोले दानेबीनें । हजरत मिरांके मेहेरसुं ॥२॥—(पोत. १–२०; १–२०३). –३१४

# शेख महंमद–चरित्रपर कविता

## १. चरित्र :

**शेख महंमद** पीर, कबिराचा अवतार। तयाचें चरित्र, ऐका तुम्ही ॥१॥ श्रीगोंदियामध्यें, पेठ मकरंदपूर। तेथें अवतार, **शेख महंमद** ॥२॥ राजेमहंमद पिता, पुल्हलेशा माता। त्यांचे पोटीं संता, अवतार ॥३॥ कबिराचा अवतार, जनासी कळे ना। उमज पडे ना, भव भ्रांति ॥४॥ अखंड समाधि, गुफेंत बैसावें। मनीं जीईं भावें, हरिनाम ॥५॥ मनाची स्फुरणी, सदा धरिताहे। अखंड लाविताहे, ध्यान मुद्रा ॥६॥ न कळे कोणासी, तयाची पैं कला। अवतार लीला, दाविती ते ॥७॥ अवतार लीला, दाविली अपार। संत साधु थोर, वर्णित गेले ॥८॥ तुकोबा आणीक, स्वामी जयराम। रामदासां प्रेम, चरणीं त्यांच्या ॥९॥ न कळे यांचा महिमा, अगाध पैं सिमा। न वर्णवे गरिमा, कोणासही ॥१०॥ अतर्क्य ती लीला, करूनि अकर्ते। अनाथासि दाते, करिती कृपा ॥११॥ कृपावंत साधु, **शेख महंमद**। अनादि सिद्ध पद, त्यांसी साजे ॥१२॥ मऱ्हाठ्यांत साधु, योगी **दिगांबर**। अविंधांत पीर, अनादिसिद्ध ॥१३॥ उभया नमस्कार, करिताती पुजा। त्यांचें चरित्र वोजा, ऐका श्रोते ॥१४॥ एक्या मुखें त्यांची, किती वर्णू स्तुती। शेषाचीहि मती, कुंठे जेथें ॥१५॥ नित्य गमन करी, हिंडे चारी दिशा। जूती जोडा मासा, एक लागे ॥१६॥ –३१५

तंव कोणें दिवशी, इच्छेसी पैं आलें। करावें वहिलें, ग्रंथामाजी ॥१७॥ "योग-संग्राम" ग्रंथ, तेव्हां आरंभिला। विचार तो केला, सिद्ध तेव्हां ॥१८॥ सिद्ध करुनी ग्रंथ, धाडिला वाराणसी। माने कीं दुषिती, यासी पहावा ॥१९॥ तेव्हां काशीमध्यें, लोकांनीं पाहिला। भाविकीं वंदिला, करुनि नमन ॥२०॥ ब्राह्मण षड्शास्त्री, अंगीं विद्या गर्व। निखंडिला सर्व, ग्रंथ त्यांनीं ॥२१॥ अविंधाची वाणी, नायकावी कानीं। ग्रंथ तो उचलोनी, त्यांनीं नेला ॥२२॥ नेऊनियां ग्रंथ, पाण्यांत बुडविला। विचार तो केला, नाहीं त्यांनीं ॥२३॥ **शेख महंमदासी,** अंतरीं कळलें। पाण्यांत बुडविलें, ग्रंथालागी ॥२४॥ आपुल्या शिष्यांसी, दृष्टांत दाविला। मागूनि वहिला, ग्रंथ घ्यावा ॥२५॥ ग्रंथ नेला कासी, होते दोघेजण। ब्राह्मणांलागून, बोलियले ॥२६॥ आमचा ग्रंथ द्यावा, आम्ही घेऊनि जातों। सांगातें विप्र

तो, एक आला ॥२७॥ ग्रंथ काढावया, पाण्यांत तो गेला । कोरडा निघाला, ग्रंथ तेव्हां ॥२८॥ ब्राह्मणांकारणें, नवलाव झाला । ग्रंथ तो आणिला, अवघ्यांजवळीं ॥२९॥ समस्तीं मिळोन, नवलाव केला ग्रंथ तो वंदिला, भाळावरी ॥३०॥ कोरडे कागद, निघाले बरवे । कैसें त्या म्हणावें, अविंधवाणी ॥३१॥ जगमान्य ग्रंथ, साधुत्वासी केला । उपमा आणिकाला, न ये न ये ॥३२॥ साधु मूर्तिमंत **शेख महंमद** खरा । जगाच्या उद्धारा, अवतार ॥३३॥ ऐशिया संताचें, पहावें चरण । भाविकांलागून, आल्हाद तो ॥३४॥ भाविक ब्राम्हण, दोघेहि निघाले । शिष्यांसंगें आले, श्रीगोंदिया ॥३५॥ येऊनि मस्तक, चरणीं ठेविला । नमस्कार केला, चौघाजणें ॥३६॥ ग्रंथ "योगसंग्राम", पुढें ठेवियला । जगमान्य झाला, काशीमध्यें ॥३७॥ उभयतां चरणीं, लागती ब्राह्मण । म्हणती धन्य धन्य, तुमची वाणी ॥३८॥ तुमचे दर्शनें, पुनित हो झालों । जोडी हे लाधलों, मोक्षधर्म ॥३९॥ तुमचा महिमा, किर्ती हो वर्णावा । आमुचा तो कैचा, तुम्हांपुढें ॥४०॥ धन्य आमुचें भाग्य, दर्शनाचा लाभ । तेणें आमुचें शुभ, भाग्य झालें ॥४१॥ –३१६

कांहीं दिस राहोनि, सोहळा घेतला । आनंदाचा केला, नवलाव ॥४२॥ विनंति करूनि, पुसति साधूला । कोण संतमेळा, कोठें आहे ॥४३॥ देहू तुकाराम, वडगांवीं जयराम । जिवासी विश्राम, तेथें आहे ॥४४॥ तेथें जाऊनियां, घ्यावें पै दर्शन । चित्ता समाधान, होईल तेथें ॥४५॥ ऐसें सांगतांच, ब्राह्मण निघाले । वडगांवीं आले, स्वामीपाशीं ॥४६॥ झाले ते विस्मित, वैभव पाहातां । हत्ती घोडे धुतां, पार नाहीं ॥४७॥ चोपदार हुद्दे, सांगातें अपार । नौबद हत्तीवर, वाजतसे ॥४८॥ ऐसी हो संपदा, जयराम स्वामीची । पाहूनि विप्राची, शुद्ध गेली ॥४९॥ पांच शत शिष्य, सभोंवति असती । कीर्तन करिती स्वामीराज ॥५०॥ आनंदाची थोर, सभा घनवटली । कीर्तनांत टाळी, नामघोष ॥५१॥ तेव्हां या विप्रांनीं, नमस्कार केले । सर्वहि नमिले, लहान थोर ॥५२॥ सर्वांसीच यांनीं, नमस्कार केला । तेव्हां जयरामाला, आला कोप ॥५३॥ रागें भरूनियां, द्विजांसी पुसती । कोणे गांवीं वस्ती, कोण आहां ॥५४॥ द्विज बोलियेले, आमचा गांव कासी । ब्राह्मण यातीसी, आम्ही असों ॥५५॥ ब्राह्मण असोनि, सर्वांसी नमिले । कोणें शिकविलें, ऐसें तुम्हां ॥५६॥ देशाचा दंडवत, पाहिला श्रीगोंदें । तेथें **शेख महंमद**, संत थोर ॥५७॥ अनादिसिद्ध साधु, सर्वां नमस्कार । देखिला प्रकार, आम्ही तेथें ॥५८॥ अवघें ब्रह्मरूप, हेचि त्यांची निष्ठा । श्रद्धादिक निष्ठा, सम भाव ॥५९॥ बोलिले जयराम, यातीचा अविंध । काय अनुवाद, सांगतसा॥६०॥ कीर्तन करितां, बहू क्रोध आला । म्हणती पाहूं चला, कैसा संत ॥६१॥ –३१७

घेऊनियां सर्वे, पांच शत शिष्य । स्वारीची विशेष, त्वरा केली ॥६२॥ श्रीगोंदा येऊनि, मकरंदपुरां आले । येऊनि पाहिले, गुंफेपाशीं ॥६३॥ **शेख महंमद** संत, गुंफेत तों नाहीं । निघांले सर्वहि, नदीतटा ॥६४॥ सरस्वती तिरीं, उभा असे

साधु । जोडा नाल बध्दु, पायीं असे ॥६५॥ घोंगटा डोईवर, पुसती तयाला ॥ सेख्यी[1] तो देखिला, सांग कोठें ॥६६॥ ऐकोनियां म्हणे, पैल वृक्षातळीं । आंब्याचे साऊली, बसला असे ।६७॥ जयराम स्वामिनी, वृक्ष न्याहाळिला । तैसाचि चालिला, सर्वांसह ॥६८॥ जाय वृक्षापासी, पाहे अवलोकून । तंव पंचानन, निजला असे ॥६९॥ देखोनियां व्याघ्र, भयाभित झाले । तेथूनि परतले, समग्रही ॥७०॥ येऊनि पहाती, तेथेंचि तो उभा । पाठविलें वाघावरी कैसें ॥७१॥ हांसोनियां साधु, बोले जयरामासी । तोहि तूं नेणसी, सेख्या ऐसे ॥७२॥ विस्मित जयराम, म्हणे काय आहे । मनामाजी पाहे, विचारूनी ॥७३॥ न कळे साधुरूप, कोण कैशापरी । विचार अंतरीं, दृढ केला ॥७४॥ धाऊनि जयराम, आंब्यापासी गेला । गळ्यासी झोंबला, व्याघ्राचिये ॥७५॥ भेटतांचि तेव्हां, नव्हे व्याघ्ररूप । पहिलें स्वरूप, देखियलें ॥७६॥ घेतला घोंगटा, नालबंद जोडा । देखिला धडपुडा, जयरामानें ॥७७॥ कां हो चाळविलें, केंवि दिला झोंका । म्हणती बोलूं नका, स्वामी आतां ॥७८॥ —३१८

हांसोनि जयराम, तेव्हां बोलियला । गळ्यासि झोंबला, **महंमदाच्या** ॥७९॥ कांहींसें बोलूनी, तांतडी उठले । जयरामा बोले, **शेख महंमद** ॥८०॥ करा तुम्ही स्नानें, नित्य कर्म सारा । आम्ही दाणा चारा, सिद्ध करितों ॥८१॥ करूनि साहित्य, पाक करविला । बोलाविणें त्याला, पाठविलें ॥८२॥ अवघा समुदाय, भोजन पैं झालें । विडे त्यांसी दिल्हे, त्याचि काळीं ॥८३॥ करूनि बंदोबस्ती, दिल्हा दाणाचारा । अवघ्या विचारा, सिद्ध केलें ॥८४॥ तेंव्हां संध्याकाळीं, गुंफेंत बैसोन । जयराम आपण, उभयेतां ॥८५॥ गुजगोष्टी तेव्हां, त्यांनीं काढियेल्या । जयरामा रुचल्या, मनोभावें ॥८६॥ जयरामासी बहू, झालासे आनंद । देखिला **महंमद**, आजि आम्ही ॥८७॥ सर्वत्र सुकृतें, जोडिलीं पैं आम्हां । देखुनि तुझा प्रेमा, **महंमदराया** ॥८८॥ पडलें अंतर, क्षमा हो करावी । कृपा असो द्यावी, तुमची मज ॥८९॥ एकांताचें ठाई, नवलाव केले । जानवें दाविलें, चिरुनि खांदा ॥९०॥ मुळीचें ब्राह्मण, आलो याचि ठाया । दावियेलें तया, यज्ञोपवित ॥९१॥ सदाशिव लिंग, अक्षयीं मस्तकीं । देखिलें कौतुक, जयरामानें ॥९२॥ तेव्हां नमस्कार, साष्टांगीं घातला । धन्य धन्य झाला, दिवस आजी ॥९३॥ नकळत अन्याय, आम्ही बहु केले । बहुत छळिलें, तुम्हांप्रती ॥९४॥ जग उद्धाराया, धरिला अवतार । कृपेचा सागर, धन्य धन्य ॥९५॥ धन्य मकरंदपुर, लोक ते दैवाचे । दर्शन तुमचें, लाहातातो ॥९६॥ तुमचा महिमा, तुम्हीच जाणावा । आणिकांसी गोवा, उमजे ना ॥९७॥ आतां महाराजा, कृपा ते करावी । समाधिसी द्यावी, आतां मज ॥९८॥ दर्शनेंचि झालों, कृतकृत्य आजी । समाधि सहजीं, घेऊं

---

१. सेखा=व्याघ्र, शब्दिक कोटी.

आतां ॥९९॥ आईकावें स्वामी, **शेख महंमद** म्हणे। जन्मासी कारणें, नका करूं ॥१००॥ अडीच वर्षें आयुष्य[२], तुमचें राहिलें। करावें वहिलें, पुरतें आतां ॥१०१॥ पांच वर्षें आणीक, राहिली आमुची। इच्छा हो जन्माची, कशास व्हावी ॥१०२॥ थोड्यासाठीं कां हो, पुढें जन्म घ्यावा। येथेंच फेडावा, संदेह अवघा ॥१०३॥ बोलिला जयराम, आज काय आतां। सांगाल तैसें आतां, करणें लागे ॥१०४॥ **शेख महंमद** म्हणे, ऐकावें जी स्वामी। समाधि हो नेमी, तुम्ही घ्यावी ॥१०५॥ अडीच वर्षांचा, नेम तो धरावा। आनंदें करावा, मोहोच्छाव ॥१०६॥ साधु मुनि सिद्ध, संत महा थोर। बोलवा सत्वर, आधीं तुम्हीं ॥१०७॥ कीर्तनगजरीं, आनंदें नगारे। म्हणा हरिहर, तेचि काळीं ॥१०८॥ तेव्हां जयराम, विनवणी करी। तुम्ही तेथवरी, यावें स्वामी ॥१०९॥ समयासीं येऊं, ऐकावें जयरामा। तुमचिया नेमा, सिद्ध असों ॥११०॥ वचन बोलोनि, निरोप घेतला। वडगांवीं आला, पेणोवणी ॥१११॥ —३१९

संख्या तेव्हां झाली, अडीच वर्षांची। तेव्हां मर्यादेची, घडी आली ॥११२॥ बोलाऊनि संत, भक्त थोर थोर। समुदाय अपार, थोर झाला ॥११३॥ आले तुकाराम[३], ऋषी मुनी सिद्ध। म्हणती **शेख महंमद**, केव्हां येती ॥११४॥ नेमाचा तो दिन, आजि उगवला। समुदाय मिळाला, घनघोर ॥११५॥ करोनियां पाक, पात्रें टाकियलीं। कां हो वेळ झाली, आणि न येती ॥११६॥ बोले तुकाराम, आमुचें शेजारीं। पात्र लवकरीं, टाकां आतां ॥११७॥ टाकियलें पात्र, अन्न तें वाढिलें। जयराम बोले, कां हो न ये ॥११८॥ म्हणे तुकाराम, तुम्ही स्वस्थ रहावें। जेवितील भावें, आतांचि ते ॥११९॥ **शेख महंमदा**ची, गुप्त त्यांची फेरी। तुकया शेजारीं, येऊनि बैसे ॥१२०॥ कोणासी दिसे ना, येरु जाणें तुका। भोजन जनलोकां, आज्ञा झाली ॥१२१॥ वरच्यावरी अन्न, पात्रांतील सरे। नवल विचारें, करिते झाले ॥१२२॥ एक जाणें तुका, वरकडां कळे ना। करोनि भोजना, आंचवले ॥१२३॥ येऊनि तुकाराम, जयरामा बोले। आजि भाग्य झालें, सुफल तुमचें ॥१२४॥ **शेख महंमदबाबा**, जेऊनियां गेले। कीर्तना येतील, मागुती ते ॥१२५॥ —३२०

---

२. जयरामस्वामी वडगांवीं शके १५९४ भाद्रपद वद्य (शुद्ध पाहिजे) ११ गुरुवार परिधावी नाम संवत्सरे (शुद्ध—२२ आगस्ट व वद्य —५ सप्टेंबर १६७२) रोजीं समाधिस्त झाले. वरील हकीकतीप्रमाणें ही भेट १६६९ इ. स. अखेरीस झाली व **शेख महंमदा**चा समाधिकाल इ. स. १६७४–७५ येईल. परंतु **शेख महंमद** इ. स. १६५६ पूर्वींच समाधिस्त झाले होते.

३. तुकोबांचा निर्याणकाल इ. स. १६५०.

सर्व लहानथोरां, भोजन पर्वें झालीं। कीर्तना मंडळीं, सर्व आलीं ॥१२६॥ झाला समारंभ, मांडियली पोथी। करुनि आरती, जयजयकारें ॥१२७॥ जयरामस्वामी, राहोनियां उभे। कीर्तन समारंभ, करिती ते ॥१२८॥ हेत तो गुंतला, सत्पदारविंदीं। लक्ष तें महंमदीं, लागलेसें ॥१२९॥ तेव्हां **महंमद** स्वामी, आले उठाउठी। देखियेली दाटी, ढाळ नसे ॥१३०॥ येऊनियां मध्यें, पोथी उचलिली। बैसुनि घेतली, पुढें ठाया ॥१३१॥ जनलोक बोले, देखिला नाहीं कधीं। जोड्यासंगें मधीं, बैसलासे ॥१३२॥ म्हणे तुकाराम, हे **शेख महंमद** संत। असा तुम्ही निवांत, उगें पहा ॥१३३॥ उठियेला तुका, लागे स्वामीं कानीं। साधु हो नयनीं, पहा आतां ॥१३४॥ तेव्हां जयरामानीं, भर दृष्टीं पाहिला। जयजयकार केला, समारंभ ॥१३५॥ साष्टांग घालोनि, केला नमस्कार। केला हरिहर, जयरामानीं ॥१३६॥ देह ठेवियेला, संतांचें चरणीं। समाधि वडगावीं, घेतलीसे ॥१३७॥[४] **शेख महंमद चरित्र** संपूर्ण ॥—(ओवी गीत-सेम, ४-४).

-३२१

## २. सिजरा जदि कादिरी

तंतरबुल आलमीन। बये तळ मुकदस। जलु अला ॥१॥ काळन नबिरी साल तपना। सलला आहे सलम ॥२॥ इमामे मसरक वैलमगरब आसुदुलाहिलगालीब आमीरुल मोमीनीन आली इबने अबुतालिब ॥३॥ इमामे हसन इमामे हुसन सहि। देसतकरबलारजी अला होताला आनहु ॥४॥ इमाम जनुल आबदीन रंजी अला होताला आय हु रसीद ॥५॥ इमाम महमद बाकर रजी अला होताला आन हु रसीद ॥६॥ इमाम जाफर ब सादक रजी अला होताला अन हो रसीद ॥७॥ इमामे मुसे वकाजेम रजी अला होताला अन हो रसीद ॥८॥ इमामे अली मुझीरजा रजा अला होताला रसहीद ॥९॥ इमामे नकीब इमामे तकी रजी अला होताला रसीद ॥१०॥ अखरे मेहेदि अखरी जमा रजी अला होताला अन हो रसीद ॥११॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बरहजरत सयेद मारूफ करखी रजी अला होताला अन हो रसीद ॥१२॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत सयद खाजे सीरीव तती रजी अला होताला अन हो रसीद ॥१३॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत खाजे जुनेदबुंदादी रजी अला होताला अन हो रसीद ॥१४॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत सयद अबा बाकर अबदुला हेजीबली रजी अला होताला अन हो रसीद ॥१५॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत सयेद अबास येमनी रजी अला होताला रसीद ॥१६॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत सय्यद अहमद बिन अबदुला अजीज येमनी रजी अला होताला अन हो रसीद ॥१७॥ इलाहि बहुरमत खीरके

४. मुळांत क्रमांक चुकीचे पडले आहेत.

खिलाफत बर हजरत सयेद ईसुफ बिन अहमद तरतोसी रखी अला होताला अन हो रसीद ॥१८॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत सयेद अबदुला हसन अल कुरेसी रजी अला होताला अन हो रसीद ॥१९॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत सयेद अबु सहीद मुबारक मुखर मिरजा अला होताला अन हो रसीद ॥२०॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत सयेद अबदुला कादर जिलानी अल हुसेनी वैल हुसेनी शहिदेद संतकलबला रजी अला हो ताला अन हो रसीद ॥२१॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत **सयेद अबदुल रजाक ताजोदिन कादरी** रजी अला होताला अन हो रसीद ॥२२॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत **सयेद महमद गंवस ग्वालेरी कादरी** रजी अला होताला अन हो रसीद ॥२३॥ इलाहि बहुरमत खीर के खिलाफत बर हजरत **सयेद राजेमहंमद कादरी** रजी अला होताला अन हो रसीद ॥२४॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत **सयेद चांदसाहेब कादरी** रजी अला होताला अन हो रसीद ॥२५॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत **सयेद महंमदसाहेब कादरी** रजी अला होताला अन हो रसीद ॥२६॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत **सयेद लाडजी (दावलजी ?) सायेब कादरी** रजी अला हो ताला अन हो रसीद ॥२७॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत **सयेद हाकीमसायेब कादरी** रजी अला होताला अन हो रसीद ॥२८॥ इलाहि बहुरमत खीरके खिलाफत बर हजरत **सयेद बालासायेब कादरी** रजी अला होताला अन हो रसीद ॥२९॥—(शिजब्र, सेम. ४–५).

–३२२

## ३. चरित्रपर–अनामिक

धन्य तो परमात्मा । परात्पर सिमा । चतुर खाणीं उत्तमा । लक्ष चौऱ्यांशी ॥१॥ चराचर नांदती । नामघोष करिती । चौदा भुवनें उत्पत्ति । दहा खंड क्षेत्र ॥२॥ जन्म भुमिका धारूर । वाहेरे रुईनगर । कडेवलीत भिंगार । जुनेर देश ॥३॥ दौलताबाद बेदर । तेलंगन इंदुर । बीड भागानगर । कर्णाटक ॥४॥ उत्तरेसी दक्षिण । पूर्व पश्चिम ईशान्य । आग्नेय नैऋत्य । अष्ट दिशा ॥५॥ वडाळी सुरवडी । देऊळगांव श्रीगोंदाप्रौढी । कोरेगांव रासिनप्रौढी । अनंतगांव ॥६॥ निशिदिनीं दोन । कथा करिती ज्ञानी । सद्गुण निर्गुण ध्यानीं । **शेख महंमदा** ॥७॥—(गीत ओवी–पोत. १–३).

–३२३

शेख महंमद पीर । जयरामाचे नमस्कार । आठव माझा विसर । पडों न द्यावा ॥१॥ तुमच्या[५] नेमीं दिन । होईन सनातन । माझा हेतु संपूर्ण । तुमच्या

५. स्वामी तुमच्या०

पायीं ॥२॥ मेलों[6] गेला म्हणती । तरी चरणें[7] पुरती । हेचि माझी भक्ति । अनिवार ॥३॥ स्वामी मागें मी पुढें । कांहीं न पडे सांकडे । पाई ठेविलें रोकडें । **शेख महंमदीं** ॥४॥[8] —(गीत ओवी-पोत. १-५२). –३२४

## ४. गुरुपरंपरा—चंद्र बोधले : मुकुंदराज :

उत्तम हा ठाव, नांव दौलताबाद । तेथें योगीराज, चंद्र बोधले ॥१॥ महा हे प्रतापी, पुण्य आणि पवित्र । वसविलें क्षेत्र, देवगिरी ॥२॥ चंद्र बोधल्यानीं, बोधविला बोध । लाधला प्रसाद, जनार्दन ॥३॥ जनार्दन म्हणे, आलों[9] शरणांगत । करावें पुनित, पतितासी ॥४॥ जाला निज लाभ, प्रसाद उच्छिष्टाचा । दास हा स्वामीचा, जनार्दन ॥५॥ तयाचा अंकित, जाला एकनाथ । केले हे सनाथ, समर्थानीं ॥६॥ तयाचे कृपेनें, वस्ती गंगातिरीं । एकनाथें केली, योगसमाधि ॥७॥ तयाचाहि दास, योगीं मुकुंदराज । सांगे निजगुज, रामनाथा ॥८॥ आमची परंपरा, चंद्र हा बोधला । प्रसाद लाधला, आम्हांप्रती ॥९॥ चंद्र बोधला मूळ, जनार्दन खोड । शाखा पालव गोड, एकनाथ ॥१०॥ तयाचें हें फळ, आम्हीं घनदाट । सेविनी उत्कृष्ट, साधुसंत ॥११॥ मुकुंदराज म्हणे, ऐक रामनाथा । वंशावळी कथा सांगितली ॥१२॥—(गीत-ओवी-सेम. ५-१०). –३२५

## ५. मुधा पांगुळ : वासुदेव

सद्गुरु वासुदेवा काय वर्णूं बा तुज । स्वर्ग मृत्यु पाताळ याहीं वेगळें गुज ॥ सप्तहि सागराचा चुळ भरीला सहज । एकविस स्वर्गांवरी तूं गुरु महाराज ॥१॥ हरिहरब्रह्मादिक बा सोई लाविले । रामकृष्ण अवतार गुरु शरण गेले ॥ अठ्यांशीं सहस्र ऋषी गुरु वंदिते जाले । राजेंद्र महा शूर जयवंत त्वां केलें ॥२॥ वासुदेव मिसें संत घालिती घिरटी । संचित थोर ज्याचें आले वासुदेव भेटी ॥ तन मन भक्तिभावें चरणीं घालिती मिठी । वासुदेव आले जेणें[10] धरियेला कंठीं ॥३॥ उत्तम नरदेह संचितें लाधला । जाणिव ओळखोनी कैसें नेणूं मी त्याला ॥ पापाचें भय नाहीं, कर्म करूं लागला । आपणांसी आपण कैसा घातकी जाला ॥४॥ प्रपंचीं हें जन अवघें गुंतलें आवडी । अमंगळ मक्षीका गुंतल्या परवडी ॥ ऐसिया[11] विषयाची जना लागलीसे गोडी । अंत काळीं मांडल्या (?) जेणें हेडावती बापुडीं ॥५॥ मानवी माझा देह कैसा होय जतन । शरीर मैंदा वे हे तो (?) लागलेसें पूर्ण ॥ आतां मी काय करूं मांडिलें निर्वाण । **शेख महंमद** बळी आला मुधा आतां शरण ॥६॥—(पद-सेम. १-३४). –३२६

---

६. मेला मेला गेला०

७. तरी तुमचेच चरण०

८. या अभंगावर "जयराम" असें शीर्षक दिलें आहे.

९. स्वामी आलों०

## पांगुळास साक्षात्कार

धर्म जागो **महंमदा**चा, त्याच्या दाना अगणित रूचा ॥धृ.॥ इच्छा जाली पांगुळाला, सद्गुरु तुझा धांवा केला । दान दे बा निज नामाचें, म्हणवुनि उपवास केला[12] ॥ रुईनांदे सरवर तटीं, दाता उचितासी आला । दीपवाळी शुद्ध पाडवा[13], दान दिले पांगुळाला ॥१॥ काळयुक्त संवत्सरीं, दाता वाहीरें नगरीं । वैशाख वदीं सप्तमीसी, दान दिधलें गुरुवारीं[14] ॥ पटीं बसवुनि पांगुळाला, शेला घालूनि अंगावरी । भाव देखुनि गोपाळाचा, हात जोडुनि शरण करी ॥२॥ पदीं बसल्याचें भूषण जालें, माझें मनीं भेंव सुटलें । द्रोणागिरी पर्वताला, हनुमंतें उपटिलें ॥ हिरा पहातां बहु मोलाचा, त्याला घणावरी कुटिलें । सुख दुःख माझें सारें, गुरुराज मायेनें घेतलें ॥३॥ भार घालूनि तुजवरी, मी अपराधी थोरी । ब्रह्महत्या चोरी मारी, मात्रागमन परद्वारीं ॥ गोहत्या बाळहत्या, ऐसीं कर्मे घडलीं थोरी । ऐसा दोषी कबुल केला, सांगतो नवल परी ॥४॥ भावभक्ति करुनी कांहीं, सेवादान घडलें नाहीं । जप तप अनुष्ठान, होम यज्ञ नेणों कांहीं ॥ कोण्या पुण्यें दया केली, दाता सद्गुरुनें पाही । **शेख महंमद** नाम ज्याचें, मुधा पांगुळ त्याचे पायीं ॥५॥
—(पद–सेम. १–२५; पोत. १–२४७). –३२७

## धांवा :

श्रीसद्गुरुपरात्परा...शिष्य म्हणवूं तरी शिष्यत्व नाहीं केलें । बारा वरुषें जग म्यां भोंदिलें । आतां माझें कर्म उदेलें । कृपा करावी जी सद्गुरु ॥५॥ सेवक म्हणवूं तरी सेवा नाहीं घडली । दास म्हणवूं तरी दास्यत्व नाहीं केलें । ऐसी तस्कर विद्या म्यां केली । आतां मज दंडिलें पाहिजे ॥६॥... दाते **शेख महंमद** महाराज । मुधा पांगुळ मागे निज गुज । आतां कृपा करावी सहज । मज दान द्यावें ॥४१॥–(ग्रंथी ओवी–सेम. ५–६). –३२८

## आरत्या

### ६. अजम

श्रीगुरु **शेख महंमद** नयनीं अवलोका भावें । अर्थ पाहातां षड् अक्षरीं ब्रह्म सावेव ॥धृ.॥ सेविति संत मुनिजन अखंड अनुभव संतोषें । शैवी वैष्णव दीक्षा या स्थळीं होती अस्पर्शें[15] ॥ शेवट वेदांताचा निःशब्द विगलित षड्कोशें ।

१०. ० गो त ना जेणें०
११. वै इ सि या
१२. ०म्यां केला ।
१३. ० १७ आक्टोबर १६७७.
१४. –२ मे १६७८.
१५. चरणलोप–सेम.

सेजे उन्मनि येउनि जेथें जगदाभास निरसे ॥१॥ खलुविद ब्रह्मास्मि निश्चय वेदांचा देख। खंडन मनसा वाचा दृष्ट्यारहीत[16] उल्लेख ॥ खमरूतादि भौतिक सृष्टि यासी पडे आंख। खंत नसे पूर्णत्व पहातां विश्वा सन्मुख ॥२॥ मत्येक ब्रह्म स्तंभ पावतो ऐक्य रूप निःसिम[17]। ममैवांश गीतार्थी साक्ष ऐका निष्काम ॥ मधुसूदन वचनोक्ति योत्सुखांतरा राम। मदनांतक नगजापतिशी अखंड हृदयीं[18] विश्राम ॥३॥ हरिसी हरिजन भिन्न[19] नव्हती नसेचि संदेह। हरि आत्मातें शरीर हरीचीं हरि त्यांचा देह[20] ॥ हंसरूप जगीं वर्तति परि ते ठाईं विदेह। हत त्रैगुण्यें भेदाभेदौ अद्वयपदग्राह ॥४॥ अमजमव्यय सत्स्वरूप सनातन अखंड सप्रेम। मन उन्मन पद[21] पाउनि सहजीं विषयें विराम ॥ मतांतर सर्वस्वहि विगलित समस्त आश्रम। मत्सर त्यागुनि ऐक्यींहि हरला भवश्रम ॥५॥ दर्शन स्पर्शन मननीं सदैव वदनीं[22] अनुवाद। दर्पण न्यायें भिन्न दिसें हें एकमुखीं भेद[23] ॥ दवडुनि माया मिथ्या लक्षितां ब्रह्म निजानंद। दग्धांबर परि विदेह आजम वर्ते निर्द्वंद्व ॥६॥—(आरती–सेम. १–५; पोत. १–२८४). —३२९

## ७. दावलजी

जय जय आरती आरक्तरूपा। त्रिभुवनतारक तूं मायबापा ॥धृ.॥ स्तंभाविण आकाश शोभती तारा। चंद्र सूर्य दिवटे उजेड अवधारा ॥ पवन धूप दीप घांट वाजे शिखरा। दमामे गर्जती पुजा शंकरा ॥१॥ नव नाटकशाळा रंगणीं नाचती। चारी वेद तेथें गायन करिती ॥ दश अवतार दर्शना येती। शेष शिणला म्हणतां म्हणतां आरती ॥२॥ महद माया अर्धांगी ते आदिशक्ति। चराचर व्यापिलें तिची उत्पत्ती ॥ चारी खाणी वाणी आनंद करिती। पुरोनी उरलासे तो ब्रा श्रीपती ॥३॥ चौदा भुवनें पहातां अवघा स्वयंभाकार। इच्छेपासूनि तो जाला आकार ॥ सिद्ध साधु करिती नाम उच्चार। भक्त उद्धाराया दाविला आकार ॥४॥ पांचा तत्त्वांची करूनी आरती। ज्ञानदीप लाऊनि घेतली हातीं। भावें वोवाळिले आम्ही श्रीपती। **शेख महंमद** गुरु माझा तो सती ॥५॥ त्यांचे कृपेनें केली आरती। दावलजी म्हणे मी बहु मूढमती ॥ घेऊनि बैसले मजला पंगती। सद्गुरुप्रसादें अविनाश आरती ॥६॥—(आरती–पोत. १–३५ अ). —३३०

---

१६. दृश्याविरहित–सेम.
१७. निशमं–सेम.
१८. देई–सेम.
१९. शब्दलोप–सेम.
२०. संदेह–सेम.
२१. पाहुनि–सेम.
२२. शब्दलोप–सेम.
२३. चरणलोप–सेम.

## ८. हाकीम

आरते आरती उन्मनि अवस्था जेथें। उन्मेषें अविलंबे प्रकाश स्वयुंभु हो तेथें ॥धृ.॥ उर्ध्व दृष्टि बुडुनि सृष्टि तन्मयता अंतरीं। ज्ञानामृत वर्षति धारा पूर्ण विश्रांती ॥१॥ त्रिवेणी संगमीं स्थान नित्य दर्शन। पूज्य पुजक पहातां भावें जाला आपण ॥२॥ तूर्येचे जे अंतःकरणीं हो महदानन्द। हाकीम **महंमद** आरती ऐसी भाविका छंद ॥३॥–(सेम.२–१–आरती). –३३१

## ९. दयाळदास

**शेख महंमद** षड् अक्षरीं मंत्र हा श्रेष्ठ। उच्चारितां अनन्य भावें हरती भवकष्ट ॥धृ.॥ शरीर शोधन केलें जींही दश देहें निरास। षड्चक्रीं भेदुन केला ब्रह्मरंध्रीं वास ॥ सैंधवाचा खडा जैसा जिवनीं समरस। सत्रावीचें दर्शन भोग अक्षई सुमनास ॥१॥ खजील जाला भेद सहसा न दावी मुख। खटाटोप अविद्या गेली हरलें भवदुःख ॥ ख परतें स्वरूप स्वयें सारूनि नव अख। खळमळ विध समुळीं जाळुनि केलीसे राख ॥२॥ महद्भूतीं सरतें जालें होऊनि निष्काम। मठ अक्षयीं केला पहा स्वरूपीं निजधाम ॥ मंगळदायक जालें नित्य हरला भवश्रम। मन निश्चयलें दसवे खंडें विश्राम ॥३॥ हमेश ब्रह्मीं रमणी जाला सुफळ नरदेह। हरुषें निर्भय स्वरूपीं लुब्धुनि छेदुनि लिंग देह ॥" हंकाराचा छेदुनि कंद फिटला संदेह। हस्तीं प्रपंच विदारुनि जालों विदेह ॥४॥ मत्येक ब्रह्म समान दृष्टि नाहीं विषम। मत अभिमान गाळुनि केलीं कर्मेंची भस्म ॥ महिमा अगाध ज्याचा घडला निश्चय स्वधर्म। मन मारुनि मूळा नेऊन स्वयं परब्रह्म ॥५॥ दंभाहंकाराचा समुळीं छेदुनियां कंद। दमनीं निश्चय केला आसनीं देऊन त्रिबंध ॥ दवकुनि काळ पळे स्वरूप देखुन अभेद। दयाळदासा देवंगाचा **शेख महंमद** ॥६॥—(आरती–पोत. १–२८३). –३३२

## १०. रामदास :

जय जय आरती जय **महंमद शेखा**। तुज ब्रह्मादिक वर्णिती न कळे गुर्जे[२४] विवेका ॥धृ.॥ अभिन्नत्व आर्त अनिवार पाही। आठव ना[२५] विसर मज हृदयीं ध्याई ॥ दृश्येविण[२६] दर्शन दिधलें सम ठायीं। म्हणुनि वियोगें सोऽहं तत्त्व लवलाही ॥१॥ कल्पांतीचें संचित सांचलें माझें। तेणें गुणें दर्शन लग्नीं केलेंसें बीजें ॥ क्षेमेविण आलिंगन मुख[२७] पाहे सहजें। ज्ञप्ती अपरोक्ष पिता मी किंकर तुज साजे ॥२॥ देह जरी वोवाळूं उसनें पांचांचें। जीव शिव वोवाळूं तरी देणें हें तुमचें ॥

२४. नेणत–सेम. २५. आठवणीं–सेम.
२६. दर्शनविण–सेम. २७. मुख–सेम.

भाव भक्ति नेणें पोसणें संतांचें । रामींरामदास चरणरज संतांचें[२८] ॥३॥—(आरती –सेम. १–१८; पोत. १–७८). –३३३

## ११. रघुनाथयोगी

जय जय आरती जय अमळा मंगळा । चित्त वृत्ति वोवाळी तुज निज निश्चळा ॥धृ.॥ त्रिगुणारहिता भवभंजन शांता । त्रैलोक्यतारका विश्वगुणभरिता ॥ तूंचि आमुची माता सद तूंचि पिता । तुजविण अनुदिन नेणें तत्त्वतां ॥१॥ आत्म्याची आरती भावें परब्रह्म साम्या । अविंध याति चित्त विंध्रिलें स्वामीया ॥ रघुनाथयोगी ध्याये तुझी हे सिमा । **शेख महंमद** अवतार भाग्यें आमुच्या निजधामा ॥२॥—(आरती-पोत. १–२३१ अ). –३३४

## १२. अनामिक :

जय जय **महंमदा** सद्गुरु ज्ञानसागरू ब्रह्मविद्येचा दाता । ब्रह्मादिक तेहि शिणले वेद श्रमले तुजलागीं वर्णितां ॥धृ.॥ अतर्क वेदासी तर्कें ना व्यापिले जना सद्गुरु तूं समर्था । अगम्यगम्या न येसी **महंमद** वर्णी महा वाक्य गीता ॥१॥ नांवा रूपासी तूं अतीत भक्त वर्णित सहस्र नांवें ठेवून । वर्णिता शिणला (शेष) या जिव्हा चिरलिया न कळे तुझे गुण ॥२॥ माया नटला नाम **महंमद** हाचि विनोद माया–ब्रह्म हे जाण । दया करी दया स्वरूपा सद्गुरुबापा बाळ तुझें मी दीन ॥३॥—(आरती–रा. १–४३). –३३५

जयजय सद्गुरु **महंमदा** आनंदकंदा देई हरिनाम धंदा । ब्रह्मादिक तुज वर्णिती न कळे कीर्ति मौन्य पडलें वेदां ॥धृ०॥ नेणं भाव भक्ति लक्षणें आहे अज्ञान टाऊक तुझें तुज । पडियेलों भवसागरीं कृपा तूं करी तारी तारी बा मज ॥१॥ पतित पावन म्हणविसी जनीं वर्तसी जनीं जनार्दन । सिणल्या वेदश्रुती माझी मंदमती न वर्णवे तुमचे गुण ॥२॥ याती हीन मती चांडाळ देहीं अमंगळ नाहीं हृदय शुद्ध । पडियेलों जन्मफेरीं धांव झडकरी तोडी चैतन्यासी दग्ध ॥३॥ रिद्धि सिद्धि मुक्ति न मगे कांहीं अखंड हृदयीं वसो दे तुझे चरण । **महंमद** उच्चार व्यर्थ संसार जातो तुजविण ॥४॥—(पद–रा. १–४४). –३३६

आरती हो **शेख** स्वामी वसे चिदानंद योगी । लाघव आवडीचे **शेख महंमद** नामीं ॥धृ.॥ देखुनि सर्व लोकीं डोळियांचा डोळा । निज जना मुक्तिदानी ज्याची अकळ लीळा ॥१॥ अनुहात ध्वनी नांदे नित्य उन्मनी भोगी । निःसंग निर्विकार निःशाश्वत योगी ॥२॥ या सी ह वी रा पुसो तुम्हां अर्पितां । सं हे ते तुम्हा आवडीनें नमी...घ आतां ॥३॥ –(आरती–सेम. १–२९). –३३७

---

२८. महंमदाचें–सेम.

## १३. हरदासी साकी :

शेख महंमदा येणें जाणें नाहीं साचार।

हरिभक्तांचे घरीं उपवास करी कंटकांचा ने घे आदर ॥१॥—(साकी-पोत. १-३०). -३३८

## १४. हरदासी आर्या :

शेख महंमद साधु म्हणतां पहातां प्रत्यक्ष यवन।
यवन नोहे तो आपा संतजनाचें विसाव्याचें तें स्थान ॥१॥
देहूस कीर्तन करितां मंडप जळतां स्वकरें विझविला।
**शेख महंमद** साधुसंतां कीर्तनें जनांत मानवला ॥२॥
—(आर्या–सेम. ४–२). -३३९

## १५. श्रीसद्गुरु शेख महंमद दुचेश्मा :

जलालियत । तमोगुण ॥१॥
कमालियत । शुद्ध सत्त्वगुण ॥२॥
मकान चार । स्थानें चार ॥

चश्म मकान । नेत्रस्थान ॥१॥
हलक मकान । कंठस्थान ॥२॥
कतब्र मकान । हृदयस्थान ॥३॥
सिररे मकान । मूर्ध्नि स्थान ॥४॥

भोग चार

सुरत दीदनी । स्थूळ भोग ॥१॥
वहमा । कल्पनाप्रविक्रम ॥२॥
नीद । निराचंद मुर्छना ॥३॥
खुशआनी । आनंदावभास भोग ॥४॥

नासूत दर मलकूत । अकारो उकार
मलकूत दर जबरूत । मकारो ॐकार
लाहूत दर नासूत । ॐकार अहमेव
अकलोम गुद सवदरी । अहमात्मा साक्ष
अनसर पंज । पंच महा भुतें ॥

खाक । पृथ्वी ॥१॥
अब । आप ॥२॥

| | |
|---|---|
| आतश । | तेज ॥३॥ |
| बाद । | वायू ॥४॥ |
| हवा । | आकाश ॥५॥ |
| हवासें दस १० । | इंद्रियें दहा १० ॥ |
| शिनवाई । | श्रोत्र ॥१॥ |
| लसम | त्वचा ॥२॥ |
| बिनाई | चक्षु ॥३॥ |
| चेशिदन । | जिव्हा ॥४॥ |
| बोईदन | घ्राण ॥५॥ |
| गोईदन | वाचा ॥६॥ |
| हस्त । | पाणी ॥७॥ |
| पाद । | पाद ॥८॥ |
| केर । | शिश्न ॥९॥ |
| कून । | गुद ॥१०॥ |
| दिल । | अंतकरण ॥१॥ |
| वहम । | मन ॥२॥ |
| अकल । | बुद्धि ॥३॥ |
| कतरा । | चित्त ॥४॥ |
| खुदी । | अहंकार ॥६॥ |
| नजर । | प्राणदृश्य ॥५॥ |
| नजर नाजिर । | दृश्यदृष्टा ॥७॥ |
| खुदा बंदा । | जीव ईश्वर ॥८॥ |
| जात सिफत । | माया ब्रह्म ॥९॥ |
| नफी इसबत । | नित्यानित्य ॥१०॥ |
| दाना बिना । | ज्ञाता द्रष्टा ॥११॥ |
| शाहीद । | साक्ष ॥१२॥ |
| शरा सलूक । | कर्म निःकर्म ॥१३॥ |
| तोहीद । | अद्वैत । |
| भिहिष्त दोजख | स्वर्ग निरय । |
| बसालत । | ऐक्य । |
| दुई । | द्वैत । |
| दानाईनादानगी । | ज्ञान अज्ञान । |
| खुदशिनास । | आत्मज्ञान । |
| जिकीर फिकीर । | स्मरण विवेक । |

| | |
|---|---|
| तफदूर । | विचारणा । |
| मुकर्बा । | ध्यान । |
| नूर । | प्रकाश । |
| जुलुमात । | अंधःकार । |
| फीरा का विसाल । | योग वियोग । |
| दरफीर । | अहं ब्रह्मस्मिन |
| गंजे । | पूर्ण । |
| अला जमे जामी सीफत । | सार्धं ब्रह्मेति । |
| मना मणी । | मी माझें । |
| सलीमीसुलीनकतरानफी । | वृत्तिलीन । तल्लीन |
| खुदपरस्ती । | अहंकारी । |
| खादिमुलफुकरा । | साधु भजन । |
| हुबलफुकरा । | साधु प्रीती । |
| पैगंबरीखास्त । | देवता प्रकृति । |
| फिरावून खास्त । | असुरी प्रकृति । |
| अजमत । | सिद्धी । |
| पाक अरवा । | शुद्ध जीव । |
| नापाक अरवा । | मलीन जीव । |
| पीर मुरीद । | गुरु शिष्य । |
| मुतकल्लीम । | वाचक । |
| तालब । | साधक । |
| मुराद । | साध्यें । |
| दुई बुगजार । | आत्मज्ञाननिरसन । |
| यकशव । | अद्वैत आत्मा होणें । |
| हकीकी । | आत्मज्ञानी । |
| मीजाजी । | वर्णाश्रम अभिमानी । |
| किरमुन कातेबिन । | चित्रगुप्त । |
| सातों सिफ्तखुदा । | सप्तगुण । |
| सबलीत । | ईश्वर । |
| आलेन । | सर्वज्ञ । |
| इरातद । | ईशत्व । |
| कुदरत । | सामर्थ्य । |
| हयुंत । | जीवन । |
| समीयुल । | ऐकणें । |

अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों दि:


| | |
|---|---|
| बसीरून । | देखणें । |
| मुतकल्लेमुन । | वाचक बोलणें । |
| औजूद मौजूद । | क्षेत्र क्षेत्रज्ञ । |
| खुलासा । | उकल । |
| अशक माशुक । | पुज्यापूज्यक । |
| इश्क । | प्रेमा । |
| नेकी बंदी । | पापपुण्य । |
| हज । | तीर्थभ्रमण । |
| जाहेरबातीन । | अंतरबाहिर । |
| हकराह । | सत्यमार्ग । |
| कुलमन अंलेहफान । | यद्दष्टं तं नष्टं । |
| तात । | भक्ति |
| दिनदुनिया । | इहपर । |
| हुरा । | देवकन्या । |
| दरखोतुबा । | कल्पवृक्ष । |
| अमिया । | अमृत । |
| हिजाब जीवनीफ । | मोहित व्याप । |
| अमर । | सत । |
| जिया । | जीव । |
| अल्ला । | ब्रह्म । |
| खुदा । | परमेश्वर । |
| सीर सित्फ । | माया । |
| असर सित्फ । | अविद्या । |
| जिन इनस । | देवमनुष्य । |
| अरश । | वैकुंठ । |
| भीष्त । | स्वर्ग । |
| औलियां अंबियां । | हरिहरब्रह्मादिक । |
| किताब चार । | वेद चार । |
| तौरयत । | ऋग्वेद । |
| जबूर । | यजुर्वेद । |
| इंजील । | सामवेद । |
| फुर्कीन । | अथर्व वेद । |
| रिसाले । | शास्त्रें । |

-३४०

# सद्गुरु चंद्रभट उर्फ चांद बोधले यांची कविता

गुरुकृपा ज्ञान[२९], अनुभव परिसन। वस्तु जालें मन, बोलतां न ये ॥१॥ वस्तूचा उदय, निश्चय चरणीं। परि अनुदिनीं, मेघरामा ॥२॥ गुरुचा अंकिला, हा चांद बोधला। तारोनि तरला, आपेंआप ॥३॥ –(पोत. १–४२; सेम. ४–२६).
–३४१

माझें मन गुरुपाई चेइयलें। तस्कर पावले, देहादिक ॥१॥ ज्ञाना करी पाती, प्रार्थी गुरुदिप्ती। प्रकाशली स्थिती[३०], अविनाश ॥२॥ आपलें निधान, आपणां चोरिलें। तें जाण आपलें, आपणरया ॥३॥ तें सुख सोलिव, आनंद निरावेव। पावले गुरुराव, चांद बोधल्यासी ॥४॥—(पोत. १–४१; सेम. ४–३६). –३४२

सद सखोल तूं सपुरा। चिद लहरी तूं एक धारा। सद आनंद अंतर करा। एक सच्चिदानंदु खरा ॥१॥ रे कान्होबा डोहो रे आनंद डोहो ॥धृ.॥ डोहीं नासला माया मोहो। डोहीं भरले सद्गुरुरावो। त्यानीं केला पा निर्वावो। डोहा पाहुनि तद्रुप होऊं रे ॥२॥ पेंद्या म्हणे बा कान्हया। वडजा धांवोनि बिलगला पाया। म्हणे वांकुडा यादवराया। बरें आणिलें मुळच्या ठाया रे ॥३॥ मूळ वस्ती तें तुझा थारा। डोळा पाहिलासी सारंगधरा। जालों मुकलों आजि घरबारा। जीव कांपतसे थरारा रे ॥४॥ जवळ जातां ग्रासिल त्याला। माया खाऊनि दिसे मातला। द्वैत विसरोनि उन्मन जाला। डोहो पाहातां जीव भ्याला रे ॥५॥ अवघे संवगडे म्हणती ऋषिकेशी। किंव नाहीं कीं बा तुम्हांपाशीं। आम्हां आणिलें बा निद्रिसी। डोहो दाऊनि डोहीं लपविसी रे ॥६॥ डोहीं भरलें जगजीवन। डोहीं आपोनारायण। निज लपऊनि दावी जन। वस्तु कृपाळु आपण रे ॥७॥ डोहो अखंड सदोदित। निज संतांचा एकांत। तेथें चांद बोधले जिवन्मुक्त। डोहो होऊनि डोहीं खेळत रे ॥८॥—(पोत. १–४०; सेम. ४–३५). –३४३

---

२९. ०निज ज्ञान—सेम.

३०. ०स्वरूपस्थिती—सेम.

# सूचि


| | क्रमांक |
|---|---|
| अकल्पित सांडे मांडे अभिमान | ६५ |
| अंगाचिया बळें पाहे भुजांकडे | १५३ |
| अंतःकाळीं मती तेचि जाणा गती | १७१ |
| अंतरीं तत्वकळा वाचे निज नाम | ८५ |
| अंतरीं नाहीं प्रेमा वाचे म्हणे रामा | १९६ |
| अंतरींहि चक्र बाहेरहि चक्र | ४५ |
| अनंत जन्में दासी | ६० |
| अनिवार पंढरी | २३६ |
| अपवित्रासी संग पवित्रानें केला | १९० |
| अभक्तां पोटीं भक्त जन्म आणि संचित | १३ |
| अभाव स्वभाव तर्क धोका | ३६ |
| अल्लाका हे बिसारा अभिमानी | २९६ |
| अल्लाकी रहमत हाये तीनकूं | २९१ |
| अल्ला ना दिस हरकीसे | २९९ |
| अल्ला हजरत मौला | २९४ |
| अविनाश दिगांबरा श्रीपरात्परा | २७६ |
| अविनाश निज लिंगा दौड पातक भंगा | २७१ |
| अविनाशा निज निर्गुणा | २०० |
| अष्टधा प्रकृति लेणें जाया रे | १३८ |
| असो हीन याती जाणें ब्रह्मस्थिती | १७३ |
| अहंकार उन्मत्त अज्ञान | ३७ |
| अहिंसक म्हणविती शोधूनियां पाणी | ७ |
| | |
| आत्मनिष्ठ ज्ञानी | १३४ |
| आत्मज्ञानी नर धन्य जिवीं आले | १२५ |
| आत्मज्ञानी ब्रह्मऋषी | १७२ |
| आंधळियानीं संगती डोळसाची धरावी | ४८ |
| आपनेकु हलाल करना दर हाल | २९७ |

| | |
|---|---|
| आपले आपण बद्ध आपले आपण मुक्त | ३३ |
| आपुलिया नामासाठीं | ११४ |
| आपुली वाणी थोरी | २१७ |
| आमचा आचार ऐका | १४९ |
| आमुचें नाचणीं, कोणी नाचूं नका | ९० |
| आमुचें संचितीं होतें तैसें जालें | १४१ |
| आम्हां ऐसे गेले किती | १५९ |
| आम्ही निर्गुणपुरचे वाणी | १३१ |
| आम्ही परात्पर योगी | ७५ |
| आम्ही भक्तराज देवा | ७१ |
| आरती अंतरीं लक्ष दसवे द्वारीं | २७७ |
| आरती हो शेख स्वामी वसे चिदानंद योगी | ३३७ |
| आरते आरती उन्मनि अवस्था जेथें | ३३१ |
| आरते आरती सद्गुरु नभा | २७५ |
| आलोखोन भिष्त म्यान | २८१ |
| आवडीनें वोढी विटोनियां सोडी | ८७ |
| | |
| उत्तम हा ठाव नांव दौलताबाद | ३२५ |
| उपजलें तृण निपजलें शेण | २८ |
| उपजीं निपज दृष्टांतें सांगेन | २७ |
| ऊंसा अंगीं खरड कांटे | १३३ |
| | |
| एक मुसलमान व्हावे शाहाणे | ३१४ |
| | |
| ऐक नष्ट तूं भगवंता | ९६ |
| ऐका त्या वनाची रचना | २६४ |
| ऐका नवलाव हा अनुभवार्थ | १५० |
| ऐका श्रोते राजभाविक महा प्रष्टिक | १६७ |
| ऐका संत साधु श्रोते सज्जन | २६३ |
| ऐकोनि निश्चय निर्धारें | ३८ |
| ऐसा आचार नोव्हे बरा (तैसें भजन नव्हेरे०) | २२५ |
| ऐसा आचार नोव्हे बरा (कागा गोदेची०) | २२६ |

ऐसा संतांचा मारग ९५
ऐसी बाहिजकारा प्रमाणें २३९
ऐसी भक्तीची लालुच ९४
ऐसे सद्गुरु क्षेत्रपाळा ६४

ॐकार विस्तारला वर्णावया भक्ति ९१
ॐनमो जी निर्गुणा ५७

औजूद में मौजूद इलाहि ३०७
ओजूद में मौजूद नहिं पाया ३०६

कटावरी कर चंद्रभागा ठाणा २३४
कर्म करूनि अकर्ता २०७
कर्म बळिवंत दारुण २०८
कलियुगाभितरीं पातकें परोपरी २६९
कवि ऐसा निंदक नाहीं हो आणीक २५९
कांतीं सांडवला भुजंग १३२
काय करील गोदा काशी १८७
काय दाखवितां थोरी २२४
काशी नेसी उडसी २१०
कांहीं दिस राहोनि सोहोळा घेतला ३१७
काळतोंडे नकटे बुचे १६३
किती सांगो बेश्रमाला १६४
कैकाये सुंदरा बाळा २५१
कैसा जालासी महात्मा २५५
कोणी नाहीं मेला रडावें कोणाला १७०

खाना खाकर पकडे रोझा २८९
खुळखुळा देऊनि बाळ रिझविलें ३२

गर्भ नसतां पोटीं वनिता कळाहीन १९८
गायका – हरि गाई तुझ्या बारगळा ३५
गुरुकृपा ज्ञान अनुभव परिसन ३४१

गोविंदाचें अंगणीं ५८
गोविंदाचें नाम जीवाचा विश्राम ९८

घडिक वंदी घडिक निंदी ६७
घेऊनियां सवें पांच शत शिष्य ३१८

चराचर व्यापुनी उरतो त्रिभुवनीं १४३
चित् शब्द हृदयीं जतन तत्त्वबोधीं ४१
चौदा भुवनें निर्गुणाची करणी ७०
चौ मुक्तीचा विधि परमार्थ बुद्धि २९

जगीं जागे जयवंत जोगी २४५
जनालागीं आशिर्वाद २६७
जन्मा नाहीं आलों मजलागी जिणें १२७
जन्मा येऊनि काय काज १६६
जय अव्यक्ता निज गुजा २८०
जय जय आरती अविनाश रूपा २७९
जय जय आरती आरक्त रूपा ३३०
जय जय आरती जय अमळा मंगळा ३३४
जय जय आरती जय महंमद शेखा ३३३
जय जय आरती जयवंत परब्रह्मा २७८
जय जय महंमद सद्गुरु ३३५
जय जय सद्‌गुरु दिगांबरा २७४
जय जय सद्गुरु महंमदा आनंदकंदा ३३६
जळो पापियाची दृष्टि २२१
जाणती विचक्षण ज्ञानाचे समुद्र २६
जाणा रे अनुभव जाणा १४८
जाहिर बोले शेख महंमद २९५
जे आपुलें स्वहित न करिती ६८
जेंचि साधन तेंचि बंधन ५४
जेथें मन पवनाची धांव खुंटली १४२
जेथें शब्द तो न समाये ५५

| | |
|---|---|
| जो दिसे तो सर्वेश्वर | २६१ |
| ज्याचे मुखीं नाम कीर्ति | २०६ |
| ज्यानीं लवण सेविलें | २२२ |
| ज्यासी रूप नाहीं रेखा | १३६ |
| झुटे आये दुनिया म्यानें | २९३ |
| ठाईंचीच भ्रष्ट दिवाणी | ६९ |
| डोळे गेले परी न जाय वासना | ९९ |
| तमाखुचा धूर इतरां ओंगळ | २१६ |
| तंव कोणे दिवशीं इच्छेसी पैं आले | ३१६ |
| तळहातां बुबुळा केंस उगवती | २१ |
| ताडावरील मोहोळ पाण्यांत दिसे | १३० |
| तीर्थांव्रतांचें अधिष्ठान | १८८ |
| तूं संन्यासी मी संन्यासी | ८८ |
| तेजरूप सम विषम होतें जातें | १०७ |
| तैसा एक कुळीं पापें करी चांडाळ | ८४ |
| तैसा तो श्रीहरि नेणती अविचारी | १०९ |
| तैसा साधुसंता उपज निपज | १७४ |
| तैसें नव्हें म्हणती वेडे | ५० |
| थोडा हा संसार जाईज ना | १६८ |
| दायम कायम रहेंगे साचे अल्ला | ३०१ |
| दिल भये वैरागी | ३०३ |
| दिलें दान उच्चारी हीन भांड नगारी | २१८ |
| दुचष्मा–जलालियत तमोगुण | ३४० |
| दुरूनि डोंगर दिसती शोभिवंत | ८० |
| दुसऱ्याचें अवगुण आपण सळों नये | २०४ |
| दुसऱ्याचें ठावें गुण आपण सळों नये | २०५ |
| देह अभिमानें नटशील झोंडा | १५४ |

| | |
|---|---|
| देह गेला जातो सांडूनी | १६० |
| देहें सावधान आत्मा कोठें आहे | १२६ |
| दों दिवसांचा पाहुणा | २२३ |
| द्विज सरलिया विझुनि जाय दिवा | १६९ |
| | |
| धन मना तूं सज्ञाना घेतला हरिनाम लाहो | १४० |
| धन्य चांद बोधले | ४० |
| धन्य तो परमात्मा | ३२३ |
| धन्य तोचि भाव धन्य तेचि भक्ति | ४२ |
| धर्म जागो महंमदाचा | ३२७ |
| धर्म जागो म्हणतसे | २४६ |
| धर्म दाता जनार्दन | २४७ |
| | |
| नको सोडूं घर रे नको सांडू दार | २२७ |
| नकट्याची बुचा देतसे ग्वाही | २२० |
| नमिला अविनाश गणेश | २२१ |
| नरदेह लाधले पुण्यें संचित केलीं | ३ |
| नरदेह लाधल्या स्वहित तें करा | १५५ |
| नरदेह लाधोन जितां मृत्य पावती | १७ |
| नरदेह लाधोन बोलत ना गोड | १५७ |
| नरदेह संचित पुण्य | १६१ |
| नसिहतनामा–बिस्मिल्ला अल्ला हो अकबर | २८३ |
| नसे परनारीचा अभिलास | २७२ |
| न होता पाखांडी म्हणविती साधु | २५ |
| नाम जीवाचें जीवन | १०० |
| नाशीवंत काया जाईल विलया | १५८ |
| नाहीं जात येत शिवशक्ति मेळीं | ११७ |
| निपजला खरें दिसे बा जनाला | १२ |
| निर्गुण म्हणो न ये आकार निराकार | ११० |
| निर्शुन्यें निराळा श्रीहरि | २३८ |
| निश्चिविण कवि भांड | २६० |
| निष्कलंकप्रबोध–पाणी प्याल्याविण | १ |
| नेकोंके सात अल्ला की बात | २९० |

पडताळुनि सुऱ्या पशू विदारिती ३०
पंढरीचा महिमा २३७
परमार्थ विवेक वैरागी ७४
परमार्थाचें सार निज गोड गोष्टी २२
परमार्थाच्या द्वारीं लावूनि बोरांटी ११८
परासी उपदेश करीत नेटका ७७
पर्जन्य पडला नदीपूर आला १९१
पवनविजय–तत्त्वसार–ॐनमो जी अव्यक्तरामा पृ. १
पवनविजय–पवनविजयाचें ज्ञान पृ. ६
पवनविजय–काळज्ञान–आतां काळज्ञानाची कुसरी पृ. २५
पवनविजय–काळाचें भोजन पृ. २८
पवनविजय–छाया पुरुषाची धारणा पृ. २६
पवित्रांच्या कीर्ति अपवित्र वाणिती १९
पहिली ओवी माझी सद्गुरुचे पायीं ४४
पाणी प्याल्याविण नव जाय तहान १
पांचवें काया धुणें मळिनाची मळी १६
पुरें पुरें ह्या जनासी संनिधान १९५
प्रकार स्नानाचा आणि पंचविसाचा १५
प्रकृति देह ढाळ जीवासी जंजाळ ११९
प्रतिमा दुषिल्याचा राहिला अन्वय ३२
प्रपंचीं असतां परमार्थ साधिले २११
प्रीतिविण रुसणें मूर्खवाद ६१
पृथ्वी आप टीका विवेकें चर्चिली १०६
पृथ्वीचीं पापें तीर्थजळीं फिटतीं १८४
प्रेम सुरत लागीं ३०४

फट गे रांडे झट गे केलें २५३
फुलसे फुलांमाजी ५९

बंधुपणें खरें राम लक्ष्मण २४
बरवा जालों मुसलमान १७८
बाभळेच्या झाडा आंबे आले पाडा १७७
बिस्मिल्ला अल्ला हो अकबर २८३

| | |
|---|---|
| बुबुळांत बुबुळें त्यांत रूप निराळें | १४४ |
| ब्रह्मपुरीचे तुरुक | १७९ |
| ब्रह्मा विष्णु रुद्र फोद्याचे कामारी | २१९ |
| भक्त कवेश्वर जन्मतील सृष्टीं | ८३ |
| भलतिये यातीचा असो पै भक्त | ७२ |
| भांडानें बुडविलें घर | २२८ |
| भाडियाचें घर घेतलें बिऱ्हाड | ५६ |
| भाव कैसा सांगेन सर्व परी लीनता | २३ |
| भाव भक्ति निष्ठा कवि | ९२ |
| भाव भक्ति बोध शांति | ९३ |
| भावेंचि स्मरा तुम्ही एक सर्वेश्वरा | २२९ |
| भूदेव ते ब्राम्हण सर्व वर्णां श्रेष्ठ | ३४ |
| | |
| मग ग्रासिलें ज्यालेंपणें | २४० |
| मज निजरूपीं आवडी | १२० |
| मध्य शेवटाविण नाहीं पाठपोट | १११ |
| मन कल्पना बोडित ना | १८५ |
| मन मुरालें द्वैत विरालें | ११३ |
| मनाची भाकरी मज द्या न्याहारी | २१४ |
| मनुष्य जन्म रत्न | १६२ |
| मनुष्य देहीं अति नष्ट | १६५ |
| मले तारी बा गोविंदा | १०२ |
| मागें शुन्य पुढें शुन्य | १०१ |
| माझें मन गुरुपायीं चेइयलें | ३४२ |
| माझें मी जाणें हो जाणणें | १३९ |
| माझ्या चिताचा मीच ग्वाही | १४६ |
| माया हे आदि शक्ति भवानी | २५२ |
| मी माझें कवण हें करी शोधन | २१२ |
| मूर्ति एकली मी देखली | १२१ |
| मुलाच्या हातची सिंत्रून भाकरी | ९ |
| मुसलमान ली पछयान | ३१३ |
| मैदा नष्टाच्या गांवीं | १९३ |
| मोतियाचें डोहीं चंद्रमा बुडाला | १३५ |
| म्हणवी गरोदर घड्या बांधूनि पोट | १९९ |

| | |
|---|---|
| या अल्ला या अल्ला, या महंमद नबी | २८५ |
| या अल्ला या मौला | २८६ |
| येई वा सद्गुरु माझिया भेटीस | ४६ |
| योनी ध्यानें मरती पुन्हा योन्या होती | १८ |
| | |
| रसना चवि निवडी लोभेंद्रिय तृप्त | २ |
| राखील जो मोरी लाज साइयां | ३०२ |
| राधा सुंदर चतुर कामिनी अंग टाकी धरणी | २६६ |
| राम जपा मंत्र सोपा | १०३ |
| राम नव्हे दाशरथी | २३३ |
| राम नाहीं कृष्ण नाहीं | १५१ |
| रामापरतें कृष्णा अरुतें | १२२ |
| रामीं आराम आरामीं राम | १३७ |
| राहावे दूरी (अर्धवट) | १०४ |
| ऋतुवंती जालिया वरी | ६२ |
| | |
| लटिकें आलें लटिक्याचें पोटीं | १९२ |
| लळितीं लळीत जालें | २४१ |
| ला इलाहा इल्लल्ला हो मोहंमद | २८७ |
| लानत होय तीनकूं | २९२ |
| | |
| वरदळें आंघोळी अंतर्यामीं रांगोळी | ८९ |
| वस्त्राआड नग्न | १५५ |
| वागवून वस्त्रें करितील क्षौर | ६ |
| वागा सद्गुरुचे पथेन | ५१ |
| वाचा शिश्न योनी आवरा नरनारी | १५६ |
| वायुरूप हरि वंदक निंदक | १०८ |
| वासुदेव घालितो घिरटी | २४३ |
| वासुदेव घालितो फेरा | २४४ |
| वासुदेव मिसें गा संत घालिती फेरा | २४२ |
| विटंबिलें कांदे परसाती | ५३ |
| विटंबुनी संसारा बुडवूनी आचारा | ५ |
| विठला दातारा कृपेच्या सागरा | ९७ |

विनायका स्वयंभा २३२
विवेक वैराग्य बोध चर्चितसे शेख महंमद-मदालसा ३९
विप्र जन्मा आलिया नाहीं नाम विवेक १७५
वि म्हणजे विकासला २३५
वोवो रसें वोविया अव्यक्तला आवडी ४३
यतिरिक्त शब्दें आदि अंतीं आत्मा १४

शिष्य म्हणवूं तरी शिष्यत्व नाहीं केलें ३२८
शूर म्हणविती पाटीवर घाय ७९
शेख महंमद एकसरें ११२
शेख महंमद कहे दोजख ३०९
शेख महंमद कहे ना मानो ३१२
शेख महंमद कहे बहुत ३१०
शेख महंमद कहे लिखे कागज ३०८
शेख महंमद कहे हिंदु ३११
शेख महंमद चरित्र : शेख महंमद पीर ३१५
शेख महंमद जनांप्रती २६८
शेख महंमद नापिक २५७
शेख महंमद परद्वारीं १४७
शेख महंमद पीर, कबिराचा अवतार ३१५
शेख महंमद पीर जयरामाचे नमस्कार ३२४
शेख महंमद बोले बानी २८८
शेख महंमद बोले विज्ञान २३०
शेख महंमद मुळीं आले १२३
शेख महंमद रडे ना माया अश्रुपाते १२८
शेख महंमद रे राऊत १२४
शेख महंमद वणजारा २४८
शेख महंमद वैरागी १७३
शेख महंमद शूरपणें शब्दरत्नें २५४
शेख महंमद षड् अक्षरी मंत्र हा श्रेष्ठ ३३२
शेख महंमद साधु म्हणतां पहातां प्रत्यक्ष यवन ३३९
शेख महंमदाचे संगती २०३
शेख महंमदाच्या विटाळें १८०
शेख महंमदा येणें जाणें नाहीं साचार ३३८

शौच्य ( शुच ) सांवळी हीन याती १८२
श्री गुरु शेख महंमद नयनीं अवलोका भावें ३२९
श्रीसद्गुरु परात्परा ३२८
श्रीहरि तू देव कैसा ११६
श्रोतेराज ऐका सांगतो गुज टीका २१५
श्वानाच्या ढुंगला प्रीति श्वान चाटी ८१
श्वानापरिस हीन मज केलें श्रीहरि १५२

सकळ तीर्थांच्या अधिष्टाना ६३
संख्या तेव्हां झाली अडीच वर्षांची ३२०
सगुण वंदिती अवगुण निंदिती १७६
संचित आचरे जना २०९
संत म्हणवी आपणा १८९
सत्यार्थ बोलती अधःपाता जाती १४५
सद् सखोल तूं सपुरा ३४३
सद्गुरु वासुदेवा कां वर्णू बा तुज ३२६
सद्गुरु सर्वेश्वरु मायेबाप गुरु ४७
सद्गुरु सांचे पिरू ४१
सर्व लहान थोरां भोजनपर्वें झाली ३२१
सल्लाम गुरुनाथा २४९
सल्लाम मोहंमद नबि सादात २८२
सहज हाटा आले हाटकरी २५८
सहा दर्शनांमाजी छत्तीस पाखंडें १०
सहा शत एकवीस हजार फेरीली रत्न जपमाळ ७६
सांचे अल्ला सुनिके मन लागो ३००
सांचे पीरके मुरीद निके ३०५
सांडून सलाम दंडवत उच्चारी ८
साधूचीं लक्षणें नसती जयापासीं ७८
साधूच्या नमस्कारा लाजसी गव्हारा २०२
साधु बळियाचे बळी ६६
साधुला पाहातां परावृत्त दृष्टी ८६
साधुसंतांची चेष्टा करितां बहु खोटी २०
साधुसंतांचें धुवट १९४
साबुन सांडुनि नासिली कावी ५२

| | |
|---|---|
| सिजरा जदी कादरी–तंतरबुल अलमीन | ३२२ |
| सुंगध चंदनीं धांवे धृति झांका | १२९ |
| सुनो मुसलमानीका जमाना | २८४ |
| सुपर्रात विपरीत | २६२ |
| सेवी आवडी मध दवडुनी त्या माशा | ११ |
| सोंवळें वोवळें भाविती लटिक्या | १८३ |
| स्त्री आधीन असेल जो प्राणी | २०१ |
| स्वयें ब्रह्म असोनि मी देह म्हणती | ३१ |
| स्वयें ब्रह्म झालों | ३२ |
| | |
| हमारी जिक्रिर पढे तुमारी जिक्रिर कथा | २९८ |
| हरि गाई तुझ्या बारगळा | ३५ |
| हरि गाऊ निर्गुणराया | २५० |
| हरि दुर्बळ तुझा तेली | २४६ |
| हरिनामीं मरतां | १८१ |
| हरिभक्त म्हणविणें शूद्रीसी रमणें | २१३ |
| हांकली बोंवली रडे भुलुनि तोंडे भांडें | ४ |
| हांसोनि जयराम तेव्हां बोलियेला | ३१९ |
| हिंदोळा बैसोनि तमासा | २६५ |
| हुरळल्या मैंढ्या लागल्या लांडग्यापाठीं | १९७ |
| ह्या कलियुगाची भक्ति | २७० |
| हृदयवासी आम्ही | ७३ |
| | |
| ज्ञानगोंदेचे वासी | १८६ |
| ज्ञानी होती बहू विज्ञात्यांचा दुकाळ | ८२ |


REFBK-0011966
REFBK-0011966
११९६६
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३५३८ वि:
क्रमांक ७४७० नों वि: १५।११।६४